

अनुक्रमणिका

भाषा आपली सर्वांचीच

अविनाश बिनीवाले

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

अनुक्रमणिका

भाषा — आपली सर्वांचीच

प्रथमावृत्ती
© राज्य मराठी विकास संस्था

प्रकाशक

प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था,
३ महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१
दूरध्वनी : २६५ ३९६६

मुद्रक

न्यू एज प्रिंटींग प्रेस
भूपेश गुप्ता भवन, लेनिनग्राड चौक
प्रभादेवी, मुंबई — ४०० ०२५.

अक्षरजुळणी

सुधीर कुलकर्णी
नेरूळ/नवी मुंबई.

मूल्य

दीडशे रुपये.

अनुक्रमणिका

अर्पणपत्रिका

मला समर्थ मराठीचा आधार देणाऱ्या

इंग्लिश, फ्रेंच शिकवणाऱ्या

इतर अनेक भाषा शिकायला प्रोत्साहन देणाऱ्या

जगभर हिंडण्याची आवड निर्माण करणाऱ्या

माझ्या आद्यशिक्षकांना – माझ्या आईवडलांना

सप्रेम!

अविनाश

अनुक्रमणिका

निवेदन

भाषांविषयक विविध प्रश्नांच्या संदर्भात जिज्ञासू वाचकांची जाण अनेक अंगांनी वाढविणे हे राज्य मराठी विकास संस्थेला आपले एक महत्त्वाचे कार्य वाटते. ते उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून आम्ही पुढील पाच पुस्तके या वर्षी प्रकाशित करीत आहोत. डॉ. मिलिंद मालशे आणि डॉ. गीता भागवत यांच्या आम्ही यापूर्वी पुरस्कृत वा प्रकाशित केलेल्या दोन पुस्तकांना ('आधुनिक भाषाविज्ञान' आणि 'प्रशासनिक मराठी भाषेचा विकास') वाचकांनी उत्तम रीतीने दाद दिली आहे. जाणकारांनी पारितोषिके देऊन त्यांचा सन्मान केलेला आहे.

नव्याने प्रकाशित होत असलेल्या पाच पुस्तकांपैकी कालदृष्ट्या पहिले अभ्यासपूर्ण पुस्तक आहे कै. प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांचे 'शिक्षण, शिक्षक व सध्याचा अभ्यासक्रम'. मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेत त्यांनी या विषयावर दिलेली व्याख्याने पुस्तकरूपाने १९०६ साली प्रकाशित झालेली होती. परंतु दुर्दैवाने आज त्या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध नाहीत. अभ्यासक्रमात मराठी कशासाठी शिकवायचे या प्रश्नाचे उत्तर जसे या व्याख्यानांत पटवर्धनांनी दिले आहे तसेच सर्व शिक्षणक्रमात, सर्व स्तरांवर मराठीचे स्थान आणि स्वरूप कसे असावे याचे विवरण केले आहे. हे करताना त्यावेळी त्यांच्या डोळ्यांसमोर जो जर्मनीतील भाषाशिक्षणाचा आदर्श होता त्याच्याशी त्यांनी आपल्याकडील भाषाशिक्षणाच्या वस्तुस्थितीची तुलना केलेली आहे. शालेय शिक्षणाशी विविध अंगानी संबंधित असलेले आणि स्वतंत्रपणे लिहिले गेलेले अर्वाचीन मराठी वाङ्मयामधील हे पहिले मराठी पुस्तक आहे. आम्ही हे पुस्तक प्रकाशित करताना त्याला अद्याप वर्तमानकाळातील शैक्षणिक परिस्थितीच्या संदर्भातही अर्थपूर्णता कशी आहे हे लक्षात यावे या दृष्टीने अभ्यासपूर्ण प्रस्तावना व तळटिपांची जोड दिली आहे. आमच्या विनंतीवरून प्रा. रमेश पानसे यांनी हे अत्यावश्यक काम केले. गेली पंधरा वर्षे एक अभ्यासक-कार्यकर्ता या नात्याने प्रा. पानसे यांना पूर्वप्राथमिक, प्राथमिक आणि ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाशी विशेष जवळून संबंध आलेला आहे.

प्रा. वा. ब. पटवर्धन यांचा परिचय त्यांनी प्रकट केलेल्या विचारांवरून वाचकांना होईलच. पण आवर्जून आणखी दोन-चार गोष्टींचा उल्लेख इथे करावयास हवा. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात पटवर्धन हे इंग्रजीचे अत्यंत नाणावलेले असे प्राध्यापक होते. शेक्सपीअरची नाटके आणि शेली, कीट्स् बायरन आदी रोमँटिक कवींची कविता उत्तम रीतीने शिकविण्याबद्दल त्यांची महाविद्यालयात विशेष ख्याती होती. त्याचबरोबर मराठीतील प्राचीन संतकवितेपासून त्यांना समकालीन असणाऱ्या रविकिरण मंडळाच्या कवितेपर्यंतच्या मराठी कवितेचे ते एक चोखंदळ समीक्षकही होते. न्या. रानडे, सुधारकाग्रणी गो. ग. आगरकर आदि शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच्या मान्यवर लोकनेत्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा पुरस्कार करताना जो विचार केला होता, त्या विचारसरणीला धरून काम करणारे पटवर्धन हे एक कार्यकर्तेही होते. त्यांच्या विषयीची ही पूर्वमाहिती सांगण्याचा उद्देश मराठीविषयक त्यांनी केलेल्या प्रतिपादनाचे नेमके वजन वाचकांच्या लक्षात यावे हा आहे.

दुसरे प्रकाशित होणारे पुस्तक 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' हे कै. श्री. के. क्षीरसागर यांच्या भाषाविषयक लेखांचे श्रीमती शकुंतला क्षीरसागर यांनी केलेले संकलन आहे. विविध भाषांतील दर्जेदार साहित्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या क्षीरसागरांचे हे लेखन वेळोवेळी अनेक नियतकालिकांतून आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले होते आणि त्या त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, कविवर्य माधवराव पटवर्धन आदी भाषाशुद्धीच्या पुरस्कर्त्यांशी त्यांनी घेतलेल्या वैचारिक झुंजीसाठी गाजलेलेही होते. हे लेख वाचताना

अनुक्रमणिका

आमच्या असे लक्षात आले की भाषाशुद्धी, परिभाषेची घडण, मराठीचे लेखन आणि उच्चारण आदी आजही चर्चेत असणाऱ्या प्रश्नांवर प्रा. क्षीरसागर यांनी त्यावेळी जे विचार व्यक्त केले आहेत ते पुष्कळ अंशांनी स्वीकारले तरी गेले आहेत किंवा अजून स्वीकारावेत इतके उपयुक्त तरी आहेत. विवेचनात त्यांनी घेतलेल्या काही उदाहरणांशी आपला मतभेदही होईल. तथापि, आपल्या भाषेत संदर्भात सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे जे प्रश्न घुटमळत आहेत त्यांचाच क्षीरसागरांनी 'मराठी भाषा :वाढ आणि बिघाड'या पुस्तकांमध्ये परामर्श घेतलेला आहे. त्यांचे हे पुस्तक आजच्या लेखक-वाचकांच्या मराठीबाबतच्या संभ्रमित झालेल्या मानसिकतेला निश्चित दृष्टिकोनाची आणि आधाराची बैठक पुरवल्याखेरीज राहणार नाही. कै. क्षीरसागरांनी हाताळलेल्या भाषाविषयक प्रश्नांच्या संदर्भात, नंतरच्या काळात प्रत्यक्ष कार्यानुभवच घेतलेल्या श्रीमती सत्त्वशीला सामंत (निवृत्त उपसंचालक, भाषा संचलनालय, महाराष्ट्र राज्य) यांची प्रस्तावना आम्ही या पुस्तकाला घेतलेली आहे. तीही विषयाच्या संदर्भात आजची भाषिक स्थिती सांगत आवश्यक तेवढ्या माहितीची पुरेशी भर घालणारी आहे. (पूर्वप्रसिद्धी :म. सा. प. , जुलै-सप्टेंबर १९९५) मराठी लेखन आणि व्याकरण यांबाबत सत्त्वशिलाबाईंची स्वतःची एक विशिष्ट भूमिका आहे. तिचा आदर राखण्यासाठी प्रस्तावनेतील काही तत्सम शब्दांचे लेखन त्यांच्या मूळ लेखनानुसार आम्ही ठेवलेले आहे एवढे कृपया वाचकांनी समजून घ्यावे.

तिसरे पुस्तक आहे डॉ. दिनेश द. माहुलकर या बडोदा येथे वास्तव्याला असणाऱ्या आणि बऱ्याच मराठी मंडळीना अपरिचित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भाषावैज्ञानिकाचे 'वृद्धि :- भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन'. 'वृद्धि :'हा पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथातील पहिल्या सूत्रातील पहिला शब्द आहे. तो शीर्षकात योजण्याबाबत डॉ. माहुलकर विशेष आग्रही होते. त्यांचे म्हणणे असे आहे की, विविध प्रकारची कुंपणे तोडून पलीकडे हा पाणिनीचा मंत्रच भाषाविकसनाच्या संदर्भात आज विशेष अर्थपूर्ण ठरतो आहे. पाणिनीचा हा विचार जितका जुना तितकाच नवाही आहे. भाषा विषयावरील डॉ. माहुलकारांचे आजवरचे सर्व लेखन इंग्रजीतून झालेले आहे. हे त्यांचे पहिले मराठी पुस्तक प्रकाशनासाठी आम्हांला देऊन त्यांनी राज्य मराठी विकास संस्थेचा बहुमान केला आहे, अशी आमची कृतज्ञता भावना आहे. डॉ. माहुलकर यांच्या विचारांचा व कार्याचा परिचय, राज्य मराठी विकास संस्थेच्या संस्थांपकांपैकीच एक असलेले ज्येष्ठ भाषावैज्ञानिक डॉ. अशोक केळकर यांनी प्रस्तावनेत समर्थपणे करून दिला आहे. त्याची पुनरावृत्ती मी करीत नाही. पण जगभर झालेली भाषाविषयक विचारांची गेल्या काही शतकांतील वाटचाल या पुस्तकात डॉ. माहुलकर यांनी ज्या सुबोध बोली मराठीत उलगडून दाखविली आहे तिने वाचक स्तिमित झाल्याखेरीज राहणार नाहीत एवढे मात्र इथे आवर्जून सांगायला हवे. डॉ. माहुलकर यांनी पाणिनीचा 'वृद्धि:'हा मंत्र उच्चारीत काढलेला वरील निष्कर्ष तर आपली मान उंचावणारा आहे.

या पाच पुस्तकांच्या संचातील चौथे आणि पाचवे पुस्तक आहे अनुक्रमे श्रीमती सुमन बेलवलकर आणि अविनाश बिनीवाले यांचे. या दोघांनी 'लोकसत्ता' या मान्यवर दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीत १९९४ ते १९९९ या काळात जी भाषाविषयक सदरे लिहिली त्यांचे हे संकलन आहे. 'बेलभाषा' आणि 'भाषा-आपली सर्वांचीच' ही दोन्ही पुस्तके भाषाविषयक दोन वेगळ्या विचारक्षेत्रांचा विनोदात्म शैलीत परामर्श घेतात. सुमन बेलवलकर यांना परभाषिकांना मराठी शिकवताना जे स्वभाषेचे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन झाले ते त्यांनी मोठ्या खेळकरपणाने छोट्या छोट्या लेखातून टिपले आहे. अविनाश बिनीवाले यांनी मराठी भाषिकाला वर्णमाला, लिपी, उच्चार, इत्यादींच्या संदर्भात जगातल्या विविध भाषांच्या व्यापक विश्वातून गंमतीजंमती सांगून फिरवून आणले आहे. या दोघांनीही स्वतःच्या पुस्तकाला ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्याही त्यांच्या मूळ विवेचनात अधिक भर घालणाऱ्या आहेत.

अनुक्रमणिका

अविनाश बिनीवाले यांनी वरील सर्व पुस्तकांची जुळवाजुळव करताना वेळोवेळी विचारविनिमय करण्यामध्ये, पुस्तकांच्या मुद्रणाच्या संदर्भात विशेष सहकार्य केले आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानते. त्याचप्रमाणे या प्रकाशन प्रकल्पात सहकार्य देणारे लेखक, प्रस्तावनाकार यांचेही आम्ही ऋणी आहोत. तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयातील माझे सहकारी अनिता जोशी, कविता महाजन, गिरीश पतके, स्मिता जोशी, नेहा मोहोड, सरोज भंडारी, ज्योती जोशी यांनीही कामाचा आपापला वाटा आनंदाने आणि हौसेने उचलला आहे. त्यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळेच दिनांक २७ फेब्रुवारी रोजी, कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी ही पुस्तके प्रकाशित होत आहेत.

गेली काही वर्षे महाराष्ट्रात कुसुमाग्रजांचा वाढदिवस हा मराठी दिवस म्हणून साजरा होत आला आहे. यंदा कविवर्य आपल्यामध्ये नाहीत. राज्य मराठी विकास संस्थेला त्यांचे सहकार्य अनेक प्रकारे लाभले होते. कृतज्ञतापूर्वक त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून ही भाषाविषयाचे वेगवेगळे पैलू दिग्दर्शित करणारी पुस्तके आम्ही त्यांच्या जन्मदिनी प्रकाशित करीत आहोत.

सरोजिनी वैद्य
संचालक
राज्य मराठी विकास संस्था
मुंबई – १.

दिनांक २७ फेब्रुवारी, २०००.

अनुक्रमणिका

मनोगत

भाषा हा मानवी संस्कृतीचा महान ठेवा आहे. मानवी संस्कृती म्हटल्यावर खरं तर त्यात आपपरभाव यायचं काही कारण नाही. सर्व भाषा आपल्याच आहेत. पण प्रत्यक्ष व्यवहारात दुर्दैवाने तसं घडत नाही. सर्वांना जोडणारा दुवा ठरण्याऐवजी बऱ्याच ठिकाणी भाषेच्या नावावर माणसांना एकमेकांपासून तोडण्याचे प्रकार होत असलेले दिसतात ह्याचं मुख्य कारण म्हणजे आपलं एकमेकांबद्दलचं घोर अज्ञान, स्वार्थ, अहंगंड, हेवेदावे, उच्चनीचतेच्या कल्पना, राजकीय बेरीजा-वजाबाक्या अशा अनेक गोष्टी असतात की ज्यामुळे आपण एकमेकांना दुरावत चाललो आहोत.

गेल्या काही दशकांत आणखी एक चमत्कारित चित्र दिसू लागलं आहे की अनेक भाषासामुदायांना आता आपलं काय होणार, तथाकथित मोठ्या भाषांचे समुदाय आपल्याला गिळून तर टाकणार नाहीत ना अशी भीती वाटायला लागली आहे. भाषेत अंतर्गत बदल होत असतात तसे तिच्या बाह्य परिस्थितीतही होत असतात, चढ-उतार चालू असतात. जगातल्या अनेक भाषांनी असे चढउतार अनुभवले आहेत, आपल्याला ती माहिती कळली तर आपणही तशा परिस्थितीला तोंड द्यायला तयार होऊ शकू.

दुसऱ्या महायुद्धानंतर इझराएलनं मृतवत झालेल्या हिब्रू भाषेला पुनः जिवंत केलं हे उदाहरण आपण ऐकतो. पण त्यांनी नक्की काय केलं, का केलं हा तपशील सामन्यांपर्यंत पोहोचत नाही. इंग्लिश भाषेचं साम्राज्य तयार होतं पण त्यातलं रहस्य आपण समजून घेत नाही. आपल्या आसपासच्या भाषिक क्षेत्रांतून काय चाललं आहे हेही आपल्याला बऱ्याचदा माहीत नसतं.

आज जागतिकीकरण हा परवलीचा शब्द झाला आहे. आपला अजूनही असा समज आहे की जागतिकीकरण म्हणजे जगभरातल्या विविध वस्तू आपल्या घरात आणून त्यांचा उपभोग घेणं! जागतिकीकरण म्हणजे आपल्या तरुणांनी, उद्योजकांनी

देशोदेशी जाऊन पराक्रम गाजवणं, जग काबीज करणं. आज ह्या जागतिकीकरणाच्या निमित्तानं आपल्याला आपल्या भाषानांही मोठं करण्याची संधी आली आहे, आपण तिचा उपयोग करून घेणार की दवडणार हे आपल्या विजिगीषू वृत्तीवरच अवलंबून आहे. ह्या बाबतीत अगदी अलीकडची चीनमधली घटना लक्षात घेण्यासारखी आहे. संगणकाच्या क्षेत्रात मायक्रोसॉफ्टनं आपला 'विन्डोज' कार्यक्रम आणून जगातल्या साऱ्या देशांमध्ये खिंडारं पाडली; पण चीनमध्ये मात्र त्यांना प्रवेश नव्हता. विन्डोज आज्ञावलीवर आमची चिनी भाषा आणा नि मगच तुमचे कार्यक्रम विका अशी अट चीनी सरकारानं घातली. हे आव्हान स्वीकारून मायक्रोसॉफ्टनं आपला पैसा, बुद्धिमत्ता नि कसब एकवटून चिनी-चित्रलिपी संगणकावर बसवण्याचं ऐतिहासिक कार्य पार पाडलं नि चीनच्या बाजारात प्रवेश केला. चिन्यांनी दाखवलेल्या हुषारीमुळे त्यांचा, त्यांच्या भाषेचा केवढा फायदा झाला!

जागतिकीकरणाच्या रेट्यात आपण हरवून जायचं, नष्ट व्हायचं की पराक्रम गाजवून विजयी व्हायचं हे आपल्या मनोवृत्तीवरच अवलंबून आहे. 'इंग्लिश आली, पळा!' किंवा 'चिनी आली, धावा धावा!'असं म्हणून आपण घाबरून जाणार असू, आलेल्यांपुढे स्पेशल लोटांगण घालणार असू तर आपल्या भाषेचं, म्हणजेच आपल्या संस्कृतीचं नि पर्यायानं आपलं अस्तित्वच संपून जाईल ह्यात काही संशयच नाही! त्यानंतर आपण केवळ 'प्राणी' म्हणून जगत राहू. तसं झालं तर राजकीय दृष्टया नाही तरी सांस्कृतिक

अनुक्रमणिका

दृष्टया ते जिणं गुलामगिरीचंच असेल. आज दुर्दैवाने अशी अनेक उदाहरणं आफ्रिकेत दिसतात; हा धोका आपल्या उंबरठ्यापाशी येऊन ठेपलेला आहे एवढंच नव्हे तर त्यानं ईशान्य भारतात चंचूप्रवेशही केलेला आहे.

एखादी भाषा मरणं म्हणजे ती संस्कृती मरणं नि एकूण मानवजातीचं ते फार मोठं, कधीही भरून न येणारं नुकसान असतं हे जगातल्या जाणत्यांना ठाऊक असलं तरी 'व्यापाऱ्यांना'त्याची पर्वा नसते; बऱ्याचदा राजकारणीही अगतिक बनतात; तेव्हा जागतिकीकरणाच्या लाटेत संस्कृतीचा विचार करणाऱ्यांनी वाहून जाता कामा नये. तो आपल्या केवळ अस्मितेचा नव्हे तर अस्तित्वाचा प्रश्न म्हणून गांभिर्याने बघायला पाहिजे. आपण जागरूक राहिलो तर आपण नव्या लाटेत निश्चितपणे टिकून राहू, स्वतंत्रपणे वाढू, समृद्ध होऊ!

देशांच्या तथाकथित राजकीय सीमा ओलांडून जाणारं तंत्रज्ञान आज आपल्या हाती आलं आहे, त्याचा योग्य उपयोग करण्याची हुषारी आपण दाखवली तर आपल्या भाषेला जागतिक स्तरावर नेणं सोपं आहे कारण मुळातच मराठी ही संख्येच्या दृष्टीनं जगातल्या मोठ्या भाषांपैकी एक भाषा आहे, पण तेवढं वाटणं पुरेसं नाही. मुळात म्हणजे आपण आपल्या भाषेचा सर्व क्षेत्रात वापर केला पाहिजे, जास्तीत जास्त ठिकाणी ती आग्रहानं वापरली पाहिजे, आपल्या विचार-चिंतनाचं आणि शिक्षणाचं माध्यम म्हणून तिचाच वापर केला पाहिजे. एवढी एक गोष्ट आपण प्रामाणिकपणे केली तरीही नव्या ज्ञानाच्या दृष्टीनंही सक्षम बनून ती ज्ञानभाषा होण्यात कसलीही अडचण नाही. सारं काही आपल्याच हातात आहे.

साऱ्या भाषा आपल्याच आहेत, आपण त्या शिकाव्या, गरजेनुसार त्यांचा उपयोग करावा, आपलं जीवन समृद्ध करावं. . . हे सगळं करताना आपली भाषा-संस्कृती सोडण्याची गरज नसते हे आपल्याला भाषांच्या अभ्यासामुळे कळतं, आपल्यात दडलेला अतिरेकी 'संपतो'.

संस्कृतीचा ठेवा मुख्यतः भाषेच्या आधारानंच टिकून असतो; म्हणूनच संस्कृतीच्या संरक्षणात, संवर्धनात भाषेचं स्थान अनन्यसाधारण आहे. भाषांच्या संदर्भातल्या महत्त्वाच्या मुद्द्यांची मुळात माहिती देऊन चर्चा व्हावी असा विचार होता. त्यासाठी एखाद्या योग्य मंचाचा मी शोध घेत होतो. सुदैवाने मला तशी संधी लोकसत्तेचे संपादक डॉ. अरुण टिकेकर ह्यांनी दिली. भाषा हा तसा न संपणारा विषय आहे, तेव्हा व्यावहारिक अडचणी लक्षात घेता जुलै, १९९८ ते डिसेंबर १९९९ ह्या अल्प काळात भाषेच्या काही पैलूंवर 'भाषा-आपली सर्वांचीच' ह्या सदरात माझे आठ्याहत्तर लेख लोकसत्तेत प्रकाशित झाले. सरोजिनी वैद्य ह्यांच्याशी चर्चा करून त्यातील विविध भाषा, लिप्या, लेखन, संस्कृती अशा विषयांशी संबंधित काही लेखांची ह्या पुस्तकासाठी निवड केलेली आहे. त्या निवडक, संस्कारित लेखांचं संकलन आज ह्या पुस्तकाच्या रूपानं प्रकाशित होत आहे.

पुस्तकाची जुळवाजुळव करताना राज्य मराठी विकास संस्थेच्या सर्व कर्मचारी-सदस्यांनी मला वेळोवेळी जे सहकार्य केलं त्याबद्दल त्यांचा आभारी आहे!

अविनाश विनीवाले

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१. हावभावांची भाषा १२
२. गोड भाषा १४
३. खणखणीत उच्चार १६
४. आघात १८
५. . . . . . पण सिंह गेला! २१
६. भाषा — शुद्ध आणि अशुद्ध २३
७. क्रियेवीण वाचाळता २५
८. य: क्रियावान् २८
९. हवाल्यावर टवाला ३०
१०. नसणे ३२
११. परिभाषा ३४
१२. नाती गोती ३६
१३. हस्ताक्षर ३८
१४. भारतीय लिप्यांची एकात्मता ४१
१५. मराठी वर्णमालेचे तक्ते ४३
१६. तामिळलिपिमाहात्म्य ४६
१७. मोडी 'भाषा'? ४९
१८. कुमाऊँतला उलटा प्रवास ५२
१९. अप्रगत लिप्यांची ओढ ५४
२०. अहोऽ, मला वाचता येतंय! ५६
२१. शिघ्रलेखन ५९
२२. संगणकीय साक्षरता ६२
२३. समान कळफलक ६४
२४. लिपी सुधारणा ६७
२५. विरामचिन्हं ७०
२६. जीए सिन्ध! ७३
२७. कश्मीरी-न घरकी न घाटकी ७६
२८. पूर्वांचलातल्या भाषिक समस्या ७८
२९. अरबीची सुरस कथा ८१

३०. चिन्यांचं चित्रमय चक्रव्यूह ८४
३१. रूसी टोपी ८७
३२. हिन्दी हैं हम! ८९
३३. भाषांचं ओझं ९२
३४. तिसऱ्या जगासाठी—डायरेक्ट मेथड ९४
३५. भाषेचा शिक्षक ९६
३६. भाषांचं अध्ययन ९८
३७. डूडन् प्रामाण्य १००
३८. ज़ीप्स्-प्रामाण्य १०३
३९. द्वैभाषिक शब्दकोष १०६
४०. भाषेची ओढ १०८
४१. अर्धं त्यजति पण्डितः ११०
४२. भाषिक साम्यं ११४
४३. अनेकभाषाकोविद ११७
४४. स्त्रीचं भाषिक स्थान १२०
४५. मराठीचं भवितव्य १२३
४६. कानडीने केला मराठी भ्रतार १२५
४७. चांगली भाषा १२८

अनुक्रमणिका

१
हावभावांची भाषा

देवानं, आता तुमचा देवावर विश्वास नसेल तर निसर्गानं म्हणा हवं तर, मानवाला बोलण्यासाठी कोणकोणते अवयव दिलेले आहेत असा प्रश्न विचारला तर तोंड, ओठ, दात, जीभ (हाड नसलेली) , टाळा (जीभ उचलली की लावायला तो हवाच) , स्वरयंत्र इ. असं उत्तर मिळतं; पण खरं तर ह्यातला एकही अवयव देवानं/ निसर्गानं आपल्याला बोलण्यासाठी म्हणून दिलेलाच नाही! सस्तनच नव्हे तर इतर अनेक प्राण्यांना हे सारे अवयव असतातच आणि त्यांचा उपयोग ते निसर्गनियोजित पकडणे, चाटणे, चावणे, लचका तोडणे, चघळणे, चव घेणे इत्यादी कार्यांसाठी करीत असतात. मनुष्येतर प्राण्यांनी ह्या अवयवांचा उपयोग बोलण्यासाठी अजून तरी केलेला नाही. म्हणूनच मानवाचं वेगळेपण आहे ते त्याच्या भाषेत. हजारो वर्षांच्या प्रयत्नांनी मानवानं भाषा, एखाद-दुसरीच नव्हे तर हजारो-हजारो भाषा विकसित केल्या आहेत.

मानवानं असंख्य भाषा विकसित केलेल्या असल्या तरी त्यानं आपली मूळची प्राणिभाषा सोडून दिलेली आहे असं नाही. अल्प प्रमाणात का होईना पण उठता-बसता तिचा वापर करत असल्यामुळे आपली प्राणिभाषा अजूनही टिकून आहे आणि आपल्या प्राणिभाषांची गंमत अशी की ध्वनी-भाषांप्रमांणेच आपल्या प्राणिभाषांमध्येही भरपूर विविधता आहे!

मांजर रागावलं की आपली शेपटी फुगवून ताठ करतं; तर कुत्र्याला ओळख पटली की तो शेपटी हलवतो. मोराला आनंद झाला की तो आपली शेपटी (पिसारा) पसरतो. शेपटी एकच असली तरी शेपटीवाल्या प्राण्यांच्या हालचालींची, हावभावांची भाषा त्यांच्या-त्यांच्या प्राणिसमाजानुसार भिन्न असते. त्याचप्रमाणे डोकं, हात-पाय वगैरे अवयव सारखेच असले तरी मानवांची हावभावांची भाषा त्यांच्या समाजानुसार वेगवेगळी असते.

हावभावांच्या भाषेत सर्वात महत्त्वाचा (सह) भाग असतो तो डोक्याचा! डोकं हलवून (खरं म्हणजे मान हलवून) आपण माणसं अनेक गोष्टी व्यक्त करतो; पण ह्या मानेच्या हावभाव-भाषेतही इतकी विविधता आहे की भिन्न-भिन्न समाजात त्यामुळे वेगळा समज नव्हे तर गैरसमज होण्याची शक्यताच अधिक! आता अगदी साधं 'हो' म्हणताना आपण मराठीत जशी मान हलवतो तशी ती इंग्लिशमध्ये 'येस्' म्हणताना हलवत नाहीत. एखाद्या इंग्लिश माणसानं तुम्हाला 'आज संध्याकाळी आमच्याकडे जेवायला याल का?' असं (इंग्लिशमध्ये) विचारलं नि तुम्ही त्याला 'येस्' म्हटलंत, पण मान आपल्या मराठी 'हो' सारखी हलवलीत तर तो नक्कीच घोटाळ्यात पडेल;कारण आपण'हो'साठी ज्या प्रकारे मान हलवतो (एखादा डाव्या खांद्यांच्या बाजूला नि मग सरळ उजव्या खांद्याच्या बाजूला) त्या प्रकाराचा अर्थ इंग्लिश माणसाच्या दृष्टीने 'नक्की नाही!', 'बघू, जमल्यास येईन!' असा होतो. 'येस्' म्हणताना इंग्लिश माणूस मान वरून खाली नि खालून वर अशी हलवतो.

'नाही'म्हणताना आपण मान जमिनीला समांतर अशी डावीकडून उजवीकडे (आपला नकाराच्या तीव्रतेनुसार) जास्तीत-जास्त १८० अंशात हलवतो. पण त्याच अर्थानं 'नो' (non) म्हणताना फ्रेंच माणूस एकाच बाजूला मान (नकाराच्या तीव्रतेनुसार) तिरकी करुन दोन्ही खांदे (नकाराच्या तीव्रतेनुसार कमी-

अधिक) उंच करतो. तिरकी मान आणि उचललेले खांदे दिसले नाहीत तर फ्रेंच माणसाला आपला नकार स्पष्टपणे जाणवतच नाही.

समोरच्या माणसाला अंगठा दाखवण्याचा अर्थ आपल्याकडे निश्चितपणे वाईटच होतो. अंगठा दाखवणे म्हणजे काहीही न देणे, क्रूर थट्टा करणे, निराश करणे, खिजवणे, अपमानित करणे अशा तऱ्हेचा अर्थ आपल्याकडे असतो. म्हणजे अंगठा दाखवणे हा प्रकार आपल्या दृष्टीनं वाईट असतो, असभ्य असतो. पण जर्मन माणसं एखाद्याला धीर देताना, प्रोत्साहन देताना उजव्या हाताचा अंगठा दाखवतात!

आकडे मोजताना आपल्या बोटांची जी हालचाल होते त्यात तर इतकी विविधता असते की ते सारे प्रकार पाहून लक्षात येतं की आपल्या हाताला केवळ दहाच बोटं आहेत पण आपण किती प्रकारे वापरतो ती!

भाषा शिकताना ह्या हावभावांचा अभ्यासही अतिशय महत्त्वाचा असतो, अगदी सामान्य माणसालाही त्यातल्या काही प्रमुख, महत्त्वाच्या हावभावांचा अभ्यास प्रयत्नपूर्वक करणं आवश्यक असतं; नाहीतर त्याला जे काय म्हणायचं असतं ते त्याच्या समोरच्या भाषिकाला जाणवणार नाही.

दुसऱ्याच्या प्रदेशात काही गुप्त कामासाठी गुपचुपपणे, म्हणजे हेर म्हणून, ज्यांना जायचं असेल अशा व्यक्तींना तर केवळ शब्दांची भाषा शिकणंही पुरेसं नसतं, त्यांचे हावभावही तंतोतंत त्या-त्या भाषिकांप्रमाणे होणं अत्यावश्यक असतं (नाहीतर गाठ साक्षात मृत्यूशीच असते!) कारण तो गुप्तहेर ज्या प्रदेशात गेलेला असेल तिथले हावभाव जर त्याला नीट आले नाहीतर तिथल्या अगदी सामान्य माणसालाही तो गुप्तहेर आहे हे लगेच लक्षात येईल.

महायुध्दाच्या काळात अमेरिकेतले प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ ब्लूमफिल्ड ह्यांनी युरोपात पाठवल्या जाणाऱ्या अमेरिकन सैनिकांना झटपट जर्मन, इटालियन वगैरे भाषा शिकण्यासाठी काही अभ्यासक्रम विकसित केले होते. त्या अभ्यासक्रमांमध्ये अशा ध्वनि—भाषेच्या आधारानं अत्यावश्यक असलेल्या हावभावांचा समावेश अग्रक्रमानं केलेला होता. ह्या पद्धतीचा उपयोग अमेरिकेनं पुढे कोरियातल्या आणि व्हिएटनाममधल्या युध्दांच्यावेळीही केला होता.

हावभाव ते नैसर्गिक भाषा ह्यांच्यामध्ये आणखी एक प्रकार येतो तो म्हणजे काही हावभावांसहित असलेल्या ध्वनींचा अं, हं, चक् चकसऽ वगैरेसारखे ध्वनी खूप काही सांगत असतात; पण तेही भाषांनुसार, समाजांनुसार बदलतात. एखाद्याला साधी हाक मारायची पद्धतही प्रत्येक भाषेत/सामाजात वेगळी असते. काही भाषांमध्ये एखाद्याला हाक मारण्याचेही अनेक प्रकार असतात. मराठीत अनेक प्रकार आहेत, ते बारकावे अभ्यासणं मनोरंजक तर आहेच पण उपयुक्तही आहे.

भाषा शिकणाऱ्यांनी ह्या साऱ्या गोष्टींकडे बारकाईनं लक्ष देऊन, सातत्यानं निरीक्षण करून त्या जाणून घेणं, त्यांचा सराव करणं आवश्यक असतं.

खरं तर ह्या साऱ्या प्रकारांचा अंतर्भाव आपल्या अभ्यासक्रमांमध्ये सुद्धा असायला पाहिजे, पण तो नाही म्हणून आपण रडत बसायचं कारण नाही! विद्यार्थ्यांनी आपणहून प्रयत्न करावेत. विद्यालय नाही, अभ्यासक्रम नाही, गुरुजी नाहीत म्हणून एकलव्य थांबला होता का ?

अनुक्रमणिका

२.

गोड भाषा

'फ्रेंच म्हणजे की नाही अतिशय गोड भाषा आहे! मला की नाही तीच शिकायची आहे!'पु. ल देशपांड्यांच्या 'एका रविवारची कहाणी मधल्या उच्चभ्रू ललनेप्रमाणे असं काहीतरी म्हणणारे विद्यार्थी / खरं तर विद्यार्थिनीच दर वर्षी नित्यनेमानं भेटतात एवढंच नाही तर आपल्या पाल्यानं शिकायची तर फ्रेचं भाषाच शिकावी, दुसरी तिसरी कोणती भाषा शिकू नये असं अधिकारशाहीनं सांगणारे पालकही दर वर्षी नित्यंनेमानं भेटत असतात.

गोड भाषेच्या शोधात असणाऱ्या आरंभशूर पालकांना आणि त्यांच्या लाडक्या पाल्यांना त्यांच्या 'गोड'बद्दलच्या व्याख्येबद्दल विचारलं तर सामान्यतः त्यांच्याकडे काहीच उत्तर नसतं. आपण त्यांना खोदून विचारल्यास कोणी कोणी उत्तर देतात की फ्रेंचमध्ये की नाही कठोर ध्वनी म्हणजे हार्ड साऊंड नसल्यामुळे स्वीऽट आहे.

भाषेचं माधुर्य ह्या विषयावर सर्व जण आपलं मत नेहमीच अत्यंत आग्रहानं मांडत असतात. भाषा हा विषय मुळातच सर्वांचा असल्यामुळे त्याबद्दल आपलं मत मांडण्याचा, अत्यंत आग्रहानं, हिरिरीनं मांडण्याचा हक्क अर्थात प्रत्येकाला आहेच; पण हा हक्क बजावताना त्यानं आपल्या मूलभूत कल्पना स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे.

भाषेचं माधुर्य हा विषय मुळातच व्यक्तिनिष्ठ आहे. आजच्या संगणकांवर असे कार्यक्रम आहेत की काही मजकूर त्यात घालून, संगणकाला त्याची वाचनीयता किती आहे ह्याची तपासणी करण्याची आज्ञा दिली की तो अक्षरशः काही सेकंदात आपल्याला त्यात दिलेल्या मजकुराची चिरफाड करून, त्यांत किती शब्द आहेत, किती वाक्य आहेत, किती कर्मणी रचना आहेत इत्यादी आकारिक माहिती देऊन, त्या मजकुराची वाचनीयता किती आहे हेही सांगतो! असा एखादा संगणकीय कार्यक्रम अजून तरी अस्तित्त्वात नाही की ज्यात काही शब्द/वाक्य घातल्यावर तो त्यांची ध्वनिशास्त्रीय मीमांसा करून काही वेळात आपल्याला त्या चाचणीचा निर्णय देईल; सांगेल की बाबा रे, ह्या परिच्छेदात ५० टक्के 'गोडी' आहे! गोड कशाला म्हणायचं हा मूलभूत प्रश्न डावलून भाषेच्या माधुर्याबद्दल किंवा काठिण्याबद्दल आपली वैयक्तिक मतंच साधारणतः (दडपून) सांगितली जातात. सर्वच जण असं करत असल्यामुळे, त्याबाबतीत काही निकष लावून बघण्याची गरज कोणाला भासतच नसते. एखाद्या भाषेची स्पष्टता, त्या भाषेतल्या ध्वनींची ऐकणाऱ्याच्या दृष्टीनं स्पष्टता किती आहे, हे ठरवणं सहज शक्य आहे. ध्वनी उच्चारताना त्यांच्यातलं अंतर किती आहे, त्यांच्यात सरमिसळ होण्याची शक्यता कितपत आहे किंवा नाही अशा निकषांवरुन ते ठरवता येईल. एखाद्या भाषेची स्पष्टता मोजणं शक्य आहे पण तिची गोडी मोजणं फारच अवघड आहे, कारण गोडीचे मानदंडच ठरलेले नाहीत.

कठोर ध्वनी आणि मृदू ध्वनी ही कल्पनाही मुळात व्यक्तिसाक्षेप आहे. ट, ठ, ड, ढ, ण, ळ वगैरे ध्वनी कठोर आहेत, ते असले की भाषा खडबडीत होते असं म्हणणं केवळ अशास्त्रीयच नव्हे तर सांकेतिकच आहे. ह्या तथाकथित कठोर ध्वनीचं बाहुल्य असलेली पंजाबी एखाद्या गोड गळयातून श्रवणीय वाटते की नाही? अमृता प्रीतमच्या पंजाबी कविता ऐकायला गोड वाटतात की नाही? सुभा दास ह्या वृत्तनिवेदिकेनं सांगितलेल्या (म्हणजे वाचलेल्या) कन्नड भाषेतल्या अगदी आकाशवाणीवरच्या बातम्यासुद्धा, श्रवणीय

वाटतात की नाही? मूक-बधीर नसलेल्या कुठल्याही माणसानं ह्या गोष्टी स्वतः अनुभव घेऊन पाहाव्यात (म्हणजे ऐकाव्यात) म्हणजे त्याची निश्चितच खात्री पटेल की भाषांमध्ये ट, ठ, ड, ढ, ण आणि ळ ह्या ध्वनींची रेलचेल असूनही श्रवणसौख्य कमी होत नाही.

एकदा मृदू-कठोर वगैरे ध्वनींबद्दल अशीच चर्चा झाल्यावर ग. दि. माडगूळकरांनी एक गीत लिहिलं नि त्यात त्यांनी शब्दा-शब्दात ळ अक्षराचा उपयोग केला- 'घननीळा लडिवाळा झुलवू नको हिंदोळा. . .' माणिक वर्मांनी गायलेलं हे गाणं लगेचच लोकप्रिय झालं ते त्यातील सुरांच्या आणि शब्दांच्याही माधुर्यामुळेच ना?

आपल्याकडे तेलगुभाषिक लोक नेहमी मोठ्या कौतुकानं आणि ठाशीव आग्रहानं सांगत असतात की तेलगु म्हणजे पूर्वेकडची इटालियन! इटालियन म्हटलं म्हणजे ती काय गोड भाषा होते? ह्या दोन भाषां- मध्ये एक साम्यस्थळ असं आहे की शब्द सामान्यतः स्वरान्त असतात. साम्य आहे हे ठीक आहे; पण त्याचा गोडीशी काय संबंध? (आणि इटालियन गोड आहे हे कोणी ठरवलं? क्लिओपात्रा इटालियन सेनानींवर भाळली म्हणून की. . .) शब्द स्वरान्त असला की कानाला गोड वाटतो असं थोडंच आहे? गोडी हा मूलतः 'त्या' गळ्याचा भाग आहे. . .

ध्वनींची एकूण रचना, वाक्याच्या शेवटी येणाऱ्या छ सारखा स्पर्शसंघर्षी ध्वनी, स/श/ष वगैरे ध्वनींचे सरमिसळ म्हणजे काहीसे भोंगळ उच्चार वगैरे वैशिष्टयं असणारी रवीन्द्रनाथ ठाकुरांची (सॉरी हं- टागोरांची असं म्हटलं म्हणजे आमच्या लोकांना पटकन कळेल!) बंगाली गोड आहे असं प्रत्येक माणूस गृहीत धरतो. ह्याबाबत कधी वाद होऊच शकत नाही! गुजराती भाषेची ध्वनिवैशिष्टयं बंगालीसारखीच आहेत म्हणून गुजराती ही मधुर भाषा आहे असं जर कोणी म्हटलं तर लोकं त्याला सरळ मुर्खात काढतील! दोन्ही भाषांचा तौलनिक विचार करणाऱ्याला वेड्यात काढणाऱ्याला, अर्थातच बंगाली किंवा गुजराती भाषेचा गंधही असणार नाही, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

माझ्या एका मावस भावाला काही काळ बंगालीच्या गोडीनं (?!) अक्षरशः झपाटलं होतं. बंगाली संस्कृतीच्या प्रत्येक अंगाची आणि भाषेची तो घरी-दारी, दिवसा- रात्री, जाता-येता तोंड फाटेपर्यंत स्तुती करत असे. त्याच्या 'बाङ्ला'प्रेमाचं रहस्य आम्हाला पुढे लौकरच उलगडलं, त्याची प्रेयसी बंगाली होती! शुद्धपक्षातल्या चंद्राप्रमाणे त्याचं बंगाली प्रेम कलेकलेनं वाढतच होतं. . . यथावकाश ते दोघ विवाहबद्ध झाले. . . दुदैवानं त्यांच्या वैवाहिक जीवनातला वद्य पक्ष लगेचच सुरु होऊन काही वर्षानी त्यांनी घटस्फोट घेतला. आता माझ्या भावाला 'बंगाली' ह्या शब्दाचीही चीड आहे. त्याच्या दृष्टीनं 'तोंडाचा सतत चंबू करून कारण नसताना वरच्या पट्टीत वचा-वचा किंचाळत बोलली जाणारी जगातली एक अत्यंत हेंगाडी भाषा म्हणजे 'बाङ्ला'- हे तिचं बरोब्बर वर्णन आहे', असा त्याचा आताचा अनुभवसिद्ध, शंभर टक्के वस्तुनिष्ठ अभिप्राय आहे!- तेव्हा थोडक्यात सांगायचं तर भाषेची गोडी ही अशी अत्यंत व्यक्तिनिष्ठ आणि परिस्थितीनिष्ठ असते!

अनुक्रमणिका

३.
खणखणीत उच्चार

‘आमच्यासारखं खणखणीत इंग्लिश तुमच्या सायबाला पण यायचं नाय हं, कांय?’ भाषेचा विषय निघो न निघो. आमचे वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, जेष्ठ शेजारी प्राध्यापक दुभाषी अण्णा दिवसातून एकदा तरी आपलं मत आम्हांला ठणकावून ऐकवत असत. त्यांचं नावच दुभाषी, त्यातून ते इंग्लिशचे, नव्हे इंग्रजीचे प्राध्यापक, तेही आमच्या गावातल्या मोठया प्रतिष्ठित महाविद्यालयात, त्यामुळे त्यांच्या भाषाविषयक मतांची (ही) जबरदस्त छाप आमच्या (बाल) मनावर स्वाभाविकपणे पडली होती आणि परिणामतः टेबल, टाइम वगैरे उच्चार महाभारतकालीन युद्धातून होणाऱ्या टणत्काराप्रमाणे करायचा सराव आम्ही आमच्या (प्राध्यापक) दुभाषी सरांच्या तालमीत नित्य नियमानं केला होता. फादर, मदर, ब्रदर, सिस्टर असे इंग्रजीतले उच्चार अधलं-मधलं किंवा शेवटचं, कोणतंही अक्षर न गाळता अत्यंत चोखपणे स्वच्छ, स्पष्ट करण्याच्या सरावही आम्ही कसोशीनं करायचो. ‘पाठशाळेंत स्पष्ट उच्चार करायला शिकलोंत आम्हीं! साहेब काय कप्पाळ शिकवणार आम्हांला? काय शिंचे तोंडातल्या तोंडात पुटपुटतात झालं. म्हणे थंड हवेमुळे तोंड उघडून खणखणीत उच्चार करणं इंग्लंडात शक्य नसतं! लंगड्या सबबी! मुळांत संस्कृतचं वळण नाही नि वर रोजच्या रोज गोमांसाचे रतीब! कशी वळणार जीभ? ह्यांना काय आमच्यासारखं उच्चार जमणारेत?!’

दुभाषी अण्णांचं विश्लेषण आम्हांला त्या काळात पूर्ण पटलेलं होतं; एवढंच नव्हे तर त्या पटण्याची (पुटावर) पुटं आमच्या विचारचक्रावर वज्रलेप झाली होती! आणि त्यामुळे पुढे ती पुटं जायला, नव्हे खरवडून खरवडून पूर्णपणे घालवायला बऱ्यापैकी वेळ लागला होता नि त्या खरवडण्याचे ओरखाडेही उठले होते !

प्रत्येक भाषेची उच्चार करण्याची स्वतःची अशी एक खास पद्धत असते. त्यांची पध्दत योग्य आहे की नाही, आपल्याला म्हणजे ती भाषा ज्यांची नाही त्यांना, ती चांगली वाटते की नाही, ती पद्धत आपल्या सोयीची आहे की नाही वगैरे गोष्टी पाहण्याची आपल्याला गरज नसते. त्याचं साधं, सोपं कारण म्हणजे ती भाषा आपली नसल्यामुळे आपण ह्या पंचायती करायच्या नसतात! दुसऱ्या, परक्या भाषेच्या पद्धतीचं साम्य इतर भाषांशी असण्याचीही आवश्यकता नसते. अगदी मराठी आणि हिन्दीसारख्या एकाच भाषा-परिवारा तल्या, एकच लिपी वापरणाऱ्या आणि तशा खरोखरच खूप जवळच्या असलेल्या भाषा घेतल्या तरीही लक्षात येतं की त्यांची उच्चार करण्याची पद्धत एकसारखी नाही, खूप वेगळी आहे; मग इंग्लिश सारखी भाषा तर दूरचीच. भाषेतला एक मूलभूत नियम असा आहे की जो ध्वनी तुम्हाला माहीत नसतो तो तुम्हाला ऐकू येत नाही. आता प्रश्न असा पडेल की कान धड असणाऱ्याला ऐकू येत नाही असं कसं शक्य आहे? तर त्या ऐकू येत नाही असं म्हणण्याचा अर्थ असा की तो माहीत नसलेला म्हणजे नवा, वेगळा ध्वनी त्याच्या खऱ्या स्वरूपात तुम्हाला ऐकू येत नाही; पण तुम्हाला, तुमच्या मेंदूला ठाऊक असलेला त्याच्या जवळचा ध्वनी तुम्ही ऐकता म्हणजे संस्कृतमधला ष ध्वनी तुम्हाला ठाऊक नसेल तर तुम्ही तो श म्हणून ऐकता किंवा जर्मन मधला श किंवा ष पेक्षा खूपच वेगळा असलेला श (C) हा ध्वनी तुम्हाला माहीत असलेल्या श सारखा ऐकू येतो. नेमक्या ह्याच कारणामुळे आपल्याला सुरुवातीला इंग्लिशमध्ये वेगळे ध्वनी आहेत तसे ऐकू येत नाहीत त्यामुळे आपण आपल्याला माहीत असलेल्या पद्धतीनं त्यांचे सुरेख, ठसठशीत, ठाशीव उच्चार करायला लागतो. इंग्लिशमधले ट, ठ, ड वगैरे खूप वेगळे आहेत, त्या उच्चारांमध्ये जीभ टेकण्याच्या(किंवा न टेकण्याच्या) जागा वेगळ्या आहेत, पण ह्या वेगळेपणाची जाणीव-शिकवणं आपल्याला कोणी न दिल्यास आपण ते मराठी पध्दतीनंच उच्चारत राहतो. त्यांच्या ‘फाऽदऽ’ मधला ‘फ’ आपल्या फणसातल्या ‘फ’पेक्षा

अनुक्रमणिका

खूप वेगळा आहे, ‘थिअरि’ शब्दातला ‘थ’ आपल्या थव्यातल्या किंवा थडग्यातला ‘थ’सारखा नाही. हे सारं काही आपण प्रयत्नानं, विशेष परिश्रमानं शिकायला पाहिजे. केवळ इंग्लिशचेच नव्हे तर कोणत्याही भाषेचे उच्चार पद्धतशीरपणेच शिकायला हवेत, मराठी माणसाला हिन्दीतले उच्चारही व्यवस्थितपणे शिकण्याची गरज असते. फार काय, उच्चारांबद्दल आस्था असेल तर खुद्द आपल्या मातृभाषेतले उच्चारही पद्धतशीरपणे शिकणं आवश्यक असतं!

आपल्याकडे आजतरी अशी परिस्थिती आहे की शिकणारे आणि शिकवणारे आपापल्या म्हणजे देशी पद्धतीनंच उच्चार करतात. ह्या प्रकारात बदल म्हणजे सुधारणा करू शकणारी खरी बलस्थानं दोन; एक म्हणजे ठाकून-ठोकून तयार केलेले प्रशिक्षित शिक्षक आणि दुसरं म्हणजे उत्तर संदर्भग्रंथ. पाहिलं बलस्थान हे आपल्या पद्धतीत सध्यातरी अत्यंत दुर्बळ आहे आणि दुसऱ्याबाबतही फारशी आशादायक स्थिती नाही. खूप गाजावाजा करून मराठीत आलेल्या शब्दकोषांनीही ह्या बाबतीत आपलं कर्तव्य बजावलेलं नाही, किंबहुना उच्चार आणि आघात ह्या भाषेच्या प्राणभूत गोष्टींकडे पूर्ण दुर्लक्षच केलेलं आहे, अक्षम्य अपराध केलेला आहे असंच म्हणावं लागेल.

आपले उच्चार स्वच्छ, स्पष्ट वगैरे असले तरी ते इंग्लिशचे नव्हेत. त्या भाषेचे वेगळे उच्चार आपण व्यवस्थितपणे शिकणं आवश्यक आहे हे आपण सर्वप्रथम शिकायला पाहिजे. ही चुक केल्यामुळे आपण आपले हिन्दीचे उच्चारही नीट करत नाही. वर्षानुवर्ष दिल्लीत राहूनही अतिशय वाईट(वाईट्ट) हिन्दी बोलणारे आमचे एक-एक-नामवंत मित्र, नातेवाईक आणि पुढारी बघितले की वाईट वाटतं, त्यांची कीव येते- आणि त्यांच्यापेक्षा आपली, म्हणजे आपणा मतदारांची, कारण त्यांना दिल्लीला पाठवायला आपलंच अमूल्य मत कारणीभूत झालेलं असतं ना! ‘हेची फळ काय मम मताला?’

भाषेच्या उच्चारांकडे आपण लक्षच देत नाही किंबहुना अतिशय दुर्लक्ष करतो. हिन्दी चित्रपटातून असलेल्या बहुतेक सर्व अहिन्दी-भाषी नट्या, आपल्या मराठी नट्याही चागलं हिन्दी बोलतात, जुन्या जमान्यातल्या दुर्गा खोटेंपासून ते आजच्या माधुरी दीक्षित नि उर्मिला मातोंडकर पर्यंत सर्वच. पण ह्या बाबतीतलं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे लता मंगेशकरांचं. लता मंगेशकरांसारख्या फार थोड्या व्यक्ती उच्चारांकडे, शब्दांवरच्या आघातांकडे अतिशय बारकाईनं लक्ष देतात, कठोर परिश्रमानं अस्सल उच्चार आत्मसात करतात, जिह्वाग्री खेळवतात. . . म्हणूनच त्यांची बंगाली गाणी ऐकणाऱ्या बंगाली रसिकांना त्या अस्सल बंगालीच आहेत असं वाटतं तर गुजराती लोकांना त्या गुजरातीच वाटतात, अशा वेळी आम्हाला त्या मराठी असल्याचा विलक्षण अभिमान वाटतो! सुधीर फडक्यांचे उच्चार, शब्दांवरचे आघात इतके उत्तम असतात की सुरेल गातानाही ते त्यांची मोडतोड करत नाहीत, होऊ देत नाहीत. इतकी महान उदाहरणं आपल्यासमोर असूनही आपण चांगल्या, प्रमाणित उच्चारांबाबत त्यांचं अनुकरण का बरं करत नाही? केलं तर?

त्यासाठी पहिल्यांदा प्राध्यापक दुभाषीसारख्या व्यक्तींनी दिलेली शिकवणूक आपण विसरायला हवी.

४.
आघात

‘हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा ***पुण्याची*** गणना कोण करा’|| आणि
‘***पुण्याची*** गणना आता भारतातल्या प्रमुख शहरांमध्ये होते.’

ह्या दोन वाक्यातल्या ‘पुण्याची’ह्या शब्दाचा उच्चार तुम्ही अगदी अचूक केलेला असणारा ह्यात काही शंकाच नाही पण तो सारखा आहे का? तो उच्चार सारखा आहे किंवा नाही ह्याचा विचारही तुम्ही कदाचित कधी केलेला नसेल. मराठी ही तुमची मातृभाषा असल्यामुळे हा विचार करण्याचं एरवी काही कारणही नाही पण असा प्रश्न(चूकून) कुठे उपस्थित झाला तर मात्र आपली मोठी पंचाईत होते कारण असा प्रश्नच कधी पडलेला नसल्यामुळे त्याच्या उत्तराची उठाठेव आपण स्वाभाविकपणे कधी केलेली नसते.

संस्कृत भाषेत आघात केव्हा, कुठे द्यायचा ह्याबाबत स्वच्छ, सोपा नियम आहे. जेव्हा जोडाक्षर येतं तेव्हा त्या जोडाक्षरापूर्वीच्या अक्षरावर (सिलॅबलवर) नेहमी आघात येतो, म्हणजे सत्य शब्दात‘त्य’पूर्वीच्या अक्षरावर आघात येईल. आघातांबाबतची संस्कृतची ही परंपरा आधुनिक भारतीय भाषांमध्ये - प्रमाण भाषां मध्ये तत्सम म्हणजे संस्कृत भाषेतून आलेल्या शब्दांबाबत (बऱ्याच प्रमाणात) टिकून आहे. सुदैवानं प्रमाण मराठीत ती अजून निकालात निघालेली नाही! (‘एका फटक्यात संस्कृत शब्दांचं लेखन बदललं, आता त्यांचे उच्चारही बदलून टाकूया!’ अशी चळवळ अजूनतरी कोणाच्या डोक्यात आलेली दिसत नाही हे आपलं सुदैवच म्हणायचं!) एका बाजूला आपण संस्कृतमधली जोडाक्षरांची आणि त्यावरच्या आघातांची परंपरा मानतो आणि त्याच वेळी आधुनिक मराठीत आघात नसलेली भाराभर खोटी जोडाक्षरंही लिहीत असतो ! ह्या दुहेरी पद्धतीमुळे मराठीत, केवळ मराठीतच नव्हे तर सर्वच भारतीय भाषांच्या लेखनात एक चमत्कारिक गोंधळ निर्माण झालेला आहे, म्हणजे संस्कृतसारख्या प्राचीन भाषेचं लेखन एकदम निर्दोष, उत्कृष्ट पण आधुनिक भारतीय भाषांचं लेखन सदोष, अशास्त्रीय, भोंगळ. . .

मराठी भाषेचा विकास होताना तिच्यात अनेक नवीन ध्वनी विकसित झाले पण ते लिहिण्याची योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे नव्या ध्वनींची काही व्यवस्थाच लावली गेली नाही! परिणामत: नव्या ध्वनींची सोय जुन्या अक्षराच्या खोलीतच दाटीवाटीनं करण्यात आली! असलेला अक्षरांमध्ये मोडतोड करून मराठीचं लेखन पुढे रेटण्यात आलं; त्यामुळे, उच्चारांमध्ये, आघातामध्ये घोटाळे व्हायला सुरुवात झाली. एकदा जी घसरगुंडी चालू झाली ती अद्यापि चालूच आहे !

मूळ देवनागरी लिपीत संस्कृतातल्या ध्वनींची सुरेख रचना केलेली आहे. क, च, ट, त, प ह्या पाच वर्गात २५ व्यंजनं आहेत. ही पाच व्यंजनं अघोष आहेत तर ह्याच वर्गातली तिसरी व्यंजनं म्हणजे ग, ज, ड, द, ब, ही सघोष आहेत. प्रत्येक वर्गातलं दुसरं आणि चौथं व्यंजनं हकारयुक्त आहे – (ख छ ठ थ फ आणि घ झ ढ ध भ) . संस्कृतभाषेत एवढेच हकारयुक्त ध्वनी आहेत. क+ह=ख, ग+ह =घ अशा प्रकारे हे ध्वनी बनतात.

मराठीत जेव्हा आणखी बरेच हकारयुक्त ध्वनी विकसित झाले तेव्हा त्यांच्यासाठी नवीन चिन्ह देण्याचा प्रयत्न झाला नाही आणि हकारयुक्त(ऑस्पिरेटीड) न, म, य, र, ल, र, व हे ध्वनी आपण कारण

नसताना जोडाक्षरं म्हणून लिहू लागलो! उदा० कान्हा, आम्हांला, वह्या, कोल्हा, गुऱ्हाळ, चव्हाण ह्या शब्दांमध्ये कुठेही आघात नाही. म्हणून तिथे कोणतंही जोडाक्षर येता कामा नये. आज जी दिसतात ती खरी जोडाक्षरं नाहीतच. कन्नड लिपीत अक्षराखाली एक टिंब देऊन हकार दाखवला जातो. त्याप्रमाणे मराठीत तो **न, म, य, व** इत्यादी प्रकारे दाखवता येईल आणि मग काना (कान्हा) , आमांला (आम्हांला) , कोलापूर (कोल्हापूर) , गुराळ (गुऱ्हाळ) , चवाण (चव्हाण) अशा प्रकारे अचूक लेखन करता येईल. (शुद्धलेखनाच्या नियमात वरचेवर बदल करण्याची हौस महाराष्ट्राला आहेच. उपयुक्त सुधारणा करायच्या नाहीत असा संकेत असला तरी पुढच्या सामितीतल्या काही उत्साही सदस्यांनी ह्या मुद्द्याचा विचार मांडायचा प्रयत्न करुन बघायला हरकत नाही.)

ह्या आणि अशा शास्त्रीय सुधारणा आपण आपल्या लेखनात करायचं ठरवलं तर उत्तमच आहे; पण हा क्रान्तिकारक बदल आपल्याला रोजच्या लेखनात (आर्थिकदृष्ट्या कदाचित) परवडणारा नसला तरी देवनागरीचा ध्वनिलिपी म्हणून - फोनेटीक स्क्रीप्ट म्हणून उपयोग करायचा असेल तर आपल्याला ह्या गोष्टींचा विचार करणं (आणि विकास करणं) आवश्यकच आहे, पण त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले उच्चार चांगले होण्यासाठी ह्या सर्व बाबींचा विचार, आचार आणि अभ्यास आपण सातत्यानं करायला पाहिजे. प्रथम म्हणजे आपण आपल्या शिक्षकांना उत्तम प्रशिक्षण द्यायला पाहिजे आणि त्यानंतर शिक्षकांकडून ते सर्व विद्यार्थ्यापर्यंत झिरपेल / मिळेल / जाणीवपूर्वक दिलं जाईल अशी व्यवस्था करायला पाहिजे. ह्या मुद्द्यावरूनही लक्षात येईल की मराठीचा उच्चारणकोष असणं किती आवश्यक आहे. प्रशिक्षणाची गरज पालकांनाही आहे हे आपण विसरता कामा नये कारण मुलं शाळेत असतात त्यापेक्षा अधिक वेळ घरी असतात.

शब्दच ठाऊक नसले की मग सामासिक शब्दांमध्ये होणाऱ्या गोंधळांना तर अन्तच नसतो. ते गोंधळ पाहिले की असं वाटत की आपण आपल्या सख्या भाषेकडे, मातृभाषेकडे का बरं इतकं दुर्लक्ष करतो?

काही वर्षापूर्वीची गोष्ट. माझा पुतण्या कल्याणच्या शाळेत होता. एक दिवस तो घरी आला तोच मुळी भयंकर चिडून. गुरुजींनी त्याच्या श्रीमुखात ठेवून दिली होती, घरी आला तेव्हा त्याच्या फार गोऱ्या नसलेल्या गालावरची लाली स्पष्ट दिसत होती. आज आपल्याला विनाकारण मार खावा लागला अशी त्याची तक्रार होती. त्याच्या चेहऱ्यावर आणि आवाजातही विलक्षण सात्त्विक संताप होता.

शेवटचा तास होता आरोग्यविज्ञानाचा. गुरुजी विषमज्वराची माहिती सांगत होते. प्रत्येक वेळी ते ‘विशमज् वर’ असा उच्चार करत होते तेव्हा आमच्या संतोषनं गुरुजींना अडवून तो ‘विषमज्वर’आहे असं सांगितलं. बरं हा पठ्ठ्या एकदा सांगून गप्प बसला असं नाही. (आमचा संतोष तसा अगदी लहानपणापासून थोडा आगाऊ आहेचं!) दोन-चारदा त्यांन आपला शहाणपण दाखवत ‘गुरुजी, विषमज् वर नाही, विषमज्वर!’ असं सांगून त्यांच्या व्याख्यानाचा ओघ खंडित केला होता. आख्या वर्गाचा वेळ फुकट गेला होता; त्यामुळे गुरुजी स्वाभाविकपणे रागावले, (त्यातून तो शेवटचा तास!). संतोषच्या अपराधाला शिक्षा होणं प्राप्त होतं, तास चालू असताना मध्येच गडबड करण्याच्या प्रवृत्तीला जरब बसणं आवश्यक होतं! आणि परिणामत: गुरुजींनी संतोषच्या गालावर एक सणसणीत ठेवून दिली. त्यांचं तरी काय चुकलं होतं?

अनुक्रमणिका

डोळ्यांना अक्षरांचा, शब्दांचा सराव व्हावा लागतो तसा कानांवरही ध्वनींचे पद्धतशीरपणे संस्कार व्हावे लागतात. तसे सु-संस्कार घेउन माणसानं सु-श्रुत, बहु-श्रुत बनायला पाहिजे. संस्कार दोघांनाही आवश्यक आहेत, ते झाले तरच कोणाच्या गालावर उगाचच आघात होण्याचे प्रसंग टळतील, नाही का?

अनुक्रमणिका

५.

. . . . . पण सिंह गेला!

तानाजीच्या बलिदानानंतर कोंडाणा ताब्यात आला तेव्हा 'गड आला पण सिंह गेला'असं म्हणायची वेळ शिवाजी महाराजांवरच आली होती, आज भाषेच्या संदर्भात ती आपल्यावर आली की काय असं वाटतं! महाराष्ट्रातल्या कोणत्याही छोट्या-मोठया गावातल्या रस्त्यावरून जाताना आपल्याला एखाद्या बँकेची भली मोठी पाटी सहजच दृष्टीस पडते आणि सर्वसाधारणपणे कोणालाही चमत्कारिक वाटेल अशाच त्या पाट्या असतात. मराठी आणि हिन्दी ह्या भाषांची लिपी एकच असतानाही अनेक गोष्टी त्या पाट्यांवर पुनः पुनः लिहून जागेचा अपव्यय मात्र केलेला असतो. पण ह्या अपव्ययापेक्षा चमत्कारिक वाटणारी बाब म्हणजे बँक हा शब्द मराठीत आणि हिन्दीत वेगवेगळ्या तऱ्हेनं लिहिलेला असतो. दोन्ही भाषांत बँक काय वेगळी असते का? त्या विचित्र पाटीवर 'बँक'आणि 'बैंक' असे शब्द पाहून माणसं रोज घोटाळत असतात.

इंग्लिशच्या संपर्कानंतर मराठीनं इंग्लिशमधले ॲ आणि ऑ हे दोन मराठीला पूर्णतः नवे ध्वनी सहजपणे स्वीकारले. ह्या नव्या ध्वनींना स्वतंत्र चिन्हं देणारी मराठी ही भारतातली पहिली भाषा आहे हे प्रत्येक मराठी माणसानं अभिमानानं लक्षात ठेवावं. इंग्लिशमधल्या वेगळ्या ध्वनींसाठी मराठीनं वेगळी चिन्हं तयार केली हा मराठीचा मोठेपणा की मराठी माणसाचा परधार्जिणेपणा हा तसा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे! भारतातल्या इतर भाषांनी नवे ध्वनी स्वीकारण्याचं हे उदार धोरण ठेवलं नाही. (अलीकडे मलयाळम् लिपीनं ॲ आणि ऑ ध्वनींचा रीतसर स्वीकार केला आहे आणि हे ध्वनी दाखविण्यासाठी मराठीतल्यासारख्याच चिन्हांचा म्हणजे ॲ / ॅ आणि ऑ/ऑ ह्या खुणांचा उपयोग केला आहे.)

हिन्दीनं म्हणजे खडी बोली हिन्दीनं ह्या चिन्हांचा स्वीकार केला नाही पण त्याचं कारण वेगळंच होतं. एक महत्त्वाचं कारण असं होतं की कॅट, बॅट मधला ॲ ध्वनी हिन्दीनं म्हणजे खडी बोलीनं फारसीचा परिणाम म्हणून फार पूर्वीच आत्मसात केलेला होता! खडी बोली हिन्दीत 'ै' ह्या चिन्हांचा म्हणजे दोन मात्रांचा उच्चार इंग्लीशमधल्या ॲ सारखाच होतो त्यामुळे ॲ चिन्हाची हिन्दीला गरज नव्हती आणि म्हणूनच हिन्दीत बँक शब्द बैंक असाच लिहिणं स्वाभाविक आहे, अर्थात ॲ हा हिन्दीतला म्हणजे खडी बोलीतला ध्वनी तसा नवीन आहे. मूळचा म्हणजे संस्कृत परंपरेला दोन मात्रांचा उच्चार खडी बोलीत लुप्त झाला आहे, पण हिन्दी क्षेत्रातल्या इतर बोलींमध्ये(किंवा भाषांमध्ये म्हणूया!) दोन मात्रांचा, मूळच्या संस्कृत परंपरेला उच्चार आजही सुरक्षित आहे. गंमत म्हणजे खडी बोलीतही काही ठिकाणी तो उच्चार जुन्या परंपरेनुसारच होतो! आपल्या परिचयातलं एक छान उदाहरण आहे की जिथे दोन मात्रांचे दोन्ही वेगवेगळे उच्चार एकाच वाक्यात आलेले आहेत!- '**मै**या मोरी **मैं** नहीं माखन खायो!'

खडी बोली हिंदीनं 'अ' ह्या स्वराचा मूळचा उच्चारही काही ठिकाणी हरवला आहे. 'ह'पूर्वी'अ' असला तर त्याचां उच्चार ॲ होतो जसं कहना (कॅहना) चाहना (रॅहना) , सहना(सॅहना) जहर(जहर) बहन (बॅहन) इत्यादी. हिन्दीच्या अवधी, भोजपुरी इत्यादी बोलींमध्ये मात्र 'अ' चा मूळचा उच्चार अजूनही अबाधित आहे.

जी स्थिती 'ऐ'ची तिच स्थिती'औ'ची . औचा उच्चार हिन्दीच्या इतर बोलींमध्ये संस्कृत परंपरेप्रमाणेच होत असला तरी खडी बोलीत तो इंग्लिशमधल्या ऑसारखाच होतो. कौन (कॉन), सौतना (सॉतन), खौलना (खॉलना) वगैरे.

अनुक्रमणिका

अर्थात छोटे-छोटे बदल सर्वाच भाषांमध्ये थोडेफार होत असतात, आपण ते जाणीवपूर्वक बघायचे असतात, समजून घ्यायचा प्रयत्न करायचा असतो. एखादा नवा ध्वनी अवश्य स्वीकारावा पण हे औदार्य दाखवताना आपल्या मूळच्या ध्वनींवर अन्याय होऊन ते लुप्त होण्याची भीती नाही ना ह्याचीही काळजी घ्यायला हवी. तंबूत घुसलेल्या उंटासारखं होऊ देता कामा नये की उंट आत नि मालक बिचारा तंबूबाहेर! प्रमाणित उच्चार टिकवण्यासाठी समाजानं कसोशीनं प्रयत्न करायचे असतात. समाजानं म्हणजे कोणी? समाजानं म्हणजे समाजातल्या प्रत्येक व्यक्तीनंच असे प्रयत्न करणं आवश्यक असतं. ही काही केवळ चार – दोन विद्वानांची किंवा शिक्षकांची, किंवा साहित्य परिषदांसारख्या संस्थांची किंवा सरकारची जबाबदारी नाही तर प्रत्येकाची म्हणजे ती भाषा बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची ती जबाबदारी आहे ह्याचा अर्थ असाही नव्हे की प्रत्येकानं उठून जाऊन लोकांना शिकवायला पाहिजे. प्रत्येकानं आपले स्वत:चे आणि आपल्या मुलांचे उच्चार नीट होत आहेत की नाही एवढं बघितलं तरी खूप काही साधता येईल.

मराठीतलंच एक छोटसं उदाहरण पाहू या! सिंह ह्या शब्दाचा मराठीतला आणि संस्कृतमधला प्र माणित उच्चार सिंव्ह असा आहे. (फार बारकाईनं बघितल्यास असं लक्षात येतं की वेदांमधलीही अतिप्राचीन परंपरा आहे ती ऋग्वेदी, त्या ऋग्वेदी परंपरेमुळे महाराष्ट्रात मूळचा सिंह उच्चार आज टिकून आहे.) 'सि'चा सानुनासिक उच्चार केला की ओठांचा स्वाभाविकाच चंबूसारखा गोल आकार होतो आणि त्यानंतर लगेचच ह म्हटला की ओठांच्या गोलाकारामुळे तो 'व्ह'सारखा उच्चार होतो. पण आज असा म्हणजे प्रामाणित –शुद्ध उच्चार करणारी मंडळी हळू हळू अल्पसंख्य होऊ लागली आहेत!'सि'चा नाकात उच्चार करून किंचित आराम करून मंडळी 'ह'चा उच्चार करतात नि एक चमत्कारिक शब्द कानावर पडतो. जागोजागी असाच चुकीचा उच्चार एकसारखा ऐकायला मिळतो नव्हे ऐकावा लागतो! आज मराठी माणसावर पुन: एकदा 'गड आला की नाही कोण जाणे पण सिंह गेला!' असं म्हणायची पाळी आली आहे.

मुंबईसारख्या महानगरीत रेल्वेच्या तमाम स्टेशनांवरून उद्घोषणेच्या नावाखाली दिवसभर जो ठणाणा चालू असतो त्यामुळे आपल्या कानांवर सातत्यानं अत्यंत वाईट उच्चारांचे, चूकीच्या आघातांचे सरकारी संस्कार लादले जात असतात. केवळ मराठीच नव्हे तर हिन्दीही वाईट असतं. चांगली भाषा बोलू शकणारी माणसं ह्या देशात नाहीत का? हजारो –लाखोंनी आहेत, मग आपलं रेल्वे खातं त्यांना का नेमत नाही? आमच्या कानांवर असली वाईट भाषा पडता कामा नये अशी सक्त ताकीद प्रवासी संघटनांनीच का देऊ नये? रेल्वेच्या स्थानकांवरच नव्हे तर जिथे जिथे उद्घोषणा होत असतील तिथे तिथे त्या चांगल्या आवाजात, प्रामाणिक उच्चारात, योग्य आघातांसह ऐकणं हा श्रोता /ग्राहक ह्या नात्यानं आपला हक्क आहे!

आपल्या सर्वच भाषांवर जे अत्याचार चालू असतात त्यांच्याकडे आपण एक अटळ (?) बदल म्हणून निर्विकारपणे बघत राहणार की आपल्या भाषेतल्या चांगल्या गोष्टींचा वारसा टिकवण्याची, तो वारसा पुढच्या पिढ्यांना देण्याची आपली जवाबदारी आहे हे लक्षात ठेवून कसोशीनं प्रयत्न करणार हे आपणच ठरवायचं आहे!

६

भाषा – शुद्ध आणि अशुद्ध

दिल्लीत असतानाची गोष्ट, रोज भल्या सकाळी खालच्या मजल्यावरचा एक संवाद नित्यनेमानं कानावर पडायचा. सुमन भाभीच्या माहेरचा गडी दूध घेऊन आलेला असायचा आणि उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे तो रोज एक बरणीभर ताकही आणत असे; ती बरणी देताना तो सांगायचा,'बहणजी, इसमें **पाणी** नहीं डाला है!' आणि ह्यावर सुमन भाभी म्हणायची, 'कितनी बार समझाया तुम्हें लेकिन अभीभी पाणी कहते हो. अनाडी! क्या तुम **पानी** नहीं कह सकते?'

दिल्लीतल्या पंजाबी बागेच्या पश्चिमेला/वायव्येला पसरलेला हल्लीचा भाग पंधरा वीस वर्षापूर्वी ग्रामीण भाग होता. तिथे हिरवीगार शेतं होती, गोठे होते कारण गोपालन करणारे यादव मोठ्या संख्येनं ह्या भागात राहत होते. (यादव मडळी आजही तिथेच आहेत.) दिल्लीतला तो काळ अजूनही चांगला आठवतो! आता तिथून पाच-सात किलोमीटरवरच हरियाणाचा ग्रामीण भाग आहे, पण महेन्द्र नगर वगैरे भागातून राहणारी यादव मंडळी 'प्रमाण'हिन्दी भाषा (हिन्दीत त्याला 'मानक हिन्दी'म्हणतात) बोलू लागल्यामुळे आता त्यांच्यासाठी पानी हा शुद्ध झाला आहे नि हरियाणातल्या ग्रामीण भागात राहणारी माणसं पूर्वीच्या पंजाबीच्या संस्कारामुळे अजूनही पाणी म्हणतात! दिल्लीत रोज कानावर पडणारा हा संवाद ऐकून मला पंजाबमधल्या दिवसांची आठवण यायची नि गंमत वाटायची, हसू यायचं–

पंजाबमध्ये लुधियाणाजवळच्या हलवाडा गावात होतो तेव्हा जसवन्तसिंहाशी चांगली दोस्ती झाली होती, गंमत म्हणजे दुधाचे कॅन आपल्या (चलती का नाम गाडीसारख्या) टेंपोतून स्टेशनवर पोहोचवायचा त्याचा व्यवसाय होता. टेंपोवर कॅन द्यायला आलेल्या शेतकरी मंडळींशी त्याच्या गप्पा चालायच्या तेव्हा माझ्या लक्षात आलं होतं की पंजाबतल्या ग्रामीण भागातली मंडळी 'पानी' म्हणतात नि पंजाबीतला प्रमाण शब्द आहे 'पाणी', म्हणजे पंजाबी माणसाच्या दृष्टीनं अडाणी, गांवढळ माणसं 'पानी' असा अशुद्ध शब्द वापरतात तर हरियाणातल्या लोकांच्या दृष्टीनं 'पानी' शब्द शुद्ध आहे पण अडाणी, अशिक्षित माणसं 'पाणी'म्हणतात! आहे ना गंमत! शुद्ध –अशुद्धची अगदी चपखल गफलत!

आता शुद्ध कशाला म्हणायचं नि अशुद्ध कशाला म्हणायचं? कोणते ध्वनी शुद्ध असतात आणि कोणते ध्वनी अशुद्ध असतात? ध्वनीमध्ये पण शुद्ध –अशुद्ध, उच्च-नीच, सवर्ण –अवर्ण असे काही (जाति) भेद असतात का? आपल्या मराठीतसुद्धा पाणी आणि पानी शब्दांच्या बाबतीत अगदी असाच प्रकार आहे ! तेव्हा 'न' शुद्ध की 'ण'शुद्ध?

शुद्ध भाषा आणि अशुद्ध भाषा हे प्रयोग सर्वच करत असतात; पण आधुनिक भाषाशास्त्रात मात्र ही शुद्ध- अशुद्धची कल्पना मुळीच मानली जात नाही. भाषेत शुद्ध- अशुद्ध असं काही नसतंच. काही माणसं किंवा एखाद्या भागातील माणसं वेगळ्या प्रकारे बोलत असतात एवढंच. भाषेतलं ते वेगळेपण असतं.

मराठीत सकर्मक क्रियापदांपासून भूतकाळात कर्मणी प्रयोगच होतो पण अनेक भागात, विशेषतः दक्षिण महाराष्ट्रात कन्नडच्या प्रभावामुळे सरसकट कर्तरी प्रयोग केले जातात, उदाहरणार्थ 'त्यानं चहा प्यायला' हे शुद्ध म्हणजे प्रमाण भाषेतलं वाक्य आहे; पण 'तो चहा प्यायला', 'ती चहा प्यायली', 'आम्ही दूध प्यायलो' असे भयंकर चुकीचे प्रयोग हल्ली अगदी पुण्या –मुबंईतही ऐकू येतात! कोल्हापूर–सांगली

अनुक्रमणिका

भागातली मंडळी तर आई गच्चीवर वाळत घातली, (म्हणजे आईनं गच्चीवर पापड/कपडे इ. वाळत घातले) . काका आंघोळ केला. (काकानं आंघोळ केली.) ती पुस्तक वाचली. (तिनं पुस्तक वाचलं) असे चमत्कारिक, भयंकर प्रयोग सातत्यानं करत असतात.

प्रादेशिक म्हणून हे सारे प्रयोग मान्य असले तरी ते प्रमाण मानता येणार नाहीत आणि 'अस्मिता'ह्या गोंडस नावाखाली कोणी त्यांचा उगाचच आग्रहही धरता कामा नये, कारण सर्वांसाठी हवी असते ती 'प्रमाण' भाषा.

एखादा प्रयोग प्रमाण नाही किंवा उच्चार प्रमाण नाही असं म्हटलं की काहींच्या कपाळाला आठ्या पडतात, पण कोणत्याही भाषेत प्रमाण आणि प्रमाण नसलेले असा भेद केलेलाच असतो कारण भाषा (बोली नव्हे) सर्वांसाठी असते, ती सर्वांसाठी असल्यामुळे सर्वांना त्याच प्रकारे, त्याच पद्धतीनं कळणं अतिशय आवश्यक असतं आणि हे साधायाचं असेल तर त्यासाठी प्रमाणीकरणाची गरज असते; म्हणूनच प्रत्येक भाषेत असं प्रमाणीकरण झालेलं असतं. ज्या भाषांमध्ये प्रमाणीकरण चांगल असतं त्या समाजाला प्रमाणीकरणाचे फायदे मिळत असतात. आपल्याकडचं प्रमाणीकरणाचं उत्कृष्ट उदाहरण आहे 'आपल्या' संस्कृत भाषेचं.

प्रमाणीकरणाची प्रक्रिया होत असताना ते कोणाच्या भाषेचं प्रमाणीकरण झालेलं आहे /व्हावं असा एक प्रश्न असतो. सामान्यात: असं दिसतं की पुढारलेल्या समाजाच्या बोलीचं प्रमाणीकरण होतं आणि तिला भाषेचा दर्जा मिळतो.

काही भाषांबाबत असं दिसतं की बहुसंख्याकांची बोली प्रमाण होते तर काही भाषांबाबत असं दिसतं की एखाद्या लोकोत्तर, विलक्षण प्रतिभावान पुरूषाचा त्या समाजावर एवढा प्रभाव पडतो की परिणामत: त्याची बोली हीच प्रमाण भाषा बनते. ही प्रक्रिया हळू हळू होत असते. आता आपल्या मराठीचं जे प्रमाणीकरण झालेलं आहे त्याबाबत काही नवे प्रश्न उत्पन्न करून ते बदलण्याचा प्रयत्न करावा असं काहींना वाटतं पण तो खटाटोप केल्यास मराठी भाषिक समाजाचीच पंचाईत होईल आणि अंतिमत: नुकसान होईल.

उच्चार, प्रयोग, वाक्यरचना इत्यादीप्रमाणेच लेखनाचं प्रमाणीकरणही महत्त्वाचं असतं. लेखनाचं प्रमाणीकरण म्हणजे शुध्दलेखन(ऑरथॉग्राफि) . ह्याबाबतही विद्वानांनी आपल्या 'इगो'पेक्षा, कुठल्यातरी तथाकथित नव्या तत्त्वज्ञानापेक्षा आपल्या देशाच्या भाषिक परंपरेला आणि समाजहिताला अधिक महत्त्व देऊन, किंबहुना फक्त समाजहितालाच महत्त्व देऊन सोडवला, तर सारा गोंधळ एकदाच संपून जाईल.

तेव्हा प्रमाणीकरणाचे फायदे आपल्याला मिळवायचे असतील, जगाबरोबर राहायचं असेल, नव्हे, पुढे जायचं असेल तर प्रमाणीकरणाला पर्याय नाही हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे.

अनुक्रमणिका

७
क्रियेवीण वाचाळता

भाषेतला, कोणत्याही भाषेतला सगळ्यात महत्त्वाचा शब्द म्हणजे क्रियापद. मुख्य घटना काय आहे, त्यात नक्की काय घडतंय हे सांगण्याच काम करणारा शब्द ते सांगणारं पद म्हणजे क्रियापद. क्रियापदं सर्वच भाषांमध्ये असली तरी ती सारखी नसतात. क्रियापदांचा विकास हा त्या त्या भाषेत अगदी स्वतंत्रपणे झालेला असतो. तो विकास म्हणजे त्या भाषिकांचं वैशिष्ट्य असतं. तो भूभाग तिथली माणसं त्यांचा इतिहास, त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी, अशा एक ना अनेक गोष्टीच्या शतकानुशतकांच्या परंपरेतून क्रियापदांचं रसायन तयार झालेलं असतं, पण ह्या सगळ्याची जाणीव आपल्याला सहजासहजी होत नसते. आपण जेव्हा आणखी एखादी नवी, वेगळी भाषा डोळसपणानं शिकतो-शिकू लागतो तेव्हाच आपल्याला ह्या गोष्टीची जाणीव होऊ शकते.

खाणे, पिणे, येणे, जाणे सारख्या अत्यंत प्राथमिक क्रियापदांचा बाबतही जगातल्या भाषांमध्ये इतकी विविधता आढळते की ते जाणून घेणं मनोरंजक आहे.

'आमि रोशोगुल्ला खाई. आमि जोल खाई किन्तु आमि शिग्रेट खाई ना!'-(मी रसगुल्ला खातो, मी पाणी पितो पण मी सिगरेट ओढत नाही.) ह्या बंगाली वाक्यात तीन ठिकाणी'खा'ह्या धातूचा – क्रियापदाचा उपयोग झाला आहे पण ह्या बंगाली वाक्याचं मराठी भाषांतर करताना मात्र आपल्याला तीन वेगवेगळ्या क्रियापदांची गरज भासते कारण मराठी भाषिक समाजाच्या कल्पनेप्रमाणे मुखानं सेवन केलेला पदार्थ काय स्वरूपाचा आहे ह्यावर क्रियापद कोणतं वापरायचं हे अवलंबून असतं. बंगाली भाषिकांच्या दृष्टीनं मुखानं सेवन केलं की त्याला 'खाबो' म्हणतात; पण आपल्या दृष्टीनं पदार्थ घनरूप असेल तर खाणे, द्रवरूप असेल तर पिणे आणि वायरूप असेल तर ओढणे अशी तीन वेगळी क्रियापद वापरण आवश्यक असतं, ह्याच क्रियांच्या संदर्भात हिन्दीचा विचार केला तर असं दिसतं की वायुरूप पदार्थांच्या सेवनासाठी हिन्दीत वेगळं क्रियापद नाही, त्यामुळे हिन्दी भाषिकांना 'सिगरेट पीना'शिवाय पर्याय नसतो.

वस्त्रं परिधान करण्याच्या बाबतीत मराठीत प्रामुख्यानं दोन क्रियापदं आहेत-'नेसणे'आणि 'घालणे'. ह्या दोन क्रियापदांमध्ये फरक काय आहे? नेसण्यासाठी वस्त्र हे न शिवलेलं असावं लागतं; म्हणजे कमीतकमी प्रक्रिया केलेलं, शिंपी नावाच्या प्राण्याचा स्पर्श न झालेलं वस्त्र असेल तर नेसणे. साडी नेसणे धोतर नेसणे, वल्कलं नेसणे इत्यादी. पण वस्त्रावर शिवणकामाचे संस्कार झालेले असतील तर त्यासाठी घालणे शब्द वापरावा लागतो म्हणजे सदरा घालणे, पँट घालणे, झंपर घालणे इत्यादी.

पण समजा रीतसर नेसणं किंवा घालणं होत नसेल, घाईघाईन केवळ अंगाभोवती लपेटण्याचा प्रकार होत असेल, नेसण्याच्या क्रियेतला कोणत्याही कौशल्याचा, नीटनेटकेपणाचा भाग तिथे नसेल तर त्या क्रियेला नकारात्मक अर्थ असणारं 'गुंडाळणे' हे क्रियापद वापरलं जातं; म्हणजे उदाहरणार्थ लुंगी गुंडाळणे, साडी गुंडाळणे वगैरे. पूर्वी पाचवारी साडी नेसणाऱ्या बायांची हेटाळणी करताना नऊवारी नेसणाऱ्या बाया म्हणत असत, 'तिचं काय बाई बरं आहे, एवढीशी साडी गुंडाळली की झालं!' मराठीत वापरात असलेल्या नेसणे, घालणे नि गुंडाळणे ह्या क्रियापदांसारखा बारकावा हिन्दीत नाही की इंग्लिशमध्येही नाही. लज्जारक्षणासाठी काहीही परिधान केलं तरी तिथे 'पहनना' नि 'to wear' असा एकमेव

अनुक्रमणिका

शब्द वापरता येतो. वस्त्राच्या प्रकाराला किंवा परिधान करणाच्या कौशल्याचा विचार हिन्दीत किंवा इंग्लिशमध्ये होत नाही.

आपल्यासमोर एक वर्तमानपत्र आहे, आपण ते उचललं की ते आपण आपल्या हातात 'धरतो'. पण समजा भल्या मोठया टेबलाच्या विरूद्ध बाजूला तुमचा मित्र बसलेला आहे तर तो ते वर्तमानपत्र उचलून तुमच्या दिशेनं टाकेल (भिरकावेल) आणि म्हणेल 'झेल!' आणि तुम्ही ते झेलाल. समजा चोर पळतो आहे नि तुम्ही त्याच्यामागे पळत–पळत जाता आहात. त्या क्रियेच्या शेवटी तुम्ही काय कराल? तुम्ही त्याला 'पकडाल'. म्हणजे धरणे, झेलणे आणि पकडणे ह्या तीन क्रिया मराठी भाषिकांच्या दृष्टीनं वेगवेगळ्या आहेत, ह्या तीनही ठिकाणी दुसरं कोणतं क्रियापद चालणारच नाही. ह्याचा प्रसंगांचा इंग्लिशच्या दृष्टीनं विचार करा, पहिल्या ठिकाणी You hold the newspaper. दुसऱ्या ठिकाणी You catch the news paper. आणि तिसऱ्या ठिकाणी You catch the thief. ह्याचा अर्थ असा की इंग्लिशमध्ये दोन क्रियापादांनीच हे काम साधलं आहे.

आता हिन्दी भाषेच्या दृष्टीनं विचार केला तर ह्याच तीन प्रसंगांच्या तीन वाक्यांमध्ये 'मैने अखबार हाथ में पकडा है.' 'मैंने गेंन्द पकडी.' 'मैंने चोर को पकडा.' म्हणजे हिन्दी भाषिक ह्या सगळ्यांसाठी फक्त एकच क्रियापद वापरतो 'पकडना'.

ह्या सगळ्याचा बारकाईनं विचार केला तर लक्षात येतं की मराठीत ह्या क्रियेचे सारे बारकावे लक्षात घेतलेले आहेत. स्थिर वस्तू असेल तर त्यासाठी धरणे क्रियापद. वस्तू अस्थिर, हलणारी असेल तर तिचं हलणं काय प्रकारचं आहे हा विचार मराठीत होतो. वस्तू बोलणाऱ्याच्या विरुद्ध दिशेनं येत असेल तर झेलणे(चेंडू झेलणे) आणि वस्तूची(कर्माची) आणि बोलणाऱ्याची (कर्त्याची) दिशा एकच असेल तर पकडणे (गाडी पकडणे, चोराला पकडणे) . दिशा एकच आहे की विरुद्ध आहे ही परिस्थिती इंग्लिशभाषेत विचारातच घेतली जात नाही, आणि हिन्दीत तर वस्तू स्थिर आहे की अस्थिर आहे ह्याचा कसलाच विचार होत नाही असं ह्या क्रियापदाच्या बाबतीत दिसतं!

आता 'पिणे' म्हणजे द्रव पदार्थाचं सेवन असं म्हटलं तर तेही शंभर टक्के खरं असतं असं नाही. मराठीच्या दृष्टीनं द्रवरूप किंवा पळीवाढया पदार्थाचं सेवन आपण जेवताना करत असू, तर त्यासाठी आपण खाणे असाच शब्द वापरतो (आमटी, खीर हे पदार्थ आपण जेवताना खातो पण आमटीची किंवा खिरीचा वाटी उचलून सरळ तोंडाला लावली तर मात्र आपण त्या ठिकाणी पिणे शब्दाचा प्रयोग करतो. –बुडबुड घागरीच्या गोष्टीतसुद्धा 'मी खीर खाल्ली तर-'असाच प्रयोग आहे!) इंग्लिशमधल्या to eat ह्या क्रियापदाध्येही हाच विचार दिसतो म्हणूनच you eat soup. पण एखाद्यानं प्लेट उचलून सरळ तोंडाला लावली तर तिथे मात्र ड्रिंक शब्दाचा उपयोग करावा लागतो.

आपल्या समाजाचा विचार केला तर असं दिसतं की मराठीच्या जोडीनं आपला हिन्दी भाषेशी संबंध येतो आणि बऱ्याच जणांचा इंग्लिशशीही. जर आपण प्रत्येक क्रियापदाचा अशा प्रकारे विचार केला की ह्यात काय आहे, कशाकशाचा विचार केलेला आहे आणि त्याचा आपल्या मराठीतल्या क्रियापदाशी कसा संबंध आहे, मराठीतल्या त्याच्यासारख्या, जवळपासच्या क्रियापदात काय-काय आहे किंवा काय नाही. . . तर आपल्याला त्याचा नक्कीच उपयोग होईल. आपल्या मातृभाषेचे बारकावे आपल्याला जेव्हा पक्के कळतील, तीव्रतेनं जाणवतील तेव्हाचा आपल्याला इतर भाषा चांगल्या येऊ शकतील कारण हे सगळ साध्य करण्यासाठी आपल्याला खरा आधार - मूलाधार असतो तो आपल्या मातृभाषेचाच! तिच्याविना ही तुलना

होऊच शकणार नाही हा महत्त्वाचा मुद्दा आपण मुळीच विसरता कामा नये! अशा प्रकारे आपल्यात तौलनिक दृष्टीकोण विकसित झाला तर आपल्याला जगातल्या कोणत्याही भाषेत प्रावीण्य मिळवणं अवघड राहणार नाही कारण आपल्याला खरीखुरी कृती - क्रिया गवसलेली असेल.

अनुक्रमणिका

८

यः क्रियावान्

इंग्लिश, जर्मन वगैरे भाषांशी मराठीची तुलना केली तर तीव्रतेनं जाणवणारी पहिली गोष्ट म्हणजे मराठीत असलेली क्रियापदांची उणीव, म्हणजे मराठीत काही गोष्टी सांगताच येत नाहीत असं नाही, पण त्यासाठी बरेच वेगळे आधार घ्यावे लागतात.

संस्कृत भाषेत सुमारे दोन हजार धातू आहेत, त्यांना प्र-परा असे उपसर्ग लावून अनेक नवीन धातू तयार करता येतात, शिवाय नामांपासूनही धातू (नामधातू) करण्याची सोय संस्कृत भाषेत—व्याकरणात आहे. म्हणजे क्रियापदांच्या बाबतीत संस्कृत अतिशय संपन्न आहे. पण आधुनिक भारतीय भाषांना मात्र संस्कृतचा हा संपन्न वारसा दुर्दैवानं लाभलेला दिसत नाही. (ह्यात नक्की कोणते जीन्स कमी पडले कोण जाणे!)

एका काळी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रेरणेनं मिठाळणे, साखराळणे, चुनवणे अशा सारखे नामधातू वापरुन क्रियापदांची उणीव भरून काढण्याचा प्रयत्न झाला. लोकांनी काही काळ नवे प्रयोग केले. नामाधातूंना विरोध असा कोणी केला नाही पण तो प्रकार लोकांच्या पचनी पडला नाही हे निश्चित. आजच्या मराठीत ते नाहीत.

क्रियापदांची उणीव भरून काढण्यासाठी मराठीत आपण लावणे, घालणे, काढणे, देणे अशा काही ठरावीक क्रियापदांचा उपयोग वेगवेगळ्या नामांच्या आधारानं करून वेगळा अर्थ दाखवतो. मराठीप्रमाणेच गुजराती, सिन्धी, पंजाबी आणि हिन्दी ह्या भाषांमध्येही अगदी असाच प्रकार आहे. उदाहरणार्थ लावणे ह्या क्रियापदाचे मूळचे काही अर्थ आहेत पण त्याच्या जोडीला आपण इतक्या नामांबरोबर लावणे क्रियापदाचा उपयोग करतो की त्या लावण्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो! उदाहरणार्थ – दिवा लावणे, रेडीओ लावणे वगैरे ठिकाणी आपण लावणे हा शब्द सुरु करणे ह्या अर्थी वापरतो तर दार लावणे, खिडकी लावणे, कडी लावणे ह्या ठिकाणी बंद करणे ह्या अर्थी 'लावणे' चा उपयोग करतो! घर लावणे, घडयाळ लावणे वगैरे ठिकाणी नीट करणे, व्यवस्थितपणा आणणे हा अर्थ आहे, तर झाड लावणे त्याहून खूपच भिन्न आहे. चित्र लावणे मध्ये आपण ते अडकवतो तर पत्ते लावताना त्यात बहुतेक वेळा लबाडी(च) असते! ह्या लावण्यात मस्का लावणे, लोणी लावणे असे काही 'स्निग्ध' पदार्थही आहेत! भाषेतही त्यांचा भाव चढाच असतो! रंग लावणे पुन: वेगळंच आहे, आणि मन लावणे तर फारच वेगळं (आणि अवघडली; जमेल त्यानं लावावं म्हणजे इतर मंडळी त्याचा अन्वय किंवा अर्थ लावायला मोकळी!) 'लावणे' चे असे कितीतरी प्रयोग आपल्या रोजच्या भाषेत पुन: पुन: येत असतात. ह्यातल्या प्रत्येक लावण्याला इंग्लिश, जर्मन वगैरे भाषेत स्वतंत्र क्रियापद असतं.

'म्हणणे' आणि 'सांगणे' ह्या शब्दांचा उपयोग तर आपण फारच ढिलेपणानं करतो. 'बाबा म्हणाले की उद्यापासून तू रोज व्यायाम करायला जा!' 'काका म्हणाले की तू तूझं अक्षर सुधार बाबा!', मन्या म्हणाला की आज शाळेला सुट्टी आहे,' 'मी म्हटलं की तूपण आमच्याबरोबर ये!' अशा तऱ्हेच्या वाक्यांची यादी खूप वाढवता येईल; पण गंमत अशी आहे की ह्या सर्व वाक्यांमध्ये म्हणणे हे एकच क्रियापद वापरलेलं आहे पण प्रत्यक्षात त्यांतून व्यक्त झालेली भावना/क्रिया वेगवेगळी आहे. ह्या वाक्यांचं इंग्लिशमध्ये चांगल्या प्रकारे भाषांतर केलं तर प्रत्येक ठिकाणी वेगवेगळं क्रियापद येईल/येतं. He said-//, He told -// He

described -//, He narrated -//, He suggested-//He asked -//, He advised -// He recommended -//, He informed -//, He repeated -//, He explained-//, He commented -//- He reminded-असे कितीतरी पर्याय इंग्लिश, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषांमध्ये आहेत, आहेत म्हणजे प्रत्यक्ष वापरात आहेत, मराठीत असे पर्याय नसल्यामुळे(किंवा आपण वापरत नसल्यामुळे) आपण काही ठराविक क्रियापदांबरोबर वेगवेगळी नामं वापरून अर्थ दाखवतो /काम भागवतो.

पण अशी नामं वापरण्यातही आपण मराठी माणसं बऱ्याचदा काटकसर करतो किंवा कदाचित तो आपला मराठी बाणा(वगैरे) असावा! आता 'घेणे' ह्या क्रियेचेसुद्धा कितीतरी प्रकार आहेत. घेणे, विकत घेणे, उसने घेणे, उचलून घेणे ते अगदी चोरुन घेणे! पण ह्यातला एखादा बारकावाही आपण आपल्या बोलण्यातच काय पण लेखनातही सामान्यत: कधी दाखवत नाही. एखादा हिन्दी भाषिक सहजतेनं म्हणतो 'कल हमने टीवी खरीदा' किंवा इंग्लिश माणूसही We bought a new tv set. असंच म्हणतो; पण आपण मराठी माणसं मात्र 'काल आम्ही टीव्ही घेतला!' एवढंच म्हणतो, अगदी लिहिताना सुध्दा इतकंच लिहितो! 'विकत घेतला' असं सांगण्याची गरज मराठी माणसाला वाटतच नाही, कारण त्याच्या (स्वाभिमानी, परखड, फटकळ इत्यादी इत्यादी) स्वभावानुसार तो प्रत्येक वस्तू (रोख पैसे देऊन) विकतच घेत असतो, आणि तो नव्या वस्तूच घेतो त्यामुळे 'नवा' म्हणण्याचीही त्याला गरज वाटत नाही. सबब ते वेगळं सांगण्याची आवश्यकता त्याला वाटत नाही! 'आम्ही काल संगणक विकत घेतला' असं एखादा म्हणालाच तर समोरचा मराठी माणूस त्याला लगेच म्हणेल, 'होक्का? मला वाटलं की चकटफू मिळाला!'— म्हणजे असं म्हणणं आपल्याला मुळातच मान्य नसतं.

मराठी, हिन्दी, गुजराती वगैरे भारतीय भाषांच्या माध्यमातून शालेय शिक्षण घेणाऱ्या/ घेतलेल्या विद्यार्थ्यांना इंग्लिश किती येतं, त्यांच्या अडचणी काय आहेत, ती नक्की कुठे कच्ची पडतात हे पाहण्यासाठी घेतलेल्या चाचण्यांमध्ये असं आढळून येतं/ आलं की ह्या विद्यार्थ्यांना इंग्लिश भाषेतली वेगवेगळी क्रियापदं वापरण्यात अडचण येते आणि त्यातही महत्त्वाची गोष्ट अशी आहे की ह्या अनेक क्रियापदांशी त्यांचा परिचयच झालेला नसतो! अगदी दहावीच्या वर्गातल्या बऱ्या समजल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यालाही दुर्दैवानं ह्याची कल्पना नसते, त्यामुळे इंग्लिश बोलताना किंवा लिहिताना ते सुरुवातीला स्वाभाविकपणे मराठी, हिन्दीप्रमाणे काही ठरावीक मोजक्याच क्रियापदांवर भागवून नेतात; म्हणजे उदाहरणार्थ He said — ह्याचा प्रयोग ते सर्वत्र करतात, त्यातून अर्थ स्पष्ट होत नाही हे त्यांना मातृभाषेच्या प्रभावामुळे कळतच नाही; तेव्हा भाषेच्या शिक्षकांनी ह्या गोष्टी विशेष परिश्रमपूर्वक, मातृभाषेशी तुलना करून पुन:पुन: समजावून सांगून विद्यार्थ्यांकडून सातत्यानं त्यांचा सराव करून घेणं आवश्यक असतं.

असे आणि अशा प्रकारचे पध्दतशीर प्रयत्न शाळांनी/शिक्षकांनी केल्यास आमच्या मुलांना कोणतीही भाषा उत्तम प्रकारे येऊ शकते, त्यासाठी इंग्लिश माध्यमाच्या किंवा फ्रेंच वगैरे माध्यमाच्या शाळेत जाण्याची आवश्यकता नसते.

अनुक्रमणिका

९

हवाल्यावर टवाला

भाषा म्हणजे समाजाचा आरसा असतो. समाजाचं, त्यातल्या माणसांचं आणि त्यांच्या वागण्याचं, त्यांच्या विचारांचं, त्यांच्या बऱ्या–वाईट प्रवृत्तीचं– थोडक्यात म्हणजे त्यांच्या संस्कृतीचं स्वच्छ, स्पष्ट प्रतिबिंब त्यांच्या भाषेत पडलेलं असतं; ते बघण्याची दृष्टी आपल्याला लाभली तर एक वेगळंच समाजदर्शन आपल्याला घडतं. माणसांचं वागणं तिथल्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतं; त्यामुळे तिथली भौगोलिक परिस्थिती, एकूण आर्थिक परिस्थिती इत्यादी गोष्टी आपल्याला सहजपणे दिसून येत असतात. ह्या साऱ्या गोष्टी भाषेच्या केवळ शब्दभांडारातच नव्हे तर तिच्या रचनेत, तिच्या व्याकरणातही स्पष्टपणे दिसून येतात.

आपल्याकडच्या भाषांचा विचार केला तर प्रयोजक रचना (कॉऽजल) सर्वच भाषांमध्ये आहेत असं दिसून येतं. प्रयोजक रचना म्हणजे आपण स्वतः एखादी क्रिया न करता दुसऱ्याकडून करून घेणे (हे खरं तर आपल्यातला बहुतेक सर्वांना खूप आवडत असलं तरी प्रत्यक्षात ते सगळयांना जमतं असं नाही; ज्यांना जमतं ते कुशल प्रशासक बनू शकतात!) म्हणजे करणेचं प्रयोजक रूप करवणे. करणे-करवणे, देणे-देववणे, लिहिणे–लिहवणे इत्यादी. प्रयोजक रचना सर्वच भाषांमध्ये असली तरी ती सर्वच भाषांमध्ये सारख्या प्रमाणात वापरली जाते असं मात्र नाही. मराठीसारख्या भाषेत प्रयोजकाचा उपयोग फारच कमी प्रमाणात होतो तर हिन्दीसारख्या भाषेत तो फार मोठया प्रमाणात होतो असं दिसून येतं. हिन्दी भाषेत त्याचा उपयोग इतक्या मोठया प्रमाणात का होतो / का होत असावा? तिथलं पाणी म्हणजे हवा-पाणी वेगळं असल्यामुळे? तिथल्या भौगोलिक परिस्थितीमुळे? की आणखी काही कारणांमुळे? प्रयोजकाची रचना करायची म्हणजे पहिली अट अशी असते की ती क्रिया आपण स्वतः करायची नाही! आपण करायची नाही म्हणजेच ती करवून घ्यायची ! क्रिया दुसऱ्याकडून करून घ्यायची म्हणजे ती करायला दुसरं माणूस तर हवंच. उगाच कोणीतरी सोम्या –गोम्या असून उपयोगाचा नाही, ते दुसरं माणूस हक्काचं हवं(नाहीतर आपलं ऐकणार कोण?) . आपण सांगितलेलं काम ऐकून त्याप्रमाणे कृती करणारा हक्काचा माणूस हवा म्हणजे नोकर, तोही आज्ञाधारक नोकर हवा. आपली कामं नोकरांकडून करून घ्यायची म्हणजे हाताखाली नोकर –चाकर हवेतच, अशी शक्यता असल्याशिवाय प्रयोजाकाची रचना ऊठसूट करायची संधी मिळणार नाही. आणि नोकर ठेवायचे म्हणजे ऐपत हवी. घरची परिस्थिती चांगली हवी. घरची चांगली शेती –भाती हवी, जमीनदारी हवी, गाई –गुरं हवीत, मोठं उत्पन्न हवं, जोडीला शारीरिक शक्ती हवी नि थोडीफार (नव्हे, बऱ्यापैकी) दांडगाई करायची धमकसुद्धा हवी! (हिन्दी भाषिक प्रदेशांतलं राजकारण मराठी माणसानं डोळ्यापुढे आणायचा प्रयत्न करावा म्हणजे हे सगळं प्रकरण झटकन लक्षात येईल!) असं सगळं यथास्थित जुळून आलं म्हणजे मग दुसऱ्यांकडून कामं करून घेण्याची ताकद येते, शब्दाला वजन येतं!

प्रयोजक रचनेतली ही व्यावहारिक अडचण लक्षात घेतली की आपल्या लगेचच लक्षात येईल की महाराष्ट्रात म्हणजे मराठी भाषेच्या क्षेत्रात अशा रचना कमी का आहेत. त्याउलट उत्तरेत पहा, तिथे मुळातच जमीन सुपीक, त्यात वर्षभर पाणी देणाऱ्या आणि खंडोगणती सुपीक गाळ आणून टाकणाऱ्या हिमालयात उगम पावलेल्या गंगायमुनेसारख्या मोठमोठ्या नद्या, त्यामुळे हिन्दी भाषिक प्रदेशातली शेती खूपच चांगली. उत्तम शेतीच्या भरघोस उत्पन्नामुळे हाताखाली नोकर-चाकर ठेवण्याची ऐपत येते, त्यामुळे आपण स्वतः काम करायची सवय कमी आणि इतरांकडून करून घ्यायची सवय अधिक ह्या सगळ्याचा परिणाम म्हणून प्रयोजकाची रचना करण्याची तिथल्या लोकांच्या भाषेची लकबच बनली आणि हाताखाली

नोकरा-चाकराची फौज नसली तरीही जमीनदाराच्या थाटात बोलायची सवय हिन्दी भाषिकांच्या अंगवळणी पडली. 'बेफिक्र रहिये जी, करवा लेते है!', 'क्या फर्क पडेगा, भिजवा देते हैं!' 'आपने क्यों कष्ट किया? हम अभी करवाते है!' 'कोई बात नहीं, हम भिजवाते हैं! चिन्ता मत कीजिए, हम लिखावा देंगे!' 'इसमे कौनसी बडी बात है जी, अभी करवा देंगे! आप बैठीये (मैं भी बैठता हूँ) अभी दिलवाते हैं!' अशा रचना फार मोठया प्रमाणात केल्या जातात; इतक्या की घाबरलेल्या एखादा गरीब बिचारा माणूस दुसऱ्या तसल्याच माणसाबद्दल बोलताना, 'नहीं जी, वे हमें जरूर निकलवा देंगे!'असं अगदी गयावया करून सांगतो!

दक्षिणेकडे मद्राश्यांना म्हणजे तामिळ-भाषी लोकांना आपल्या भाषेचा आणि आपल्या (संस्कृतपेक्षा?) प्राचीन संस्कृतीचा अतिशय अभिमान असतो (खरं तर जरा जादाच) . तामिळ भाषा आणि तमिळ संस्कृती उत्तरेतल्या (परक्या, आक्रमक आर्यांच्या?) संस्कृत भाषेपेक्षा आणि त्यांच्या संस्कृतीपेक्षा कित्येक हजार वर्ष प्राचीन आहे असा त्यांचा जोरदार दावा असतो; पण ह्या प्राचीन, (संस्कृतशी फटकून वागणाऱ्या) 'संस्कृतिसंपन्न'तमिळींच्या भाषेतही हिंदीतल्याप्रमाणे प्रयोजक रचनेचा उपयोग होत नाही! प्रयोजकरचनांची नवाबी ऐट तमिळमध्ये नाही. हिन्दीच्या तुलनेनं अशा प्रायोजक रचना भारतातल्या इतर कोणत्याही प्रांतातल्या भाषांमधून जवळ-जवळ होत नाहीत असं म्हटलं तरी चालेल.

मराठी प्रदेशाचा विचार केला तर महाराष्ट्रात सुपीक म्हणण्यासारखे जिल्हे दोनच ते म्हणजे भंडारा आणि कोल्हापूर. भूशास्त्रीयदृष्ट्या ह्या दोन जिल्ह्यांत खऱ्या अर्थानं माती आहे. बाकी साऱ्या महाराष्ट्रातली माती गेल्या लाखो वर्षात झालेल्या पावसापाण्यानं धूप होऊन-होऊन वाहून गेली, उरला तो नुसता उघडा-बोडका अवशिष्ट पर्वत, कोल्हापूर हा शेतीच्या दृष्टीनं चांगला, सुपीक प्रदेश. फार पूर्वीपासून कृषीमुळे संपन्न असलेला प्रदेश, त्यामुळे इथल्या लोकांच्या हाताखाली चार नोकर-चाकर बाळगण्याची परिस्थिती होती/आहे. स्वाभाविकच इथल्या भाषेत इतरांकडून कामं करून घेण्याची भाषा पुण्याच्या भाषेपेक्षा खूपच अधिक प्रमाणात वापरलेली दिसून येते पण गंमत म्हणजे हिन्दी भाषिक प्रदेशांप्रमाणे इथे प्रयोजकाची रचना होत नाही. 'संध्याकाळी रामाबरोबर लावून देतो', 'रामाला आणायला सांगतो', 'गाणपालाच लावून देतो', 'केरबाबरोबर धाडून देतो', 'करायला लावतो', 'बाळूकडून लोटून घेतो.' इत्यादी. अशा प्रकारे म्हणण्याची पद्धत आहे म्हणजे देतो, लावतो, बघतो असं कर्तरी क्रियापदाचं वापरलं जातं. देववतो, घालववतो, लोटवतो, झाडवतो, आणवतो असले आपल्याला सवय नसल्यामुळे अत्यंत चमत्कारिक वाटणारे शब्दप्रयोग आपण चुकूनही कुठे ऐकलेले नसतात की कुठे वाचलेलेही नसतात! तेव्हा कोल्हापुरातली भौगोलिक परिस्थिति थोडी वेगळी असली तरी, बरी असली तरी तो महाराष्ट्रातला एक अपवाद आहे एवढंच म्हणता येईल. प्रयोजकसदृश रचना तिथे होत असल्या तरीही हिन्दीतल्या अस्सल प्रयोजक रचनेचा बादशाही थाट आणि नबाबी मस्ती आपल्या कोल्हापुरी मराठीतल्या वाक्यांमध्ये मुळीच येत नाही ह्यात काही संशय नाही.

अनुक्रमणिका

१०
नसणे

हॅम्लेटला मोठा गहन प्रश्न पडला होता TO be or **not** to be? पुढे त्या बिचाऱ्याची मानसिक स्थिती फारच चमत्कारिक झाली वगैरे भाग आपल्याला ठाऊक आहेच. भाषेच्या दृष्टीनं हॅम्लेटच्या ह्या समस्येचा विचार केला तर इंग्लिश भाषेतली ही रचना फार सोपी आहे. नकार दाखवायचा झाला की क्रियापदाच्या जोडीनं नॉट् वापरलं की झालं ! He is there. नकारार्थी करायचं झालं तर He is **not** there. Is he coming ?. No, he is **not** coming. Did he get the letter ? No, he did not get it. वगैरे. थोडक्यात म्हणजे इंग्लिश भाषेतला नन्नाचा पाढा सोपा आहे.

आपल्या प्राचीन संस्कृत भाषेतही असाच प्रकार आहे. 'स: अत्र अस्ति|', 'स: अत्र न अस्ति/नास्ति|' 'स: गृहं गच्छति|' 'सः गृहं **न** गच्छति|' म्हणजे '**न**' वापरला की नकारात्मक वाक्यं बनतं. रूसी, जर्मन वगैरे भाषांमधूनही अशीच पद्धत दिसते. उदा. रूसी भाषेत- 'अना पनिमायेत.' (तिला समजतं.) तर नकारात्मक होतं 'अना **नि** पनिमायेत. (तिला काही समजत नाही.) . 'ओन् गवरिल्. –ओन् **नि** गवरिल्.' (तो म्हणाला. -तो म्हणाला नाही) . किंवा जर्मन भाषेत Er Kommt heute. – Er Kommt nicht heute. (तो आज येतो. - तो आज येत नाही.)

युरोपात रोमनांनी साम्राज्य स्थापलं, अनेक अर्थांनी गाजवलं तरी संस्कृतीचा ठेका मात्र फ्रेंचांकडेच दिसतो! ह्या पार्श्वभूमीवर फ्रेंचांचा भाषिक अभिमानही फार प्रखर, त्यामुळे फ्रेंचांच्या नकाराची तऱ्हा तर आणखीनच वेगळी! त्यांना तर नकार एकदा सांगून पुरत नाही. एकदा नाही म्हणलं नि तेवढ्यात तुम्ही विसरलात तर? नकार ऐकणाऱ्याच्या मनावर चांगला ठसावा म्हणून ते वाक्याच्या शेवटी पुनः तो ठासून सांगतात, हलवून खुंटा बळकट केल्याप्रमाणे. ज्झS पार्ल् Je parle म्हणजे मी बोलतो पण मी बोलत नाही असं म्हणायचं झालं तर ज्झS न पार्ल् Je ne parle एवढं म्हणून पुरत नाही तर पुढे 'पा' म्हणावंच लागतं म्हणजे ज्झS न पार्ल पा Je ne parle pas! त्रिवार नाही पण दुहेरी नकार! व्हू कोम्प्रने?-नों, ज्झS ण कोम्प्रि पा Vous comprenez?-Non, je ne compri pas! (तुम्हाला कळलं का?-नाही, मला काही कळलं नाही!) आपल्याकडच्या वैदिक परंपरेमध्ये जसं 'इन्द्राय इदं दत्तम्' एवढं म्हणून पुरत नाही तर पुढे 'न मम!' असं म्हणावंच लागतं त्या प्रमाणे, सारं काम कसं चोख आणि कायदेशीर हवं!

तेव्हा थोडक्यात असं म्हणता येईल की टु बी/ **नॉट** टु बी. अस्ति/ **ना**स्ति. भवती/ **न** भवति. जाइन्/ निश्ट् जाइन्. येस्त्/ **नि** येस्त् अशा सकारात्मक नि नकारात्मक जोड्या बनताना इतर भाषांमध्ये क्रियाविशेषण लागतं.

आपल्या मराठीत मात्र हे प्रकरण एकदम वेगळं आहे. नुसतंच वेगळं आहे असं नाही तर अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठीचं वेगळेपण असं की न, निश्ट, नॉट, नि, न. . . पा अशा कोणत्याही नकारात्मक शब्दाची (क्रियाविशेषणाची) जोड न देता आपण नकार दाखवू शकतो कारण नकार दाखवणारं पूर्ण वेगळं, स्वतंत्र असं एक क्रियापदाच मराठी भाषेत आहे, ते म्हणजे 'नसणे'

काहींना वाटेल की अरे हे काय क्रियापद आहे? हा तर साधा संधी आहे. संस्कृतात न+अस्ति=नास्ति होतं त्याप्रमाणेच 'असणे' ला न लावला की 'नसणे'!

नाही! नसणे हा सन्धि नाही. 'न'+'आहे' ह्यांचा संधी केला तर काय रूप होईल? 'नाहे' होईल! असणे अधिक न केलं तर काय होईल? नासणे! (नासणे असं एक क्रियापद मराठीत आहेच पण त्याचा अर्थ खूपच वेगळा आहे हे आपल्याला चांगलं ठाऊक आहेच.) म्हणजे 'नसणे' हा कुठल्याही प्रकारचा संधी वगैरे नाही तर ते स्वतंत्र क्रियापदाच आहे.

नसणे हे क्रियापदच आहे म्हणूनतर ते इतर क्रियापदांप्रमाणे चालतं. म्हणजे मी नाही. तू नाही**स**. ते नाही**त** इत्यादी. हे क्रियापद आहे म्हणून चालतं, त्याला वेगवेगळे प्रत्यय लागतात, ते प्रत्यय कर्त्यानुसार, काळानुसार बदलतात. नसणे हे क्रियापद असल्यामुळे ह्याची भूतकाळाची रूपंही अस्तित्त्वात आहेत, उदा० 'तू काल घरी नव्हतास.' भूतकाळाप्रमाणेच भविष्यकाळाची रूपंही आहेत, उदा० 'मी उद्या संध्याकाळी घरी **असेन** की **नसेन** हे सांगता येत नाही.' त्याचप्रमाणे 'तो असेल किंवा नसेल-' 'तो घरी असो किंवा नसो-' इत्यादी. नसणे हे जर क्रियापद नसतं, इतर भाषांमध्ये आहेत त्याप्रमाणे क्रियाविशेषण असतं तर त्याच्या रूपात कसलाही बदल झाला नसता, ते अव्ययाप्रमाणे अविकारी राहिलं असतं.

मराठीतल्या ह्या वैशिष्ट्यपूर्ण क्रियापदांची जाणीव अनेकांना नसली तरी काही चांगल्या कोषकारांनी अर्थातच ह्या क्रियापदाची नोंद घेतलेली आहे आणि त्यांनी आपल्या कोषामध्ये 'नसणे' हे क्रियापद स्वतंत्रपणे दाखवलेलंही आहे. . .

'नसण्याचं' एक साधं उदाहरण पाहूया! 'आनंद आत्ता घरात आहे.' ह्याचं नकारात्मक काय होईल? 'आनंद आत्ता घरात नाही.'('आनंद घरात नाही आहे' असं होत नाही) ह्या वाक्यात इंग्लिश, संस्कृत, जर्मन, रूसी वगैरे भाषांप्रमाणे कोणतंही नकारदर्शक क्रियाविशेषण (ॲडव्हर्ब) वापरलेलं नाही तरीही ह्या वाक्याचा अर्थ नकारात्मक आहे. आहे की नाही गंमत?

संस्कृत किंवा इतर कोणत्याही आधुनिक आर्य भाषांमध्ये मुळीच नसलेलं हे वेगळं क्रियापद मराठीत आलं तरी कुठून हा खरं तर एक संशोधनाचाच विषय आहे. उत्तरेकडे ह्या प्रश्नाचं उत्तर सापडत नाही. दक्षिणेकडे असलेली आपली शेजारीण म्हणजे कन्नड. ह्या भाषेतून 'नसणे' मराठीत आलं असेल का?

'नम्म (तुझं) हेसरू (नाव) यादिवळगे (यादीत) इदे (आहे) .' आणि 'नम्म हेसरू यादिवळगे इल्ल'. (तुझं नाव यादीत नाही.) ह्या कन्नड रचनेत असं दिसतं की नकारासाठी 'इल्ल' शब्द वापरताना तिथे 'इदे' हे क्रियापदाचं रूप येत नाही तर फक्त 'इल्ल' येतं. पण ह्या 'इल्ल' शब्दात लिंग, वचन, काळ ह्यानुसार कुठेही, कसलाही बदल होत नाही म्हणजे इल्ल हा शब्द संस्कृत, इंग्लिश, रूसी, जर्मन वगैरे भाषांमध्ये वापरतात त्याप्रमाणेच क्रियाविशेषणाप्रमाणे/ अव्ययाप्रमाणे वापरला जातो, म्हणजे मराठीतल्याप्रमाणे ते क्रियापद नाही.

कधी-कधी भाषेतलं असं एखादं 'नसणं' ही गंमतशीर नि अवघड 'असतं'!

११
परिभाषा

भाषा, बोली हे शब्द आपल्या केवळ परिचयाचेच नव्हे तर अगदी रोजच्या व्यवहारातले आहेत. ह्यांच्या जोडीनं येणारा परिभाषा हा शब्द तसा आपल्या रोजच्या वापरातला नसला तरी आता तो आपल्या चांगला परिचयाचा झालेला आहे ह्यात तर काही शंका नाही. परिभाषा, परिपत्रक वगैरे नाना 'पऱ्यां'ना आपण आता आपल्या जिभेवर हळू हळू स्थान द्यायला लागलो आहोत.

परिभाषा सोपी असावी, नसल्यास ती सोपी (एकदम सोप्पी) करावी अशी मागणी फार पूर्वीपासून आहे. आपल्या आचार्य अत्र्यांनीसुध्दा सोप्या परिभाषेसाठी आग्रह धरला होता आणि त्यांच्या कल्पनेला विरोध करणारा जो कोणी दिसेल त्याच्यावर घणाघाती हल्ले केले होते! पहिल्या पदनामकोशाला तर त्यांनी कायमचच बदनामकोश करून टाकलं होतं! मुळात प्रश्न असा आहे की परिभाषेचं प्रयोजन काय?

आपण सामान्यत: व्यवहारात जी भाषा वापरतो, ती खरी भाषा, म्हणजे ज्याला हल्लीच्या संगणकयुगात नैसर्गिक भाषा- नॅचरल लॅंग्वेज -म्हणू लागले आहेत, ती भाषा. तिला त्या त्या समाजात विकसित झालेली अनेक शतकांची परंपरा असते. त्या भाषेत एका शब्दाचे अनेक अर्थ होतात तर अनेक शब्दांचे अर्थ सारखेच असतात! एकच शब्द वगवेगळ्या पदधतीनं उच्चारल्यास त्याचे अर्थही वेगवेगळे होणं, गोळाबेरीज अर्थ तोच असला तरी त्याच्या छटा बदलणं अशा अनेक गमतीजमती सर्वच भाषांमध्ये स्वाभाविकपणे होत असतात, ह्याला कोणतीही भाषा म्हणजे नैसर्गिक भाषा अपवाद नाही. एखादी भाषा जेव्हा खऱ्या अर्थानं सर्वत्र-समाजाच्या सर्व थरांमध्ये, सर्व तऱ्हेच्या कामांसाठी एकमेव भाषा म्हणून वापरायची असते तेव्हा तिच्यात नेमकेपणा आवश्यक असतो. साध्या, सोप्या भाषेत सांगायचं झालं तर असं म्हणता येईल की भाषेतला नेमकेपणा म्हणजे एका शब्दाला एकच अर्थ असणं आणि एका अर्थाचा एकच शब्द असणं!

खरं सांगायचं तर आपल्या सर्वच व्यवहारांमध्ये आपल्याला नेमकेपणाची गरज असते, तो असावा असंही प्रत्येकाला वाटतं, पण त्यावाचून आपलं अडत नाही असाही आपला गोड गैरसमज असतो. त्यामुळे जेव्हा नेमकेपणा आणायचा प्रयत्न होतो तेव्हा काहीतरी भयंकर चालू आहे अशा कल्पनेनं माणसं बोलायला लागतात, भडकतात, चवताळतातही. मराठीत पदनामकोष जेव्हा तयार झाला तेव्हा खुद्द आचार्य अत्र्यांनीच 'बदनामकोष' म्हणून त्याची टिंगल केली होती. एका शब्दाला एकच निश्चिती अर्थ हे शास्त्रीय तत्त्व पाळायचं म्हणजे शेकडो-हजारो नव्या शब्दांची गरज भासणार, जसजसं आपलं ज्ञान वाढत जाईल तशी तशी आपली शब्दांची गरजही वाढत जाणार हेही आपण लक्षात घ्यायला पाहिजे. म्हणजेच नव्यानं शब्द बनवण्याला पर्याय असणार नाही आणि हे करताना आपल्याला संस्कृतचाच आधार घ्यावा लागेल हेही आपण ध्यानात ठेवायला पाहिजे.

शब्द सोपे असावेत असं म्हणणारे एक मुद्दा विसरतात/लक्षातच घेत नाहीत की मुळात शब्द सोपा किंवा अवघड असा नसतोच. त्या शब्दानं व्यक्त होणारी गोष्ट, कल्पना, वस्तू तुम्हाला माहीत असेल तर तो शब्द सोपा असतो पण ती गोष्टच तुम्हाला माहीत नसेल तर तो शब्दही अवघड वाटतो; वाटणारच! तेव्हा शब्द समजून घेण्यासाठी तो विषय समजून घ्यायला पाहिजे, विषय समाजाला तरच शब्द कळणार. पण सोपेपणाची सवंग लोकप्रिय मागणी करणाऱ्यांना विषय समजून न घेताच शब्दज्ञान अपेक्षित असतं, काहीही

न शिकता आपोआप सर्व कळावं असं वाटत असतं, हे शक्य नाही! ही गोष्ट कोणत्याही भाषेत, कोणत्याही समाजात, कोणत्याही काळात शक्य नसते. इंग्लंडात सर्वत्र इंग्लिश हेच माध्यम आहे म्हणून काय कोणत्याही माणसाला इंग्लिशमध्ये असलेलं कुठलंही पुस्तक कळतं की काय? शब्द कळण्यासाठी विषयाचा अभ्यास अत्यावश्यक असतो. केवळ इंग्लिश येतं एवढ्या भांडवलावर आपल्याला तर्कशास्त्र, शरीरशास्त्र, संगणकशास्त्र किंवा अर्थशास्त्र कळू शकेल असा जर कोणाचा भ्रम असेल तर आपण तो दूर केला पाहिजे.

मराठीचा उपयोग जिथे कुठे आज होऊ लागला आहे तिथली पत्रं किंवा परिपत्रक पाहून कोणीही चक्रावून जावं अशी स्थिती आहे ह्यात शंकाच नाही; पण हा प्रश्न शब्दांचा नसून शैलीचा आहे. शब्द सोपे किंवा अवघड नसतात हे आपण पाहिलंच पण त्यांचा वापर कसा केला जातो ह्यावरही खूप अवलंबून असतं. इंग्लिश भाषेची सरकारी शैली, सध्याची शैली ही अनेक वर्ष वापरून वापरून तयार झालेली आहे, ती लोकांच्या अंगवळणी पडलेली आहे, लोकांच्या सरावाची झालेली आहे; म्हणून ती सोपी वाटते.

मराठीतही अशी प्रक्रिया होणं आवश्यक आहे, होईलही. काटेकोर, चपखल, अर्थवाही, प्रभावी आणि तरीही प्रासादिक अशी प्रशासकीय मराठी शैली अशक्य नाही; पण त्यासाठी पहिली अट म्हणजे आपण सर्वांनी ती भाषा आग्रहानं, वाटल्यास थोड्या अट्टहासानं वापरली पाहिजे. तिचा वापर करताना महत्त्वाची पहिली गोष्ट आपण करायला पाहिजे. ती अशी की आपण आपल्याला केवळ सराव आहे म्हणून, आपल्याला सोपं जावं म्हणून उठसूट इंग्लिशचं भाषांतर करून भाषांतर-छाप मराठी लिहिणं ताबडतोब बंद करायला पाहिजे!

आपल्या भाषांशी असलेला आपला सर्वसामान्य माणसाचा संपर्क सुदैवानं अजूनही तुटलेला नाही. मराठीत लिहिताना आपण जरा असा विचार केला की बुवा माझ्या आजीला इंग्लिश येत नाही/ नव्हतं, मुळी च येत नव्हतं तेव्हा ही गोष्ट आपण आपल्या आजीला मराठीत कशी सांगितली असती? इंग्लिशचा अगदी एकही शब्द न वापरता सांगण्यासाठी आपण काय काय केलं असतं? कोणत्या क्लृप्त्या लढवल्या असत्या?-तिला कळावं म्हणून आपण मोठया प्रेमानं, जिद्दीनं जे जे काय केलं असतं ते सगळं आपण आता आपल्या बांधवांसाठी करायचं आहे! मराठी भाषा हाच तर आपल्यातला प्रेमबंध आहे! हा बंधच आपण तोडून टाकणार असलो तर कसलं बंधुत्व नि कोण बंधू? आपण जर मराठीत विचार करायचा प्रयत्न केला- खरं तर हीच स्वाभाविक प्रक्रिया आहे – तर खास देशी वळण्याची अर्थवाही, शक्तिशाली आणि तरीही सुबोध मराठी अत्यल्प काळात विकसित होऊ शकेल, म्हणजे आपण करू शकू. जगातल्या आजच्या प्रगत देशांच्या भाग्यशाली भाषांचा इतिहास हेच सांगतो की प्रयत्न केल्यास काहीही अशक्य नाही.

इतर अनेक भाषांच्या तुलनेनं आपली मराटी भाषा किती प्रगत आहे हेही एकदा ठणकावून सांगायलाच हवं. तिला सतत अप्रगत म्हणून आपण तसंच चुकीचं समजून चालायला लागलो आहोत. . . .

अनुक्रमणिका

१२
नाती गोती

परवा जेनेटचा फोन आला आणि 'आज मी येणार नाही' असा निरोप तिनं आमच्या शेजारी राहणाऱ्या तिच्या मेरी 'आन्टी'ला लगेच सांगायला म्हणून माझ्याकडे दिला. मी लगबगीनं शेजारी जाऊन निरोप दिला; तेव्हा त्यांनी मला न येण्याचं कारण विचारलं. जेनेटनं मला फोनवर 'माय कझिन हॅज कम फ्रॉम लंडन' असं सांगितलेलं असल्यामुळे मीही तत्परतेनं (पण नकळत भाषांतर करून) तिचा लंडनचा भाऊ आला आहे असं सांगितलं, तेव्हा आमच्या शेजारीणबाई आतूनच अक्षरशः ओरडल्या की 'अहो, जेनेटला भाऊच नाही! लंडनला असते ती तिची बहीण, मावस बहीण !'

इंग्लिशमधला कझिन हा शब्दच गोंधळ करणार आहे. ह्या शब्दानं कोणता भाऊ किंवा कोणती बहीण हे तर मुळीच कळत नाही; पण भाऊ की बहीण एवढा साधा भेदसुध्दा ह्या शब्दातून प्रकट होत नाही. नातेवाईकवाचक शब्द हे त्या-त्या समाजानं आपल्या गरजेनुसार बनवलेले असतात. साधं भावंडांच्या बाबतीत बघितलं तरी लक्षात येतं की इंग्लिश समाजाच्या गरजा फारच कमी आहेत; त्यांना ब्रदर, सिस्टर आणि कझिन एवढे तीन शब्दच पुरतात, अगदी भावंडं ह्या शब्दाचीसुद्धा त्यांना गरज पडत नाही! जर्मन बोलणाऱ्यांच्या गरजा इंग्लिशांपेक्षा जरा व्यापक आहेत असं दिसतं. त्यांना ब्रूडर्(Bruder भाऊ) , श्वेस्टर्(Schwester बहीण) , गश्विस्टर (Geschwester) भावंडं, फ़ेटर् (Vetter चुलत /आते/मामे/मावस भाऊ) आणि कुजीनऽ (Kusine चुलत/आते/मामे /मावस बहीण) असे पाच शब्द लागतात. मराठी – हिन्दीत आपल्याला किमान आठ शब्दांची गरज पडते; म्हणजे चुलत, आते, मामे, मावस भाऊ किंवा बहीण, कन्नड, तेलगु, तमिळ, मलयाळम् ह्या भाषांमध्ये मोठा भाऊ किंवा मोठी बहीण ह्यांच्यासाठी वेगळे शब्द आहेत. उदा. तमिळमध्ये अण्णा म्हणजे मोठा भाऊ नि तम्बी म्हणजे धाकटा भाऊ. मोठी बहीण अक्क नि धाकटी बहीण तंगई. नातेवाईकवाचक शब्दांचा विकास त्या-त्या समाजाच्या आणि प्रदेशाच्या आर्थिक परिस्थितीवर आणि सामाजिक चाली –रीतींवर अवलंबून असतो आणि ती स्थिती मुख्यतः शेतीवर अवलंबून असते.

आपल्याकडे गंगा-यमुनेच्या खोऱ्यांतल्या भाषांमध्ये नातेवाईकवाचक शब्द जसे विकसित झालेले दिसतात तसे महाराष्ट्रासारख्या दुष्काळी प्रदेशात झालेले दिसत नाहीत. परिणामतः अनेक व्यक्तींना, उदाहरणार्थ हिन्दी भाषिक प्रदेशात ज्या व्यक्तींना नातेवाईक मानलं जातं त्यांना आपल्या मराठी प्रदेशात नातेवाईकच मानलं जात नाही! आता त्यांना नातेवाईकच न मानल्यामुळे त्यांच्यासाठी भाषेत शब्द असण्याचीही गरज नसते! मावशीच्या नवऱ्याला हिन्दीत मौसा (जी) म्हणतात आणि आत्याच्या नवऱ्याला फूफा(जी) म्हणतात, ह्यांच्यासाठी मराठीत काय शब्द आहेत?- शब्दच नाहीत! शब्द नसण्याचं कारणही सोपं आहे, मराठी समाज ह्या दोघांना नातेवाईकच मानत नाही! ही 'नवरे'मडळी नातेवाईकच नाहीत त्यामुळे त्यांच्यासाठी वेगळे, स्वतंत्र शब्द नाहीत! (पूर्व महाराष्ट्रात मासा आणि फूफा ह्यांना काका/मामा वगैरे म्हणतात, पण हा सरळ सरळ हिन्दीचा परिणाम दिसतो. पूर्व महाराष्ट्रात मराठी भाषेवरच नव्हे तर संस्कृतीवरही हिन्दीचा फार मोठा प्रभाव आहे/ दडपण आहे) हिन्दी भाषिक त्यांना काही म्हणतात तेव्हा आपणही काही तरी म्हणायला पाहिजे अशा'सत्'भावनेतून मावशीच्या नवऱ्याला आणि आत्याच्या नवऱ्याला काका/ मामा शब्द वापरला जाऊ लागला असावा. मराठीत काका/मामा ह्या शब्दांचे अर्थ अतिशय स्पष्ट आहेत. काका/मामा ह्या महत्त्वाच्या नात्यांचा इतका भोंगळ उपयोग हेच दर्शवतो की हा अर्थ त्याला नंतर चिकटवलेला आहे. 'मावसोबा' आणि 'आत्तोबा' असे बोकोबाच्या चालीवरचे शब्दही हेच दर्शवतात की हे

शब्द खरे नाहीत, मुळचे नाहीत. विचार करा की सभ्य सुसंस्कृत वातावरणात तुम्ही एखाद्या व्यक्तीची ओळख 'हे माझे मावसोबा!' किंवा 'हे माझे आतोबा!' अशी करून देता का?/ द्याल का?-नाही ना? ह्याचाच अर्थ असा की हे शब्द प्रतिष्ठित नाहीत, प्रमाण नाहीत.

इथे खरं म्हणजे एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असा आहे की प्रत्येक भाषेत सर्व काही असलंच पाहिजे असं असतं का? आणि ह्या धर्तीवर नणदेच्या नवऱ्याला 'नणदोबा' आणि मेव्हण्याचा बायकोला म्हणजे बायकोच्या भावाच्या बायकोला 'मेव्हणाई' वगैरे काही शब्दांच्या विचार तरी मराठी भाषिकांनी केलेला आहे का? नाही! कारण मराठी समाजाच्या दृष्टीनं हे तसे नातेवाईक नाहीतच. पण ह्या मंडळीसाठी हिन्दी भाषेत शब्द आहेत (नन्दोई, सलहज) कारण त्यांना तिथे नातेवाईक म्हणून मानाचं स्थान असतं.

एखाद्याला काय म्हणायचं हाही खरं तर महत्त्वाचा प्रश्न असतो. घर, शाळा वगैरे ठिकाणी कोणी कुणाला काय म्हणायचं ह्याबाबत मराठीत रूढ शब्द आहे; पण गेल्या काही वर्षात असित्वात आलेल्या नव्या ठिकाणी कोणी कोणाला काय म्हणायचं हे अजून धडपणे ठरलेलंच नाही! उदाहरणार्थ सभेत सदस्य आणि अध्यश ह्यांना काय म्हणून संबोधावं? कार्यालयात कोणी कोणाला काय म्हणाव? एखाद्याला 'साहेब' म्हणणं अजूनही आपल्याला रुचत नाही; कारण ते गुलामगिरीचं /चमचेगिरीचं लक्षण आहे हे आपल्या सुशिक्षितांना चांगलं ठाऊक आहे. वरिष्ठच्या पदावर एखादी महिला असेल तर तिला नुसतं 'बाई 'म्हणायचं का? अशा संबो धनांचा विकास मराठीत व्हायचा आहे.

मराठीत जे जे आहे ते ते इतर भाषांमध्ये असायलाच पाहिजे असं आहे का? इंग्लिशमध्ये जे जे आहे ते ते सर्व काही, भले फार चांगलं –असलं तरीही ते त्याच प्रकारे मराठीत आणण्याचा प्रयत्न किंवा खटाटोप केलाच पाहिजे का ? मराठीत किंवा इतर अनेक भारतीय भाषांमध्ये अशा कितीतरी चांगल्या गोष्टी आहेत की ज्या इंग्लिशमध्ये नाहीत, त्या इंग्लिशमध्ये घुसवण्याचा प्रयत्न कधी होतो का? नाही होत! तथाकथित एकवाक्यता –युनिफॉर्मिटि म्हणून जे 'प्रयत्न' अनेक स्तरांवर चालू असतात त्यांना पाठिंबा द्यायला पाहिजे की निर्विकारपणे दुर्लक्ष करायला पाहिजे की आपल्या भाषेची प्रवृत्ती बघून आवश्यक तेव्हा विरोध करायला पाहिजे? भाषांची स्वत:ची म्हणून जी काही वैशिष्ट्यं असतात, कोणत्याही समाजानं ती उगाचच्या उगाच घालवून टाकू नयेत. नवं स्वीकारताना मूळच्या गाभ्याला किंचितही धक्का लागणार नाही ह्याची काळजी डोळ्यात तेल घालून घेणं आवश्यक असतं, 'आकादेमी फ्रॉसेज्'प्रमाणे.

राज्यव्यवहारात मराठीचा वापर (नव्हे, प्रयोग) करण्याचा विचार जेव्हा जेव्हा होतो तेव्हा तेव्हा हितसंबंधियांकडून मराठीतल्या असलेल्या नसलेल्या काल्पनिक उणिवांचा पाढा वाचला जातो, शक्य असेल तेव्हा मराठीची टिंगल केली जाते आणि कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ह्या न्यायानं असलेली परिस्थिती कायम ठेवण्यात येते म्हणजे मराठीचा वापर 'स्थगित' ठेवण्यात येतो किंवा परिभाषेच्या बाऊ करण्यात येतो किंवा नव्या शब्दांच्या आणि तथाकथित नव्या शैलीच्या म्हणजे थेट इंग्लिश वळणाच्या दुर्बोध '(प्र) शासकीय' भाषेनं मराठीचा आग्रह धरण्याऱ्यावर 'भीक नको पण कुत्रं आवर' असं म्हणायची वेळ आणण्यात येते! परिभाषा हा मुळात रोचक नि उपयुक्त असलेला पण अकारण दुर्बोध आणि गूढ बनवून ठेवलेला विषय झाला आहे!

अनुक्रमणिका

१३
हस्ताक्षर

सहज बोलता-बोलता गप्पांच्या ओघात माझा एक चिनी मित्र म्हणाला की 'आमची चित्रलिपी ही जगातली सर्वात जुनी लेखनपद्धती आहे!' अशा वेळी माझ्यातला भारतीय तोही परदेशात असताना गप्प बसणं शक्यच नव्हतं! मी अर्थातच भारतातली ब्राम्ही-खरोष्टीची माहिती सांगून त्या पद्धातीचं लेखन हेच सर्वात जुनं आहे असं उत्स्फूर्तपणानं नि मोठया अभिनिवेशानं सांगण्याचा प्रयत्न करत होतो. आमच्या गप्पांमधून निर्माण झालेला हा वाद फार न ताणता काही वेळानं आम्ही दोघांनाही नेहमीप्रमाणे 'अनिर्णित/बरोबरीत'सोडून दिला, पण तो विषय माझ्या डोक्यात पक्का राहिला.

माणूस नक्की कधी लिहू लागला हे सांगणं कठीण आहे लिहिण्यापूर्वी तो चित्रं काढू लागला असणार हे निश्चित. आपल्या परिसरात दिसणाऱ्या विविध आकृती त्याला भावल्या असणार नि फुरसतीच्या वेळी चाळा म्हणून नि नंतर वेळ काढून त्यानं त्या 'काढायचा' प्रयत्न केलेला असणार. जे पाहिलं, जसं दिसलं 'तसं'ते रेखताना सुरुवातीच्या काळात त्याला काय अडचणी आल्या असतील, लेखनाची सुरुवात कोणत्या 'अपघातानं' झाली असेल ह्याची इतिहासात कुठे नोंद नसली तरी आपण ते कल्पनेनं समजू शकतो. त्या काळात रेखाटणं हे अतिशय अवघड काम असलं पाहिजे !

वेगवेगळ्या प्रकारच्या रेषांच्या आधारानं ध्वनीशी संबंधित अक्षरं निर्माण व्हायला कितीतरी हजार वर्षाचा काळ गेला असणार नि तेवढ्या काळात माणसं आपल्या परीनं चित्रच काढत असणार! गंमत म्हणजे हा मुद्दा आमच्या वादात आलाच नव्हता! त्यालाही सुचला नव्हता! ह्या मुद्द्यावरून वाटतं की ध्वनीचा कसलाही आधार नसलेली चिनी चित्रलिपी ही आपल्या ब्राह्मी, खरोष्टी लिप्यांच्या खूपच अगोदरची, अगोदरच्या 'पिढीतली' कदाचित ब्राह्मीची आजी/पणजी/खापरपणजी शोभेल इतकी प्राचीन लेखनपद्धती असली पाहिजे हे नि:संशय.

ब्राम्ही लिपीही मुळात चित्रलिपी असली पाहिजे कारण अक्षरांना ध्वनीची जोड देताना किंवा ध्वनीला अक्षर म्हणून काही आकार देताना, नवे संकेत ठरवताना आधार हा एखाद्या वस्तूचा, कल्पनेचाच असणार ना! कोणते शब्द असतील ते? वैदिक-पूर्व भाषेतले किंवा कदाचित त्या भाषेच्या पूर्वीच्या भाषेतले? उदाहरणार्थ 'गज' ह्या प्राण्याचं चित्र काढलं, पुढे ते चिनी पद्धतीनं सोपं-सोपं होत गेलं तर काय राहिल त्या चित्रात? त्या प्राण्याचं व्यवच्छेदक लक्षण म्हणजे सोंड ब्राम्ही लिपीतला 'ग'गजाच्या सोंडेसारखाच आहे !

चिनी लिपीचा विकास लक्षात घेतला तर माझी ही कल्पना तर्कसंगत आहे. ह्या दिशेनं विचार केला, जुने भाषिक पुरावे शोधले, अधिक संशोधन केलं तर ब्राह्मीचा मूलाधार शोधून काढणं शक्य होईल.

चीनमध्ये चित्रांचं सुलभीकरण होत गेलं कारण तिथे त्या वस्तूला, वस्तूलाच नव्हे तर भावनांनाही आकार देण्याचा, त्याचं चित्र रेखाटण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. इतर जगात आकाराऐवजी ध्वनींचा आधार घेऊन अनुकरण / सुलभीकरण झालेलं असावं असंच दिसतं. लेखन सर्वांना यावं ह्याच कल्पनेनं ते सोपं करायचे प्रयत्न झालेले असणार. सुलभीकरणाच्या कल्पना प्रत्येक समाजाच्या वेगळ्या होत्या हा भाग वेगळा!

जपानी लोकांनी चिनी लिपीच्या आधारानं आपली लिपी, नव्हे लिप्या तयार केल्या; पण स्वर आणि व्यंजन वेगळे करून दाखवण्याचं तंत्र जपानी लोकांना अजूनपर्यंत जमलेलं दिसत नाही. का, के, कि, को, क्यू ह्या पाचखडीत 'क्' हा समान ध्वनी आहे नि, आ, इ, ओ, आय अयू हे स्वर आहेत हे त्यांच्या लिपिकारांना जाणवलंही असेल; पण जपानी भाषेत त्यांची गरजा नसल्यामुळे ते वेगळे दाखवण्याची सोय केली गेली नसावी. शब्दभांडाराबाबत जसं दिसतं की ज्या कल्पनाच एखाद्या समाजात नसतात त्या कल्पनांसाठी त्यांच्या भाषेत शब्द नसतात, ते विकसित होत नाहीत. जपानमध्ये तीन-तीन पारंपारिक लिप्या असल्या तरीही स्वर आणि व्यंजन वेगळं दाखवण्याची सोय न होण्याचं/विकसित न होण्याचं कारण हेच असावं.

स्वर, व्यंजन, ह्रस्व, दीर्घ आणि प्लुत अशा एक ना अनेक प्रकारे आपल्याकडे ध्वनींचा अभ्यास झाला नि शास्त्रीय पायावर ब्राम्ही लिपीचा विकास झाला, तो वारसा सहजपणे सर्व भारतीय लिप्यांना मिळाला. आवाजातला चढ –उतार लक्षात घेता वैदिक भाषेत तीन प्रकार दिसतात- उदात्त, अनुदात्त आणि स्वरित. वैदिक भाषेच्या लेखनात हे स्वराघात (पिच ॲक्सेन्ट) दाखविण्याची सोय आहे. चिनी भाषेत असे चार प्रकारचे चढ-उतार आहेत, पण ते दाखवण्याची कसलीही सोय त्यांच्याकडे नाही. त्यांना ते उच्चारणाच्या प्रत्यक्ष तालमीतून-संस्कारातूनच शिकावे लागतात.

पण हा वारसा आपण नीटपणे सांभाळतो आहोत असं मात्र वाटत नाही. भारतात एवढ्या उत्तम लिप्या असूनही 'निर्गुण', निरक्षर' माणसं आपल्यातच अधिक ! एकीकडे मुद्रणकलेत विकास होत आहे नि त्याचवेळी आपल्या(जेमतेम साक्षर) मुलांचं हस्ताक्षर अधिकाधिक वाईट होत चाललं आहे. (शुध्दलेखनाबद्दल तर बोलायचीच सोय नाही.) थ, ध, श वगैरे अक्षरांचं गोटुळं रेषेला काढायचं की रेषेच्या चिकटून काढायचं की रेषेच्या खाली काढायचं, द, स, ह वगैरे अक्षरांचा खालचा फरांटा किती खाली ओढायचा ह्याचं शास्त्र आहे पण ते विध्यार्थ्यांनी ठाकून- ठोकून शिकवलं जात नाही.

मिशनऱ्यांनी चालवलेल्या (नुसत्या इंग्लिश माध्यमाच्या नव्हे) अनेक शाळांमध्ये अगदी सुरवाती पासून चार –रेघी वहीवर मुलांकडून अक्षर घटवून घेतलं जातं. रनिंग हॅन्डमध्ये वळणदार अक्षर होण्यासाठी तिथे जे परिश्रम करून घेतले जातात ते कौतुकास्पद असतात. मिशनऱ्यांच्या शाळेत मुलांसाठी करडी शिस्त, छडी आणि पालकांसाठी 'फाइन' ह्यांच्या वापरामुळे तिथल्या विद्यार्थ्यांचं अक्षर चांगलं होत असेल का?

ह्या बाबतीत बंगाली मुलं भाग्यवान कारण त्यांच्यासाठी शंभर वर्षापूर्वी विद्यासागरांसारख्या मोठया माणसानं खूप काम केलं. रवीन्द्रनाथ ठाकुरांनीही लहान मुलांसाठी खूप काम केलं. आपल्याकडे मराठीत असे प्रयत्न फारसे झालेले दिसत नाहीत.

अक्षराकडे लक्ष देणारे काही शिक्षक असतात. पण विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या बघता असे शिक्षक फारच थोडे. बहुतेक शाळा नित्यनेमानं हस्ताक्षरांच्या स्पर्धा घेतात, बक्षिसंही वाटतात, पण चांगलं अक्षर म्हणजे काय, त्याचे निकष काय, ते कसं काढावं /घटवावं हे शिकवत नाहीत. अक्षर गिरवून सुधारण्यासाठी बर्ग्यांची सुलेखा पाटी बाजारात मिळते, अनेक पालक ती आपल्या पाल्यांना आणून देतात, पण तिचा उपयोग केला जातो की नाही हे बघितलं जात नाही. ह्या सगळ्याचा परिणाम म्हणजे एकूण परिस्थितीत काही सुधारणा झालेली दिसत नाही.

शाळांनी जर अक्षरलेखनाचे पध्दतशीर धडे देण्याची व्यवस्था केली नि घरी पालकांनीही लक्ष घातलं तर आपल्याला खूप काही साधता येईल. 'भाषा काय, साधं माध्यम आहे! मुद्दा कळला म्हणजे झालं!' किंवा 'वाचता आलं म्हणजे झालं, त्यात शुद्ध –अशुद्धचा काय प्रश्न आहे? आणि आता हातानं लिहितो कोण?' असं पालकच वरचेवर म्हणत राहिले तर विध्यार्थ्याचं काय होणार?ही उदासीनता आपण प्रथम सोडली पाहिजे. मुलांचं अक्षर सुधारण्यासाठी पालकांनी, शिक्षकांनी अस्वस्थ होऊन कार्य करण्याची गरज आहे. ह्या विषयात रस असणारी, योजना असणारी नि त्यासाठी वेळ देऊ इच्छिणारी अनेक माणसं आहेत. पालकांनी पुढाकार घेतला तर अनेक जण पुढे येतील.

जोपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यांसमोर शाळेत, घरात संगणक येत नाही नि प्रत्येक जण आपल्या खिशातून संगणक नि मुद्रणयंत्र नेऊ शकत नाही, तोपर्यंत हातानं लिहिण्याची गरज पडणार आहे, म्हणून वळणदार नाही तरी सुवाच्य अक्षराची गरज राहणारच आहे.

अक्षर म्हणजे त्या-त्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग असतो. समर्थांनी म्हटलं आहे की सुंदर ह्स्ताक्षर पाहिल्यावर ते काढणाऱ्या माणसाला प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा होते, असं पाहिजे अक्षर. प्रत्येकाच्या हातावरच्या रेषा जशा वेगवेगळ्या असतात तसं अक्षरही वेगळंच असतं. चांगल्या अक्षराची तरफदारी जुन्या काळच्या संतांपासून ते महात्मा गांधीपर्यंत सर्वांनीच केलेली आहे. पाटीवर किंवा कागदावर काढलेल्या रेषांना 'मन'असतं हीच त्यांची गमंत. मित्राचं किंवा मैत्रिणीचं टंकलिखित पत्र किंवा हस्तलिखित पत्र ह्यातलं तुम्हाला कोणतं अधिक जवळचं वाटेल? जगात कितीही नवनवीन यंत्र निर्माण होवोत, खिशात मावणारे छोटे संगणक नि तसलीच मुद्रणयंत्र येवोत, कित्येक हजार वर्षांपासून माणसानं शोधून काढलेली नि लाखो पिढ्यांनी विकसित केलेली, जपलेली ह्स्ताक्षराची कला नि विद्या आपण कोणत्याही परिस्थितीत गमावता कामा नये. तोही आपला भाषेसारखाच अमूल्य वारसा आहे.

१४
भारतीय लिप्यांची एकात्मता

भारतीय भाषांसाठी रोमन लिपीच योग्य होईल आणि भारतीय लिप्यांचा गोंधळ आटोक्यात आणायचा असेल तर भारतीयांनी रोमन लिपी स्वीकारणं हा एकमेव रामबाण (की जेम्स-बॉड) उपाय आहे असा दावा करणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्थाही आपल्याकडे आहेत एवढंच नव्हे तर आपल्या ह्या सहिष्णु देशात त्या कार्यरत (?) आहेत. कोणत्याही (धश्चोट) माणसाला काहीही सांगण्याचा अधिकार आपल्या पवित्र घटनेनं दिलेला आहे, नव्हे प्रदान केलेला आहे! असं झटकन न कळणार किंवा अगडबंब काहीतरी म्हटलं किंवा लिहीलं की एकदम भारदस्त / की शासकीय वाटतं, नाही?!

भारतीय लिप्यांची स्थिती गोंधळाची आहे हे सांगणाऱ्यांना भारतीय भाषांची आणि लिप्यांची जुजबी माहितीही नसते आणि ते ऐकणाऱ्या सर्वसामान्य, सहनशील भारतीयाला ती द्यायला पाहिजे असं कोणालाच वाटत नाही!

अशा परिस्थितीत भारतीय भाषांच्या ऐक्यासाठी रोमन लिपीचा उपयोग करण्याची कल्पना ऐकून त्याला कुतूहल वाटतं. सर्वसामान्यांना असलेलं 'एकतेचं वेड' हीच असते रोमनवाद्यांना लाभलेली मऊ भुसभुशीत जमीन, मग काय? ते सरळ कोपरानंच खणायला सुरुवात करतात. समोरचा माणूस ऐकत राहतो, उलटे-सुलटे प्रश्न विचारत नाही त्यामुळे त्याचं 'ब्रेन-वॉशिंग' चालूच राहतं.

ज्या एकात्मतेचं मृगजळ भारतीयांपुढे निर्माण करण्याचा प्रयत्न होतो ते मुळातच किती निराधार आहे, खोट आहे हे त्या बिचाऱ्यांना ठाऊक तरी असतं की नाही कोण जाणे! रोमन लिपी एकच आहे असा प्रचार सातत्यानं केला जातो तोच मुळात धादांत खोटा आहे; कारण त्या लिपीत अक्षरांचा आकार- म्हणजे आकृती कदाचित एकसारखी दिसत असेल; म्हणजे इंग्लिश, फ्रेंच, जर्मन वगैरे भाषांसाठी मुख्य अक्षरं तीच आहेत असं म्हटलं तरी प्रत्येक भाषेत त्या अक्षरांचे उच्चार बदलतात! फार काय, खुद्द इंग्लिश भाषेतसुध्दा 'ए' ह्या अक्षराचे दहा प्रकारचे उच्चार होतात (उदा. cat, cane, talk, इत्यादी) मग उद्या ही कुडमुडी रोमन लिपी आपल्या भारतीय भाषांसाठी वापरायची झाली तर प्रत्येक भाषेनुसार तिच्यातल्या तथाकथित समान समजल्या जाणाऱ्या अक्षरांचे अनेक प्रकारचे उच्चार होतील भाषेनुसार तिच्यातल्या २६ अक्षरांच्या डोक्यावर पायाखाली, अलीकडे, पलीकडे पोटात वगैरे नाना प्रकारच्या किमान ३०/४० खुणा येतील, जर्मन भाषेलाच रोमन लिपीत ४ ज्यादा अक्षराची जोड द्यावी लागली (A. a. Oo, Uu, B) , फ्रेंच भाषेत रोमनच्या २६ अक्षरांच्या जोडीनं थोड्याथोडक्या नाही तर आणखी तेरा खुणा लागतात- (ग्राब्, एग्यु, सिर्कोफ्लेक्स आणि त्रेमा ह्या खुणा a, e, o, u ह्या अक्षरांच्या डोक्यावर दिल्या जातात आणि सेदीय ही खूण C अक्षराच्या खाली शेपटीसारखी दिली जाते.) तेव्हा ह्या प्रकारे भारतीय भाषांसाठी रोमन लिपीत नक्की किती नवी अक्षरं आणि खुणा घालाव्या लागतील ह्या जोडतोडीचा /तडजोडीचा पध्दतशीर हिशेबच अजून कोणी मांडलेला नाही; आणि हा सारा खटाटोप केल्यावर तिच्यात एकतावाद्यांना अपेक्षित असलेली एकता साधेल का?

आज भारतात वरवर पाहता जरी आठ-दहा लिप्या आहेत असं वाटत असलं तरी त्या सर्वांची पध्दत एकच आहे, उच्चारही एकाच प्रकारचे आहेत कारण ह्या अनेक वाटणाऱ्या लिप्यांचा मूलाधार एकच आहे, तो म्हणजे ब्राह्मी लिपी. खरं म्हणजे भारतात आजही एकच लिपी आहे असं म्हणणंच योग्य ठरेल! जे भेद वाटतात ते केवळ प्रादेशिक आहेत- लिप्या अनेक नसून देवनागरीचीच ती विविध प्रादेशिक रूपं आहेत.

रोमन- लिपीप्रेमिकांप्रमाणेच देवनागरी लिपिप्रेमिकांचा पण एक अतिरेक गट आपल्याकडे आहे. हा गट (इतर भारतीय संघटनांप्रमाणेच) तसा दुर्बळ असला तरी वैचारिक दृष्ट्या अतिरेकीच म्हणावा लागेल.

भारतातल्या सर्व भाषांनी आपापली लिपी त्यागून देवनागरीचा वापर करावा असं त्यांना मनापासून वाटतं. भारताच्या एकात्मतेसाठी ते आवश्यक आहे असा प्रचारसुद्धा ते हिरीरीनं करतात, पण त्यांचा क्षीण आवाज फारसा कोणापर्यंत पोहोचत नाही!

भारतात खूप लिप्या आहेत हाच मुळात भ्रम आहे, आहेत ती देवानागरीचीच प्रादेशिक रूपं. मग कन्नड किंवा तामिऴनं आपलं प्रादेशिक वळण बदलण्याची काय गरज आहे? ती प्रादेशिकता अत्यंत स्वाभाविक आहे, सुंदर आहे आणि मुख्य म्हणजे तिच्या प्रादेशिक रुपानं भारतीय एकतेला कुठेही बाधा येत नाही. मुद्रणकलेत आज होत असलेल्या क्रांतीकारक बदलांमुळे देवनागरीची प्रादेशिक वळणं आज पुनः जवळ येऊ लागली आहेत. मालयाळमच्या लिपीतले बदल, ॲ-ऑला मिळालेलं स्थान, बंगालीत देवनागरीसदृश झालेले बदल जिज्ञासूंनी अवश्य पहावेत.

आता ते प्रादेशिक वळण झटकन लक्षात येत नाही अशी कोणाची प्रामाणिक अडचण असेल तर गोष्टी वेगळी. अडचण प्रामाणिक असेल तर त्यावर उपाय शोधता येतात आणि ह्या तथाकथित समस्येवर तर उपाय आहेतच. भारतातली कोणतीही प्रादेशिक लिपी देवनागरी येणाऱ्या कोणत्याही सर्वसामान्य माणसाला खरोखरच तळमळ असेल तर एका दिवसात, नव्हे केवळ दोन-चार तासात सहजपणे शिकता येते, मग अशा परीस्थितीत ते प्रादेशिक वळणच मोडीत काढण्याची काय गरज आहे?

ब्राम्ही लिपीतलं अक्षरलेखन हळूहळू बदलत गेलं; ज्या काळात मुद्रणासारख्या प्रभावी साधनांचा अभाव होता त्या काळात असे बदल स्वाभाविकच होते. ह्या साऱ्या बदलांचा पद्धतशीर अभ्यास अनेक विद्वानांनी केलेला आहे, त्यावर चांगली ग्रंथरचना केलेली आहे, त्यातले बारकावे स्पष्ट करून दाखवलेले आहेत, त्या बदलांची कारणं स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लिपी विषयातले बरेचसे जाणकार नि चांगली साधनं आपल्याकडे उपलब्धही आहेत पण त्यांचा उपयोग करून लिपीचा बागुलबुवा दूर करावा असं मात्र कोणालाही वाटत नाही. सध्या आढळतात ते फक्त दोन टोकांचे अतिरेकीच. भारतीय विद्यार्थ्याला (प्रौढ विद्यार्थ्याला किंवा नवसाक्षराला नव्हे) त्याच्या शालेय जीवनातच भारतीय लिप्यांचा व्यवस्थित परिचय करून दिला तर त्यालाच त्याचा उपयोग होईल.

कोल्हापुरातून निघालेला आपल्याकडचा एखादा शिकलासवरलेला मराठी माणूस बसमध्ये बसून दोन तासांत बेळगांवच्या स्टँडवर उतरल्या-उतरल्या निरक्षर बनतो! बसवरच्या, दुकानांवरच्या पाट्याही त्याला वाचता येत नाहीत! अशा माणसाला एक वेळ कन्नड भाषा येत नसली तरी चालेल पण त्याला जर कन्नड लिपी वाचता येत असेल तर बऱ्याचशा अडचणी सहज दूर होऊ शकतील. भारतीय एकात्मतेसाठी किंवा देशाच्या भल्यासाठी, भारतीय एकात्मतेसाठी वगैरे नव्हे तर विशुद्ध स्वार्थासाठी म्हणजे इतर कुणाचं नुकसान न करता, कोणाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष न लुबाडता स्वतःचं भलं करणाऱ्या विशुद्ध स्वार्थासाठी, आपल्याच भल्यासाठी लिपी येणं/लिप्या येणं, किमान वाचता येणं महत्त्वाचं आहे आणि ते आहेही सहज जमणारं, सोपं काम. त्यासाठी पाहिजे जबरदस्त इच्छा आणि फक्त एक दिवस!

अनुक्रमणिका

१५
मराठी वर्णमालेचे तक्ते

पूर्वीची म्हणजे फार फार पूर्वी, रामा-कृष्णाच्या काळी वगैरे नव्हे, जेमतेम दोन- अडीच दशकापूर्वीची गोष्ट. महाराष्ट्रात बालवर्गातल्या मुलांच्यासाठी वर्णमालेचे जे तक्ते मिळत असत, अंकलिप्या मिळत असत त्यावर 'अ'पासून 'ळ'पर्यन्तचे सारे वर्ण असायचेच पण त्याशिवाय क्ष आणि ज्ञ ही दोन जोडाक्षरही असायची. काही तक्त्यांवर त्र हे सामान्यत: हिन्दी तक्त्यांमध्ये दिलं जाणारं जोडाक्षरही दिलेलं असायचं, हा त्या काळात हित असलेल्या हिन्दी भाषेच्या प्रचार-प्रसार मोहिमेचा परिणाम असणं शक्य आहे. संस्कृतच्या प्रभावामुळे मराठीत नसलेले दोन स्वर म्हणजे दीर्घ 'ॠ' आणि दीर्घ 'ॡ'(हा बिचारा खरंतर संस्कृत भाषेतही नाही) पण मराठीच्या साऱ्या तक्त्यांमध्ये हे सारे वर्ण अगदी न चुकता ओळीनं हजर असायचे.

आजच्या तुलनेनं चाळीस—पन्नास वर्षापूर्वीची मुद्रणकला फारशी प्रगत नव्हती; म्हणजे खरं सांगायचं तर मागासच होती. तरीही चित्र सुबक नि मुख्य म्हणजे खुपच प्रमाणबद्ध असायची. तक्ते हे मुलांसाठी असल्यामुळे त्यातील चित्र रंगीबेरंगी असायची (पण त्यातले रंग इकडे-तिकडे सरकलेले असायचे) . महाराष्ट्रातले बरे समजले जाणारे प्रकाशक —मुद्रक असे तक्ते काढत असत आणि त्यांच्या किंमतीही बऱ्यापैकी असतं; म्हणजे त्या काळातल्या सुमारे दीड —दोन लिटर दुधाच्या किंमतीइतक्या!

गेल्या तीस-चाळीस नव्हे पण आठ-दहा वर्षातील मुद्रणकलेच्या क्षेत्रातली परिस्थिती अफाट क्रांतिकारक प्रगती बघितली तर आपल्याला तिच्यात नित्य नवीन काहीतरी घडत असल्याचं दिसून येतं. मुद्रणकला फारच सुधारली आहे, खऱ्याचा आभास देऊ शकणारी रंगसंगती कागदावर उमटू लागली आहे आणि एवढं असूनही किंमती फार वाढल्या आहेत, भडकल्या आहेत अशी परिस्थिती सुदैवानं नाही. (उलट स्वस्ताईची लयलूट म्हणायला हरकत नाही. कारण आज एखाद्या तक्त्याची आजही किंमत आजच्या लिटरभर दुधाएवढीच असते! एकूण शिक्षणच भयंकर स्वस्त /पातळ झाल्याचा परिणाम असावा हा!) पण आज बाजारात उपलब्ध असलेले तक्ते बघून आजची बालकं सुदैवी आहेत असं म्हणावं की नाही अशी शंका मात्र अस्वस्थ करते. 'शिक्षणाचा व्यापार झाला आहे'असं जे म्हटलं जातं त्याची सुरुवात मुलांसाठी बनवल्या जाणाऱ्या ह्या पहिल्या-वहिल्या वर्णमालेच्या तक्त्यांपासून आणि अंकलिप्यांपासूनच हो ते की काय कोण जाणे!

एकदम बघितल्यावर अत्यंत आकर्षक वाटणारे मुळाक्षरांचे बहुतेक तक्ते आणि अंकलिपीची पुस्तकं नीटपणे बघितली, म्हणजे एका साक्षर माणसाच्या दृष्टीनं बघितली, तर लक्षात येतं की मुळाक्षरांच्या ह्या तक्त्यात मुळातच काही अक्षरं कमी आहेत!

मराठी भाषेत ॠ आणि ॡ ह्या अक्षराचे दीर्घ वर्ण नाहीत. जुन्या काळी संस्कृतच्या म्हणजे शास्त्रीपंडीतांच्या आग्रहामुळे असेल कदाचित पण वर्णमालांमधून हे स्वर म्हणजे ही अक्षरं न चुकता दाखविलेली असायची पण आता संस्कृतशीच संबंध तोडू इच्छिणाऱ्यांची संख्या (की शक्ती) बरीच वाढल्यामुळे दीर्घ ॠ, ॡची हकालपट्टी झाली असावी ; ठीक आहे. ह्या बाबतीत काही लोकांचा राग आणि प्रकाशकाची सोय समजण्यासारखी आहे! (दोन अक्षरांची जागा वाचली म्हणजे कागद वाचला ! पर्यावरणवादीही खूष !) पण काही प्रकाशक इतके पुढारलेले आहेत की त्यांनी ह्रस्व ऋला आणि ह्रस्व

अनुक्रमणिका

लृलाही फाटा देवून टाकला! सर्वसाधारण तक्त्यांमधून ह्रस्व लृ तर कधीचाच लुप्त झाला आहे! (क्लृप्ती ह्या एकमेव शब्दात येणाऱ्या लृबरोबर ऋचीही उचलबांगडी करायची प्रकाशकांची ही क्लृप्ती तशी छान फायदेशीर ठरत असणार!)

तक्त्यातील स्वर संपवून आपण व्यंजनाकडे वळालो की क ख ग घ नंतरचा अनुनासिक वर्ण 'ङ' हा पुन: बेपत्ता ! कारण? एका प्रकाशकानं मोठया गांभीर्यान सांगितलेलं कारण असं होत की नाहीतरी त्या अक्षरापासून कुठल्याही भाषेत एकही शब्द सुरु होत नाही, इकडे-तिकडे कुठेतरी टिंब टाकल की (म्हणजे 'अनुस्वार' टाकला की, असं म्हणायचं होत त्यांना) काम होत, आपली स्पेस वाचते ! क वर्गानंतरच्या च वर्गातही च छ ज झ नं नतरच 'ञ' अक्षर गायब केलेलं असतं. याला कारणही पुनः तेच की ह्या अक्षरापासून शब्द सुरु होत नाही आणि अनुस्वार देऊन काम होतं!

अत्यंत संकुचितपणानं, केवळ मराठी भाषेचाच विचार केला तर हा युक्तिवाद ठीक आहे असं एकवेळ म्हणता येईलही ;पण प्रश्न मुलांच्या शिक्षणाचा आहे, त्यांच्या विकासाचा आहे, त्यांच्या आयुष्याचा आहे त्यांना मूळातच आपल्या लिपीतली सगळी अक्षरं शिकवली नाहीत तर ती बिचारी मुलं पुढे काय करणार? पुढे आठवीत गेल्यावर संस्कृत शिकायचं झालं तर त्यांनी पुन: एकदा वर्णमालेपासून सुरुवात करायची की काय? त्या मुलांच्या सुदैवानं त्यांना पाचवीच्या (किंवा आता येवू घातलेल्या नव्या पद्धतीनुसार अगदी पहिलीच्याच) वर्गात इंग्लिश शिकवायला एखादे चांगले शिक्षक लाभले आणि त्यांनी मुलांना 'गोइङ्'(going) , 'कमिङ' (coming) , 'सिङ' (sing) असे शुद्ध उच्चार शिकवले, मुलांना नीट कळावेत म्हणून फळ्यावर देवनागरी लिपीत लिहून दाखवले तर नव्या तक्त्यावरून, नव्या गुरुजींच्या तालमीत तयार झालेले आमचे चिरंजीव ते उच्चार गोईड, कमिड असेच वाचणार आणि इंग्लिशचे उत्साही शिक्षक आपल्या कपाळाला हात लावणार! आमच्या चिरंजीवांना मुळात म्हणजे सगळी अक्षरंच येत नाहीत, ते तरी काय वाचणार बिचारे! ङ आणि ञ ह्या अक्षरांपासून शब्द सुरू होत नसले तरी त्यांचा वापर संस्कृतमध्येच नाही तर हिन्दीतही खूप मोठया प्रमाणात होतो. इंग्लिश, जर्मन अशा अनेक भाषांमध्ये (ङ) ह्या ध्वनीचा उपयोग फार मोठया प्रमाणात होतो. मलयाळम्, सिन्धी वगैरे भाषांमध्ये 'ञ' ला पर्यायाच नसतो, प्रत्येक वाक्यात चारदा 'ञ' येतो! त्यामुळे बालवयातच ही अक्षरं नि त्यांचे योग्य उच्चार शिकणं अतिशय महत्त्वाचं आहे आणि एक गंमत अशी की ह्या 'ङ' आणि 'ञ' पासून सुरू होणार शब्दही अनेक ईशान्य भारतातल्या मणिपूरी, तांखुल वगैरे अनेक भाषांमध्ये आहेत. तेव्हा आपल्या मुलाला आपल्या लिपीतील सारी अक्षरं येतात की नाही याकडे पालकांनी लक्ष द्यावं. सगळी अक्षरं न देणारे तक्ते विकत घेऊ नयेत, कोणी फुकट दिल्यासही घेऊ नयेत ! काही अक्षरं गाळून होणाऱ्या फायदातोट्याचा आर्थिक विचार व्यवसायिकांनी नक्कीच केलेला असणार; पण त्यांची की क्लृप्ती आपल्या मुलांना केवढ्यात पडते/पडेल ह्याचा विचार पालकांनी कधी केला आहे का?

अलीकडे अगदी खुद्द विद्येच्या माहेरघरी म्हणजे पुण्यपत्तनीच काही अंकलिपीची पुस्तकं बघायला मिळाली. पुस्तकाचं मुखपृष्ट, आतली चित्रं, मुद्रण, बांधणी वगैरे सर्व तांत्रिक अंगं चांगली होती; पण त्यात दिलेल्या शब्दांवरून ते अंकलिपीचं पुस्तक नक्की कोणासाठी आहे, हिन्दी भाषिकांसाठी आहे की मराठी भाषिकांसाठी आहे हेच कळत नव्हतं! मराठीची आणि हिन्दीची लिपी एकच असल्यामुळे शिवकाशीतल्या (म्हणजे तमिळनाडुतल्या) थोर मुद्रकाला ह्या दोन भाषा वेगळ्या आहेत हे कदाचित कळलं नसावं आणि ते जाणून घेण्याची गरजही त्याला भासली नसावी! ऐ म्हणजे ऐनकातला ऐ, ठ म्हणजे ठठेरातला ठ, ब म्हणजे बढईतला ब! 'ऐनक'(चष्मा) , 'ठठेरा'(तांबट) , 'बढई'(सुतार) असे मराठीत मुळीच नसलेले शब्द

अनुक्रमणिका

(सुदैवानं योग्य) चित्रांसह त्यात होते/आहेत. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर पुण्यातल्या एका प्रतिष्ठित प्रकाशक संस्थेचं नाव आहे!

आधुनिक तंत्रात आणि अर्थशास्त्रात मागणी, पुरवठा, स्वस्त माल, स्वस्त सेवा, उत्तम बाजारपेठ अशा अनेक मुद्द्यांचा विचार करून पुरवठा होत असतो. नफा कमवला जात असतो. आक्षेप ह्या आर्थिक विचारसारणीला नाही, मुळीच नाही; पण हे करत असताना काही मूलभूत गोष्टी बघण्याची गरज आहे असं आपल्या प्रकाशकांना, विक्रेत्यांना का वाटत नाही? शिवकाशीतून नाही अगदी सिंगापुरातूनही अंकलिपीचं सुबक, सुंदर स्वस्त मुद्रण करून आणा, जरूर आणा. आम्ही त्या उद्योजकाचं निश्चितच कौतुक करू, पण मराठी पुस्तकाचा म्हणून असलेला मजकूर मराठीतच आहे की नाही हे बघण्याची काळजी तरी घ्याल की नाही? असल्या अंकलिप्यांवर आणि तक्त्यांवर पालकांनीच बहिष्कार घालायला पाहिजे.

खरं तर आपल्या प्रकाशकांनी कल्पकतेनं तक्ते बनवले तर त्यांची मोठया प्रमाणात निर्यातही होऊ शकेल. युरोप-अमेरिकेतल्या मराठी-हिन्दी भाषिकांच्याच नव्हे तर स्थलांतर केलेल्या भारतीयांच्या मुलांसाठी ‘ऐ’ ऐराणीतला न म्हणता ice मधल्या ऐ सारख्या ऐ असं काही सांगणारे तक्ते तिकडे हवे आहेत. आज ही तिकडची मागणी आहे. भक्कम शास्त्रीय आधारावर अशी अंकलिपी कोणी काढली, तक्ते बनवले तर ते तातडीनं हवे आहेत.

अनुक्रमणिका

१६
तामिळलिपिमाहात्म्य

भल्या पहाटेची वेळ. रामेश्वरहून अडनिड्या वेळी निघून मंडपम्‌ला उतरलेली प्रवासी-यात्रेकरू मंडळी कन्याकुमारीला जाणारी पाच वाजताची पाहिली बस गाठण्यासाठी धावत-पळत निघालेली होती. मीही त्या धावपळीत होतो. अर्धवट झोपेत असलेले बहुतेक उतारू आपलं समान-सुमान घेऊन कसेबसे बसमध्ये येऊन स्थानापन्न झाले होते. भल्या पहाटेची बस; तीही वेळेत निघाली होती त्यामुळे सुट्टीचे दिवस असूनही बसमध्ये नेहमीसारखी खेचाखेच गर्दी नव्हती. डावीकडच्या दोन सिटांच्या बाकड्यावरची, मागच्या दाराजवळची असली तरी खिडकीजवळची जागा मला मिळाली होती.

बस निघाली. बाहेर अजून अंधारच होता पण बसमधल्या दिव्यांच्या उजेडात कंडक्टरनं तिकिटं द्यायला सुरुवात केली होती. कंडक्टरला चार दोन हिन्दी शब्द येत होते आणि जोडीला खाणाखुणा होत्याच; त्यामुळे कोणाचीही कसलीही व्यावहारिक अडचण वगैरे होत नव्हती. अर्धवट झोपेत असलेले उतारू पैसे पुढे करत होते, कंडक्टर पैसे घेऊन (बहुतेकांना) तिकीट देत होता, हातात पडलेलं तिकीट न बघताच झटक्यात खिशात कोंबून प्रवासी मंडळी आपले अर्धवट उघडलेले डोळे पुनः मिटून घेऊन झोपी जात होते.

तासाभरानं चांगलं उजाडलं तेव्हा आमची बस चहासाठी एका छोट्याश्या गावापाशी थांबली. ड्रायव्हर-कंडक्टरची जोडी कॉफी-नाश्त्यासाठी कोपऱ्यातल्या एका टेबलापाशी स्थानापन्न झाली. मीही खाली उतरून कडक फिल्टर कॉफीचा आस्वाद घेतला. जरा वेळ पाय मोकळे करून मी बसमध्ये आलो. तिरुविळुवर विभागाची आमची बस तशी सुस्थितीत होती. सोयीचं म्हणून पुढच्या दरवाज्यातून मी आत शिरलो तेव्हा लक्षात आलं की ड्रायव्हरच्या पाठीमागे असलेल्या जाळीवर एक छोटी पण सुबक अक्षरात रंगवलेली पाटी होती. पाटी बघताच बालसुलभ जिज्ञासेनं ती वाचू लागलो. मंडपम् ते कन्याकुमारी ह्या मार्गावरच्या गावांची ती केवळ यादी नव्हती तर त्या त्या ठिकाणांचे बसचे दरही त्यात दिलेले होते. पाटी अर्थात तामिळ लिपीत होती. पाटी वाचल्यावर माझ्या लक्षात आलं की कंडक्टरनं माझ्याकडून तिकिटाचे पैसे घेताना सहा रुपये जास्त घेतली आहेत, माझ्याकडूनच नव्हे तर सर्वच प्रवाशांकडून.

बस पुनः सुरू झाली. नव्यानं चढलेल्या उतारूंना तिकीट देण्यासाठी कंडक्टर बसमध्ये फिरत होता. तिकीटविक्री करून तो माझ्यासमोरच्या रिकाम्या सीटवर येऊन बसताच मी त्याला तिकिटाच्या दरांबद्दल विचारलं तेव्हा त्यानं आपण त्या गावचेच नव्हे असा चेहरा केला; पण त्यानं घेतलेल्या जादा पैशाचा विषय मी सहजा-सहजी सोडायला तयार नाही असं लक्षात येताच कंडक्टरनं माझ्या शेजारी बसलेल्या एका तमिळी पोऱ्याला उठवून दुसरीकडे बसायला सांगितलं नि माझ्या शेजारी बसून म्हणाला, ‘मी पैसे बरोबरच घेतले आहेत.’

‘पण समोरच्या पाटीवर तर तिकिटांचे दर लिहिलेले आहेत. ते दर खरे की तुम्ही म्हणता ते दर खरे?’ बोटानं पाटीकडे निर्देश करत मी विचारलं.

‘तुमको कौन बताया?’ कंडक्टरनं आसपास बसलेल्या इतर प्रवाशांकडे. विशेषतः तमिळ प्रवाशांकडे भयंकर संशयानं (मेहमूदप्रमाणे) डोळे गरागरा फिरवत मला आपल्या खास ‘दखनी’ शैलीच्या

अनुक्रमणिका

हिन्दीत विचारलं. भल्या सकाळी हिन्दी येत नाही असं खुणेनं सांगणाऱ्या कंडक्टरला आता कामचलाऊ हिन्दी यायला लागलं होतं.

‘कोणी कशाला सांगायला पाहिजे?! मीच वाचली आहे ती पाटी’ मी सहजपणे म्हटलं.

‘तूम तमिळ जानता?’ आश्चर्यानं माझ्याकडे पाहत कंडक्टरने विचारलं.

‘अर्थात! मला तामिळ वाचता येतं.’

‘सच्ची?’ कंडक्टरला आश्चर्य वाटलं तरी तो माझ्यावर एकदम विश्वास ठेवायला तयार नव्हता. बारा गावाचं पाणी प्यायलेला तो कंडक्टर भोळसट थोडाच असणार? त्यानं आपल्या तिकीटांच्या बॅगेत खुपसून ठेवलेली वर्तामानपत्रातली एक घडी झटकन बाहेर काढून ती उलगडत माझ्यापुढे धरली. मीही ते वर्तमानपत्र हातात घेऊन घडी उलगडून बालवर्गातल्या लहान मुलाप्रमाणे लागत-लागत त्यातली मथळ्याची ठळक-ठळक तमिळ अक्षरं वाचू लागलो नि काय आश्चर्य कंडक्टरनं आपल्या खांद्यावर लटकावलेल्या दणकट चामडी बॅगेतून सहा रुपये काढून स्मितहास्य करीत माझ्या हातावर ठेवले!

त्यानंतर आमच्या गप्पा अखंडपणे चालू होत्या. माझ्या नव्या दोस्ताला माझ्या तमिऴवाचनाबद्दल विलक्षण कुतूहल होतं.

‘पर तुम हमारा इतना डिफिकल्ट तमिळ क्यो सीखा?’ तंबीनं मला विचारलं.

‘दोस्ता, -’ मी किंचित थांबलो नि काय आश्चर्य माझी अडचण ओळखून झटकन आपलं नाव मला सांगितलं.

‘तंबी. मेरा नाम तंबी है.’

‘तंबी,’ त्याचं नाव कळल्यामुळे नि त्याचा अर्थ धाकटा भाऊ हे मला माहीती असल्यामुळे त्याचा फायदा घेत मी मोठया भावाच्या थाटात त्याला म्हटलं, पहिली गोष्ट म्हणजे तमिऴ ही काय कोणा परक्याची भाषा थोडीच आहे? अरे, ही तर आपलीच भाषा आहे!’

‘हाँ! सच है!’तम्बीला माझं म्हणणं सहजपणे पटत होतं.

‘आणि तमिळ अवघड वगैरे मुळीच नाही! खरं सागायचं तर तमिऴ ही भारतातली सगळ्यात सोपी लिपी आहे !’

‘ऐसाऽ?’

‘कुठल्याही सर्वसाधारण माणसाला अक्षरशः एका दिवसात शिकता येण्याइतकी सोपी लिपी आहे!’ तंबी माझ्याकडे मोठया आश्चर्यानं आणि कौतुकानं बघत होता.

अनुक्रमणिका

तमिऴनाडूत बसस्टॅन्ड, रेल्वेस्टेशन, देवळ वगैरे महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या पाट्या, सूचना फक्त तमिळ लिपीतच असतात ह्याबद्दल मी तमिळी लोकांचं मनापासून भरभरून कौतुक करत होतो त्यामुळे तर तंबी माझ्यावर भलताच खुश होता! आपल्या भाषेचं, लिपीचं कौतुक इतरांकडून ऐकायला नेहमीच छान वाटतं, तंबी त्यामुळे सुखावला होता.

आमची बस पुढे जिथे जिथे थांबली तिथे तिथे तंबीनं मला मोठया आत्मीयतेनं स्वतःच्या शेजारी बसवून घेऊन आग्रहानं कॉफी पाजली होती. त्याच्या इतर कंडक्टरमित्रांना मला तमिऴ वाचता येतं हे तो कौतुकानं सांगत होता आणि शेवटी कन्याकुमारीला उतरल्यावर त्याच्याबरोबर डोशाचा (पोटभर) नाश्ता केल्यावरच त्यानं माझा निरोप घेतला होता.

अनुक्रमणिका

१७
मोडी 'भाषा'?

परवा एक विद्यार्थी मोठया उत्साहानं मला सांगत होता की, 'सर सर, मी मोडी भाषेच्या वर्गाला जाणार आहे!' मोडीचे वर्ग कुठे भरणार आहेत वगैरे माहिती मी त्याला विचारली तेव्हा 'सर, तुम्हाला मोडी भाषा येते का?' असंही त्यानं किंचित संकोचानं आणि मोठया कुतूहलानं विचारलं.

मोडी आता आपल्याला इतकी दुरावली आहे की मोडी ही लिपी आहे की भाषा आहे हेही आजच्या तरुणांना सांगावं लागतं. अनेक पंजाब्यांनाही पुनः पुनः सांगावं, लागतं की बाबारे, गुरुमुखी ही भाषा नाही, ती एक लिपी आहे! तरीही बहुसंख्य पंजाबी लोक आपली भाषा 'गुरुमुखी' असल्याचं सांगतच राहतात. त्यांच्या दृष्टीनं गुरुवरची श्रध्दा दाखवायचा हा एक 'सोप्पा' मार्ग असावा बहुतेक! वाहे गुरु, ह्या सगळ्यांना माफ कर!

हेमाडपंथी मोडी लिपी महाराष्ट्रात एके काळी चांगलीच रुजली होती. भरभर लिहिण्यासाठी म्हणून मोडीचा उपयोग सरसकट सर्वच व्यवहारात होत असे, राजदरबारीही तिचाच वापर होता, शिवकाळाच्या पूर्वीपासून ते पेशवाई संपुष्टात येईपर्यंत. ती मोडी म्हणजे लिपी आहे की भाषा आहे हेही आजच्या नव्या पिढीला ठाउक नसावं ह्याचं थोडं वाईट वाटलं; पण माझ्या विद्यार्थ्याला मोडीत रुची आहे नि तो ती शिकणार आहे हे पाहून मला त्याचं कौतुकही वाटलं.

जो काळ मोडीचा काळ म्हणून समजला जातो (नशीब की त्या काळाला कोणी मोडीचं सुवर्णयुग वगैरे म्हणत नाहीत!) त्या काळातही मोडीला तशी प्रतिष्ठा नव्हती हेही तितकंच खरं आहे. आपल्या मुलांबाबत विशेषतः मुली-सुनांबाबत बोलताना लोक आग्रहानं सांगत असत की 'आमच्याकडे बाळबोध वळण आहे!' मोडी आणि बाळबोध ह्यांची तशी जोडी कधी नव्हतीच उलट त्या एकमेकीच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या लिप्या होत्या. मोडी ही निव्वळ व्यवहारातली, कामचलाऊ लिपी होती, अलीकडच्या आशुलिप्यांसारखी (म्हणजे शॉर्टहॅन्डसारखी) . आपला सांस्कृतिक वारसा चालवण्याचं काम मोडीला झेपणारं नव्हतं, ते काम देवनागरीचं होतं. मोठे ग्रंथच नव्हे तर अगदी साधं रामायण किंवा महाभारत वाचायचं किंवा घरातल्या वयस्क माणसांना वाचून दाखवायचं म्हटलं तरी त्यासाठी मुलीला बाळबोध म्हणजे देवनागरी लिहिता-वाचता येणं अत्यावश्यक होतं, त्यामुळे लेकी-सुनांना बाळबोध शिक्षणावाचून पर्याय नव्हता, बाळबोघ वळणाला तोड नव्हती!

मोडीचा उपयोग सर्वत्र म्हणजे साध्या-सुध्या व्यवहारात आणि अपवाद म्हणजे राज्यकारभारात होत होता तरी तिला प्रतिष्ठा अशी नव्हती, त्याच कारणही तसंच होतं. मोडी ही नावाप्रमाणेच मोडतोड करणारी किंवा मोडतोड असलेली लिपी होती. मोडी लिपीत ह्रस्व-दीर्घ दाखवण्याची सोय नाही, जोडाक्षरं धडपणे दाखवता येत नाहीत, म्हणजे तशी सोयच ह्या लिपीत नाही; पंजाबीसाठी वापरल्या जाणाऱ्या गुरुमुखी लिपीतल्याप्रमाणे! अक्षरांवरच्या मात्रा दाखवताना केली जाणरी मात्रांची काटकसर/आकर्षक लपेटी दिसायला बरी दिसत असली, लेखकुंना सोयीची वाटली तरी वाचकूंना निश्चितपणे अडचणीचीच असते.

वळणांच्या दृष्टीनं मोडी लिपीचा विचार केला तर तिच्या चार अवस्था आढळतात. १. शिवपूर्वकाल -ह्या काळात मोडीचं वळण खुपच वेडवाकडं होतं, त्यात गुजराती/ महाजनी, कन्नड लिपीतली अक्षरं/वळण अढळतात. २. शिवकाल- ह्या काळात मोडीला बरंच चांगलं स्वरूप आलेलं दिसतं. ३. पेशवेकाल - ह्या काळात मोडीचं वळण सुरेख झालेलं आहे. टप्पोरं, मोत्यासारखं मोडी अक्षर ह्या काळातच विकसित झालं. आकर्षक लपेटयाही ह्याच काळात जन्माला आल्या. भक्कम राजाश्रयामुळे ह्या गोष्टी साध्य झालेल्या दिसतात. पेशवाईच्या काळानंतर मोडीची चवथी अवस्था दिसते. ४. अव्वल इंग्रजी काळ –ह्या काळात राजाश्रय गेल्यामुळे मोडीला स्वाभाविकपणे उतरती कळा लागली.

इंग्रजी अमदानीच्या काळात दक्षिणा कमिटीकडे पुरस्कारासाठी लेखकांनी/ कवींनी पाठवलेली हस्तलिखितं मोडीत असली तर त्याला पन्नास –शंभर रुपये कमी मिळत असत.

मोडीत लिहायचं म्हणजे प्रथम बोरुनं किंवा टाकानं कागदावर एक सरळसोट रेष आखून घ्यायची आणि मग एकापुढे एक शब्द लिहित जायचं, मध्ये किंचित अंतर ठेवून दोन शब्द वेगळे आहेत हे सूचित करायचं. . . अशा एक ना अनेक अंगभूत उणिवा मोडी लिपीत होत्या/ आहेत.

पुढे काही काळानं हळूहळू का होईना पण युरोपातली मुद्रणकला आपल्यापर्यंत येऊन पोहोचली. छापण्याच्या दृष्टीनं मोडी लिपीत असणारा गोंधळ फारच मोठा होता कारण मोडीसाठी टाइप पाडणं जवळ–जवळ अशक्य होतं. (टाइप तरी किती पाडायचे आणि पाडले तरी एवढे सतराशेसाठ टाईप समोर ठेवून खिळेजुळवणीचं काम करायला कोणी जादूगारच लागला असता!)

टंकयंत्राच्या दृष्टीनं मोडीकडे बघितलं तर एकच पर्याय होता, एक तर टंकयंत्र मोडीत काढायची किंवा मोडी लिपी! आणि झालं तेच. व्यवहाराच्या दृष्टीनं सोयीची म्हणून मानली जाणारी मोडी लिपीची सारीच्या सारी वैशिष्टयं वेगळ्या म्हणजे शास्त्रीय दृष्टीनं बघता तिच्या उणिवा ठरतात आणि एक चांगली लिपी म्हणून तिचा उपयोग त्याज्य ठरवतात.

मोडीच्या ह्या उणिवांची जाणीव अर्थात लोकांना पूर्वी नव्हती असं नाही पण लेखन जोपर्यंत केवळ हातानंच होत होतं तोपर्यंत इतर गोष्टीचा विचार करण्याचं कारण नव्हतं नि केवळ त्यामुळेच मोडी लिपीचा वापर दैनंदिन व्यवहारात चालू होता.

पेशवाई नष्ट झाल्यावर हळूहळू आलेल्या नव्या तंत्रामध्ये मोडी स्वाभाविकपणे मागे पडू लागली केशव भिकाजी ढवळे (प्रकाशन) वगैरे मंडळींनी त्या काळात मोठ्या कष्टानं मोडीची चांगली पुस्तकं विशेष प्रयत्न करून तयार करवून घेतली आणि ती उत्तम प्रकारे छापून बाजारात आणली. त्या काळात ह्या पुस्तकामुळे शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली, पण अशी कामं मोठ्या प्रमाणात होणं अवघडच होतं; तरी पण शाळामधून ती पुढेही बराच काळ चालू होती. १९५० पासून महाराष्ट्रातल्या शाळांतून मोडी हा एक विषय म्हणून शिकवणं बंद करण्यात आलं आणि मोडी इतिहासजमा झाली.

मोडी लिपी इतिहासजमा झाली तरी तिचं महत्त्व महाराष्ट्राच्या, महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीनं नेहमीच राहणार आहे हे आपण कदापि विसरता कामा नये, कारण महाराष्ट्राच्या फार मोठया कालखंडातली आपली बहुतेक ऐतिहासिक महत्त्वाची कागदपत्रं की जी संख्येनं असंख्य आहेत, मराठी

अनुक्रमणिका

भाषेत पण मोडी लिपीत आहेत. ते सारे अस्सल ऐतिहासिक पुरावे जाणून घेण्यासाठी, त्यांचा अभ्यास करण्यासाठी मोडी-लिपीच्या तज्ज्ञांची गरज आपल्याला आजही आहे आणि पुढेही लागणार आहे, म्हणजेच मोडी वाचू शकणारी माणसं आपल्याकडे हवीत, नुसती हवीत नव्हे तर मोठया संख्येनं हवीत. आजच त्यांची वानवा आहे. तशी माणसं तयार करण्याकडे अजूनतरी आपण दुर्लक्षच केलेलं आहे असं वाटतं. मोडी लिपीची ही हेळसांड अशीच चालू राहिली तर ती आपल्याला फार महाग पडेल. उद्या आपल्याला मोडी कागदपत्रं वाचून घेण्यासाठी कोणा परदेशी तज्ज्ञांना पाचारण करावं लागेल! आपला ऐतिहासिक, सांस्कृतिक ठेवा समजून घेण्यासाठी परदेशी विद्वानांना आमंत्रित करण्यासाठी लाजिरवाणी गोष्ट पुढे होऊ द्यायची की नाही ह्याचा विचार आपण आजच गांभीर्यान करायला पाहिजे.

अलीकडे काही संस्थांनी मोडी लिपी शिकवण्याचे वर्ग सुरु केले आहेत, मुंबईच्या केशव भिकाजी ढवळे प्रकाशन संस्थेनं आपल्या जुन्या मोडी पुस्तकांचं (एकूण पाच भागात) सुबक पुनर्मुद्रण करून ती दुर्मिळ पुस्तकं जिज्ञासूंसाठी बाजारात उपलब्ध करून दिली आहेत ही आनंदाची आणि महत्त्वाची गोष्ट आहे, त्याबद्दल मराठी माणसानं ढवळे प्रकाशनाला हार्दिक धन्यवाद द्यायला हवेत!

ह्या विषयाच्या अभ्यासकांनी मोडीचा अभ्यास करणं आवश्यक आहे. कारण बऱ्याचदा असं होतं की केवळ मोडी लिपी वाचता येणारी व्यक्ती उपलब्ध असून काम होत नाही कारण त्या माणसाला प्रमाण लिपी वाचता येत असली तरी त्या विषयाची माहिती नसेल किंवा पेशवेकालीन भाषा ठाऊक नसेल तर चालणार नाही. ह्यासाठी त्या-त्या विषयांच्या विद्यार्थ्यांनी स्वत:च मोडी शिकणं आवश्यक असतं. तत्कालीन भाषा, त्या-त्या काळातील मोडीची विविध वळण हे सगळंच शिकायला पाहिजे.

काही उपाय पद्धतशीरपणे योजून काम करायला पाहिजे तरच मोडी लिपीचा दुवा आपल्या हातातून निसटणार नाही.

अनुक्रमणिका

१८

कुमाऊँतला उलटा प्रवास

मणिपुरमधल्या काही चळवळ्या विद्यार्थ्यांप्रमाणे उत्तर प्रदेशातल्या म्हणजे आता होऊ घातलेल्या(?) उत्तराखण्डातल्या कुमाउँ क्षेत्रातल्या काही चळवळ्या भोटिया विद्यार्थ्यांनीही अशीच एक मागणी सुरु केली आहे, त्यांच्या भाषेसाठी नव्या लिपीची. ह्या भागातल्या भुटिया/भोतिया लोकांची जी भाषा आहे तिला म्हणतात 'रंग भाषा' रंग ही पाश्चात्त्य अभ्यासकांच्या(?) वर्गीकरणाप्रमाणे चिनी-तिबेटी परिवारातली भाषा मानली जाते.

कुमाऊँ भागात नारायण स्वामींनी जे महान कार्य केलं त्याचा परिणाम म्हणून ह्या संपूर्ण कुमाऊँ भागात शिक्षणाच्या मूलभूत सोयी निर्माण झाल्या आणि त्यानंतरच्या काळात त्या सातत्यानं वाढल्या आणि अधिकाधिक चांगल्या होत गेल्या, कारण नारायणाश्रमाच्या वतीनंच ठिकठिकाणी शाळा, महाविद्यालयं, वसतीगृहं चालवली जातात. नारायणाश्रमाच्या एकूण कारभारातच स्थानिक लोकांचा सहभाग फार मोठा असतो, त्यामुळे ह्या भागातले कुमाऊँ, भोटीया वगैरे सर्वच जातीजमातीच्या लोकांना त्यांचा फायदा होतो. (श्रीगंगोत्री देवी ह्या सध्या नारायणाश्रमाच्या प्रमुख आहेत. साध्वी श्रीगंगोत्री देवी ह्या मूळच्या 'गरब्यान' गावच्या. गरब्यान हे प्रसिद्ध गाव कैलास –मानसच्या वाटेवर आहे. मध्यंतरी म्हणजे १८ ऑगस्ट, १९९८ ह्या दिवशी दरडी कोसळून शेकडो माणसं चिरडून मेली ते माल्पा गाव आपल्याला चांगलंच माहीत आहे, तेच हे माल्पा. त्यापुढे बुद्दी आणि त्यानंतर गारब्यान.) शिक्षणाच्या सुनियोजित योजनांमुळे ह्या संपूर्ण कुमाऊँ क्षेत्रात प्रमाण (मानक) हिन्दी न येणारी व्यक्ती तुम्हाला कुठे आढळणार नाही, ह्याचं फार मोठं श्रेय नारायणाश्रमालाच द्यायला पाहिजे.

भोटिया लोक केवळ कुमाऊँमध्येच आहेत असं नाही. भारत-तिबेट सीमेवरच्या सर्वच प्रदेशांमध्ये ते आढळतात; पण कुमाऊँतल्या भोटियांचं वैशिष्टय म्हणजे ते हिंदू आहेत. त्यांची नावंही राम, शंकर, विष्णू, गोपाल, लक्ष्मी, पार्वती, उमा, गंगा, कमला अशीच असतात. रंगारूपानं जराशी वेगळी असली तरी सांस्कृतिकदृष्टया पूर्णपणे हिंदू असलेली ही भोटिया मंडळी आपली 'रंग' भाषा टिकवून आहेत, त्यांच्यात असलेलं खास म्हणता येईल असं हे एक वेगळेपण आहे. त्यांची ही भाषिक विशिष्टयं निर्माण करण्यात आणि टिकवण्यात नारायणाश्रमाचा वाटा फार मोठा आहे.

अशा ह्या स्वर्गीय प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या 'रंग'भाषेसाठी लिपी 'शोधण्याचा' प्रयोग (उपद्व्याप) गेल्या पाच-सात वर्षात चालू झाला आहे. ह्या फुटीरतेला (डॉलरचं) भरपूर खत-पाणी घालणारे कोण आहेत हे वेगळं सागण्याची गरजच नाही! आज ह्या भागात घोडा-खेचर धरणारी बहुसंख्य तरुण मुलं बऱ्यापैकी शिकलेली असतात. आपल्याच प्रदेशात राहून प्रामाणीकपणानं कष्ट करून सन्मानानं जगण्याची शिकवण इथल्या लोकांना मिळत होती/आहे.

पुढे काही तरुण मंडळी उच्च शिक्षणासाठी दूर जाऊ लागली. सामान्यत: मुलं लखनऊला जात. कालांतरानं दिल्लीला जाणं अनेकांना अधिक सोयीचं वाटू लागलं (सत्तेच्या केंद्राजवळ जायला कोणाला आवडणार नाही?) . 'जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय' (JNU) सारख्या थोर विद्यापीठातून कुमाऊँतले तरुण मोठया संख्येनं जाऊ लागले. विश्वविद्यालयातल्या वातावरणात त्यांना वेगळं(च) विश्वरूपदर्शन होऊ लागलं. आपली भाषा वेगळी आहे, आपली अस्मिता टिकवण्यासाठी आपण काहीतरी करायला

पाहिजे, आपलं वेगळेपण नसेल तर ते निर्माण करून टिकवायला पाहिजे असा एक ध्यासच काहींना लागला.

'रंग' भाषा ही जर चिनी–तिबेटी गटातली आहे, तिच्यासाठी आज वापरात असलेली देवनागरी लिपी वापरायची नसेल तर तिबेटी लिपी वापरावी असं कोणीही म्हणेल. पण नाही! तिबेटी लिपी वापरायची नाही कारण तिबेटी लिपी म्हणजे देवनागरीचं एक वळण आहे! विरोध करायचा आहे तो थेट भारतीयत्वालाच!

मग अशा परिस्थितीत एक नवा विचार पेरला गेला-थेट चिनी लोकांच्या चित्रलिपीच्या आधारानंच एखादी नवी लिपी तयार करून रंग भाषेसाठी वापरली तर?

अशा प्रकारच्या घरभेदी 'कल्पनांना' उचलून धरणाऱ्या बुद्धिवाद्यांची / विद्वानांची कमतरता ह्या भारतभूमीत पूर्वीही नव्हती आणि आजही नाही! काही चळवळ्या तरुण विद्यार्थ्यांना हाताशी धरून नव्या लिपीची निर्मिती चालू झाली! मुळात म्हणजे चिनी भाषेला लिपी म्हणजे ध्वनिलिपी नाही तेव्हा तिच्या आधारानं रंग भाषेसाठी कसली लिपी बनवणार?

बरं, रंग भाषा तिबेटी परिवारातली आहे; म्हणजे तिचा चिनीशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही हेही त्यांना कोणी ठणकावून सांगत नाही. तिबेटी आणि चिनी ह्यांचा कसलाही संबंध नाही असं खुद्द दलाई लामा प्रत्येक ठिकाणी आवर्जून सांगत असतात, पण ह्या वस्तुस्थितीकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष केलं जात आहे.

अशा परिस्थितीत गरज आहे ती त्या भागात चालू असलेल्या शैक्षणिक कार्याला इतरांकडून भरघोस मदत मिळण्याची आणि कुमाऊँ भागात इतर भारतीयांनी मोठ्या संख्येनं भेट देऊन तिथल्या लोकांना अशी स्पष्ट जाणीव करून देण्याची की 'बाबांनो' आपण सगळे एक आहोत!' त्यांना देशाच्या मुख्य सांस्कृतिक प्रवाहात आणायचं म्हणजे त्यांना दिल्लीत किंवा मुंबईत आणणं नव्हे, तर त्यांच्याशी संपर्क ठेवणं. आपल्यातल्या सर्वसामान्यांना हे काम सहज करता येईल. प्रत्येकानं चार पैसे (स्वतःच्या प्रवासानिवासासाठी) नि दहा –पंधरा दिवस ह्या कार्यासाठी खर्च केले तरी पुष्कळ काम होऊ शकेल.

रंग भाषेसाठी लिपिसंशोधन (वरसंशोधनाच्या थाटात) करायला काही उत्साही कार्यकर्ते आता परदेशी जाऊ लागले आहेत! ही संशोधक मंडळी प्रदेशात रमण्याची शक्यता नाकारता येत नाही! असं झाल्यास रंग भाषेचा एक फायदा निश्चित होईल, नव्या लिपीच्या नावानं रंग भाषेवर 'बनावट' चिनी लिपी लादली जाण्याचा धोका टळेल! हेही नसे थोडके!

अनुक्रमणिका

१९
अप्रगत लिप्यांची ओढ

संस्कृतसारखा एखादा अपवाद सोडला तर भाषांच्या विकासाची आणि लिप्यांच्या विकासाची प्रक्रिया सतत चालूच असते. भाषांमध्ये किंवा लिप्यांमध्ये होणाऱ्या बदलांना विकास म्हणायचं किंवा नाही ह्याबाबत एखादवेळेस दुमत असू शकेल; पण त्यांच्यात बदल होत असतो ह्याबाबत दुमत असणार नाही. काही भाषांमध्ये व्यावहारिक सोयीसाठी लेखनाची पद्धत म्हणजे सोप्या शब्दात सांगायच तर शुद्धलेखन प्रमाणित केलेलं असतं कारण त्या बलशाली समाजाला प्रमाणीकरणाचे फायदे ठाऊक असतात. फ्रेंच भाषा, लिपी आणि लेखनपद्धती हे त्याचं आजच्या जगातलं सर्वोत्तम उदाहरण आहे तर ऐतिहासिक काळातलं संस्कृत हे आपल्याकडचं उदाहरण आहे. वेदांच्या उच्चारात किंवा संस्कृतच्या लेखनात गेल्या कित्येक हजार वर्षात अगदी किरकोळ कानामात्रेचाही फरक झालेला नाही!

सामान्यत: आपण असं समजतो की आपली धाव प्रगतीच्या दिशेनं असते, आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी काही मानदंड ठरवण्याची, प्रमाणीकरणाची गरज असते नि प्रत्येक समाज त्यानुसार वागत असतो, प्रयत्नशील असतो(असावा) प्रमाणीकरणाचे निकष ठरवण्याचा आणि ते काटेकोरपणानं पाळण्याचा प्रयत्न जे समाज करतात, करू शकतात त्यांची प्रगती चांगली होते हे ऐतिहासिक सत्य आहे. परंतु ह्या ऐतिहासिक सत्याकडे दुर्लक्ष करून नव्हे पाठ फिरवून काही समाज आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्याचा प्रकार करतात तेव्हा विलक्षण आश्चर्य वाटतं. भाषेसारख्या महत्त्वाच्या बाबतीतही अनेक समाज आजही खेळखंडोबा करत असतात नि त्याचा परिणाम त्या त्या भाषांच्या प्रगतीवर निश्चितपणे होत असतो.

आपल्याकडे महाराष्ट्रातही अधून-मधून कोणी कोणी मोडी लिपीच्या पुनरुज्जीवनाची भाषा करीत असतात, कधी कोणाला तथाकथित सोप्या रोमन लिपीची भुरळ पडते; पण असल्या उरफाटया मागणीकडे महाराष्ट्रात फारसं कोणी लक्ष देत नाही हा आपल्या सुदैवाचाच भाग आहे! पण आपल्या मणिपुर राज्यातली भाषिक अतिरेकी मंडळी गेली काही वर्ष मणिपुरातल्या एका जुन्या लिपीचा —मैतेई लिपीचा आग्रह धरून बसली आहेत.

मणिपुर भागात कृष्णभक्तीची सुरुवात झाली आणि त्या पाठोपाठच तिथे देवनागरीसारखीच असलेली बंगाली भाषेची लिपी उपयोगात येऊ लागली, ह्याचा साधा, सरळ अर्थ असा होता की लिपीच्या दृष्टीनं मणिपुर हा प्रदेश पुन: एकदा म्हणजे अर्जुन-उलुपि ह्यांच्या विवाहानंतर बऱ्याच शतकांनी देशाच्या मुख्य प्रवाहात आला होता! मणिपुरात झालेला हा बदल स्वागतार्ह होता. पुढे भारतात परदेशी माणसं मोठया प्रमाणात येऊन शिरजोर राज्यकर्ते बनल्यावर त्यांनी इथल्या डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्यांचं मोठया प्रमाणात धर्मपरिवर्तन सुरु केलं. बघता-बघता मणिपुरातल्या बहुतेक नागा टोळ्या नि कुकी टोळ्या ख्रिश्चन झाल्या. धर्मांतराच्या जोडीनंच त्यांचं 'भाषांतर' ही करण्यात आलं, त्यांच्यावर नव्या धर्माची इंग्लिश भाषा नि रोमन लिपी लादण्यात आली. ख्रिश्चन धर्माचे प्रसारक इतके भाग्यवान की त्यांनी लादलेली भाषा आणि लिपी स्थानिकांना लादल्यासारखी वाटलीच नाही!!!

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केंद्र सरकारनं सातत्यानं दुर्लक्ष केल्यामुळे संपूर्ण ईशान्य भारतात फुटीर पणाची जी बीजं गेल्या शतकात परकीयांकडून आणि आपल्याच स्वार्थी नेत्यांकडून पेरली गेली होती ती

अनुक्रमणिका

आता जोमानं फुटून वर आली आहेत. आपल्या संस्कृतीची, भाषेची अस्मिता तेवती ठेवली पाहिजे नि त्यासाठी भारतातून जे जे काही आलेलं आहे ते काट्यासारखं उचलून फेकलं पाहिजे. . . वगैरे वगैरे. अशा प्रकारे बुद्धीभेद करून तथाकथित नेत्यांनी तरूणांची डोकी भडकावली नि त्याचा परिणाम जो व्हायचा तोच झाला, भारतावरचा राग उफाळून येणं. मणिपुरी अस्मितेच्या जपणुकीसाठी जुन्या मैतेई लिपीचं पुनरुज्जीवन करण्यात आलं! पुनरुज्जीवन म्हणजे इम्फालमधल्या काही मणिपुरी भाषेतल्या (चिमुकल्या आकाराच्या दोन- चार पानांच्या) वर्तमानपत्रांमध्ये काही भाग (कमी महत्त्वाचा, जो कोणी नाही वाचला तरी चालेल असा भाग) मैतेई लिपीत देण्यात येऊ लागला! पुनरुज्जीवनवादी खुश!

मैतेई लिपी मुळातच इतकी अपुरी आहे की खुद्द मणिपुरी भाषेलाच ती पुरेशी नाही त्यामुळे हिचा अंगीकार करायला कोणीही तयार नाही. मैतेई लिपीला खुल्लखुल्ला विरोध कोणीही करत नाही (काय हिंमत आहे कोणाची!) पण खऱ्या अर्थानं तिचा स्वीकार करायलाही कोणी तयार होत नाही. कसे होणार?

इंफालला मणिपुर विद्यापीठात होतो तेव्हाची गोष्ट. एकदा एक विद्यार्थी असाच कशासाठी तरी माझ्याकडे आला होता. त्यानं आणलेली माहिती मी वाचली नि त्यावर सही केली. माझी सही मी मैतेई लिपीत केली होती. माझी सही पाहिल्यावर तो विद्यार्थी प्रतिनिधी माझ्याकडे चमत्कारिकपणे बघत राहिला नि शेवटी त्यानं मला माझं नाव विचारलं; तेव्हा मी म्हटलं की 'हे बघ ना. मी स्वच्छ लिहिलं आहे.' तेव्हा त्या बहाद्दर प्रतिनिधीनं सांगितलं की 'मला मैतेई लिपी येत नाही!' हा अनुभव मला अर्थात नवीन नव्हता, मणिपुरात मी ह्या पूर्वी अनेकदा घेतलेला होता.

आपल्या सार्वजनिक जीवनात मोठया तावातावानं मैतेई लिपीचा आग्रह धरणारे पुढारी, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी हे स्वतःच मैतेई लिपीत निरक्षर आहेत. जी लिपी आजच्या युगात चालू शकणार नाही, जिच्यात टंकयंत्र तयार करणं शक्य नाही, अप्रगत स्थितीमुळे ती संगणकावर आणणंही अतिशय अवघड आहे, अशा लिपीचा आग्रह कोणी धरला तर सामान्य जनता तरी तो कसा मानेल? बरं, जी लिपी आज वापरात आहे ती काय परक्यांची आहे का?

नियम अस्वाभाविक असेल तर मोडणं हीच स्वाभाविक गोष्ट असते! उद्या कोणी हातावर चालण्याचा नियम केला तर काय होईल? सर्वजण तो नियम पावलोपावली मोडतील! दुसरं काय होणार?

मणिपुरबाबत मला हीच एक मोठी आशेची गोष्ट वाटते की तिथले फुटीरवादी नि अतिरेकी काहीही म्हणोत, कसलीही चमत्कारिक मागणी करोत; पण तिथले सामान्य नागरिक त्यांच्या सोयीची, रुळलेली आणि शिवाय (तुलनेनं) चांगली असलेली लिपी (भले काहींच्या मते ती बंगाली असली तरी) तिची साथ सोडून जुनी, अप्रगत अवस्थेतमुळे अडगळीत पडलेली मैतेई लिपी स्वीकारायला तयार होणार नाहीत असं वाटतं. पण पुढचं कोणी काय सांगावं?

२०

अहोऽ, मला वाचता येतंय!

पुणे, चेन्नई, रामेश्वरम् तलैमन्नार अशी मजल-दरमजल करत-रेल्वे, बस, आगबोट अशा अनेक प्रकारच्या वाहनांनी प्रवास करून एका भल्या सकाळी, ‘कोलम्बो फोर्ट’ स्टेशनात उतरलो होतो. मुंबईत जसा फोर्ट भाग आहे तसाच तो कोलंबोतही आहे पण कोलंबोतलं रेल्वेचं स्थानक मात्र मुंबईतल्या फोर्ट भागातल्या बोरीबंदर स्थानकासारखं भव्य नाही.

इंग्लिशच्या आणि हिन्दीच्या जोडीनं खाणाखुणांचाही आधार घेऊन कोलंबोच्या दक्षिण उपनगरात जाणारी मिनि बस मिळवून देहीवलऽ गाठलं. (एकदम आपल्या कर्जतजवळच्या दहिवली गावाची आठवण आली ना? हो, सिंहली भाषेत सर्व शब्द अजन्त असतात म्हणजे स्वरान्त, आपण गोष्टऽ म्हणतो त्याप्रमाणे, गोष्ट नव्हे.) कोलंबो फोर्ट ते देहिवलऽ प्रवासात तीव्रपणे जाणवत होतं की आसपास बरंच काही दिसत होतं पण वाचता येत नव्हतं. आपल्याकडे बहुतेक पाट्या फक्त इंग्लिशमध्येच असतात पण श्रीलंकेत सिंहली लिपीत असलेल्या पाट्या खूपच होता, तिथल्या मोटार इत्यादी स्वयंचलित वाहनांवरच्या पाट्यांवरच्या क्रमांकावरती असलेली अक्षरं फक्त सिंहली लिपीतच असतात! रोमन वगैरे लाड तिथे चालत नाहीत. मी एखाद्या अडाणी, अंगठाछाप निरक्षर माणसांप्रमाणे पाट्यांवरून नुसते डोळे फिरवत होतो पण मला त्यातून फारसा बोध होत नव्हता, द, ल वगैरे सारखी काही अक्षरं वाटत होती. काना, पूर्वमात्रा, वेलांट्या वगैरे खुणा जाणवत होत्या पण मूळ व्यंजनच कळत नव्हतं. निरक्षरतेची तीव्र बोच घेऊनच मी देहिवलऽमधल्या करकऱ्यांच्या टुमदार बंगल्यात प्रवेश केला.

पहिल्याच दिवशी संध्याकाळी बाजारात जाऊन मी सिंहली भाषेची अंकलिपी घेऊन आलो. माझा विद्यार्थी मित्र अजित आणि त्याचा धाकटा भाऊ नितीन हे माझ्या मदतीला होतेच, त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा उपयोग करून मी पुढच्या दोन-चार दिवसात बऱ्यापैकी प्रगती करून साक्षर झालो नि मग मला कोलंबोतल्या रस्त्यांवरून जाताना बालवर्गातल्या मुलांप्रमाणे पाट्या वाचण्याचा नादच लागला. आपल्याला आणखी एक लिपी वाचता यायला लागली ह्याचा खूप खूप आनंद होता, थोडासा अभिमानही होता. . .

नंतरच्या आठवड्यात गाल्लऽ, मातरऽ अशा पश्चिम किनाऱ्यावरच्या भागात मनसोक्त हिंडताना माझ्या साक्षरतेचा मला चांगलाच उपयोग झाला. गोऱ्या पर्यटकांवरच नव्हे तर खुद्द स्थानिक सिंहली लोकांवरही मला अधून-मधून छाप पाडता येत होती. स्थानिकांकडून फसवणूक तर नाहीच पण उत्तम सहकार्य मिळत असे. मी स्वत:वर भलताच खुश होतो!

असाच एक दिवस, भल्या सकाळी देहिवलऽहून निघून सराइताप्रमाणे नि कोलंबो फोर्ट स्टेशनावर आलो. आज माझा कँडीला जायचा कार्यक्रम होता. कँडी हे श्रीलंकेतलं सांस्कृतिक महत्त्वाचं शहर. गौतम बुद्धाचा दात तिथल्या स्तूपात जतन करून ठेवलेला आहे. मध्य लंकेतला डोंगराळ भागात वसलेल्या ह्या धार्मिक स्थळाला ब्रिटीशांच्या काळात थंड हवेचं ठिकाण म्हणून प्रसिद्धी मिळाली. आसपासचा प्रदेश चहाच्या लागवडीनं आणि मग माणसांनी फुलला. . . चुकवू नये असंच हे ठिकाणी असल्यामुळे मी दोन दिवस राहण्याच्या तयारीनं निघालो होतो.

फोर्ट स्टेशनसमोरच बाहेरगावी जाणाऱ्या बसेसचा तळ आहे. भल्या सकाळी इथे मोटारींच्या रांगा लागलेल्या होत्या. सॅक पाठीवर लटकावून मी बसेसवरच्या पाट्या वाचत मला हवी असलेली बस शोधत होतो. गाल्लऽ, मातरऽ, कतरगमऽ, रत्नपूरऽ, अनुराधापुरऽ, त्रिकोमलै अशा कितीतरी ठिकाणी जाणाऱ्या बसेस लागल्या होत्या पण त्या गर्दीत कँडीला जाणारी एकसुद्धा बस कुठे दिसत नव्हती. मी आश्चर्यानं गरागरा फिरून कँडीला जाणाऱ्या बसचा शोध घेत होतो, पण कँडीला जाणारी एकही बस कुठे सापडत नव्हती.

असं कसं झालं? घरून निघताना तर अजितनं मला सांगितलं होतं की सकाळच्या वेळी अगदी सिटीबसप्रमाणे कँडीला एका-पाठोपाठ एक अशा चिक्कार बसेस जातात. लंकेत येणारा प्रत्येक पर्यटक कँडीला जातोच; त्यामुळे पहाटेपासून संध्याकाळी उशिरापर्यंत कँडीला बसेस असतात, मग आत्ता इथे एकही कशी नाही? बरं, प्रत्येक बसवर मोठ्या अक्षरात पाटी होती, आणि मला वाचता येत होतं! कँडीला जाणाऱ्या बसेसचा आज संप वगैरे तर नाही ना अशी शंकाही माझ्या मनात येऊन गेली, पण इथल्या बहुतेक सगळ्या बसेस खाजगी होत्या, त्यामुळे संप-बंद वगैरे प्रश्नच उद्भवत नव्हता. मग?

एवढयात दोन गोरे पर्यटक माझ्यापुढून येताना दिसले आणि त्यांना बघताच एक –दोन बसचे कंडक्टर त्यांच्या दिशेनं कँडी! सर कँडी! करीत धावले, त्यांना आपल्या बसमधून प्रवास करण्यासाठी विनवू लागले; तेव्हा मला विलक्षण आश्चर्य वाटलं. मी त्या बसच्या पुढे जाऊन बघितलं तर त्यावर कँडीची पाटी नव्हतीच, त्या बसवर लिहिलं होतं 'महानुवर' मला रोज नकाशा पाहून बरीचशी ठिकाणं परिचयाची झाली होती आणि त्यात महानुवर हे नाव मी ह्यापूर्वी कधीच पाहिलेलं नव्हतं. शेवटी मी एका कंडक्टरला विचारलं की ही बस नक्की कुणीकडे जाणार आहे, कँडीला की महानुवरला? तेव्हा त्यानं खुलासा केला की बस कँडीलाच चालली आहे नि कँडीला सिंहलीत महानुवर म्हणतात!

बस भरली होती. मी त्या बसनं न जाण्याचं ठरवलं कारण मला खिडकीजवळची बैठक हवी होती. माझी अडचण जाणून आणि मला सिंहली वाचता येतं हे माहीत असल्यामुळे सिंहली कंडक्टरनं मला मोठया प्रेमानं ड्रायव्हरशेजारची फ्रंट सीट देऊ केली म्हणून मी बसमध्ये चढलो. बस थोड्याच वेळात महानुवरच्या दिशेनं निघाली होती.

मी विचार करत होतो की हा असा घोटाळा झालाच कसा? मला लिपी येऊ लागली हे खरं होतं; पण सिंहली लिपी ही अगदी शेजारच्या प्रदेशातील लिपी नव्हती. भौगोलिक अंतरामुळे माहितीचा दुरावा होता पण तो मी लक्षात घेतला नव्हता. स्थानिक लिपी आली तरी स्थानिक लोकांशी माझा परिचय झालेला नव्हता त्यामुळे त्यांच्या बोलण्यातून तिथल्या ठिकाणांची नावं माझ्या कानावर पडलेली नव्हती. मी भारतीय उपखंडातला रहिवासी आहे आणि श्रीलंका हा देश ह्याच उपखंडातला आहे. आपल्यावर इंग्रजांचं काही काळ राज्य होतं, त्या काळात त्यांनी आपल्या शिक्षणपद्धतीची पद्धतशीर वाट लावली एवढचं नव्हे तर आपल्या नावागावांचीही मोडतोड केली. ते गेल्यावर आपण आपली स्वतःची (वन्द्योपाध्याय, मुखोपाध्याय, ठाकूर इत्यादी) नावं किंवा आपल्या गावांची नावंसुद्धा अजूनपर्यंत सुधारलेली नाहीत. भारतात जसं आहे तसंच श्रीलंकेतही असणार ह्याचा मला अंदाज यायला हवा होता पण तो आला नाही, त्यामुळे ती केवळ स्थानिक लिपीच्या आधारानं वैकल्पिक परदेशी नावाच्या 'कँडी'चा शोध घेत फिरत राहिलो. आपल्या ह्या भारतीय उपखंडात साधी-सुधी साक्षरता उपयोगाची नाही, आपल्या परंपरेनं मानलेला बहुश्रुतपणा आपल्या

अनुक्रमणिका

दृष्टीनं अधिक महत्त्वाचा आहे आणि बहुश्रुत होण्यासाठी स्थानिक लोकांशी प्रत्यक्ष संपर्क ठेवणं आवश्यक असतं!

हा सगळा विचार करता-करता मला आणखी एका गोष्टीची एकसारखी आठवण येत होती, ती म्हणजे दिवाकरांच्या ‘अहो मला वाचता येतंय!’ ह्या कथेची.

अनुक्रमणिका

२१
शिघ्रलेखन

ती रीतसर मुलाखत अशी नव्हती; पण प्रकार तसाच होता. एका ठिकाणी मी गेलो होतो नि शॉर्ट हॅन्डचा प्रश्न आला. मला मराठीत शीघ्रलेखन करता येतं म्हटल्यावर 'सरकारी पद्धतीचं लघुलेखन येतं का?' असं विचारण्यात आलं, तेव्हा 'मी म्हटलं की मी लिमयांच्या पद्धतीनं लिहितो पण पद्धत कोणती ह्यापेक्षा मला मिनीटाला ८० शब्द लिहिता येतात की नाही हे पहा. लिपी सरकारमान्य आहे की नाही हा मुद्दा गौण आहे. त्याला तसा काही अर्थ नाही!' मी विद्यार्थी असल्यामुळे माझ्या युक्तिवादाचा तिथल्या निब्बर (आय् मीन, मच्युअर्ड / सिनिअर वगैरे) लोकांवर काही परिणाम झाला नाही. . .

जर्मन शिकायला लागलो तेव्हा आमचे जर्मनचे प्राध्यापक फादर लेदर्ले लघुलिपीत लिहीत असल्याचं बघितलं. सेन्ट व्हिन्सेन्टमधले फादर अश हेही स्वतःची टिपण शीघ्रलिपीतच करीत असतं.

तान्हं मूल प्रारंभी हुंकार द्यायला शिकतं. त्या हुंकार-चित्कारांसारख्या जाणिवेच्या सीमारेषेवरच्या ध्वनीपासून ध्वनिभाषा, ध्वनिभाषा ते रेखाटन, रेखाटन ते लिपी नि लिपी ते शिघ्रलीपी- केवढा प्रदीर्घ प्रवास आहे! आपल्या मुखातून बाहेर पडणाऱ्या हवेला जीभ, ओठ, दात, टाळा वगैरेच्या सहाय्यानं वेगवेगळे ध्वनी निर्माण करता येतात हे कळून भाषा नावाचं प्रभावी साधन माणसाला मिळण्यात कित्येक हजार वर्षांचा काळ नक्कीच गेलेला असणार.

माणसं ध्वनीच्या माध्यमातून बोलू लागल्यानंतर ते ध्वनी 'लिहिण्याची' गरज त्याला भासली असणार. अत्यंत महत्त्वाच्या शोधांचे जनक कोण हे आपल्याला कधीच कळत नाहीत! चाकाचा शोध कोणी लावला, भाषा कोणी शोधून काढली/काढल्या, लेखनकलेचा विकास कोणी केला, शून्याचा शोध लावून त्याचा पद्धतशीर उपयोग कोणी सुरू केला, वगैरेसारखे प्रश्न नेहमीच अनुत्तरीत राहतात; कारण त्यांचा शोध/ विकास प्रखर प्रतिभावंतांच्या काही पिढ्यांनी प्रदीर्घ काळ केलेल्या कठोर परिश्रमांतून लागलेला असतो.

माणसं लिहायला लागली दगड, माती, पानं वगैरे पदार्थांचा उपयोग करता-करता अनेक सहस्त्रकांनंतर कागद अवतरला नि लेखनाला बरीच गती आली. मुद्रणकलेचा शोध लागल्यावर लेखनात थोडीशी वाढ झाली; पण लेखन सामान्य माणसापर्यत पोहोचलं ते युरोपातल्या औद्योगिक क्रांतीनंतरच.

आपल्याकडची सर्वसाधारण लेखनकलाही ह्याच मार्गानं पुढे सरकली.

काल-परवापर्यत माणसांचं जीवन स्वस्थ, शांत होतं तेव्हा त्यांना लिहियला निवांतपणा होता. जीवनाला जसजशी गती यायला लागली तसतशी लेखनासाठीही गतीची आवश्यकता भासू लागली.

ज्ञात इतिहासात भरभर लिहिण्याची गरज रोमन साम्राज्यात सर्वप्रथम जाणवली. मार्कुस तालीउस् तिरो ह्यानं इ. स. पूर्व ६३ मध्ये 'नोतारे' नावानं एका लिपीचा विकास केला की जी भरभर, बोलण्याच्या गतीनं लिहिता येत असे. ही लिपी शिकवण्याची पद्धतशीर सोय रोममध्ये केलेली होती आणि अशा प्रकारे

अनुक्रमणिका

शासकीय/ वैधानिक कामाचं शीघ्रलेखन करण्यासाठी ‘नोतारिइ’ ची (हल्लीचा नोटरी) नेमणूक केली जात असे.

औद्योगिक क्रांतीच्या काळात केवळ यंत्रांचीच नव्हे तर मानवी जीवनाची गतीही खूप वाढली. त्या काळात ‘चार्ल्स् डिकिन्स्’ सारख्या कादंबरीकारानंही काही काळ शीघ्रलेखन करून आपली उपजीविका चालवली होती. आपल्या हरिप्रसाद चौरासिया ह्यांनीही आपल्या नोकरीची सुरुवात लघुलेखक म्हणूनच केली होती.

भरभर लिहिता यावं यासाठी ऐतिहासिक काळात भारतात काही प्रयत्न झाले हे अनेक पुराव्यांवरून दिसतं. ब्राम्ही लिपीवरून अनेक प्रादेशिक वळणं तयार झाली पण त्यातली मोडी, महाजनी, हटवणकाई वगैरे जी वळणं उदयाला आली त्यांत वळणांचं आणि पद्धतीचं (म्हणजे ह्रस्व –दीर्घाला फाटा देणं, शब्दांवर स्वतंत्रपणे शिरोरेखा न देणे वगैरे) जे सुलभीकरण झालं ते शीघ्र गतीसाठीच. उत्तम हस्ताक्षर असणाऱ्यांना समाजात मान होता, त्यांना नोकरीही चांगली मिळत असे.

भारताच्या पूर्व भागात मात्र ब्राह्मीच्या परिवर्तित/विकसित लिपीनं जलद लिहिण्यासाठी सुरुवातीपासून (म्हणजे दहाव्या शतकापासून) जोड-वळण घेतलेलंच होत, रोमन लिपीतल्या रनिंगहॅन्ड वळणाप्रणाणे! आजची बाङ्ला, असमी, मणिपुरी ह्या भाषांसाठी वापरली जाणारी लिपी (ही जवळ-जवळ एकच आहे) हे त्याचं उत्तम उदाहरण आहे.

पण हे सारे प्रयत्न म्हणजे रूढ पद्धतीनं लिहिलेल्या शब्दांना सोपं वळण देण्याचा प्रयत्न होता. ह्या पद्धतीला पहिला क्रांतिकारी धक्का दिला तो आइज़ॅक् पिट्मन् ह्यानं, इ. स. १८३७ मध्ये. ध्वनीच्या आधारानं त्यानं शीघ्रलेखन करायची पद्धत शोधून काढली नि हां –हां म्हणता ती इंग्लंडात लोकप्रिय झाली.

इंग्लंडात (नि त्यांच्या भारत, केनिया, दक्षिण आफ्रिका वगैरे जुन्या वसाहतींमध्ये) पिटमन् पध्दत प्रसिध्द पावली तर अमेरिकेच्या पश्चिम भागात ‘ग्रेग’ पद्धतीचं शीघ्रलेखन लोकप्रिय झालं. पिटमनच्या ‘शॉर्ट हॅन्ड’ची कीर्ति हळूहळू युरोपात पसरली आणि फ्रान्स, जर्मनी वगैरे सर्वच देशातल्या जिज्ञासूंनी नि कल्पक अभ्यासकांनी आपापल्या भाषांसाठी शीघ्रलेखनाची कला विकसित केली. (महाराष्ट्राएवढ्या) जर्मनीत तर शीघ्रलेखनाच्या एक-दोन नव्हे तर चांगल्या आठ पद्धती अस्तित्वात आल्या नि त्या आजही नि त्या आजही वापरात आहेत!

आपल्याकडे इंग्लिशचा वरचष्मा इतका जबरदस्त होता की मराठी- हिन्दीसाठी असं काही करायचे प्रयत्न फार उशिरानं सुरु झाले. मराठी, हिन्दी वगैरे भाषांसाठी मुख्यत: पिटमन् पद्धतीवर आधारित अनेक प्रकार तयार झाले नि थोड्याफार प्रमाणात ते चालू आहेत; पण ह्या बाबतीतही आपल्याकडच्या अनेकांना वाटलं/अजूनही वाटतं की अनेक पद्धती असू नयेत, एकच पद्धत असावी! कारण इंग्लन्डमध्ये एकच आहे! पण त्यांची ही माहिती अर्धवट आहे हे त्यांना कोणी सांगतच नाही.

‘विविधतेत एकात्मता’ असं आपण आपल्या लेखनात, भाषणात आवर्जून म्हणतो खरं; पण प्रत्यक्षात मात्र तथाकथित ‘सरकारमान्य’ एकीकरणाचा वरवंटा फिरवल्याशिवाय आपल्याला बरंच वाटत नाही! ही स्थिती चमत्कारिकच नव्हे तर लोकशाहीला मारक आहे.

अनुक्रमणिका

शॉर्टहॅन्ड म्हणजे लघुलेखन की लघुलिपी की शीघ्रलेखन की आशुलिपी? शब्दाच्या निश्चितीची घाई करण्याचं कारण नाही, प्रथम ती कला अवगत करणं अधिक महत्त्वाचं आहे !

यंत्रयुग आलं, घरोघरी संगणक आले, तरी हस्ताक्षराची गरज राहणारच आहे त्याचप्रमाणे कितीही नवनवीन यंत्र आली, आपोआप टंकन करू शकणारे संगणकीय कार्यक्रम आले तरी शीघ्रलेखनाचं/ आशुलिपीचं महत्त्व काही व्यवसायिकांसाठी राहणारच आहे कारण यंत्रं बिघडू शकतात, ऐनवेळी धोका देऊ शकतात पण तुमच्या हातात बसलेली कला तुम्हाला धोका देत नाही. आपल्या स्वत:च्या उन्नतीसाठी अशा काही कला आपण आत्मसात केलेल्या बऱ्या !

शीघ्रलेखन शिकण्यात भाषेच्या दृष्टीनंही मोठा फायदा आहे. ज्या भाषेच शीघ्रलेखन आपण शिकू त्या भाषेचे अनेक पैलू, जे आपल्याला अन्यथा कळण्याची शक्यता नसते, ते कळायला लागतात. उदाहरणार्थ मराठीतल्या काही पद्धतींमध्ये भाविष्यकाळ दाखवताना 'ल' ध्वनीची खूण वापरली जाते. प्रत्यक्षात प्रथम पुरुषी रूपांमध्ये वेगळा प्रत्यय असतो म्हणजे तो जाईल, ती जाईल, ते जातील, तू जाशील वगैरे पण 'मी जाईल' असं होत नाही तर मी 'जाईन' असं रूप होतं. पण लेखनपद्धतीच्या सोयीसाठी 'ल' वापरला जात असला तरी नंतर टंकित/मुद्रित करताना लघुलेखकानं 'मी जाईल' असं न करता 'मी जाईन' असं करणं आवश्यक असतं. (म्हणजेच लघुलेखकाला प्रमाण भाषा उत्तम प्रकारे येणं आवश्यक असतं.) अशा प्रकारे त्याला भाषेचे, भाषेच्या व्याकरणाचे बारकावे समजायला लागतात आणि नंतर स्वाभाविकपणे आपण त्यांचा उपयोग इतर ठिकाणीही डोळसपणानं करायला लागतो. थोडक्यात म्हणजे, शीघ्रलेखन शिकणाऱ्याची भाषा सुधारते, समृद्ध होते आणि भाषिक जाण विकसित होते, विस्तारते.

ही कला केवळ लिपिक किंवा लघुलेखक होण्यासाठी उपयोगाची आहे असं नाही. महत्त्वाकांक्षी व्यक्तींनी यंत्राच्या मदतीनं आणि स्वत:च्या हातानं झरझर लिहिण्याची कला 'हस्तगत' करावीच.

अनुक्रमणिका

२२
संगणकीय साक्षरता

परवा विद्यापीठात गेलो होतो तेव्हा फ्रेंच विभागाचे एक प्राध्यापक मोठया काळजीत पडलेले दिसत होते. त्यांना आपला प्रबंध पूर्ण करून तो घाईनं फ्रान्सला पाठवायचा होता. त्यांचा संगणक अभियंता/ विक्रेता समोर बसून बऱ्याच प्रकारे खटपट करीत होता. आपला प्रबंध टंकित करण्यात प्राध्यापक महाशयांना अडचण होती ती म्हणजे फ्रेंच भाषेत वापरल्या जाणाऱ्या ढीगभर खुणांची.

फ्रेंच भाषेची लिपी रोमनच असली तरी रोमनच्या २६ अक्षरांच्या जोडीनं थोड्याथोडक्या नाही तर आणखी दहा खुणा फ्रेंच लिहिताना लागतात – (ग्राब्, एग्यु, सिकोंफ्लेक्स आणि त्रेमा ह्या खुणा a, e, o, u ह्या अक्षराच्या डोक्यावर दिल्या जातात आणि सेदीय ही खूण c अक्षराच्या खाली दिली जाते.) आणि त्यांच्या संगणकात फक्त इंग्लिशमध्ये वापरली जाणारी २६ अक्षरंच येत होती! (युरोपात सर्व भाषांसाठी रोमन लिपी वापरली जाते नि त्या २६ अक्षरांनी सर्व काही लिहिता येतं असा भाबडा, खरं तर मूर्ख समज अनेकांचा असतो. फ्रेंच, जर्मन वगैरे भाषांच्या टंकयंत्रावरचे कळफलक फार पूर्वीपासूनच वेगळे होते. इंग्लिशचा कळफलक आपण इन्टरनॅशनल वगैरे समजतो पण ती वस्तुस्थिती नाही.) बरं तेवढया अक्षरांच्या आधारानं टंकन करावं तर त्याची प्रत काढल्यावर अक्षरश: प्रत्येक ओळीतल्या दहा-दहा अक्षरांवर/ अक्षरांखाली अत्यंत बारकाईनं डोळेफोड करून फ्रेंचमधल्या विविध खुणा काळजीपूर्वक देण्याचा प्रचंड उद्योग करावा लागणार!

बराच वेळ त्यांची चाललेली खटपट बघून मी शेवटी विचारलं तेव्हा प्राध्यापकांनी खुलासा केला. त्यांची अडचण लक्षात येताच मी संगणकाच्या नियंत्रण कक्षात प्रवेश केला (कन्ट्रोल पनेल) आणि त्यातल्या की-बोर्ड भागात गेलो. तिथे भाषेचा पर्याय होता. युरोप-अमेरीकेल्या बहुतेक भाषांचा पर्याय तिथे उपलब्ध होता, त्यातल्या फ्रेंच भाषेपुढे टाळी दिली (म्हणजे क्लिक केलं. जुन्या काळी राजे-महाराजे टाळी वाजवून आपल्या नोकराचाकरांना आज्ञा देत असत, त्या प्रमाणेच आपण आपल्या संगणक-राक्षसाला आज्ञा द्यायची!) तेव्हा संगणकानं फ्रेंच भाषिक देशात उपलब्ध असलेल्या विविध कळफलकांची यादी माझ्यासमोर टाकली, मी त्यातल्या 'प्रमाण फ्रेंच' कळफलकावर टाळी दिली नि 'कायम हाच'(डिफॉल्ट) अशी त्याला आज्ञा दिली नि अक्षरश: एका सेकंदात संगणकावर फ्रेंच कळफलक अवतरला! संगणक कार्यालयात येऊनही गेले कित्येक महिने प्राध्यापक महाशयांचं काम अडून राहिलेलं होतं ते आता मार्गी लागलं!

'विन्डो-९५'मध्ये (आणि त्यापुढच्या प्रकारांतही) आणखी एक फार मोठी सोय मायक्रोसॉफ्टवाल्यांनी आपल्याला उपलब्ध करून दिली आहे ती म्हणजे फ्रेंच, जर्मन वगैरे कळफलकाच्या जोडीनं इंग्लिशचा कळफलक असण्याची, कारण आपल्याकडे त्याची आवश्यकताही खूप असते कारण उदाहरणार्थ आपल्या संगणकावर फ्रेंच भाषेचा कळफलक आणला तर त्यावर इंग्लिश टंकन करणं खूपच अवघड जाईल कारण फ्रेंच भाषेचा कळफलक खूपच वेगळा आहे, इंग्लीशमध्ये जिथे 'अर्धविराम' आहे तिथे फ्रेंचचा 'एम्'असतो नि जर्मनचा 'ओ-उम्लाउट' (O, o) असतो! जर्मन कळफलकावर 'वाय'च्या जागी 'झेड' असतो तर इंग्लिश 'झेड'च्या जागी फ्रेंच कळफलकावर 'डब्ल्यू'असतो! तेव्हा प्रत्येक वेळी नियंत्रण कक्षात जाऊन कळफलक बदलणं त्रासदायक वाटतं. लोकांची ही अडचण लक्षात घेऊन विन्डो -९५ पासून एक महत्त्वाची सोय झाली ती ही की 'कायम'(डीफॉल्ट) म्हणून फ्रेंच, जर्मन वगैरे कळफलक ठेवला की संगणक सुरु केल्यावर नेहमी तोच येतो पण आपल्याला इंग्लिशचा कळफलक हवा असेल तर ऑल्ट

आणि शिफ्ट ह्या दोन कळा एकदम दाबायच्या की कळफलक जादू केल्याप्रमाणे बदलतो आणि इंग्लिशचा येतो. पुन: फ्रेंचचा हवा असेल तर पुन: ऑल्ट आणि शिफ्ट एकदम दाबा की पुन: फ्रेंच! आता हा कळफलक बदलला की नाही हे सुध्दा टंकन न करता कळू शकतं, संगणकाच्या पडद्यावर उजव्या बाजूच्या खालच्या कोपऱ्यात –घडयाळाच्या शेजारी ते दाखवलं जातं. इंग्लिश कळफलक असेल तर En. फ्रेंच कळफलक असेल तर Fr किंवा जर्मन कळफलक असेल तर De (कारण जर्मन भाषेत जर्मनला डॉइच् Deutsch म्हणतात.) आहे ना एकदम सोप्पं काम?

काल-परवापर्यंत आपल्याकडे परिस्थिती अशी होती की लिहिणं म्हणजे हातानं लिहिणं. टंकयंत्रावर लिहिणं म्हणजे चैनच होती; कारण तशी यंत्र सामान्यांकडे नव्हतीच, अगदी उच्चमध्यमवर्गीयां कडेही नव्हती. क्वचित कोणी परदेशी जाऊन आलेला असेल नि खूप हौशी असेल तरच एखादवेळेस त्यानं छोटसं (पोर्टेबल) टंकयंत्र बरोबर आणलेलं असायचं नि मग त्या महागड्या इम्पोर्टेड यंत्राची इतकी काळजी घेतली जायची की ते यंत्र कुलूपबंद राहायचं!

गेल्या चार-पाच वर्षात मात्र परिस्थिती पार बदलली आहे नव्हे क्रांती झाली आहे. घरोघरी संगणक येऊ लागले आहेत. संगणक ही काही आता केवळ कार्यालयांची आणि श्रीमंतांची मक्तेदारी राहिलेली नाही.

संगणक घरोघरी येऊ लागले हे खरं असलं तरी जनता साक्षर झाली असं मात्र दुर्दैवानं दिसत नाही. ज्यांच्या घरी अनेक वर्षांपासून टंकयंत्र आहेत नि आता संगणक आला आहे अशांनाही यंत्रांच्या सहाय्यानं झरझर लिहिता येत नाही. बहुसंख्य व्यक्ती जेमतेम दोन बोटांचा उपयोग करूनच लेखनाचं काम टुकुटुकु करत असतात. ह्या बाबतीत आजपर्यंत जे अनेक प्रयोग झालेले आहेत त्यांचा निष्कर्ष असा आहे की दोन बोटांनी टंकन केल्यास जास्तीत जास्त गती २०/२२ असते तर नऊ/दहा बोटांचा वापर करून पद्धतशीर लेखन केल्यास किमान गती दर मिनिटाला २५ शब्द इतकी असते. थोडासा पद्धतशीर सराव केला तर मराठी-हिन्दीतही दर मिनिटाला ६०/७० शब्द लिहिण्याइतकी गती येऊ शकते. इतका फरक असूनही लोक (आपल्याच) सगळ्या बोटांचा वापर करायला का तयार होत नाहीत हे कळत नाही!

संगणकांनी आपल्याला आणखी एक मोठी सोय करून दिलेली आहे ती म्हणजे आपल्या संगणकावर एकाच वेळी अनेक लिप्यांमध्ये लिहिण्याची सोय. (मात्र ह्यासाठी आपल्याकडे त्या-त्या लिपीचा कार्यक्रम असण्याची आवश्यकता असते) पूर्वी एखादा परिच्छेदच काय पण दुसऱ्या लिपीतला एखादा शब्द घालायचा झाला तरी तो कागद (बहुतेक वेळी कार्बनसकट) उचलून दुसऱ्या टंकयंत्रावर घालायचा, तो नीट बसवायचा वगैरे सोपस्कार करावे लागत, त्यात वेळ तर जायचाच पण कागद बसवण्याचं तंत्र नीट जमलं नाही तर एवढे सव्यापसव्य करूनही प्रत्यक्षात तो मजकूर दिसायला फार वाईट, वेडावाकडा दिसत असे; पण ह्या सर्व अडचणी आता संगणकामुळे दूर झालेल्या आहेत.

सोयी खूप झाल्या आहेत, साधनं स्वस्तही आहेत, अनेकांनी ती घरात आणूनही ठेवली आहेत, आता एकच गोष्ट राहिली आहे, त्या साधनांचा कल्पकतेनं आणि कौशल्यानं उपयोग करणं; ते शेवटी आपल्याच हातात आहे.

अनुक्रमणिका

२३
समान कळफलक

देवनागरी वळणावर अक्षरांची क्रूर मोडतोड करून टंकण करणारी हातयंत्र आता मोडीत निघाली/ निघत आहेत हे चांगलंच झालं. गेले त्यांचे दिवस. आता ठिकठिकाणी संगणक आले आहेत/येऊ घातले आहेत; तरीही काही मुद्दयांवर जुन्या, सुस्थापित लोकांनी अनेक अनावश्यक मुद्द्यांबाबत आडमुठी भूमिका घेतलेली दिसते. त्यातला एक मुद्दा म्हणजे की-बोर्डचा —कळफलकाचा.

कळफलक भारतात सर्वत्र एकाच प्रकारचा असावा असं अनेकांना वाटतं. कल्पना चांगली आहे, भावना उदात्त आहे; पण समान कळफलकाचं महत्त्व सांगताना ही मंडळी (नेहमीप्रमाणे) इंग्लिशचं म्हणजे रोमन लिपीचं(चुकीचं) उदाहरण देतात. 'पहा, रोमनचा कसा एकच कळफलक आहे, नाहीतर आपल्याकडे? नुसता गोंधळ! बजबजपुरी!'

अशी टीका करणाऱ्यांना सामान्यतः कोणताच कळफलक माहीत नसतो! त्यांना कोणत्याच लिपी चं पध्दतशीर टंकलेखन करता येत नसतं! तरी पण तुलानाच करायची झाली तर इंग्लिशच्या कळफलकापेक्षा देवनागरीचा आजचा संगणकाचा कळफलक अनेक पटीनं चांगला आहे, शास्त्रीय आहे. कोणतं अक्षर किती वेळा येतं ह्याचा विचार त्यात केलेला आहे. कोणत्या बोटानं कळ दाबणं सोपं असतं, कोणत्या बोटाला ते काम झटपट करता येईल; अशा एक ना अनेक गोष्टीचा विचार देवनागरीचा आजचा कळफलक बनवताना केलेला आहे आणि लक्षात ठेवायला तर अतिशय सोपा आहे. त्याच्यापुढे रोमनचा/इंग्लिशचा कळफलक अत्यंत अशास्त्रीय आहे, म्हणून टाकाऊ आहे.

रोमन लिपीच्या बाजूनं असा धादांत चुकीचा युक्तिवाद करणाऱ्यांना काय म्हणावं?रोमनचे एक-दोन नव्हे तर अनेक 'स्टॅन्डर्ड' कळफलक अस्तित्त्वात आहेत हे त्यांना ठाऊकच नसतं. पूर्वीच्या काळी त्यांना हे सगळं दाखवणं नि समजावून सांगण अवघडच होतं; कारण ते वेगवेगळे कळफलक/टंकयंत्र इथे उपलब्ध नसायची आणि आपली (बडी) मंडळी जरी इंग्लंडखेरीज इतर देशांमधून गेलेली असली तरी त्यांनी तिथली टंकनयंत्र कधी डोळसपणानं पाहिलेली नसायची! पण आता तुम्हाला घरच्या घरी युरोप-अमेरिकेतल्या देशांमध्ये (फक्त) रोमन लिपीसाठी किती 'स्टॅन्डर्ड'कळफलक आहेत हे तुमच्या संगणकावर बघता येईल. विन्डोवाल्यांनी त्यांची केवळ माहिती किंवा यादीच दिली आहे असं नाही तर चांगले पन्नास स्टॅन्डर्ड कळफलक उपलब्ध करून दिलेले आहेत. जिज्ञासूंनी एकदा तरी ते उघडून पहावेत, पण समान कळफलकाचा आग्रह असणाऱ्यांनी तर ते आवर्जून पहावेत!

लेखनयंत्रांमध्ये आज फार झपाट्यानं बदल होत आहेत, नव्हे क्रांती होत आहे आणि त्याला उपयुक्त अशा सोयी आज आपल्याकडे उपलब्ध होत आहेत.

आज भारतात उपलब्ध असलेल्या देवनागरीच्या 'बऱ्या' कार्यक्रमांमध्ये कळफलकांचे पाच- सात पर्याय तरी दिलेले असतात. ज्याला टंकयंत्राच्या कळफलकची(च) सवय आहे (नवीन कळफलक अतिशय सोयीचा असला तरी शिकायची तयारी नाही) अशांसाठी तो उपलब्ध आहेच; पण त्याखेरीज 'श्रीलिपी', 'स्वदेश', 'अकृति', 'लिप्', 'देवयानी' असे अनेक पर्याय दिलेले आहेत. असलेला कळफलक काढून आपल्याला हवा असलेल्या कळफलक आणण्यासाठी संगणकावर जेमतेम पाच-सात सेकंद लाग

अनुक्रमणिका

तात. अशा परिस्थितीत समान कळफलकासाठी फार ओरडा करण्याचं खरं तर कारण नाही. समान कळफलक झाला तर उत्तमच होईल आणि यथावकाश तो विकसित होईलही. पण तोपर्यंत कसलाही खोळंबा झालेला नाही.

आज खरी गरज आहे ती देवनागरीच्या समान 'अक्षर-मानचित्राची' (कॅरेक्टर-मॅपची) . असमान कळफलकानं कसलाही घोटाळा होत नाही पण देवनागरीचं समान अक्षरमानचित्र नसल्यामुळे मात्र असंख्य व्यावहारिक अडचणी येत असतात. उदाहरणार्थ तुमच्याकडे 'श्रीलिपी' कार्यक्रम आहे. त्यानुसार तुम्ही काही काम केलंत आणि ते दुसरीकडे घेऊन गेलात आणि त्याच्या संगणकावर 'स्वदेश' असेल तर तुमच्या फ्लॉपीवरचा मजकूर तिथे दिसणारच नाही. तुमच्या मुद्रकाकडे तुमच्याकडे असलेला कार्यक्रम नसेल तर तुमच्या फ्लॉपीवरून त्याच्याकडे ट्रेसिंग काढता येणार नाहीत. प्रत्येक वेळी प्रिंट-फाईल करून न्यावी लागेल. थोडक्यात म्हणजे, पुढचं कोणतंही काम करणं शक्य होणार नाही. हा घोटाळा होण्याचं कारण म्हणजे देवनागरी लिपीची अक्षरं प्रत्येकानं आपल्या कल्पनेप्रमाणे बसवलेली आहे. श्रीलिपीवाल्यांची एक तऱ्हा तर स्वदेशवाल्या भटांची कल्पना वेगळी नि सीडॅकवाल्यांची तऱ्हा त्याहून वेगळी! एकमेकांचा एकमेकांशी मुळीच वेळ नाही, अशा प्रकारे ह्या लोकांनी आपापली अक्षरं-मानचित्र बनवली आहेत.

ह्या वेगळया चुली मांडण्यामागे आणखी दोन महत्त्वाची कारणं होती, एक म्हणजे तांत्रिक कारण आणि दुसरं म्हणजे कायदेशीर कारण. प्रत्येक कंपनीनं स्वतःचं असं खास तंत्र वापरलं होतं त्यामुळे त्यांच्यात भेद होता आणि दुसरं कायदेशीर कारण म्हणजे एकसारखा कॅरेक्टर-मॅप दुसऱ्यानं बनवला तर कॉपिराइटची भानगड उद्भवते. ती कटकटच नको म्हणून प्रत्येक कंपनीनं स्वत:चा कॅरेक्टर-मॅप वेगळा ठेवला. परदेशांमध्येही असे प्रश्न आले होते पण कायद्यांमध्ये आवश्यक ते बदल करून ते सोडवले गेले. तेव्हा ह्या दोन्ही अडचणींवर मात करून देवनागरीसाठी नि सर्वच भारतीय लिप्यांसाठी एक समान अक्षर-मानचित्र बनवण्याची गरज होती, आता तर ती फार तीव्र आहे; पण गंमत म्हणजे एवढी निकड असूनही संबंधितांनी अद्यापि काहीही केलेलं नाही! संगणक आणि त्याच्या आधारावर जगाला गवसणी घालायला आता केवळ शास्त्रज्ञच नव्हे तर राजकारणीही निघाले आहेत, पण आपल्या लिप्यांसाठी अजून समान अक्षर-मानचित्र तयार नाही ह्या वास्तवाची जाणीवही फारशी कोणाला नाही!

संगणक खरेदीसाठी आज अनेक सरकारं बिनव्याजी पैसे देतात; पण ही खैरात करताना त्या शासकीय कर्मचाऱ्यानं आपल्या संगणकावर देवनागरी लिपीची/त्या राज्याच्या लिपीची सोय ठेवलीच पाहिजे असं साधं बंधन घालण्याची गरज कोणालाही वाटत नाही! देवनागरीची सोयच नसल्यामुळे अशा संगणकधार कांकडून घरगुती कामातही इंग्लिशचा वापर अकारण वाढत राहतो. आपण आपल्या भाषेच्या नि संस्कृतीच्या नावानं जाहीर भाषणातून कळवला दाखवतो पण काही भरीव करताना मात्र सारं-सारं (सोईस्करपणे?) विसरून जातो!

आज चीनमधल्या चित्रलिपीचं समान 'अक्षर' नव्हे पण 'चित्र-मानचित्र' तयार झालेलं आहे. कोणी म्हणेल की तो हुकूमशाही देश आहे म्हणून झालं; पण जपानी, थाई वगैरे किरकोळ संख्या असणाऱ्या भाषां साठीसुद्धा समान अक्षर-मानचित्र आहे पण पन्नास-साठ कोटी लोक ज्या देवनागरीचा वापर करतात, तिच्यासाठी समान अक्षर-मानचित्र अद्यापि तयार नाही!

अनुक्रमणिका

देवनागरीसाठी समान अक्षर –मानचित्र तयार करण्यात ज्या कायदेशीर अडचणी आहेत त्या दूर कराव्यात, ज्या वैधानिक तरतुदीची आवश्यकता आहे त्या पूर्ण कराव्यात असं आमच्या वैधानिक प्रतिनिधींना का बरं वाटतं नाही?की हे कोणा विशिष्ट व्यक्तींच्या फायद्याचं नसल्यामुळे त्याची गरज वाटत नाही? आमचं भाषेवरचं नि संस्कृतीवरचं प्रेम केवळ वरवरचंच, सभासंमेलनापुरतंच आहे का?

अनुक्रमणिका

२४
लिपी सुधारणा

न्यूनगंडानं पछाडल्यामुळे आपल्या लिपीत काहीतरी सुधारणा करण्याची गरज आहे असं वाटणारी माणसं आपल्या देशात खूपच आढळतात. ('बोडकी कर ग मला!' ह्या चालीवर आपल्या देवनागरी लिपीला एकदा रोमनसारखी करायला हे सारे लिपि सुधारक धडपडत असतात, बिचारे!) जगातल्या प्रगत देशांमध्ये असल्या चमत्कारिक कल्पना असणारी माणसं दिसत नाहीत.

हं, जगात अशी काही उदाहरण आहेत की जेथे पहिली लिपी टाकून देऊन पूर्णतः वेगळ्या लिपीचा स्वीकार केला गेला. उदाहरणार्थ केमाल पाशानं तुर्कस्तानचं आधुनिकीकरण करायला निश्चय केल्यावर इस्लामच्या प्रभावामुळे तुर्कीवर लादली गेलेली अरबी भाषेची लिपी टाकून देऊन रोमन लिपीचा वापर सुरू केला, सक्तीचा केला. इथे लक्षात घेण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुर्की भाषेसाठी अरबी लिपीचा उपयोग होत असला तरी त्या काळात तुर्कस्तानातील बहुसंख्य जनता निरक्षरच होती. म्हणजे पहिली लिपी टाकून देऊन नवीन लिपीचा सराव करायला हवा अशी स्थिती नव्हतीच!

साधारणतः त्याच काळात सोविएत युनियनच्या स्थापनेनंतर आशियातल्या ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, किरिगिजीस्तान, अयुज़बेकिस्तान, कज़गिस्तान इत्याडे अनेक भागांत इस्लामच्या प्रभावामुळे अरबी लिपीचा उपयोग होत असे; पण प्रत्यक्षात तिथली जनता फार मोठया प्रमाणात निरक्षरच होती. सोवि एत संघराज्य स्थापल्यानंतर सर्व जनतेला साक्षर करण्याचं ठरलं नि मग त्या वेळी सोविएत संघातल्या सर्व भाषांसाठी रूसी लिपीचाच वापर करण्याचा महत्त्वाचा निर्णय लेनिननं घेतला प्रारंभी लेनिननं आणि पुढे स्तालिननं 'प्राणपणानं' (म्हणजे वेळप्रसंगी इतरांचे प्राण घेऊनही) आपले निर्णय लागू केले! काहीही असो, लेनिन-स्तालिननं मिळून पिढ्यानि्पढ्या निरक्षर राहिलेल्या (जवळ जवळ) साऱ्या सोविएत जनतेला रूसी लिपीत साक्षर करून सोडलं! (आपल्या शंभर टक्के जनतेला साक्षर करू इच्छिणाऱ्या नेत्यांनी लेनिन-स्तालिननं काय केलं, कसं केलं, त्यासाठी त्यांना काय काय करावं लागतं हे लक्षात घेतलं तर आपल्या रम्य कल्पनांना ते व्यावहारिकतेची जोड देऊ शकतील, अन्यथा आपल्या देशात तरी रकाने भरण्याचा आकड्यांचा खेळ पुढच्या शतकातही चालू राहील!)

केमाल पाशा, लेनिन-स्तालिन, सुकर्ण असे काही अपवाद सोडले तर आपली वापरात असलेली लिपी टाकून देऊन पूर्णत: नवीन लिपी स्वीकारण्याचे खेळ सहसा कोणी करत नाही; कारण त्यामुळे आपल्यालाच जनतेचे तोटे होत असतात. नवीन लिपी वापरायला सुरूवात केल्यावर जुन्या लिपीतलं साहित्य एका क्षणात परकं होऊन जातं.

ह्याबाबत अगदी ताजं उदाहरण आहे ते आपल्या मलयाळम् लिपीचं. मागच्याच दशकात त्यांनी काही किरकोळ बदल केले, बदल म्हणजे विद्वानांच्या दृष्टीनं मलयाळम् लिपीतली अनियमितता त्यांनी दूर केली! (ह्रस्व) आणि दीर्घ उकारातली पारंपारिक म्हणजे अनियमित वळणं नियमित करण्यात आली.) ज्या काळात ते बदल लागू झाले तेव्हाच्या शाळकरी मुलांना जुनी (अनियमित) वळणही माहीत होती, पण पुढच्या काही वर्षातच परिस्थिती अशी आली की मुलांना फक्त नवीन (नवी, नियमित) वळणंच येत होती. त्यामुळे त्यांना गेली शेकडो वर्ष वापरत असलेली वळण वापरून जुन्या काळात छापलेली पुस्तकं वाचता

येईनाशी झाली! म्हणजे असे किरकोळ वाटणारे तथाकथित तर्कशुद्ध बदल हे प्रत्यक्ष व्यवहारात फार महाग पडतात!

देवनागरीच्या संदर्भात दोन दशकांपूर्वी दोन-चार अगदी किरकोळ(आणि चांगले) बदल झाले, त्यांना बदल म्हणण्यापेक्षा एकात्मता म्हणणं अधिक योग्य ठरेल. अ, झ, ल, क्ष आणि ज्ञ ह्या अक्षरांच्या उत्तरेतल्या आणि दक्षिणेतल्या म्हणजे मराठीतल्या वळणांमध्ये किंचित फरक होता. तो काढून टाकून मराठी –हिन्दीत एकाच वळणाची अक्षरं वापरायला सुरुवात झाली. (हिन्दीतला प्रचलित 'ल' आपण स्वीकारला तर मराठीतले अ, झ, क्ष, ज्ञ हिन्दीनं स्वीकारले) . ख हे अक्षर सर्वांनाच कधी-कधी घोटाळ्यात टाकणारं होतं. मराठी-हिन्दीत त्याचं वळण एकच होतं, पण त्याच्यातला मूलभूत दोष काढून टाकण्यासाठी त्यात किरकोळ बदल करण्यात आला, 'र' सारख्या वळणाचा भाग 'व'ला जोडून टाकण्यात आला नि 'ख' की 'र व' असा गोंधळ करणारं देवनागरीतलं एकमेव अक्षर कायमचं सुधारलं. हे सर्व बदल अतिशय किरकोळ असल्यामुळे नव्या पिढीला किंवा जुन्या पिढीला कोणतीच अडचण आली नाही.

अशा परिस्थितीत काही माणसं देवनागरीच्या 'सुधारणेसाठी'उगाचच वारंवार आरडा करीत असतात! ह्या मंडळीचा पहिला आक्षेप असतो की देवनागरी ही तीन स्तरात लिहिली जात असल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या ती त्रासदायक आहे! १९९९ मध्येही अशा तऱ्हेचे आक्षेप घेणारे सुधारक बघितले की आश्चर्य वाटतं. मुद्रणाच्या क्षेत्रात गेल्या काही वर्षात क्रांती घडली आहे, तिथे रोज नवनवीन तंत्र विकसित होऊन ग्राहकांच्या हाती पडत असतात. आपल्या देशाचा विचार केला तरी संगणकाच्या मदतीनं मुद्रण सुरु होऊन एक तप उलटलं. आता हातानं खिळे जुळवले जात नाहीत. तीन स्तर वगैरे काही भानगड राहिलेली नाही. खिळे जुळवण्याचीच गरज न राहिल्यामुळे ते सोडवण्याचाही त्रास नाही. . . पण देवनागरीच्या टीकाकारांना ह्या विकासाचा पत्ताच दिसत नाही!

अशी ही अडाणी (किंवा अतिधूर्त/खोटारडी/कांगावखोर) मंडळी देवनागरी, गुजराती, उडिया, बंगाली वगैरे लिप्यांमधली चार-दोन अक्षरं एकत्र करून तथाकथित नवीन लिपी तयार करतात. असलेली अक्षरं कोणो उभी कापतात तर कोणी आडवी चिरतात. वेलांटी, उकार वगैरे अक्षराच्या पुढे दाखवण्याचा प्रयत्न करतात, कोणी अनुस्वार पुढे दाखवतात तर कोणी अक्षराच्या पायाशी बेडीसारखा बांधतात! ह्या कोलांट्याउड्या मारून काय साधतं?

देवनागरी टंकयंत्रावर बसावी म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देवनागरीत काही बदल सुचवले होते. लोक सावरकरांच्या शब्दासाठी प्राण द्यायला तयार होते पण त्यांनी सावरकरांची लिपी स्वीकारली नाही हे ऐतिहासिक सत्य आहे! अशा परिस्थितीत कोण्या सोम्यागोम्यानं देवनागरीची मोडतोड केली तर लोक ती मोडतोड स्वीकारतील असं त्या सुधारकांना वाटतंच कसं? आणि लोकांनी तरी का स्वीकारावी? आता तर यंत्रात बसवण्याचाही प्रश्न उरलेला नाही. जेव्हा तो होता तेव्हाही लोकांनी देवनागरीची मोडतोड स्वीकारली नव्हती! केमाल पाशा, लेनिन वगैरेंनीही एखादी कृत्रिम, खोटी लिपी स्वीकारली नव्हती.

सिंड्रेलाच्या गोष्टीतली तिची सावत्र आई तो लोखंडाचा बूट आपल्या मुलींच्या पायात बसावा म्हणून धडपड करत असते त्याची आठवण होते. आपली लिपी एखाद्या उसन्या यंत्रावर बसत नसेल तर आपण आपल्या हिमतीवर नवीन यंत्र बनवायचं असतं, आपल्या लिपीचे हातपाय तोडून तिला त्या परक्या यंत्रावर बसवायच नसतं.

अनुक्रमणिका

ज्या नियतकालिकांचं मुद्रण अत्याधुनिक पद्धतीनं संगणकावरून होतं अशा नियाताकालीकांमध्ये कुडमुड्या लिपिसुधारकांचे लेख पाहून तर फारच आश्चर्य वाटतं. त्या-त्या संपादकांनी असल्या फाजील उत्साही सुधारकांना आपली यंत्रसामुग्री दाखवून(किमान) त्यांचं(तरी) प्रबोधन करावं म्हणजे असल्या सुधारकांपासून समाजाला होणारा उच्छाद तरी कमी होईल!

अनुक्रमणिका

२५
विरामचिन्हं

विरामचिन्हांखेरीज आजच्या लिखित भाषेची आपण कल्पनाच करू शकत नाही. आज अत्यावश्यक होऊन बसलेली ही (बहुतेक) विरामचिन्हं तशी खूपच अलीकडची आहेत. लिपीबध्द लेखनकला तशी किमान काही हजार वर्षांची जुनी असली (ऋग्वेदाच्या काळानंतरची) तरी ज्ञात इतिहासावरून असं दिसतं की तीचा संबंध सर्वसामान्य माणसाशी फारसा येत नव्हता! समाजातल्या फार थोड्या लोकांचीच ती मक्तेदारी होती. अर्थात सर्वसामान्यांना लेखनकलेपासून वंचित ठेवायचं असा उद्देश होता किंवा कारस्थान होतं असं मात्र म्हणता येणार नाही; पण सर्वसामान्यांना त्याची गरज पडत नव्हती हेक त्याचं मुख्य कारण असावं

लेखनासाठी आवश्यक असलेल्या साधनांमध्ये जसजसा विकास होता गेला तसतशी ती सामान्यांच्या आवाक्यात येऊ लागली नि परिणामत: लेखनकला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचू लागली आणि त्याच वेळी ती भाषाही सामान्यांच्या जवळची होऊ लागली. लिखित भाषेचं अतिबंदिस्त रूप मोकळं होऊ लागलं.

वेगळ्या माध्यमात बोलणं जतन करणं हा लेखनाचा एक महत्वाचा उद्देश असतो. जपणूक जोपर्यंत केवळ मौखिक परंपरेनंच होत होती तेव्हा त्यात अगदी किंचितही (कानामात्रेचाही) बदल होऊ नये ह्याची विलक्षण काळजी घेतली जात असे हे आपल्याला ऋग्वेदाच्या उदाहरणावरून चांगलं ठाऊक आहे. त्या काटेकोरपणामुळेच त्याचं पठण पूर्वीप्रमाणे आजही होत आहे. पण सर्वसामान्य गोष्टींसाठी वेदांच्या पद्धतीचा उपयोग करणं व्यवहाराच्या दृष्टीनं शक्य नव्हतं.

लेखनकला सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी पहिली क्रांतिकारक मदत झाली ती कागदाच्या शोधाची. त्यांनतर काही शतकांनी मुद्रणकलेचा शोध लागला ही दुसरी क्रांती आणि आता तिसरी म्हणता येईल ती कागदरहित संगणकाची! (प्रत्यक्षात मात्र चांगली प्रत काढेपर्यंत किती कागद वाया घालवले जातात ह्याचा हिशेब प्रत्येकानं स्वत:शीच केलेला बरा!)

जुन्या काळातल्या लेखनात, केवळ आपल्याकडच्या संस्कृतच्या पोथ्यांमध्येच नाही तर जगात इतरत्र झालेल्या लेखनातही एकच विरामचिन्ह वापरलेलं दिसतं, ते म्हणजे पूर्णविराम. ह्या पूर्णविरामासाठी कुठे बिंदु (.) वापरला जात असे तर आपल्या परंपरेत दंड म्हणजे एक उभी रेघ (!) वापरली जात असे.

'दंडाखेरीज इतर विरामचिन्हांची गरजच नाही !' अशी भूमिका घेणारे संस्कृतचे अनेक अभ्यासक होते, आजही आहेत. त्यांचा युक्तिवाद असा असायच की संस्कृत भाषेची रचना इतकी शास्त्रीय आहे की आम्हाला तुमच्या (?) त्या खाणाखुणांची गरजच नाही! 'किम्' असं अव्यय आलं की तो प्रश्न आहे हे त्या रचनेवरुनच आम्हांला कळतं, मग तुमच्या त्या प्रश्नचिन्हाची (?) गरजच काय? आमच्याकडे इंग्लिशमधल्या डायरेक्ट नि इन-डायरेक्टची भानगडच नाही, मग आम्हांला हवं कशाला अवतरण चिन्ह ('-') ? आमच्या भाषेचं व्याकरणच बोलकं आहे, त्याला नाही लागत मुक्यांसारख्या खाणाखुणा! (वैदिक भाषेत-ऋग्वेदात असं दिसतं की जिथे संयुक्त वाक्य (काम्पाउन्ड सेन्टेन्स्) असतं तिथे मुख्य क्रियापद

कोणतं असा प्रश्न पडण्याची शक्यता असते, पण तसा गोंधळ होऊ नये म्हणून तिथे मुख्य क्रियापद अनुदात्त असतं. म्हणजे शब्दांपलीकडच सांगण्याचाच प्रयत्न वैदिक कालातही केलेला आहे!)

वरवर पाहता समोरच्याला निरुत्तर करणारा युक्तिवाद आहे हा. पण मुळात लेखन म्हणजे तरी काय असतं? आपण आपल्या बोलण्याला एक वेगळं माध्यम देत असतो. त्या बोलण्यातल्या केवळ शब्दरूप आशयाचा विचार केला तर संस्कृतातली किंवा इतर भाषांमधली लेखनाची प्राचीन पद्धत ठीक होती असं म्हणता येईल, पण त्यातल्या शब्दांच्या पलीकडे असलेल्या आशयाला पूरक अशा आणखी काही गोष्टी जर आपल्याला सहजतेनं त्यात घालता आल्या तर? त्याला दुग्धशर्करायोग म्हणता येणार नाही का?

आपण जेव्हा एखादं विधान वाक्य उच्चारतो/ वाचतो तेव्हा आपला आवाज हळूहळू खाली येतो. ‘तो काल गावाहून परत आला.’ असं म्हणताना ‘आला’ पाशी आपला आवाज खाली येतो नि आपण थांबतो. ते थांबणं वाचकाला व्यवस्थित कळावं म्हणून एक मोठी ठसठशीत उभी रेघ/दंड देण्याची आपल्याकडे पध्दत होती, पुढे इंग्लिशच्या अनुकरणातून आपण एक छोटं भरीव टिंब द्यायला लागलो, तोच आजचा पूर्णविराम. पूर्णविरामाच्या जोडीनं आपण छोटासा, अल्पसा विराम द्यायलाही शिकलो, तोच हिन्दीतला अल्पविराम नि मराठीतला स्वल्पविराम(,).

‘किम्’वरून प्रश्नार्थक रचना आहे हे कळतं. पण बोलताना आपण जेव्हा प्रश्न विचारतो तेव्हा आपल्या आवाजातल्या चढउताराचा प्रकार वेगळा असतो, त्याला आपण सूरयोजना (इन्टोनेशन) म्हणतो. जर त्या सूरयोजनेची कल्पना आपण वाचकाला देऊ शकलो तर त्यात वाईट काय आहे? त्यासाठी जर आपण एक चिन्ह वापरलं तर वाचकाची मोठी सोय होते. ह्याच कल्पनेतून प्रश्नचिन्ह जन्माला आलं.

प्रश्नार्थक रचनेच्या संदर्भात स्पॅनिश भाषिक एक पाऊल इतरांच्या पुढे गेले. त्यांनी प्रश्नाचा मूलभूत विचार केला तेव्हा त्यांना जाणवलं की प्रश्न पूर्ण झाल्यावर वाचकाला प्रश्नाचिन्ह दिसतं, मग ते दिसल्यावर त्यानं आपला आवाज एकदम वर न्यायचा का? आपण जेव्हा एखादं विधान करतो तेव्हा तो नक्की प्रश्नच आहे हे स्पष्ट होत नाही, उदा. ‘तो काल गावाहून आला?’ असा ‘का’ शिवायही प्रश्न असतो. अशा वेळी वाचकाची मोठी पंचाईत होते, ती टाळण्यासाठी स्पॅनिश लेखनात प्रश्न सुरू होण्यापूर्वीही एक उलटं प्रश्नचिन्ह दिलं जातं! ‘¿ तो काल गावाहून आला का?’ अशा प्रकारे! प्रश्नाची सूररचना (इन्टोनेशन) योग्य होण्यासाठी ह्या सुरुवातीच्या प्रश्नचिन्हाची फार मदत होते. तो प्रश्न आहे हे सुरुवातीलाच कळल्यामुळे आवाज आपोआप किंचित उंच जाईल आणि प्रश्नाचं वाचन अधिक चांगलं, परिणामकारक होईल.

संस्कृत किंवा आधुनिक भारतीय भाषामध्ये इंग्लिश-जर्मन प्रमाणे डायरेक्ट-इन्डायरेक्ट स्पीच हा प्रकार नाही. तो म्हणाला की असं म्हणून पुढे आपण मूळ वाक्यच उद्धृत करतो. तत्त्वत: बघितलं तर अवतरण चिन्हाची गरज नाही पण जर ती चिन्हं उधृत वाक्याच्या सुरुवातीला नि शेवटी वापरली तर ते वाक्य दुसऱ्या कोणाचं तरी आहे, मोठ्यानं वाचायचं असेल तर चांगला वाचक ते वेगळ्या पद्धतीनं वाचेल/वाचू शकेल. सहजपणे, चार-दोन बारक्या खुणा वापरल्यानं लेखन जर बोलण्याच्या जवळ जाणार असेल तर त्याला विरोध का असावा?

अनुक्रमणिका

स्वराचा दीर्घ उच्चार दाखवण्यासाठी संस्कृत भाषेत अवग्रह (ऽ) चिन्हाचा उपयोग करतात. मराठी लेखनातही आपण ह्या चिन्हाचा उपयोग दीर्घत्व दाखवण्यासाठी, लांबलेला आवाज दाखवण्यासाठी, बोलण्यातला हेल दाखवण्यासाठी खूपदा करतो. पण हे फार महत्त्वाचं चिन्ह आहे, युरोपीय भाषांच्या लेखनात अशा प्रकारचं एकही चिन्ह नाही हा भागही गमतीचा आहे.

अवतरण चिन्ह देताना जर्मन भाषेत सुरुवातीच चिन्ह खाली देतात नि शेवटचं वरती देतात; तर फ्रेंच भाषेत अत्यंत सहजतेनं लक्षात येतील अशा (एक किंवा दोन) खुणा वापरून ती दाखवतात, उदा० तो म्हणाला << मी उद्या येणार नाही. >>

इंग्लिशच्या तुलनेनं जर्मन लेखनात उद्गारवाचक चिन्हाचा वापर कितीतरी अधिक प्रमाणात आणि योग्य प्रकारे केला जातो की ज्यामुळे मजकुराचा भाव अधिक चांगल्या प्रकारे वाचकापर्यंत पोहचू शकतो, मराठीनं अशा चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत.

जर्मन भाषेत प्रश्नचिन्ह आणि उद्गारचिन्ह यांचा फार सुरेख, एकत्रिक उपयोग केला जातो. ('त्याला काही सांगून उपयोग आहे का!'-कशाला सांगायचं? काही उपयोग नाही! हा सगळा अर्थ ह्यातून व्यक्त होतो.) अशा अनेक चांगल्या गोष्टी मराठीनं आत्मसात करायला हरकत नाही, कराव्यात.

संगणकावरच्या आदानप्रदानात (वेबसर्फिंगमध्ये) अलीकडे बरीच नवनवीन चिन्हं आली आहेत; पण ती चिन्हं म्हणजे शब्दांचे पर्याय आहेत. मजकुरातल्या शब्दांपलीकडचं किंवा इंग्लिशमध्ये ज्याला बिट्वीन द लाईन्स म्हणतात असं, बरंच काही सांगण्याचं सामर्थ्य विरामचिन्हांमध्ये आवश्यक असतं. आपण त्यांचा योग्य वापर केला पाहिजे. कोणी प्रतिभावंत उद्या काही नवी विरामचिन्हं शोधून काढीलही!

२६
जीए सिन्ध!

आपल्या बोलीचा भाषा म्हणून घटनेत समावेश व्हावा ह्यासाठी अनेक गट धडपडत असतात, आपापलं राजकीय वजन वाढवून कालांतरानं आपल्या बोलीला भाषेचं स्थान(?) मिळवून देण्यात असे गट यशस्वीही होत असतात. भारतीय संविधान लागू झाल्यानंतर गेल्या काही दशकात अनेक 'नव्या' भाषांना घटनेत स्थान मिळालेलं आहे (क्वचित पुढच्या दारानं नाहीतर मागच्या दारानं. अधिक माहितीसाठी राजकारण्यांच्या प्रांतोप्रांती विस्तारलेल्या सांस्कृतिक संस्थांशी आतून संपर्क साधावा!) . अशा नव्या यादीत सनदशीरपणे सर्वप्रथम समाविष्ट करण्यात आलेली भाषा म्हणजे सिन्धी. सिन्धीला इतर भारतीय भाषां प्रमाणेच बरोबरीचं स्थान देण्यात येणार हे फाळणीच्या काळातच निश्चित झालेलं होतं कारण सिन्धी भाषेचं संपूर्ण क्षेत्र आपल्या दुरावलेल्या तुकड्यात घालण्यात आलं होतं आणि तिथले जवळ-जवळ सगळे शहरवासी हिन्दु-सिन्धी आपली शतकानुशतकांची मायभूमी सोडून देशोधाडीला लागले होते, बहुसंख्य हिन्दु-सिन्धी भारतात आले होते. त्यांच्यासाठी वेगळा प्रदेश, वेगळं राज्य तयार करणं शक्य नव्हतं तरी पण त्यांच्या भाषेला तरी भारतात स्थान देणं अत्यंत आवश्यक होतं. सिन्धी भाषिकांना दिलेलं आश्वासन आपल्या नेत्यांनी प्रामाणिकपणानं पाळलंही!

सिन्धीला भारताच्या घटनेत स्थान मिळालं तरी तिचं खरं स्थान मात्र हिरावलं गेलं होतं, तिच्या (सु) पुत्रांनी ते घालवलं की काय अशी शंका येण्यासारखी परिस्थिती आज निश्चितच निर्माण झाली आहे. आपली मातृभाषा सिन्धी आहे असं सांगणारी सुमारे अर्धा कोटी माणसं आज भारतात आहेत; परंतु प्रत्यक्षात त्या भाषेच्या वापराबाबत जी स्थिती आहे ती बघता सिन्धी भाषिकांनीच तिचा त्याग करायचा घाट घातला आहे की काय अशी शंका येते कारण भाषेचे किंवा संस्कृतीचे मारेकरी कधीच परदेशी नसतात; ते नेहमी स्वकीयच असतात. सिन्धीनं आपली मूळची लिपी गमावली तो इतिहास गंमतशीर आहे-

गोऱ्या साहेबानं इ. स. १८५३ मध्ये सिन्ध प्रांतात अरबी लिपी सक्तीची केली तोपर्यंत सिन्धी भाषेसाठी सिन्ध प्रांतात एक-दोन नव्हे तर चार लिप्यांचा वापर होत होता! परंपरेनं चालत आलेली देवनागरी, मुसलमानी आक्रमणामुळे जे बाटले होते त्यांनी अरबी लिपीचा उपयोग सुरू केलेला होता पण त्यात गंमत अशी की बहुसंख्य मुसलमान सिन्धी निरक्षरच होते! गुरू नानकाचे काही भक्त सिन्धमध्येही होते, ते आपल्या सिन्धी भाषेसाठी गुरुमुखी लिपीचा उपयोग करीत असत. (गुरू नानकाचे भक्त फक्त पंजाबीच असतात असा आपला एक ठाम समज असतो!) ह्या तीन लिप्यांच्या जोडीनं आणखी एक लिपी वापरात होती ती म्हणजे हटवणकाई. (हुषार) सिन्धी व्यापारी आपले हिशेब वगैरे ठेवण्यासाठी हटवणकाई लिपीचा उपयोग करीत असतं. ही हटवणकाई (हट म्हणजे बाजार, बाजारात मुख्यतः व्यापाऱ्यांकडून वापरली जाणारी लिपी) आपल्याकडच्या मोडी लिपीसारखी होती, देवनागरीच्या तुलनेनं भराभर लिहिता येण्यासारखी.

खरं तर सिन्धी भाषेसाठी आणखी एक लिपी वापरली जात होती आणि आजही ती वापरात आहे, ती म्हणजे गुजराती. कच्छी ही सिन्धीचीच बोली आहे; पण ती बोलणारी जनता मुख्यत: कच्छमध्ये म्हणजे गुजरात राज्यात आहे नि फार पूर्वीपासून कच्छीसाठी गुजराती लिपीचाच उपयोग केला जात आहे. म्हणजे सिन्धीसाठी सिन्धमध्ये चार लिप्या होत्या नि सिन्धी भाषेसाठी भारतात एकूण पाच लिप्या होत्या!

अनुक्रमणिका

इंग्रजांनी सिन्ध प्रांत ताब्यात घेतल्यावर त्यांनी सर्वप्रथम आपल्या पद्धतीच्या शाळा सुरू केल्या. सिन्धी भाषिकांच्या नेत्यांना एकत्र बोलावून सांगितलं की तुम्ही लिप्यांचा गोंधळ मिटवून टाका. ह्या पुढे सिन्धी भाषेसाठी एकाच लिपी वापरली जाईल मग ती देवनागरी वापरायची की अरबी लिपी वापरायची हे तुम्ही ठरवा लिपीप्रश्नासाठी इंग्रजांनी एक समिती स्थापन केली. त्या समितीत चार हिन्दू होते नि चार मुसलमान.

त्या काळातली सिन्धची सामाजिक परिस्थिती अशी होती की ग्रामीण भागातले बहुसंख्य जमीनदार हिन्दू होते नि शहरातले व्यापारीही मुख्यत: हिन्दू होते. मुसलमानी काळातला कारभार फारसी भाषेत चालायचा; पण तो करणारे बहुसंख्य कारभारी हिन्दूच होते. सिन्धमधली बहुसंख्य जनता मुसलमान होती नि गरीब होती, अशिक्षित होती. अशा परिस्थितीत लिपीबाबत निर्णय घ्यायची वेळ आली तेव्हा समितीनं बहुमतानं(सहा विरूद्ध दोन मतांनी) निर्णय घेतला की सिन्धी भाषेसाठी अरबी लिपी वापरण्यात यावी!

सिन्धीसाठी फक्त अरबी लिपी वापरण्याचा कायदा इंग्रजांनी केला हे खरं; पण तो निर्णय इंग्रजांनी लादला असं म्हणता येणार नाही किंवा मुसलमानांच्या धर्मवेडामुळे किंवा अरबीच्या प्रेमामुळे घेतला गेला असंही नाही हे ऐतिहासिक सत्य आहे.

अरबी लिपी वापरण्याचा निर्णय झाल्यावर मात्र इंग्रजांनी मोठया कठोरपणानं त्याची अंमलबजावणी केली नि सिन्ध प्रांतातल्या इतर लिप्यांचं अस्तित्त्व संपलं.

१९४७ च्या फाळणीनंतर शहरी हिन्दु-सिन्धी भारतात आले. त्यांनी मुख्यत: अगदी शेजारच्या राजस्थान, गुजरात ह्या राज्यात त्याचप्रमाणे महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि दिल्ली ह्या भागात आश्रय घेतला. भारतात आल्यावर सिन्धी लोकांच्या सिन्धी माध्यमाच्या शाळाही ताबडतोबच सुरु झाल्या; कारण निर्वासितांच्या लोंढ्यामध्ये शाळकरी मुलं होती त्याचप्रमाणे शिक्षकही होते. महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान भागांत सिन्धी माध्यमाच्या शाळा सुरु झाल्या.

सर्व भाषांसाठी एकच लिपी असावी नि ती देवनागरीच असावी असा एक मतप्रवाह पूर्वीपासून आहेच. त्यानी जरा उचल खाल्ली नि सिन्धी पुढाऱ्यांनीही त्याला होकार दिला. सिन्धीसाठी देवनागरी वापरण्याचा निर्णय झाला. विचारी सिन्धी जनांचं म्हणणं योग्य असलं तरी सिन्धीचा प्रश्न तसा अनुत्तरीतच राहिला तसा विचार केला तर अगदी अलीकडच्या काळातच (म्हणजे इ. स. १८५३ मध्ये) लादलेली अरबी लिपी टाकून देऊन संस्कृत, हिन्दी, मराठी, नेपाली, डोग्री अशा अनेक भाषांसाठी वापरली जाणारी देवनागरी लिपी पुन: एकदा सिन्धीसाठी वापरायचं ठरलं, ह्यात चूक ते काय होतं?महाराष्ट्रात तर नागरी सिन्धीत सर्व विषयांची पाठ्यपुस्तकंही तयार करण्यात आली. नव्या पिढीला सहज येणारी, देशाच्या मुख्य प्रवाहाची आणि संपूर्ण भारताचीच अस्मिता असलेली देवनागरी लिपी सिन्धीनं पुन: एकदा वापरायची असं ठरलं आणि मग सिन्धी समाजाच्या अनेक विचारवंतांना अरबी लिपीबद्दल प्रेम वाटू लागलं, इतकं की महाराष्ट्र राज्याच्या सिन्धी अकादेमीत नागरी लिपीत लिहिलेल्या सिन्धीला सिन्धीच न म्हणण्यापर्यंत वेळ आली.

देवनागरीतली सिन्धी शिकण्यापेक्षा हिन्दी शिकलेली काय वाईट अशा कल्पनेनं सिन्धी माध्यमाच्या अनेक शाळा हिन्दी माध्यमाच्या शाळा बनल्या. राजस्थानात तर अक्षरश: एका रात्रीत हे बदल घडले!

अनुक्रमणिका

रातोरात घडलेल्या ह्या बदलांचा परिणाम एवढाच झाला की नागरी आणि अरबी असे दोन तट पडले नि मुख्य प्रश्नापेक्षा तटांना, गटांना नि त्यांच्या नेत्यांनाच अधिक महत्त्व येऊ लागलं. थोडक्यात म्हणजे लिपिचं राजकारण झालं.

ह्या सगळ्या गोंधळाचा एक अटळ परिणाम असा झाला की सर्वसामान्य सिन्धी माणसानं माध्यम म्हणून इंग्लिशला जवळ केलं (लोकांना तेवढंच एक निमित्त मिळालं) आणि तो नागरी आणि अरबी अशा दोन्ही लिप्यांपासून आणि परिणामतः आपल्या स्वतःच्याच भाषेपासून दूर-दूर जात राहिला. . .

गेल्या काही दिवसांत मात्र भारतातल्या सिन्धी समाजात एक आश्चर्यकारक बदल होऊ लागला आहे असं वाटतं. माझ्या एका (व्यापारी न होता चुकून शिक्षक झालेल्या) सिन्धी मित्रानं त्याचं विश्लेषण करताना सांगितलं की मुक्तव्यापार वगैरे चालू झाल्यापासून बरेच सिन्धी अरबी- सिन्धी लिहा-वाचायला शिकू लागले आहेत. ही मंडळी आपले सारे हिशेब आणि अन्य व्यवहार अरबी सिन्धीत ठेवायचा प्रयत्न करू लागले आहेत. त्याच्याकडून हे ऐकून आणि प्रत्यक्ष बघून मलाही विलक्षण आश्चर्य वाटलं आणि कारण कळल्यावर तर व्यापारी वृत्तीच्या सिन्धी समाजाचं अतिशय कौतुक वाटलं! आपल्या सिन्धी अस्मितेचं संरक्षण-संवर्धन आणि आपल्या व्यवसायातली गुप्तता-स्वार्थ आणि परमार्थ साधण्याचा नामी उपाय! (आयकर विभागातल्या अधिकाऱ्यांना सिन्धी व्यापाऱ्यांचे खरे व्यवहार कळावेत म्हणून आपल्या कर्मचाऱ्यां ना सिन्धी शिकण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या काही योजना येणार आहेत की काय हे कळलेलं नाही!) कशानं का होईना पण लोक लिहिण्या-वाचण्याचा प्रयत्न करू लागले आहेत हेही नसे थोडके!

सिन्धमध्येही आता विचारवंतांना जाणीव झालेली आहे की १८५३ पूर्वीचं सिन्धीतलं खूपसं साहित्य-हस्तलिखितं देवनागरीत आहेत, आपण मुसलमान झालो असलो म्हणून काय झालं? आपण देवनागरीही शिकायला पाहिजे म्हणजे आपल्याला ते साहित्यही वाचता येईल. हे सामंजस्य वाढण्यासाठी भारतीय उपखंडातल्या सिन्धी जनांनी प्रयत्न केल्यास लिपीमुळे तयार झालेली दरी दूर व्हायला नक्कीच मदत होईल.

कच्छी ही सिन्धीची एक बोली आहे. कच्छी- भाषिक मुख्यतः गुजरातमध्ये राहत असल्यामुळे त्यांनी आपल्या भाषेसाठी स्वाभाविकपणे गुजराती लिपीचा उपयोग फार पूर्वीपासूनच केलेला आहे मग हिन्दी-मराठी भाषिक प्रदेशात नव्यानं आलेल्या सिन्धी-भाषिकांना आता स्थानिक लिपिचं वावडं का असावं? सिन्धी समाजातल्या बुद्धिवाद्यांनी अरबी सिन्धीला कवटाळून राहण्याचा दुराग्रह सोडला आणि खऱ्या अर्थानं देवनागरीचा स्वीकार केला तर त्यांच्याच तरुण पिढीला त्याचा लाभ मिळेल. ह्या प्रश्नात अर्थात सरकारनं कुठल्याही प्रकारे हस्तक्षेप करू नये, कोणताही निर्णय घेऊ नये. लिपीचा निर्णय सिन्धी समाजानं घ्यायचा आहे, त्यांनी निर्णय घेताना इतिहासकाळात घडलेल्या चुका पुनः करू नयेत एवढीच अपेक्षा.

अनुक्रमणिका

२७

कश्मीरी-न घरकी न घाटकी

सिन्धीला एक भारतीय भाषा म्हणून मान्यता आहे पण भारतात तिला स्वतःचा वेगळा प्रांत राहिला नाही, तर कश्मीरी भाषेची व्यथा वेगळीच आहे. तिला एक भारतीय भाषा म्हणून पहिल्यापासून मान्यता आहे, कश्मीरी भाषा बोलणाऱ्यांचा एक प्रांतही आहे पण खुद्द तिच्या प्रांतात म्हणजे तिला (राज) मान्यता नाही. आहे ना गंमत?

कश्मीरी ही एक भाषा आहे, खरी भाषा आहे. इन्डो-युरोपियन परिवारातल्या उत्तर-वायव्येकडच्या दर्द शाखेची भारतातली ती एकमेव भाषा म्हणून तिचं महत्त्व आहे. शेजारच्या अफगाणिस्तानात तिची सख्खी बहीण पुश्तू (कशीबशी) नांदते आहे. (तीही बिचारी सध्या अतिरेक्यांच्याच तडाख्यात सापडलेली आहे!) कश्मीर हा तिचा स्वतःचा, हक्काचा प्रांत आहे; मग अडचण कुठे आली असा प्रश्न कोणाच्याही मनात येणार हे स्वाभाविकच आहे, 'असुनि खास मालक घरचा –'अशी स्थिती आहे कश्मीरीची. आणि कश्मीरीचं दुःख इथूनच सुरु होतं.

भारतातल्या काही भागात असं दिसतं की धर्मातरानंतर 'भाषांतर' ही झालं. कुठे ते सक्तीनं झालं तर कुठे ते लोकांनी आपणाहून केलं! कश्मीरमध्ये धर्मांतरचा वरवंटाच फिरला होता. धर्म बदललेल्यांनी तथाकथित उर्दू हिच आपली 'भाषा' म्हणून स्वीकारली! धर्मांतर न केलेल्यांपेक्षा आपण वेगळे आहोत हे त्यांना प्रकर्षानं दाखवायचं होतं, परक्या राज्यकर्त्यांशी जवळीक साधायची होती. आपली प्रतिमा घडवण्याचा हा सोपा उपाय होता. बघता-बघता धर्मांतरितांनी कश्मीरी सोडली. कश्मीरी ही आता केवळ अल्पसंख्य हिंदूंची नि अशिक्षित, अडाणी मुसलमानांची भाषा राहिली होती.

१९४७ मध्ये कश्मीरमध्ये नवं पर्व सुरु झालं, अनेक राजकीय उलथापालथी झाल्या पण भाषिक क्षेत्रात वेगळं, चांगलं असं काहीही घडलं नाही. कागदोपत्री प्रत्येकजण आपली भाषा उर्दू असल्याचं नोंदवत असला तरी तिथल्या सामान्य माणसाची भाषा कश्मीरीच होती/आहे आणि तरीही कश्मीरची भाषा उर्दूच राहिली. शाळेत माध्यम म्हणून फक्त तिलाच स्थान होतं. राज्यकारभारात उर्दूलाच मान्यता होती. सामान्य नागरिकांसाठी असलेल्या ठीकठिकाणच्या पाट्या, सूचना, घोषणा इत्यादी केवळ उर्दूतूनच होत राहिल्या. सार्वजनिक सभांमधून स्थानिक नेते उर्दूतूनच भाषणं ठोकतात. थोडक्यात म्हणजे लोकांचा, सामान्य जनतेचा कसलाही विचार न होता उर्दूला राजभाषेचं स्थान मिळत राहिलं आणि कश्मीरी ही बहुसंख्याकांची भाषा असूनही केवळ अल्पसंख्य हिंदूंची भाषा होऊन राहिली. अशा स्थितीत बिचाऱ्या भाषेचा विकास तरी काय होणार नि कसा होणार?

एक भारतीय भाषा म्हणून कश्मीरीत प्रकाशित होणाऱ्या पाच-दहा पुस्तकांतल्या दोन-तीन पुस्तकांना पारितोषिकं देण्याचं घटनात्मक कर्तव्य साहित्य अकादेमीसारख्या संस्था पार पाडत होत्या, पण भाषेचा विकास असल्या बक्षिसांनी किंवा कागदोपत्री असलेल्या राजमान्यतेनं होत नसतो, तिला हवा असतो लोकाश्रय, राजाश्रय आणि लोकमानसातली प्रतिष्ठा. कश्मिरीला ह्यातलं काहीच लाभलं नाही. वर्ष जात होती.

अनुक्रमणिका

१९४७ नंतरचं आणखी एक भयंकर पर्व कश्मीरमध्ये सुरु झालं नि आपली भाषा कश्मीरी आहे असं सांगणारी उरली-सुरली हिंदू मंडळी नि अनेक मुसलमान दहशतीमुळे झेलमच्या खोऱ्यातून बाहेर पडली. आपल्याच देशात हद्दपार झाली आणि निर्वासित म्हणून कुठेकुठे राहू लागली. कश्मीर कश्मीरींसाठी, कश्मीरियत वगैरे कल्पनांना जोर चढत असताना लक्षात आलं की स्वतंत्र कश्मीरची मागणी जोरदार असली तरी कश्मीरचा आत्मा म्हणजे तिथली कश्मीरी भाषा कुठे गेली? आता?

मधल्या काळात इथेही इंग्लिशचं स्तोम माजलेलं होतं. तरुण पिढी इंग्लिश-भाषी झालेली होती, कश्मीरी भाषा म्हणजे अडाणी माणसांशी, नोकराचाकरांशी बोलायची भाषा असा 'समज' नव्या पिढीत 'विकसित' झालेली होता. कश्मीरी भाषेत चार ओळी लिहू शकणारी तरुण माणसं दुर्मिळ झाली. . . आणि आता तिथल्या लोकांना वाटू लागलं आहे की कश्मीरीसाठी काहीतरी करायला पाहिजे!

मुळात त्या कश्मीरीचा जीव तो केवढा! त्यांत १९४७ मध्ये तिच्या भाषिकांची क्रूर फाळणी झाली. नंतर १९९० मध्ये अनेकांची हकालपट्टी झाली. पाकिस्तानी, अफगाणी, पश्चिम आशियायीच नव्हे तर आफ्रिकेतल्या नि युरोपातल्या बोस्निया, कोसोवो, चेचनिया, दागिस्तान वगैरे मुस्लिम देशांतून नि प्रांतांतून आलेल्या भाडोत्री सैनिकांकडून नित्यनेमानं काश्मिरींचंही शिरकाण चालू असतं, सीमेवरती पाकिस्तान्यांकडून होणारा गोळीबार नि तोफांचा भडिमार चालूच आहे; पण अजूनही वेळ गेलेली नाही. योग्य पावलं उचलली तर ती अजूनही वाचेल, सुधारेल, वाढेल. तिचे सख्खे, जवळ राहिलेले नि दुरावलेले (सु) पुत्र काय करतात ते आता बघायचं.

अनुक्रमणिका

२८
पूर्वांचलातल्या भाषिक समस्या

२० आक्टोंबर, १९६२. 'नेफा'नावानं त्या काळात ओळखल्या जाणाऱ्या आजच्या अरुणाचल प्रदेशात आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून चिनी सेना भारतात घुसली नि त्यांनी सीमेवरच्या आपल्या सातव्या ब्रिगेडची दाणादाण उडवून दिली. त्यानंतरचं युध्द, आपली पीछेहाट नि परिणामत: झालेला दारुण पराभव वगैरे भाग आपल्याला ठाऊक आहेच. . . तो दिवस आपण 'एकात्मता दिवस' म्हणून साजरा करतो; पण इतर दिवसांप्रमाणेच त्याचं महत्व समजून न घेता!

आपल्या सीमेत घुसून आलेल्या चिन्यांना हिन्दी येत होतं; पण चीनी भाषा येणारा आपला एकही माणूस त्या सीमेवर नव्हता! ह्या हलगर्जीपणाबद्दल त्या काळात खूप ओरड झाली. पण चिनीच काय, असम भागातल्या इतर भाषा जाणणारी मंडळीही आपल्याकडे नव्हती!

साऱ्या ईशान्य भारताला आपण सामान्यात: असम म्हणून ओळखायचो पण आज राजकीय दृष्ट्या ह्या भागात एक-दोन नव्हे चांगली सात राज्यं आहेत. अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपुर, मिझोरम, त्रिपुरा, मेघालय आणि ह्या सगळ्यांच्या केंद्रस्थानी असम.

ब्रम्हपुत्राच्या ह्या लाडक्या प्रदेशाला निसर्गानं खुश होऊन अनंतहस्ते भरभरून दिलं! जमीन तर इतकी सुपीक की कुंपणाच्या काठीलासुध्दा पालवी फुटते! वनश्रीत नि प्राणीसृष्टीतच विविधता आहे असं नाही तर माणसांमध्ये विलक्षण विविधता आहे, इतकी की पाहणाऱ्याला नव्हे तर तिथे राहणाऱ्यालाही गोंधळून जायला व्हावं!

इथल्या मूळच्या गोंधळात भर टाकली ती परदेशी लोकांनी, इंग्रजी अमदानीत असम म्हणजे गोऱ्या लोकांसाठी राखलेलं खास कुरण होतं. त्याचा गैरफायदा घेऊन स्थानिक लोकांना भल्याबुऱ्या मार्गांनी फितवून, मूळच्या प्रश्नांना फाटे फोडून, ते अधिकाधिक गंभीर करण्याचे उद्योगच त्यांनी गेली अनेक दशकं ह्या भागात केले. भाषेच्या क्षेत्रात त्यांनी घातलेले गोंधळ इतके भयंकर आहेत की तसले उद्योग त्यांनी एखाद्या खिश्चन किंवा मुस्लिम देशात घातले असते तर? स्थानिक जनतेचा केवळ धर्मच त्यांनी बदलला असं नाही तर त्यांची लिपी आणि त्यानंतर भाषा बदलण्याचे उद्योग पैशाचा, सत्तेचा आणि प्रसंगी शक्तीचा/घातक शस्त्रास्त्रांचा उपयोग करून चालू ठेवले. स्थानिक जनतेनं आपला धर्म, लिपी, भाषा स्वखुशीनं सोडून खिश्चन धर्माचा, रोमन लिपीचा आणि इंग्लिश भाषेचा अंगीकार केला असं खोट चित्र सातत्यानं उभं केलं गेलं पण ते सर्वथा खोटं आहे. ह्या सर्व गोष्टीना विरोध झालाही पण तो कठोरपणानं/क्रूरपणानं मोडून काढण्यात आला. बरं, ह्यातून किमान भाषिक एकात्मता साधली का? नागालँड, मिझोराम राज्यात इंग्लिश ही राज्यभाषा झाली म्हणून ती सर्वांना येते का? ती सर्वांना येते म्हणून राज्यभाषा केली असं नाही तर ती काहींच्या सोयीची आहे, तिच्यामुळे सामान्यांना दूर ठेवता येतं म्हणून ती राज्यभाषा आहे. ('म्हंजी आपल्याकडं हाय तसंच की राव! मग कशापाइ ही लांबड?)

असम हे जोपर्यंत एक मोठं राज्य होतं तोपर्यंत ईशान्येत असामी, बंगाली नि मणिपुरी (मणिपुर पहिल्यापासूनच स्वतंत्र राज्य आहे) ह्या तीन भारतीय भाषांचं प्राबल्य होतं. सर्व भागातल्या लोकांना ह्यातली एखादी भाषा येत होती नि त्यांची कामं होत होती. पण(अति) प्रादेशिकतेला वाव मिळाला नि

बघता-बघता त्याचे तुकडे झाले नि पूर्वी कधी नाही इतकी भाषिक अस्मिता/हेकटपणा वाढीला लागला. असम, त्रिपुरा आणि मणिपूरचा सपाट/पठारी प्रदेश सोडला तर ईशान्य भारताचा सारा भाग डोंगराळ आहे नि तिथे राहणाऱ्या छोट्या-छोट्या टोळ्यांना आपण भले नागा किंवा कुकी असं काही म्हणत असलो तरी त्या टोळ्या एक नसतात. एक नागा म्हटलं तरी आओ, अंगामी, तांखूल असे त्यांचे कितीतरी प्रकार असतात नि त्या प्रत्येकाची भाषा वेगळी!

सारे बोडो पूर्वी द्वैभाषिक होते; पण आता त्यांनीच असामीला परकी मानलं! बोडो भाषा देवनागरीत लिहीली जाते; पण आता तिथे मोठया संख्येनं लोक ख्रिश्चन व्हायला लागले आहेत आणि आता त्यांच्या डोक्यात शिरलं आहे की बोडो भाषेसाठी रोमन हीच उत्तम लिपी आहे! आज त्यांच रोमन लिपीसाठी नि बोडोलँडसाठी आंदोलन चालू आहे. उद्या ते आंदोलन केव्हाही स्वतंत्र राष्ट्राची मागणी करणारं होऊ शकतं! भाषांतर म्हणजे राष्ट्रांतर हे पूर्वांचलाच्या बाबतीत सातत्यानं दिसत असूनही ते थांबण्यासाठी कसलेही प्रयत्न होत नाहीत. . .

ईशान्य भारताच्या डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या छोट्या-मोठ्या टोळ्यांना आपापसात भाषिक व्यवहार करण्यासाठी उपयुक्त ठरू शकणारी खरं तर एकमेव भाषा आहे, ती म्हणजे हिन्दी.

१९६२ च्या भारत-चीन युद्धाच्या नंतरच्या काळात आपल्या सैनिकांमुळे अरुणाचल प्रदेशात हिन्दीचा चांगला प्रसार झालेला आहे. हिन्दीच्या प्रसारामुळे काय फायदे होतात ते स्थानिक लोकांनाही कळले आहेत. पण आपल्या सैनिकांनी जे कार्य सहजतेनं केलं ते आपले नेते अद्याप करू शकलेले नाहीत. भावनात्मक ऐक्याची हाक (फक्त) राष्ट्रीय दिनी ते देत आहेत. अरुणाचल प्रदेशात संपर्क भाषा म्हणून हिन्दीनं मूळ धरलेलं आहे. मणिपुरमध्ये संपर्क भाषा म्हणून मणिपुरी आहेच, आता तिला घटनेनंही मान्यता दिल्यामुळे अधिक प्रतिष्ठा मिळाली आहे, पण एकूण देशाच्या दृष्टीनं ह्या क्षेत्राला मुख्य प्रवाहात आणण्या साठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे.

पूर्वी प्रोफेसर महाले मणिपूर विद्यापीठाचे कुलगुरू असताना त्यांनी अनेक कार्यक्रमांद्वारे मणिपुरीं ना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचं महत्त्वाचं कार्य सुरु केलं, पण त्यांच्या पश्चात ते ढेपाळलं. अशा कामां चं आणि कल्पक माणसांचं सातत्य राखण्यासाठी केंद्र सरकारनं डोळ्यात तेल घालून लक्ष देणं आवश्यक आहे. नागालँड, मिझोरम नि मेघालय ह्या राज्यांत बऱ्यापैकी भाषिक गोंधळ आहे. हिन्दीचं महत्त्व पटवण्याचं काम करण्यासाठी मिशनरी वृतीच्या बुध्दिमान नि निष्ठावान कार्यकर्त्यांची खडी फौज उभारण्याची आवश्यकता आहे! ह्या कार्याशी राष्ट्रीय एकात्मता निगडीत आहे हे लक्षात ठेवून काम करायला हवं.

त्रिपुरात बंगाली सुप्रतिष्ठित आहे (त्रास आहे तो बाङ्लादेशींचा) . असममध्ये असमी आहे पण बोडोंचं नि बाङ्लादेशींचं आव्हान दिवसरात्र शस्त्रास्त्रं घेऊन उभं आहे.

काही संस्था आपल्या इतर सामाजिक कार्याच्या जोडीनं भाषिक एकात्मता साधण्याचं, हिन्दी शिकवण्याचं आणि तिथल्या लोकांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच कार्य करीत आहेत पण एकूण गरजेच्या मानानं, तिथे कार्यरत असलेल्या राष्ट्रविरोधी/विद्रोही शक्तींच्या तुलनेनं ह्या संस्थांचं बळ फारच

अनुक्रमणिका

कमी पडतं. शिवाय सरकारी कामात लाल फीत असते तशी ह्या संस्थांच्या कामातही जाडजूड भगवी फीत असतेच!

पण आपल्यासारखी सामान्य माणसंही अशा कार्याला आपल्या परीनं थोडा हातभार लावू शकतो! आपण सर्वांनी एकदा ह्या प्रदेशाला डोळसपणानं भेट दिली तरीही एक चांगली सुरुवात होईल, बरंच काही साधेल!

अनुक्रमणिका

२९
अरबीची सुरस कथा

फार फार पूर्वीची गोष्ट. पश्चिम आशियाच्या टोकाला नोआ (Noah) नावाचा माणूस राहत होता. आपल्या मनूसारखंच ह्या नोआबाबत घडलं. महाप्रलय होऊंन जग बुडणार ह्याची त्याला कल्पना होतीच. ठरल्याप्रमाणे प्रलय झाला नि ठरल्याप्रमाणे नोआ वाचला. नंतर त्यानं पुन: एकदा ह्या पृथ्वीवर प्राणिजीवन फुलवायला सुरुवात केली, नोआच्या संसारवेलीवरही फुलं उमलू लागली होती.

ह्या नोआच्या मुलाचं नाव होतं साम. यथावकाश सामच्या कुळाचाही विस्तार होत गेला. त्याचे वंशज दूरदूर पसरले पश्चिम आशियात आणि उत्तर आफ्रिकेत; आणि ते जिथे-जिथे गेले तिथे-तिथे ते आपली मूळची सामवंशीय संस्कृती बरोबर घेऊन गेले आणि मुख्य म्हणजे आपली भाषा घेऊन गेले. नुसतेच घेऊन गेले नि यथावकाश विसरून गेले असं त्यांनी होऊ दिलं नाही. सामवंशीयांनी आपल्या भाषेसकट साऱ्या परंपरा आजही मोठया निष्ठेनं जिवंत ठेवल्या आहेत. ह्या 'साम'ला इंग्लिशमध्ये सॅम म्हणतात नि त्यावरून इंग्लिशमध्ये सेमेटिक लॅंग्वेजिस असा शब्द आला, पण मूळचा तो साम!(मात्र हे सामवंशीय म्हणजे आपले भारतातले सामवेदी नव्हेत हं! उत्साही लोकांनी घोटाळा करून घेऊ नये!)

ह्या सामवंशीय भाषांमधला हिब्रू आणि अरबी ह्या दोन भाषा कालौघातही टिकून राहिल्या आहेत एवढंच नव्हे तर त्या आजही सुस्थितीत आहेत आणि ह्याचं सारं श्रेय तिच्या चिवट, जिद्दी सुपुत्रांनाच !

हिब्रू ही अरबीची मोठी बहीण, ताई. ('ताई कसली दादा म्हणा! कारण हिब्रू भाषिकांची आमच्यावर सतत दादागिरी चालू असते-' असं एकदा एक अरब आमच्या गप्पा चालू असताना सात्त्विक संतापानं म्हणाला होता) . नंतरच्या काळात ज्यू देशोधडीला लागले नि हिब्रू भाषा बोलणाऱ्यांची पश्चिम आशियातली संख्या फारच रोडावली. अनेकांना ती मेली असंच वाटायला लागलं, पण ती जगात कुठे-कुठे जिवंत होती, ज्यूंच्या मनात सळसळत होती, म्हणूनच आजच्या इस्त्राएलमध्ये ती पुन: एकदा समर्थपणानं सर्वांच्या दैनंदिन व्यवहारांची भाषा होऊ शकली. हिब्रू समर्थ असली तरी पण खरा थाट आहे तो मात्र अरबीचाच.

इस्लामचा उदय होण्याच्या कित्येक हजार वर्षं अगोदरपासून अरबी भाषा अस्तित्त्वात होती/आहे; पण आपल्याकडे मात्र ती मुसलमानांची भाषा, इस्लाम धर्माची भाषा अशा अत्यंत संकुचित दृष्टिकोणातून तिच्याकडे बघितल्यामुळे अरबीचा अभ्यास असा फारसा कोणी करत नाही. इस्लामचे अनुयायी अरबीचा अभ्यास करतात, पण त्यांचा अभ्यास फारच मर्यादित/संकुचित, म्हणजे केवळ भाविकतेनं कुरान वाचण्यापुरताच असतो!(कारण शेवटी तेही तसे आपले भारतीयच ना! धर्मांतर झालं म्हणून काय त्यांच्या रक्तात भिनलेलं मूळचं भारतीयत्व थोडंच संपून जातं!) अरबीकडे एक भाषा, एक प्राचीन, समृद्ध भाषा म्हणून पाहण्याचा निकोप दृष्टीकोण इस्लामच्या भारतीय अनुयायांमध्ये तसा विकसित झालेला नाही ही तर अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. ही परिस्थिती सुधारण्याचा फार गरज आहे.

संस्कृत भाषेत सुमारे दोन हजार मूळ धातू आहेत, प्र-परा-अप-अनु वगैरे उपसर्ग जोडून होणारे धातू वेगळेच आणि नामधातूंची तर गणतीच नाही! संस्कृतबद्दल असे प्रशंसोद्गार(संस्कृतचा अभ्यास न करता, केवळ कुठल्यातरी ऐकीव माहितीच्या भुसभुशीत आधारावर) आपण नेहमीच मोठया अभिमानानं

काढत असतो; पण अरबीचा हळू-हळू परिचय होऊ लागला तेव्हा लक्षात आलं की अरे, ह्या भाषेत तर मूळ धातूंची संख्याच ३५०० आहे! अशा ह्या समृद्ध भाषेचा अभ्यास आपण जाणीवपूर्वक करायला हवा.

अरबीतल्या धातूंचं गंमतशीर, आश्चर्यकारक वैशिष्ट्य म्हणजे तिच्यातले ९५ टक्के धातू तीन-अक्षरी आहेत. कतब(लिहिणे) , शरिब(पिणे) , फहिम(समजणे) , तलब(मागणे) , कतल(मारणे) , नकल(नक्कल करणे) , जलस(बसणे) , अकल (खाणे) , समिअ (ऐकणे) , दरस (अभ्यास करणे) , लइब (खेळणे) वगैरे. धातूचं हे मूळ रूप आणि भूतकाळाचं तृतीय पुरुषी एकवचनी, पुल्लिंगी रूप एकच असतं म्हणजे ‘अनिल कतब.’म्हणजे अनिलनं लिहिलं. अनिल थम्सअप शरिब.’ म्हणजे अनिलनं थम्सअप् प्यायलं. सोप्प आहे न अरबी?

मूळ धातूंची संख्या साडेतीन हजार, त्यातल्या प्रत्येक धातूपासून दहा-दहा रुपं बनवण्याची शक्यता, थोडक्यात म्हणजे नवीन शब्द बनवण्याचं अरबी भाषेचं सामर्थ्य संस्कृतप्रमाणेच अफाट आहे.

‘अरबी इज अ पऽफेक्टलि सन्स्क्रत् बेस्ड् लँग्वेज्’ असं म्हणणारी बरीच मंडळी दिसतात. हा अजब (गैर) समज करून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न (?) काही ठिकाणी चालू आहे की काय अशी शंका येते! एकदा एका ठिकाणी खोदून विचारलं तेव्हा तिथल्या एका बाईंनी सांगितलं की ‘अहो, तुम्हाला माहीत नसेल म्हणून सांगते बरं का, की अरबी भाषेत संस्कृतप्रमाणे द्विवचन आहे, अगदी संस्कृतसारखं! आणि गंमत म्हणजे की नाही अरबी क्रियापदं चालतात, आय मीन कॉन्जुगेट होतात, थेट संस्कृतप्रमाणे! (नशीब ती स्वत: चालतात, नाहीतर भाषेच्या ह्या कुडमुड्या शिक्षकांनी नि धंदेवाईक संस्थाचालकांनी तिला कडेवर घेऊन तिचे काय हाल केले असते देव जाणे!) अरबी भाषेत वचनं तीन आहेत, एकवचन, द्विवचन आणि बहुवचन, एवढंच ह्यातलं सत्य आहे, बाकी तिचा संस्कृतशी काडीचाही संबंध नाही.

अरबी लोक आपल्या भाषिक व्यवहारात मात्र एकदम पक्के. जी गोष्ट त्यांनी पाहिलेली नाही त्यावर ते विश्वास ठेवायला मुळीच तयार नसतात म्हणूनच त्यांच्या भाषेत ते भविष्यकाळ नावाची चीज मानतच नाहीत! भूतकाळ ही वास्तवता होती, वर्तमान आपण जगतो आहोत म्हणून तो खरा आहे, पण भविष्याचं कोणी काय सांगितलं आहे? त्याचा काय भरवसा? -त्यामुळे अरबीत भविष्यकाळ नाही. (विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं सोपं प्रकरण, म्हणजे भविष्यकाळ अभ्यासायचं कारणच नाही!) पण एखाद्याला भविष्यकाळाची सुंदर स्वप्न रंगवायचीच असतील त्यानं काय करायचं? बगदाद, बैरुतसारख्या अरबी संस्कृतीच्या वैभवसंपन्न नगरीत तर कितीतरी स्वप्नं रंगली होती. . . त्या स्वप्नांचं काय? आहे, आहे! अरबीत ती सोय अर्थातच आहे! क्रियापदाच्या वर्तमान काळातल्या रूपाच्या अगोदर ‘सौफह’ शब्द वापरला की झालं. ‘अना अकतुबू’ (मी लिहितो) ह्या वाक्याचा आपल्या कल्पनेतला भविष्यकाळ करताना त्यात सौफह शब्द जोडला की झालं, ‘अना सौफह अकतुबु’(मी लिहीन) .

अरबी भाषेतल्या प्रत्येक धातूपासून वेगवेगळी अशी दहा प्रकारची रूपं होऊ शकतात. उदाहरणार्थ प्रयोजक बनवताना धातूतल्या मधल्या अक्षराचं द्वित्त करायचं ! कतल-कत्तल (मारणे-मारवणे) , अलम-अल्लम (शिकणे-शिकवणे) .

अरबीपासून शिकावं असं खूपच आहे. अरबी, फारसी आणि तुर्की ह्या तीन भाषांशी भारतीयांचा संबंध फार पूर्वीपासून आलेला आहे. फारसी/तुर्की ह्या दरबारी भाषा/राज्यकर्त्यांचा भाषा असल्यामुळे

भारतीय भाषांमध्ये ह्या भाषांतले शब्द फार मोठया प्रमाणावर आले, अनेक कारणांनी आपल्या भाषांत मिसळले नि स्थिरावले हे ऐतिहासिक सत्य आहे! त्यामुळे ह्या भाषांचा अभ्यास आपल्या दृष्टीनं अतिशय उपयुक्त आहे. त्यामुळे अरबी ही कुठल्या धर्माची, धर्मीयांची भाषा आहे असा चमत्कारिक, विकृत समज आपण प्रथम काढून टाकला पाहिजे. आपण ती डोळसपणानं शिकली पाहिजे.

सुमारे बारा कोटी लोकांची ही अरबी भाषा एखाद-दोन नव्हे तर जगातल्या बावीस देशांची राष्ट्रभाषा आहे. पश्चिम आशियात आणि उत्तर आफ्रिकेत पसरलेल्या ह्या बावीस अरबी भाषिक देशांचे संबंध एकमेकांशी फार चांगले आहेत असं नाही, मुळीच नाही; तरीही ह्या बावीस देशांमध्ये ‘प्रमाण अरबी’ एकच आहे. ह्या साऱ्या देशांमधून अरबीच्या शुद्धलेखनाचे नियम एकच आहेत, रेडिओवर, दूरचित्रवाणीवर वापरले जाणारे उच्चार एकच आहेत. एवढ्या मोठया प्रदेशात पसरलेली असूनही, राजकीय दृष्ट्या वितुष्ट असूनही भाषेची समान परंपरा सोडण्याचा, तोडण्याचा आत्मघातकी विचार कोणाही अरबाच्या डोक्यात येत नाही हे त्या भाषेचं सुदैवच आहे.

आपण मराठी भाषिक जेमतेम सात कोटी आहोत, महाराष्ट्र एक लहानसं राज्य. तरीही आपण एक प्रमाण मराठी भाषा नि प्रमाण लेखनपद्धती ह्याबाबत अनेक वर्ष वाद घालतोच आहोत. कोणत्याही प्रकारच्या भाषिक फुटीरपणाला आपण-व्यक्तिशः किंवा संघटनेद्वारा चुकूनही उत्तेजन देता कामा नये! असं उत्तेजन देणं म्हणजे भाषाविकासाच्या संदर्भात आपल्याच पायावर धोंडा पाडून घेणं आहे हे आपण विसरता कामा नये, आपण मराठी भाषिकांनी अरबीच्या उदाहरणातून बोध घेण्यासारखं खूपच आहे.

अनुक्रमणिका

३०
चिन्यांचं चित्रमय चक्रव्यूह

इंग्लंडची भाषा इंग्लिश, जर्मनीची जर्मन तशी इंडियाची इंडियन असा समज बहुतेक सर्वच युरोपियन लोकांचा असतो हे आपल्याला त्यांच्याशी बोलल्यावर लगेचच लक्षात येतं आणि आपल्याला गंमत वाटते; बिचारे, ह्यांना आपल्या भारतांबद्दल काहीच कसं ठाऊक नाही?! त्यांच्या अगाध अज्ञानाची गंमत वाटते, त्यांचं सामान्यज्ञान फारच कच्चं आहे हे कळल्यावर आपल्यातल्या काही जणांना त्यांची कीवही येते. सर्वसाधारण युरोपीय माणसाचं हे अज्ञान आहे, पण त्याच्या अज्ञानाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे(!) . पश्चिम आशियापासून युरोपपर्यंत पसरलेलं ऑटोमान साम्राज्य, शार्लमान साम्राज्य, रोमचं पवित्र साम्राज्यं वगैरे साम्राज्यं हळूहळू दुर्बळ होऊन अस्ताला गेली आणि त्यानंतर युरोपात नवी राष्ट्रं उदयाला आली. ह्या काळात युरोपात राष्ट्रवादाचा उदय झाला असं म्हटलं जातं; पण त्या राष्ट्रवादाचा आधार मुख्यतः भाषा हाच होता नि त्यामुळे ही नवी राष्ट्रं मुख्यतः भाषेच्या आधारावर उभी राहिली.

हे झालं युरोपात; पण आपल्या भारतीय उपखंडात तर सुदैवानं असं काही घडलं नाही तरीही अशा प्रकारचं अज्ञान आपल्याकडेही कमी नाही. अगदी ह्याच युरोपियन चालीवर आपला असा प्रामाणिक समज असतो की चीनची भाषा चिनी! युरोपियनांच्या अज्ञानाला जसं ऐतिहासिक कारण आहे तसंच आपल्या अज्ञानालाही ऐतिहासिक कारण आहे हं! आपलं कारण म्हणजे आपली १९४७ पर्यंतची राजकीय गुलामगिरी नि नंतरची मानसिक गुलामगिरी, त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणजे इंग्लिश माध्यम आणि जगाकडे बघण्यासाठी आपण इंग्लिश नावाच्या एकमेव खिडकीचा उपयोग करतो हे आहे.

चिनी नावाची भाषाच नाही असं कोणी म्हटलं तर?

‘आता चीनची भाषा चिनी नाही तर कोणती असणार? जपानी? चीनची भाषा चिनच असणार !!!’असं ठणकावून/तावातावानं सांगण्याच्या तयारीत असणार तुम्ही, पण जऽरा धीरानं!

चीनची भाषा चिनी तर नाहीच नाही पण चीनमध्ये एकच भाषा आहे असं समजण हेच मुळात आपलं मोठं अज्ञान आहे. भारतात जशी भारत/भारती/इन्डियन वगैरे नावाची भाषा अस्तित्वात नाही, तर मराठी, गुजराती, सिन्धी, पंजाबी, बंगाली अशा अनेक भाषा आहेत त्याचप्रमाणे चीनमध्येही प्रमुख अशा एक-दोन नव्हे तर खूप म्हणजे चांगल्या आठ भाषा आहेत, त्या अशा-१. पैचिड ह्या (ही चीनची राष्ट्रभाषा आहे) , २. क्वाड. सु, ३. हूनान, ४. क्वाङ् सि, ५. हाका, ६. फुकेन, ७. ख्वाडतुङ, आणि ८. फुकीयान.

ह्या झाल्या चीनच्या मुख्य भूमीवर बोलल्या जाणाऱ्या चिनी प्रकारातल्या प्रमुख भाषा. ह्या सर्व भाषा चिनी भाषाकुटुंबातल्या आहेत; त्यामुळे त्यांच्यात काही साम्यं आहेत पण त्या एकच आहेत असा समज करून घेणं चुकीच आहे. मराठी, बंगाली, इंग्लिश, रुमेनियन ह्या भाषांमध्ये जितपत साम्यं (?) आहेत तितपतच साम्यं ह्या भाषांमध्ये आहेत!

चीनमध्ये भाषा बऱ्याच असल्या तरी जगातलं एक भाषिक आश्चर्य म्हणता येईल अशी एक चित्ररूप एकात्मता त्या देशात गेली काही हजार वर्षं टिकून आहे. त्यांच्या चित्रलिपीत लिहिलेला मजकूर हा सर्वांना कळतो/कळू शकतो - म्हणजे उदाहरणार्थ चित्रात आपण उडणारा पक्षी दाखवतो तशी खुण केली की

अनुक्रमणिका

त्याचा अर्थ 'माणूस' हे चीनमधल्या सर्व साक्षरांना म्हणजे अर्थात 'सचित्र' असणाऱ्या सर्वांना कळतं. अक्षर येणारा तो साक्षर तसा चिनी भाषेतली चित्रं येणारा तो सचित्र! 'आपल्याकडे निरक्षरांची संख्या खूप आहे' म्हणून काही जण पाश्चात्त्यांच्या नादानं खूप आरडाओरडा करत असतात. चीन देशात निर-चित्र माणसांची संख्या खूप आहे, पण तिकडे तसा आरडाओरडा कोणी करत असल्याचं ऐकिवात नाही. हो, आणि पुढच्या शतकात आरंभी भारतात अमूक कोटी निरक्षर असतील अशी भाविष्यवाणी अनेक पाश्चात्य /अमेरिकन विद्वान करीत असतात; पण चीनबद्दल कोणी कधी ब्रसुध्दा काढत नाही, कारण सोप्पं आहे!- चीनमधल्या भाषांमध्ये अक्षरंच नसतात, मग निरक्षर माणसं कशी असतील चीनमध्ये?! चीनच्या ह्या प्रश्नाबाबतही अमेरिकन विद्वान नि राजकारणी नेहमीप्रमाणे अगतिक होतात!

तुम्ही कधी एखादा चिनी चित्रपट बघितला असेल तर तुम्हाला आठवेल की त्यात खालच्या बाजूला चिनी लिपीत सबटायटल्स असतात. आता चिनी माणसांना ह्या सबटायटल्सची गरज काय असा प्रश्न आपल्या मनात सहजच येतो. सबटायटल्स असण्याचं कारण म्हणजे चित्रपटात वापरली गेलेली भाषा (ही साधारणत: त्यांची राष्ट्रभाषा पैचिङ् ह्या असते) ही सर्वांना, म्हणजे त्यांच्याच देशातल्या सर्वांना समजणारी नसते; म्हणूनच त्यांच्या चित्रलिपीत सबटायटल्स दिलेली असतात. इतर चिनी भाषांमध्ये चित्रपट डब करण्यापेक्षा हा प्रकार सोपा नि कमी खर्चाचा असतो.

आकारानं मोठया असणाऱ्या देशात लोकसंख्याही खूप असेल तर सर्वांची भाषा समान नसतेच, मग अशा देशांना (राष्ट्रांना?) भाषिक प्रश्न ग्रासतात, सतावतात नि त्यावर तोडगे काढण्याचे प्रयत्न सुरु होतात. चिनी चित्रपटांमधल्या सबटायटल्सचं कारण हे आहे.

तिबेट, सिंकियांग वगैरे काही प्र 'देश' लष्करी ताकदीच्या आणि उत्तम मुत्सद्देगिरीच्या जोरावर चीननं गेल्या काही दशकांत आपल्या देशाला सहजपणे जोडले आहेत पण ह्या नव्या प्र-देशांचा, तिथल्या लोकांचा आणि त्यांच्या भाषांचा चिनी भाषांशी तसा काहीही संबंध नाही. पण मूळच्या चीन देशात एक विलक्षण आश्चर्यकारक गोष्ट आहे ती म्हणजे त्यांची चित्रलिपी. आपण समजतो त्या अर्थानं चिनी भाषेला लिपी नाहीच, आहेत ती फक्त चित्र, शतकांच्या ओघात सोपी, अधिक सोपी होत आलेली चित्र. सबटायटल्स म्हणजे चित्रंच असतात म्हणूनच ती देशभरातल्या सर्वांना (म्हणजे 'सचित्र' असणाऱ्यांना) कळतात —भाषेचा प्रश्न सुटला नाही तरी तात्पुरता तोडगा म्हणून ह्या पद्धतीचा वापर गेली अनेक शतकं, नव्हे अनेक हजार वर्षं होत आहे.

अलीकडे मात्र चिनी भाषेसाठी लिपी म्हणजे ध्वनीवर आधारित-ध्वनिलिपी असावी ह्या दृष्टीनं पाश्चात्त्य /आधुनिक बनू इच्छिणाऱ्या चीनमध्ये लिपीचा शोध घेण्याचं काम जोरात चालू आहे. चीनमध्ये आज जवळजवळ घरोघरी संगणक आले आहेत आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या संगणकांवर चिनी भाषा आणि चित्रलिपी आहे. ह्या संदर्भात प्रत्येक भारतीयानं आपल्या देशाचा विचार करून पाहावा की आपल्याकडच्या किती संगणकांवर एखादी भारतीय लिपी असते?

अमेरिका-छाप आधुनिकता, जीन्स, कोकाकोला, पेप्सि, मॅक्डोनल्ड वगैरेंचा 'परीसस्पर्श' झाल्यावर अत्यल्प काळातच पूर्व युरोपातलं भलं मोठं, बलाढ्य, पोलादी कवचाचं सोविएत संघराज्य बघता-बघता पत्त्याच्या बंगल्यासारखं कोसळलं आणि इतिहासजमा झालं. . . पाश्चात्त्य वळणाच्या आधुनिकतेच्या कल्पनेकडे चीनची घोडदौड वेगानं चालू झालेलीच आहे, त्या घोडदौडीचा परिणाम

अनुक्रमणिका

चीनमधल्या भाषांवर, त्यांच्या प्राचीन चित्रलेखनावर आणि एकूणच त्यांच्या संस्कृतीवर काय होतो हे आता बघायचं आहे, घोडामैदान जवळच आहे!

अनुक्रमणिका

३१
रूसी टोपी

रशियन माणसं स्वत:च्या डोक्यावर टोपी घालत नाहीत; पण आपण मुळातच नसलेली ती ‘लाल रूसी टोपी’ खूप काळ कौतुकानं कुरवाळली. एक काळ असा होता की कार्ल मार्क्स समजण्यासाठी रूसी भाषा शिकायला पाहिजे असं आपल्याकडच्या अनेक तरुणांना वाटत असे. कार्ल मार्क्स बिचारा जर्मन होता. त्याला रूसी भाषेचा गंधही नव्हता! परदेशांमध्ये राहूनही त्यानं आपलं सारं लेखन जर्मन भाषेतच केलं, अगदी आइ न प्रमाणे !

रशियन भाषा शिकण्याचं वेड केवळ तरुणांनाच होतं असं नाही, अनेक हुषार, व्यवहारचतुर आईबाप आपल्या मुलांना (मारुनमुटकून, इंग्लिशच्या जोडीनं) रशियन शिकवायचे कारण सोविएत देशाच्या खूप शिष्यवृत्ती असायच्या.

पूश्किन, गोगोल, दस्तयेव्स्कि, तोल्स्तोइ अशा अनेक महान रशियन कलाकारांच्या (रशियन) साहित्यकृतींचा मुळातून आस्वाद घेता यावा म्हणून रशियन शिकणाऱ्यांची संख्याही कमी नव्हती. (सोविएत युनियनच्या काळात ‘रशियन वाङ्मय’ आणि ‘सोविएत वाङमय’ असे शब्द प्रचलीत होते. रशियन वाङ्मय म्हणजे लेनिनच्या साम्यवादी क्रांतीपूर्वीच, झारशाहीतलं वाङ्मय आणि सोविएत साहित्य म्हणजे क्रांतीनंतरचं साहित्य. आपल्या लोकांना सामान्यत: रशियनं साहित्यात रस असायचा.)

स्वातंत्र्यानंतर आपल्याकडे एक काळ असा होता की साम्यवादाशी जवळीक असलेले नेते दिल्लीत प्रभावी झाले नि पाठोपाठ भारतातल्या साऱ्या विद्यापीठांमधून रशियन भाषेचे विभाग सुरु झाले! ह्या कल्पनेची कारवाई इतक्या झपाट्यानं झाली की तेवढे प्रशिक्षित, किमान पात्रता असलेले शिक्षकच उपलब्ध नव्हेत; पण कार्यक्रम थांबला नाही! पात्रता असलेल्या —नसलेल्या सर्वांनाच विद्यापीठांमध्ये चांगल्या नोकऱ्या मिळून गेल्या!ह्या भारुडभरतीमुळे रशियनचं काय झालं हा प्रश्न अलाहिदा!

मुलं फार मोठया प्रमाणात रशियन शिकत होती, सोविएत युनियनमध्ये जाऊन मजेत राहत होती. . . तिथून कसल्या-कसल्या (?) विषयांवर सहजतेनं पीएचड्या वगैरे घेऊन येत होती. भारतात ज्यांनी संस्कृतचे कार श्लोकही कधी पाठ केलेले नव्हते अशा इंग्लिश माध्यमाच्या शाळेतून शिकलेल्या मुलांनी तिकडे जाऊन संस्कृत, मराठी वगैरे भाषांच्या तुलनात्मक अभ्यासावर (?) डॉक्टरेट मिळवल्या! आपली मुलं इतकी हुषार होती की त्यांच्या रशियन गाइडांनाही संस्कृत—बिंस्कृत येण्याची गरज नसायची!-‘एका गरीब, अप्रगत देशातला बिचारा माणूस आपल्या सोविएत युनियानमध्ये येऊन रशियन शिकून काही तरी करतोय ना, मग झालं!’ आणि नंतर तो इथेच न राहता त्याच्या देशात नक्की परत जाणार आहे ना? मग देऊन टाका त्याला हवी ती मोठ्ठी पदवी!’ —अशा अति-माणुसकीच्या, करुणामय दृष्टीनं सोविएत युनियनचं सरकार/विद्वान परदेशी तरुणांकडे बघत असत! पदव्यांची खैरात करत असतं. . . कित्ती छान! हं !!! गेले ते दिवसा!!!

एक बलाढ्य साम्राज्य जादूच्या गोष्टीतल्याप्रमाणे कुठल्याशा जालीम मंत्रानं छूSS केल्यासारखं एकाएकी नाहीसं झालं! त्याचे राजकीय परिणाम काय झाले ह्याबद्दल अनेक चर्चा/मीमांसा अजून चालूच आहेत; पण भाषिक दृष्ट्या त्याचा आपल्यावर काय परिणाम झाला हेही बघण्यासारखं आहे.

अनुक्रमणिका

रशियाची सहल, तिथे चार-पाच वर्ष वास्तव्य, पूर्व-पश्चिम युरोपात निवांतपणे भटकंती करायची सुवर्ण-संधी, फुकट शिक्षण, सहज मिळणारी मोठ्ठी पदवी अशा एक ना अनेक गोष्टी मिळविण्यासाठी रशियन भाषा येण्याची गरज होती. आता ते आकर्षणच संपल्यामुळे रशियन शिकायला येणाऱ्यांची संख्या एका फटक्यात संपुष्टात आली!

सोविएत युनियन कोलमडलं, त्याचे एक-दोन नव्हे तर पंधरा तुकडे झाले, पंधरा स्वतंत्र राष्ट्रं! ह्यात रशिया, युक्रेन आणि बायलो-रशिया ही तीन राष्ट्रं पहिल्यापासूनच रशियन भाषा बोलणारी आहेत; पण उरलेल्या बारा राष्ट्रांनी आपली राष्ट्रभाषा म्हणून आपल्या परंपरागत भाषेला स्थान दिलेलं आहे; पण त्यातली गंमत अशी की त्यांची परंपरागत भाषा आता खरं तर इतिहासजमा झालेली आहे. साम्यवादी क्रांतीच्या काळापासून लेनिन आणि त्यानंतर स्तालिनसारख्या महान शक्तिशाली नेत्यांना राष्ट्राच्या उभारणीत भाषेचं काय स्थान असतं हे ओळखलेलं होतं. रशियन भाषेसाठी आणि रशियन लिपीसाठी त्यांनी जे कार्य केलं तेवढं व्यापक कार्य इतिहासात आजवर इतर कोणत्या राष्ट्रानं केलेलं नाही. (ह्या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट म्हणजे स्तालिन स्वतः रशियन नव्हताच!) हे करताना भले त्यांची सत्तेचा, शक्तीचा क्वचित क्रौर्याचाही वापर केला, पण आपल्या भल्या मोठ्या साम्राज्यात भाषिक एकात्मता आणली, टिकवली. त्यांचं कार्य इतकं परिणामकारक होतं की आज ताझिकी, तुर्कमेनी, यू ज़बेकी किंवा कझाकी वगैरे आपली भाषा आहे असं सांगणाऱ्यांना ती प्रत्यक्षात येत नसते!

कागदोपत्री आमची भाषा रशियन नाही, इतर कुठली तरी आहे हे दाखवलं तरी त्यांचा कारभार आज रशियनमधूनच चालतो/ चालू शकतो कारण सोविएत युनियनच्या काळात केवळ शिक्षणासाठीच नव्हे तर सर्वत्र, खऱ्या अर्थानं रशियन हेच एकमेव माध्यम होतं, त्यामुळे आता रशियनच न राहिलेल्या इतर तेरा राष्ट्रातल्या लोकांना फक्त रशियानच येतं! ह्याचा दृश्य परिणाम म्हणजे ह्या सर्व बारा राष्ट्रांमध्येही आज प्र त्यक्ष चालणारी, लोकांना कळणारी भाषा रशियनच आहे आणि आणखी प्रदीर्घ काळ तीच चालू राहण्याची शक्यता आहे. भारतातली परिस्थिति ह्याच्या विरुद्ध होती/आहे. उच्च शिक्षणाचं माध्यम फक्त इंग्लिश होतं पण उच्च शिक्षण घेणारी माणसं फारशी नव्हतीच! प्राथमिक शिक्षणाचीही आपल्यायाकडे वानवाच होती! तरीही इथे अट्टाहासानं इंग्लिश भाषा ठेवली जी जेमेतेम एक टक्का लोकानांच येत होती. लोकांच्या भाषेचा/भाषांचा इतका अनादर करणार भारतासारखं परभाषाधार्जिणं, तथाकथित ‘स्वतंत्र’ राष्ट्र जगात दुसरं नसावं! फिनलंडमधल्या भटकंतीत लेनिनबद्दलच्या कथा ऐकून वाटायचं की खरंच, असा एखादा महान नेता आपल्याला का बरं लाभला नाही?

तेव्हा आपल्या महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांनी रशियन भाषेचा अभ्यास सोडू नये, करावा. व्यापार, उद्योग, तांत्रिक सहकार्य अशा अनेक दृष्टींनी आपल्याला नव्यानं जन्माला आलेल्या तेराच नव्हे तर खुद्द रशिया, युक्रेन, बायलोरशिया सकट पंधरा राष्ट्रांमध्ये भरपूर वाव आहे. आपल्यातली काही हुषार मंडळी अनेक वस्तूंपासून विद्यार्थ्यांपर्यंतचा व्यापार करीत आहेत. प्रत्येक व्यापाऱ्यानं रशियन भाषा येणारी मंडळी आपल्या पदरी बाळगलेली आहेत. सोविएत युनियन इतिहासजमा झालेलं असलं तरी रशियन भाषेचं साम्राज्य मात्र अजून काही दशकं अबाधित राहणार आहे, कदाचित ते वाढेलही. . .

अनुक्रमणिका

३२
हिन्दी हैं हम!

आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीचा सुवर्णमहोत्सव धूमधडाक्यानं चालू होता, नेमक्या त्याचवर्षी एका मान्यवर इंग्लिश वृत्तपत्रात एक बातमी झळकली होती. कोण्या एका विदुषीनं तक्रार केलेली होती की किमान मुंबईसारख्या शहरातल्या महाविद्यालयांमध्ये तरी अमुक-अमुक वर्गातल्या लोकांची नेमणूक करू नये; कारण त्यांना चांगलं इंग्लिश येत नाही! इंग्लिशला धक्का लागू नये म्हणून घराच्या धन्यावरच बंदी घालण्याची भाषा नि तीही सुवर्णमहोत्सवी वर्षात झालेली पाहून कोणालाही काहीही वाटलं नाही. ना दु:ख ना राग. त्या बातमीवर कसलीही प्रतिक्रिया उमटली नाही! आपले लोक प्रत्येक गोष्टीकडे अतिशय वस्तुनिष्ठपणे बघायला शिकले असं मानायचं की ते कमलपत्राप्रमाणे अलिप्त राहून विचार करू लागले असं म्हणायचं हे आपण सुज्ञांवरच सोपवलेलं बरं.

एकीकडे इंग्लिशला सर्वोच्च स्थानी टिकवण्यासाठी सर्वच क्षेत्रात, विशेषतः शिक्षणासारख्या पायाभूत क्षेत्रात प्रचंड धडपड चाललेली असली तरी तिथेच ती ढासळू लागली आहे हेही त्याच वेळी दिसायला लागलेलं आहे; त्यामुळे माझ्यासारख्याच्या मनात कुठेतरी आशेचे किरण चमकू लागले आहेत. जे चालू आहे ते भूमितीश्रेणीनं वाढत गेलं तर देशी भाषांना स्वगृही स्थान मिळण्याचे दिवस आता फार दूर नाहीत! ते स्थान सन्माननीय बनवण्यासाठी मात्र आपल्याला काही गोष्टी जाणीवपूर्वक करायला लागणार आहेत!

आधुनिक भारतीय भाषांची सुरुवात नक्की कधी झाली, ती संस्कृत नंतर झाली की त्या भाषा संस्कृतच्या बरोबरीनं अस्तित्त्वात होत्याच, संस्कृतमधून प्राकृत झाल्या, की प्राकृत म्हणजे नैसर्गिक भाषांवर संस्कार करून संस्कृत बनवली गेली, वैदिक काळातही आजच्या मराठी, हिन्दी वगैरे भाषा अस्तित्त्वात होत्या, 'संस्कृतातही नसलेले वैदिक शब्द आमच्या कोंकणीत आढळतात!' वादाचे हे आणि असे सर्व मुद्दे क्षणभर बाजूला ठेवले तरी एक गोष्ट निश्चित की साधारणत: अकराव्या/बाराव्या शतकात संस्कृत भाषेला संपर्क भाषा म्हणून उतरती कळा लागल्याबरोबर मराठी, गुजराती, सिन्धी, बाङ्ला वगैरे सर्वच भाषांना खूप महत्त्व आलं; पण आपल्या खंडप्राय देशात खरी आघाडी मारली ती हिन्दीनं. कारणं नक्की सांगता आली नाहीत तरी संस्कृतनंतर संपर्क भाषा म्हणून हिन्दीला मिळालेलं स्थान विलक्षण आहे ह्यांत शंकाच नाही.

तमिळ अतिरेक्यांनी हिन्दीच्या विरुध्द केलेल्या दंगलींचा अपवाद सोडल्यास आपल्या परंपरेत भाषेच्या प्रश्नावरून गंभीर समस्या वगैरे कधीच उद्भवल्या नाहीत; कारण बहुभाषिकत्व ही आपली परंपरा आहे. आपले (पूर्वीचे) सामाजिक नेते, संत बहुभाषिक होते. ज्ञानेश्वरांसारख्या प्रतिभावंतानं संस्कृत, मराठी, कन्नड, हिन्दी अशा अनेक भाषांमध्ये रचना केल्या आहेत असं गाथांवरून दिसतं. संपर्कभाषा म्हणून संस्कृत मागे पडायला लागली त्या काळात भारतभरातल्या संतांनी आपल्या भाषेबरोबरच हिन्दीत रचना केलेल्या आहेत. आपल्याकडचे ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम हे काही अपवादात्मक बहुभाषिक संत नव्हते. पूर्वेला बंगालमधल्या चैतन्यांपासून ते पश्चिमेला गुजरातेतल्या नरसी मेहतांपर्यंत भारतभरातल्या अनेक संतांनी हिन्दीत लिहिलं; कारण ती भारतीय उपखंडातील प्रभावी संपर्क भाषा होती आणि संतांचा संचार आणि संपर्क भारतभर होता म्हणूनच.

अनुक्रमणिका

आधुनिक काळात भारताच्या स्वातंत्र्याचा लढा चालू असतानाच स्वतंत्र भारताच्या राष्ट्रभाषेची चर्चा झाली होती नि ती हिन्दीच हवी असा निर्णयही एकमुखानं घेण्यात आला होता.

भारतातच नव्हे तर युरोप-अमेरिकेत, जगात सर्वत्रच भारतीय माणसं म्हणजे अगदी अफगाणिस्तानपासून नि बलुचिस्तानपासून बाङ्लादेशापर्यंत माणसं भेटतात तेव्हा त्यांची संपर्काची भाषा हिन्दीच असते. आता काही जण तिला अज्ञानामुळे उर्दू समजतात, पण नावात काय आहे? भाषा शेवटी एकच आहे!

हिन्दीच्या विकासासाठी मराठी माणसांनी केलेलं कार्यही फार महत्त्वाचं आहे. गंमत म्हणजे हिन्दीच्या विकासात सर्वात मोठा वाटा अहिन्दी भाषिकांचाच आहे, त्यामुळेच ती भारतीय बनली! हे भारतीयत्व कोणा एका प्रांताची मक्तेदारी नाही.

१९९९मध्ये आपण (की फक्त हिन्दीवालेच?) हिन्दीला राष्ट्रभाषेचं स्थान मिळाल्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करणार आहोत. भाषा म्हणून हिन्दीचा जो विकास झाला नि तिला ह्या खंडप्राय देशात जे स्थान मिळालं ते खरोखर अद्भूत आहे, कौतुकास्पद आहे. कोणत्याही राजकीय, सैनिकी, आर्थिक वगैरे शक्तीशिवाय हा चमत्कार घडलेला आहे. मध्ययुगात जास्तीत जास्त परकीय आक्रमणं हिन्दी भाषिक प्रदेशांतच झाली; पण त्या साऱ्या आक्रमकांना, त्यांच्या सर्व प्रकारच्या अन्यायांना, अत्याचारांना आणि त्यांच्या परक्या भाषांना लीलया पचवून हिन्दी केवळ तगली, जगली, असं नाही तर वाढली, संपन्न झाली.

हिन्दीचा राग (राग) करणारी काही मडळी भारतात आहेत (महाराष्ट्रातही आहेत) पण त्यांचा बारकाईने अभ्यास केला तर मुख्यत: दोन कारणे दिसतात, पहिलं म्हणजे काही भागात स्थानिक राजकारणी लोकांना आपल्या स्वार्थासाठी लोकांना भडकावलं आणि दुसरं म्हणजे काही लोकांना अलीकाडच्या काळात हिन्दी भाषिकांबाबत महानगरांततून जे अनुभव आले त्यामुळे. ही मंडळी खरं म्हणजे हिन्दी भाषेची विरोधक नसतात तर असंस्कृतपणाचे विरोधक असतात; पण शेवटी तो राग हिन्दीवर काढला जातो! असंस्कृत, नाठाळ वगैरे 'गुण'सर्वच भाषिकांमध्ये दिसून येतात, त्यामुळे तिकडे दुर्लक्ष करू या!

अनेक कारणांनी भटकंती करताना जिथे-जिथे जातो तिथे शाळा-महाविद्यालय असेल तर अगदी न चुकता भेट देतो, प्राचार्य नाही भेटले तरी प्राध्यापकांना गाठतो विद्यार्थ्यांशी बोलतो, कॅन्टीनमध्ये मध्ये जाऊ न त्यांच्याबरोबर चहा पितो, तासांना बसतो. . . ह्या अनुभवातला आशेचा किरण म्हणजे अगदी मुंबई-कलकत्त्यासारख्या महानगरांतसुद्धा जिथे स्थानिक भाषेला रीतसर वाव दिला जात नाही असा अनेक ठिकाणी 'प्रत्यक्ष' अध्यापनात हिन्दीचा प्रवेश झालेला आहे! इंग्लिश माध्यमातून शिक्षण झालेले प्राध्यापक आणि इंग्लिश माध्यमातून शालेय शिक्षण घेऊन आलेल्या तरुण पिढीच्या विद्यार्थ्यांना एकमेकांना समजून घेण्यासाठी हिन्दीच सर्वात जवळची वाटते हा केवढा मोठा दिलासा आहे!

भले कोणी सत्ताधारी राजकारणी तिला राष्ट्रभाषेची प्रतिष्ठा देवोत किंवा न देवोत, विद्यापीठांसारखी ज्ञानाची सत्तापीठं हिन्दीला माध्यम म्हणून मान्यता देवोत न देवोत, भले ह्या देशातल्या

अनुक्रमणिका

अठ्ठ्याण्णऊ टक्के लोकांना न कळणाऱ्या भाषेत न्यायनिवाडा चालू राहो; कोटी-कोटी जनसामान्यांच्या वाणीवर ती कधीचीच विराजमान झालेली आहे!

ह्या कोटी-कोटी जनतेनं ‘हिन्दी हैं हम !’ म्हणत आपल्या एकीच बळ वापरलं तर?

अनुक्रमणिका

३३
भाषांचं ओझं

जून महिना आला की पाठीवरून भली मोठमोठी ओझी घेऊन सकाळ-संध्याकाळ घर ते शाळा नि शाळा ते घर जाणारी बिचारी मुलं पुनः एकदा रत्यावर दिसू लागतात.

पाचवीपासूनच विद्यार्थ्यांना नवनवीत आघाड्यांना म्हणजे विषयांना तोंड द्यावं लागतं. सुरुवातीलाच इंग्लिश नि हिन्दी ह्या जोड-राष्ट्रभाषा बोकांडी बसतात. त्यांची धड ओळख होते न होते तोपर्यंतच संस्कृत येते. मराठी तर पाठ सोडत नाही. शिवाय आई-वडिलांना वाटत असतं की आपल्या मुलानं जपानी, फ्रेंच, जर्मन असं काहीतरी शिकायलाच पाहिजे. 'जगात (इतरांच्या) पुढे जायचं म्हणजे असं काही तरी आपल्या गाठीला हवंच!' ह्याचे संस्कार पालक मंडळी आपल्या पाल्यांवर जाता-येता करण्याच्या प्रयत्नात असतात.

इतर विषयांच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आणखी एक महत्वाची बाब म्हणजे नेमक्या ह्याच काळात गणित आणि शास्त्र ह्या दोन प्रमुख (आणि सक्तीच्या) विषयांचा अभासक्रम अधिकाधिक अवघड होत असतो. विषय अवघड आणि वर्गातल्या मुलांची संख्या सत्तरच्या पुढे; म्हणजे शिक्षकांचं मार्गदर्शन क्षीण होत-होत दुर्मिळच होत जातं. पालकांनी ह्या समस्येवर त्यांच्या दृष्टीनं एक हमखास उपाय शोधून काढलेला असतो, तो म्हणजे क्लासचा. अशा प्रकारे शाळा आणि क्लासच्या चरक्यात सापडलेल्या बिचाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे अभ्यास करायला वेळच राहात नाही!

ह्या वेळेच नसण्याचा सर्वाधिक वाईट परिणाम होतो तो भाषेच्या अभ्यासावर. भाषेच्या अभासाकडे दुर्लक्ष केलं तरी चालेल असा एक समज झालेला आहे. 'भाषा भाषा म्हणजे काय? बोललेलं कळलं म्हणजे झालं! कम्युनिकेशन होतं ना, मग आणखी काय पाहिजे!' अशा तऱ्हेचा अत्यंत घातक समज अनेक लोक करून घेतात आणि इतरांचा तसा करून देत असतात. बोललेलं कळलं म्हणजे झालं असं म्हणणारे हे विसरतात की बोललेलं म्हणजे काय. तुम्ही जे बोलता तेच तुम्हाला अभिप्रेत असतं का? तुम्हाला अभिप्रेत असलेला विचार, भाव तुम्ही नेमकेपणानं समोरच्या माणसाला सांगू शकता का किंवा लिहून दाखवू शकता का? 'तुझा काहीतरी गैरसमज झालेला झालेला दिसतोय, मला असं म्हणायचं नव्हतं रे!' असं म्हणण्याची पाळी तुमच्यावर (वारंवार) येत असेल (किंवा तुम्ही खूप धीट असल्यामुळे 'पुनः एकदा सांगा बरं!' किंवा 'म्हणजे नक्की काय?' असं विचारण्याची पाळी तुमच्या समोरच्या माणसावर येत असेल) तर तुमच्या भाषेत, बोलण्यात दोष आहे ह्यात काही शंकाच नाही.

भाषेचा अभ्यास म्हणजे वार्षिक परीक्षेपूर्वी नवनीत किंवा तत्सम गाइडावरून नेमलेल्या धड्यांची प्रश्नोत्तरं पाठ करणे असा सार्वत्रिक समज आहे. शाळेनं नेमलेली पाठ्यपुस्तकं वाचणे हा प्रकार शालेय विद्यार्थ्यांनी तर कधीचाच बंद करून टाकलेला आहे! धडा वाचणं, तो नीट समजून घेऊन त्यातून आनंद मिळवणे, तालासुरात कविता पाठ करणे, भाषेच्या सौंदर्याचा आस्वाद घेणे, शब्दांवर कोट्या करणे, चांगल्या अर्थानं शब्दच्छल करणे, चांगले विनोद करणे, कोणी केल्यास त्यातून आनंद मिळवणे हे भाषिक खेळांचे प्रकार लोप पावल्यासारखे झाले आहेत. खरं तर त्यातूनच चांगली भाषा आणि चांगली अभिरुची विकसित होत असते.

अनुक्रमणिका

अगदी अलीकडेच केलेल्या एका पाहणीत एक धक्कादायक गोष्ट लक्षात आली की अगदी विद्यापीठ पातळीवरच्या बऱ्याच प्राध्यापकांना संकेतार्थाची (सब्जंक्टिव्ह मूडची) रचना येत नाही! ती येत नसल्यामुळे आपल्या विषयातल्या काही गोष्टी/कल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात त्यांना अडचण येत होती (खरं तर अडचण विद्यार्थ्यांचीच होत होती; कारण अनेक प्राध्यापक एकदमच बिनधास्त होते!) आपण सांगण्यात कमी पडत आहोत ह्याची जाणीवच शिक्षकांनी नव्हती. म्हणजे शिक्षकांना केवळ विषय माहीत आहे. एवढं पुरेसं नसतं, शिक्षकांच्या बाबतीत उत्तम भाषिक कौशल्यही अत्यावश्यक असतं.

पण भाषिककौशल्य शिक्षकांनाच लागतं असं नाही. इतरांनाही त्याची तितकीच आवश्यकता असते. साधं विक्रेत्याचं काम करायचं झालं तरी भाषा चांगली पाहिजे, भाषेतच मार खाणाऱ्यांना आपल्या मालाची विक्री करायला काय जमणार? जी भाजीवाली चांगलं बोलते, तिच्याकडून तुम्ही आनंदाने खरेदी करता, भाषा चांगली नसेल तर तुम्ही त्या व्यक्तीकडे आवर्जून जात नाही आणि ज्यांची भाषा वाईट आहे अशांना तुम्ही प्रयत्नपूर्वक टाळताही. थोडक्यात म्हणजे रात्रापाळीचा गुरखा सोडला तर इतर सर्वांनाच उत्तम भाषेची गरज असतेच!

आपले जवळ-जवळ सगळेच व्यवहार भाषेशी प्रत्यक्षपणे संबंधित आहेत, मग आपण भाषांकडे ‘कोणीतरी सक्तीनं लादलेलं ओझं’ म्हणून का बघतो? एक कारण म्हणजे भाषा तितकीशी काही महत्त्वाची नाही असा गैरसमज करून घेतल्यामुळे आपल्याला भाषा म्हणजे ओझं वाटतं. दुसरं कारण म्हणजे अनाकर्षक पुस्तकं. मनाला सुखवणारे, फुलवणारे धडे, कथा, कविता नसल्या की मन कशात रमणार? भाषेतलं साहित्यातलं लालित्य म्हणजे काय हेच त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलं नाही तर ह्या सगळयाचा अटळ परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची भाषेतली रुची नाहीशी होते, ते भाषेत पार कच्चे राहतात नि मग त्यांनाही भाषा म्हणजे ओझं वाटू लागतं.

भाषा महत्त्वाची नाही अशा चुकीच्या कल्पनेतूनच भाषेच्या विषयातले गुण अन्यत्र प्रवेश वगैरे देताना न धरण्याची भयंकर घातक पद्धत सुरू झाली आहे. विषय महत्त्वाचा पण तो येतो की नाही हे कळण्याचं माध्यम असणारी भाषा मात्र बिनमहत्त्वाची.

भाषा दुय्यम नाही, बिनमहत्त्वाची तर नाहीच नाही, उलट सर्वात महत्त्वाची आहे! ती टाळून चालणार नाही ही गोष्ट मोठ्यांनी प्रथम लक्षात घ्यायला पाहिजे. मुलांसाठी असलेली भाषेची पुस्तकं आशयाच्या नि भाषेच्या दृष्टीनं उत्तम असली पाहिजेत, ही काळजीही मोठ्यांनीच घ्यायची आहे. मुलांना एकदा गोडी लागली की त्यांची भाषा निश्चितपणे सुधारेल आणि त्यांचे फायदे त्यांना, ह्याच जन्मी, मिळणार आहेत. त्यांच्या ऐहिक फायद्यासाठीही मोठ्यांनी जातीनं लक्ष घालून हे करायलाच पाहिजे. असं केल्यास भाषाशिक्षणाचं ओझं कोणालाच वाटणार नाही.

अनुक्रमणिका

३४
तिसऱ्या जगासाठी—डायरेक्ट मेथड

भाषा शिकवणं हे एक तंत्र आणि थोडी कलाही आहे. भाषा शिकणं हेही एक तंत्रच आहे. उपजत बुद्धिमत्तेला योग्य तंत्राची जोड आवश्यक असते, तो मंत्र जर मिळाला नाही तर वेळेचा अपव्यय होण्याचा धोका असतो. काही गुण सोन्याचे काही सोनाराचे म्हणतात त्याप्रमाणे अध्यापक आणि विद्यार्थी ह्यांची कुवत, त्यांचा कल, त्यांची गरज, त्यांच्या भोवतालची परिस्थिती अशा अनेक मुद्द्यांचा समावेश भाषा आत्मसात करण्याच्या प्रक्रियेत असतो; पण मूलतः ते एक तंत्र असल्यामुळे त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीला म्हणजे मेथडला निश्चितच खूप महत्त्व असतं, आहे.

भाषेच्या शिक्षणात आज ज्या अनेक पद्धतींचा उपयोग केला जातो त्यात आपल्याकडे सध्या 'डायरेक्ट मेथड' नावानं ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीचा बराच बोलबाला आहे. 'डायरेक्ट मेथड अत्यंत 'मॉडर्न' असून झटपट रिझल्ट देणारी आहे' अशी समजूत आहे. भाषा शिकवण्याच्या अनेक पद्धती आहेत, अमुक एक पद्धत सर्वोत्तम आहे असं म्हणणं खरं तरं अवघड असतं, कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या कोणत्या गटाला कोणती पद्धत केव्हा आणि कोणत्या परिस्थितीत अधिक उपयोगी ठरू शकेल हे सांगणं कठीण आहे. त्यासाठी अनेक घटकांचा विचार करणं आवश्यक असतं आणि त्या त्या परीस्थितीचा विचार करूनच कोणती पद्धत वापरायची हे ठरवता येतं, आणि हे ठरवायचं असतं ते त्या संबंधीत शिक्षकांनी. प्रत्येक पद्धतीत गुणदोष असतातच.

सर्वसामान्य मुलं आपली पहिली भाषा म्हणजे सामान्यतः मातृभाषा शिकत असताना त्याच्या भोवती सतत त्याच भाषेचं वातावरण असतं, प्रत्येक व्यक्ती त्या मुलाशी त्याच भाषेत बोलत असते. . . अशा प्रकारचा प्रयत्न तथाकथित डायरेक्ट मेथडमध्ये करण्याचा प्रयत्न असतो (बहुतेकदा तो केवळ अट्टाहास) . एखाद्या व्यक्तीला दुसरी कोणतीतरी भाषा बोलतात तिथे-दुसऱ्या देशात तातडीनं जायचं असेल आणि त्याची नव्या भाषेची गरज मामुली असेल, अगदी प्राथमिक स्वरूपाची भाषिक देवाण-घेवाण करणे एवढाच उद्देश असेल तर फार थोड्या वेळात ती भाषा, पूर्णपणे नव्हे तर केवळ कामचलाऊ स्वरूपाची भाषा डायरेक्ट मेथडसारख्या पद्धतीनं शिकणं शक्य असतं, म्हणजे उदाहरणार्थ व्हिएटनाममध्ये लढायला चाललेल्या अमेरिकन सैनिकाला व्हिएटनामी भाषेचे कामचलाऊ धडे शिकवणं. आता निरपराध, निःशस्त्र व्हिएटनामीं ना किड्यामुंग्यांप्रमाणे मारायला निघालेल्या अमेरिकन सैनिकाची व्हिएटनाममधली भाषिक गरज ती किती असणार? त्याला लागणारी/लागू शकणारी पाच —पन्नास वाक्यं वगैरे भाग ह्या पद्धतीनं झटकन साधता येतो/ साधल्यासारखा वाटतो; पण ते शिकणं आणि शिकवणं दोन्हीही वरवरचं असतं. तरीही अशा ह्या तकलादू पद्धतीचं आपल्याकडे खूप स्तोम माजवलं जातं कारण ही तथाकथित पद्धत गोऱ्या माणसानं आणखी म्हणून!

दुसऱ्या महायुध्दानंतर फ्रेंच, जर्मन आणि रशियन ह्या भाषांचा जगभर प्रसार करण्यासाठी त्या त्या राष्ट्रांनी म्हणजे फ्रान्स, दोन जर्मनी आणि सोविएत युनियन ह्यांनी आपली फौजच तयार केली. ह्या झटपट फौजेकडे डायरेक्ट मेथड नावाचा नवा मंत्र देण्यात आला नि मग ही गोरी फौज जग पादाक्रांत करायला निघाली. भारत, पाकिस्तान, श्रीलंका अशा (प्रचंड लोकसंख्या असलेल्या) वसाहतींसारख्या जगातल्या बहुतेक नव्या देशांनी आपली गुलाम वृत्ती सोडलेली नसल्यामुळे (किंवा अनेक ठिकाणी ती अधिकच वाढलेली असल्यामुळे) ह्या तथाकथित गोऱ्या तज्ज्ञांना ह्या गुलामांच्या देशांतून उदार आश्रय मिळाला! ज्या

देशात आपल्या भाषेच्या प्रचारकार्याला जायचं त्या देशातली कोणतीही भाषा त्याना अवगत नाही, तिथल्या संस्कृतीबद्दलही काही माहिती नाही नि जाणून घेण्याची तिळमात्र इच्छा नाही, तरीही त्याचा ठमठमाट नि उद्दामपणा गुलाम वृत्तीच्या देशांमध्ये चालू राहिला!

तिसऱ्या जगात उत्तर व्हिएटनाम, उत्तर कोरिया, कंपूचिया हे देशही येतात. ह्या छोट्या-छोट्या पण स्वतंत्र वृत्तीच्या स्वाभिमानी, साम्यवादी देशांनी मात्र युरोप-अमेरिकेतल्या गोऱ्यांची अरेरावी आपल्या देशात कधीक चालवून घेतली नाही! आपल्या हैद्राबादच्या ‘सेन्ट्रल इन्स्टिटयूट ऑफ इंग्लिश अॅन्ड फॉरीन लँग्वेजेस’ मधल्या जर्मन विभागात काम करणारे काही (पूर्व जर्मनीतले) प्राध्यापक भारतात येण्यापूर्वी उत्तर व्हिएटनाम, उत्तर कोरिया वगैरे साम्यवादी देशांमध्ये जर्मन शिकवत असत, त्यांच्याकडे बारकाईनं चौकशी केली तेव्हा कळलं की त्या देशात गेल्यावर त्यांना पहिले सात-आठ महिने तिथली भाषा शिकावी लागली आणि मग स्थानिक भाषेतून त्यांना जर्मन भाषेचं अध्यापन करता आलं. स्थानिक भाषेकडे आणि स्थानिक संस्कृतीकडे दुर्लक्ष करून एखाद्या परक्या भाषेचा प्रचार करण्याचं स्वैर स्वातंत्र्य स्वाभिमानी देश, कितीही छोटे असले तरी कोणालाही देत नाहीत!

ह्यापेक्षाही महत्त्वाची आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या पद्धतीचं एवढं मोठं कौतुक केलं जातं ती पद्धत अगदी फ्रान्स, जर्मनी किंवा रशियातही परकी भाषा शिकवण्यासाठी वापरत नाहीत. जर्मनीत तर अगदी शेजारच्या देशातली फ्रेंच भाषा शिकवण्यासाठी सुध्दा डायरेक्ट मेथड वापरत नाहीत तर मातृभाषेचाच माध्यम म्हणून उपयोग करतात हे मी स्वतः ठिकठिकाणी पाहिलं आहे!

एकदा बेर्लीनच्या एका शिबिराला गेलेलो असताना फ्रान्समधल्या बोर्दोहून आलेल्या शिक्षक पतिपत्नींशी माझी चांगली मैत्री झाली होती. एक दिवस संध्याकाळी गप्पांच्या ओघात डायरेक्ट मेथडचा उल्लेख झाला तेव्हा ते दोघही भाषा शिक्षक आश्चर्यानं म्हणाले की ही कुठली आली मेथड ? ते म्हणाले, फार तर जर्मनीच्या सरहद्दीजवळ असलेल्या लोकांना वर्गात जर्मन भाषेचा मोठ्या प्रमाणात उपयोग करता येईल; पण बोर्दोसारख्या दूरच्या ठिकाणी त्यांच्या कानावर सतत फ्रेंचच पडणार मग तुम्ही जर्मन भाषेत तासभर खूप (बडबड) केलीत तर त्याचा काय उपयोग? त्याला भाषा बऱ्यापैकी यायला लागली की मग त्या भाषेचा उपयोग वर्गात वाढवता येईल, त्यावेळी ते ग्रहण करण्याची क्षमता त्या विद्यार्थ्यात आलेली असते. सुरुवातीच्या काळात तरी विद्यार्थ्यांना भाषा शिकवण्यासाठी मातृभाषेसारखं दुसरं उत्तम साधन नाही!

दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये. . .

अनुक्रमणिका

३५
भाषेचा शिक्षक

ज्याला इतर काही काहीच जमत नाही तो (बिचारा) शिक्षक होतो आणि त्यातही ज्याला गणित, शास्त्र वगैरे सारखे (खाजगी शिकवणीच्या दृष्टीनं महत्त्वाचे) विषय (ही) जमत नाहीत तो शेवटी भाषेचा शिक्षक होतो, असा आपल्या समाजाचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे भाषा हा विषय कोण शिकवणार, हा प्रश्न शाळेत तरी फारसा अवघड नसतो. ज्यांना पुरेसं काम नाही किंवा गणित, शास्त्र वगैरे खास विषय ज्याला शिकवता येत नाहीत अशांना भाषा शिकवण्याचे तास दिले जातात.

भाषा शिकवायची म्हणजे त्यात असं काय मोठं असतं? पुस्तकात सगळं असतंच! (नाहीतर गाइडात तरी असतं) . पाठ्यपुस्तकांमध्ये (सोप्या) शब्दांचे अर्थ दिलेले असतात, (खरोखर अवघड असलेल्या शब्दांचे अर्थ द्यायला संपादक आणि मंडळी सोयीस्करपणे विसरलेली असतात!) , प्रश्न असतात (नि गाइडात त्यांची उत्तरं असतात!) शिक्षकांनी काही करण्याची गरजच नसते. त्यांनी वर्गात जाऊन मुलांकडून पुस्तकातले धडे वाचून घ्यायचे, किंवा फारतर (म्हणजे 'गुर्जी'नवीन असतील किंवा किंचित उत्साही वगैरे असतील तर) कधी-मधी आपण स्वत: वाचायचे, झालं! भाषा विषय शिकवणं म्हणजे एकदम सोप्पा प्रकार, तिथे खरं तर काहीच करावं लागत नाही! हे मत अनेकांचं आहे, शाळांशी, शिक्षणक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या, शिकल्या-सवरलेल्या (?) अधिकारी लोकांचंही आहे, हा भाग दुर्दैवाचा असला तरी सत्य आहे! आपल्या सर्व व्यवहारांचा मूलाधार असलेल्या भाषेकडे आपण अक्षम्य दुर्लक्ष करत आहोत ह्याची जाणीवच नसल्यामुळे त्यावर उपाय करण्याचे प्रयत्न अशक्य कोटीतलेच आहेत.

भाषेचा विकास म्हणजे खूप शब्दांचा वापर करणं असा चमत्कारिक गैरसमज बहुसंख्य पालकांबरोबर अनेक शिक्षकांमध्ये नि प्राध्यापकांमध्येही दिसतो. खूप शब्द घोकून किंवा इंग्लिशची डिक्शनरी पाठ करून भाषा सुधारते असं नसतं, मुळीच नसतं. शब्दाचा अर्थ हा त्याच्या उपयोगातून समजून घ्यायचा असतो, त्याच्या विविध छटा सुयोग्य मार्गदर्शनाखाली वारंवार वापरून आत्मसात करायच्या असतात, जिभेवर खेळवायच्या असतात तेव्हा कुठे भाषा येते. हा सर्व विकास अत्यंत जाणीवपूर्वक करणं आवश्यक असतं, तसं न झाल्यास बिचाऱ्या विद्यार्थ्यांची भाषा कायमचीच कच्ची राहून जाते आणि ज्याची मातृभाषा / पहिली भाषा कच्ची राहते, म्हणजे पायाच कच्चा राहतो त्याला आपल्या कच्च्या पायावर कसलीच उभारणी करता येत नाही.

आज सुदैवानं कांही संस्थांमधून भाषेच्या शिक्षणाबाबत शास्त्रीय दृष्टीकोण चांगल्या प्रकारे विकसित होऊ लागला आहे. उदाहरणार्थ हैद्राबादच्या सेन्ट्रल इन्स्टीट्यूट ऑफ इंग्लिश ॲंड फॉरिन लॅंग्विजिस ह्या संस्थेत भाषा आणि वाङ्मय ह्यांच्यातला भेद स्पष्ट करून अभ्यासक्रम बनवलेले आहेत. त्यामुळे टीचिंग ऑफ फ्रेंच अज़ अ फॉरिन लॅंग्वेज'सारखे अनेक भाषांचे अभ्यासक्रम तिथे पद्धतशीरपणे चालतात. अशा अभ्यासक्रमांचा फायदा प्रथम तिथे येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षणार्थींना मिळतो आणि नंतर स्वाभाविकपणे त्यांच्या विद्यार्थ्यांना मिळतो.

हैद्राबादच्या संस्थेत गेली वीस-पंचवीस वर्षं अशा प्रकारचे अभ्यासक्रम चालू आहेत; पण गमतीची गोष्ट अशी की भारतातल्याच इतर विद्यापीठांमधून मात्र भाषा आणि वाङ्मय ह्यांची गल्लत अजूनही चालूच आहे. ज्यांना भाषा शिकवण्याचा कसलाही अनुभव नाही अशी माणसं भाषा शिकवण्याचा उद्योग करतात नि

परिणामत:त्या विषयाचं नुकसान करतात आणि तिथे आलेल्या विद्यार्थ्यांचंही. अगदी एखादा विद्यापीठातला विद्वान प्राध्यापक घेतला की तो वर्षानुवर्ष मराठी वाङ्मयाचं अध्यापन उत्तम प्रकारे करतो आहे अशा प्राध्यापकाला मराठी भाषा शिकवण्याचं काम दिलं तर ते योग्य असेलच असं नाही. त्याची मातृभाषा मराठी असली, त्याचं मराठी चांगलं असलं तरी त्याला मराठी भाषा शिकवता येईल असं नाही. (भाषा शिकताना वाङ्मयाचा, काही चांगल्या कलाकृतींचा उपयोग करणं वेगळं नि केवळ वाङ्मयाचं अध्यापन करणं वेगळं असतं) भाषा शिकवण्यासाठी विशेष शिक्षणाची, प्रशिक्षणाची गरज असते. तशा विशेष प्रशिक्षणाशिवाय तो मराठी भाषेचा शिक्षक होऊ शकत नाही. ह्या सगळ्या प्रकारातील विडंबना अशी आहे की आज भारतात बहुतेक ठिकाणी भाषा शिकवण्याचं काम अशाच लोकांच्या हातात आहे की ज्यांना ते मुळातच येत नाही, अगदी प्राथमिक शाळेपासून विद्यापीठ स्तरापर्यंत हीच परिस्थिती आहे! ह्या प्रकारामुळे भाषा विषय म्हणजे माध्यमच कच्चं राहतं नि आपला विद्यार्थी मागे पडतो.

भाषेचा पहिला नि आदर्श शिक्षक म्हणजे आई. प्रसंगी कठोर होणारे आई ज्यांना लाभली असेल ते खरोखर भाग्यवान! उच्चाराची शब्दायोजनेची, आघाताची, सुरयोजनेची-थोडक्यात म्हणजे कसलीही भाषिक चूक झाली तर खपवून न घेणारी आई/आजी /आत्या/काकू/मावशी घरात असेल तर ती खमकी बाई मुलाला ताबडतोब चूक सुधारायाला लावते, योग्य वाक्य त्याच्याकडून घडवून घेते. तिचं हे काम अखंडपणे चालूच असतं. काही घरांतून वडील/आजोबा/काका वगैरे पुरुष मंडळीही मुलांकडून पाठांतर करून घेताना चांगल्या भाषेचे धडे घटवून घेतात. असे तळमळीचे शिक्षक घरातच लाभले तर कोणाचा भाषा विषय कच्चा राहील?

जर्मन महाकवी योहान् अल्फगाड् फॉन ग्यॉटS (Johann Wolfgang von Goethe) ह्यानं आपल्या आत्मचरित्रात दिलेला त्याचा फ्रान्समधला अनुभव लक्षात ठेवण्यासारखा आहे. कायद्याच्या शिक्षणासाठी ग्यॉटऽनं प्रथम फ्रान्सला जायचं ठरवलं कारण त्या काळात श्ट्रास्बुर्कला विद्यापीठ खुपच प्रसिद्ध होतं. ग्यॉटऽ तिथे दाखल झाला नि शिक्षण सुरु झालं. ग्यॉटऽला फ्रेंच भाषा तशी चांगली येत होती पण फ्रेंच लोकांच्या दृष्टीनं त्याचं फ्रेंच कच्चं होतं. काही दिवसातच ग्यॉटऽ ची मोठी पंचाईत व्हायला लागली. त्यानं एखाद्या विषयावर आपल्या प्राध्यापकांशी चर्चा करायचा प्रयत्न केला की ते त्याचं फ्रेंच सुधारायला लागायचे आणि त्यांच्या चर्चेचा मुख्य मुद्दा दूरच राहायचा! प्राध्यापकच नव्हे तर गावात कोणाशीही ग्यॉटऽ बोलायला गेला हेच व्हायचं. साध्या हवापाण्याच्या गप्पांमध्येही फ्रेंच मंडळी ग्यॉटऽच्या भाषेतल्या बारीक-सारीक चुका काढून सुधारत बसत!फ्रेंचांना आपल्या भाषेत कोणीही कसलीही चूक केलेली खपत नाही! ह्या सगळ्या प्रकाराला ग्यॉटऽ शेवटी इतका वैतागला की त्यानं श्ट्रास्बुर्कला नि फ्रेंच भाषेला कायमचा रामराम ठोकला!

फ्रेंचांसारखी जागरुकता आपण निदान आपल्या आणि आपल्या स्वत:च्या नि आपल्या मुलाबाळांच्या भाषेबाबत, किमान आपल्या मातृभाषेबाबत दाखवली तर?

अनुक्रमणिका

३६
भाषांचं अध्ययन

भाषा शिकण्याबाबत आणि शिकवण्याबाबत बऱ्याचदा चर्चा होतात पण त्या सामान्यतः तात्त्विक स्वरूपाच्याच असतात (कारण त्या चर्चांमध्ये भाग घेणाऱ्या आपल्याकडच्या तज्ज्ञांना भाषा शिकण्याचा फारसा अनुभव नसतो नि पाश्चात्त्यांना तर मुळीच नसतो) त्यामुळे भाषा शिकणाऱ्या/ शिकू इच्छिणाऱ्याला त्यातून कसलंच मार्गदर्शन मिळत नाही. भाषा येणं म्हणजे काय तर त्याला किमान चार कौशल्य येणं- बोललेलं कळण, वाचून कळणं, लिहून आपले विचार व्यक्त करता येणं आणि बोलून आपले विचार व्यक्त करणं. पण हे सगळं साध्य करण्याचा मार्ग कोणता? योग्य मार्ग कोणता? तो एकच आहे की अनेक आहेत? अनेक असतील तर त्यांतला अधिक चांगला कोणता?- भाषा शिकणाऱ्याच्या मनात हे आणि असे अनेक प्रश्न डोकावत असतात, क्वचित त्याला भंडावून सोडतात.

भाषा शिकणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांनी एक गोष्ट डोक्यात पक्की ठेवायला पाहिजे ती म्हणजे भाषा शिकणं हा प्रकार इतर विषय शिकण्यापेक्षा खूप वेगळा आहे. इतर विषय शिकताना आपण आपल्याला माहीत असलेल्या शब्दांच्या आधारानं नावेन कल्पना समजून घेत असतो. तो नवा विषय शिकण्याचं माध्यम आपल्याला चांगलं अवगत असतं. उदाहरणार्थ 'मागणी' किंवा 'पुरवठा' अशा आर्थिक कल्पना समजून घेताना आपण 'मागणी म्हणजे पैसे देऊन विकत घेण्याची कुवत असलेल्याची इच्छा-' असं आपल्याला ज्ञात असलेल्या शब्दांच्या आधारानं शिकतो. पण एखादी नवी भाषा शिकताना पहिल्या अवस्थेत तरी असं होतं की कल्पना आपल्याला ठाऊक असते पण तो शब्द परका असतो नि बऱ्याचदा लिपीही परकी असते! फळा म्हणजे काय, तो कशासाठी असतो, कसा तयार करतात वगैरे भाराभर माहिती आपल्याला असली तरी 'ब्लॅकबोर्ड' (इंग्लिश) , 'टाऽफल्' (जर्मन) , 'ताब्लो'(फ्रेंच) , 'दस्का' (रूसी) हे शब्द पूर्णतः नवीन आहेत नि भाषा शिकायची म्हणजे शब्दांना पर्याय नसतोच; ते पाठ करणं, मुखोद्गत करणं, जिभेवर खेळवणं अत्यंत महत्त्वाचं असतं. त्याला अमुकच का म्हणतात तमुक का नाही म्हणत असा प्रश्न भाषा शिकणाऱ्यानं विचारायचा नसतो! इतर विषय शिकताना आपण जितका अधिक चौकसपणा दाखवू, का, कसं, केव्हा वगैरे प्रश्न उपस्थित करून आपली जिज्ञासा पूर्ण करून घेऊ तितकी आपली प्रगती चांगली होते; पण भाषा शिकताना प्रश्न न विचारता जे आहे, जसं आहे तसं स्वीकारण्याची, आत्मसात करण्याची पात्रता असेल तरच प्रगती होते! प्रश्न विचारात बसणारा लौकरच कंटाळून अभ्यासक्रम सोडून जातो! जिज्ञासा अवश्य हवी पण का म्हणून उलट तपासणी नको.

अलीकडच्या बऱ्याच पद्धतींमध्ये (?) पाठांतर करण्याची गरज नाही, पाठांतर करू नये असं शिक्षकच (?) सांगतात. पाठांतर करायच नाही तर मग नवीन शब्द कसे येणार? त्याला त्यांचं उत्तर असतं की पुनः पुनः पुस्तक वाचा, सराव करा. ह्याचा अर्थ तोच ना? आख्खं पुस्तक किंवा संपूर्ण धडा दहादा वाचण्यापेक्षा तो धडा नीट समजून घेऊन त्यातले नवे शब्द पाठ करणं अधिक सोयीचं नाही का? आणि शेवटी महत्त्वाचा भाग म्हणजे तुम्ही धडा दहादा वाचलात की त्यातले शब्द पाठ केलेत हे नसून तुम्हाला शब्द येतात की नाही, त्यांचा उपयोग नीट करता येतो की नाही हे आहे! आणि जोपर्यंत आपल्याला एखाद्या भाषेतले किमान दीड-दोन हजार शब्द चांगले येत नाहीत तोपर्यंत आपल्याला त्या भाषेत नीट बोलता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा भाषा येण्यासाठी शब्दभांडार हवंच. म्हणून भाषा शिकणाऱ्यानं एखादं चांगलं पाठ्यपुस्तक घेऊन त्याच्या आधारानं आपलं शब्दभांडार वाढवायला पाहिजे.

भाषा शिकणाऱ्याच्या दृष्टीनं दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शब्दांचा योग्य वापर कसा करायचा हे शिकणं, थोडक्यात म्हणजे व्याकरण शिकणं. अलीकडच्या बहूतेक तथाकथित पद्धतींमध्ये व्याकरण शिकवण्यावर जणू बंदीच घातलेली असते! पोपटपंची करणाऱ्या शिक्षकांनाच बहुतेक वेळा ते माहीत नसतं ! मग तथाकथित पद्धतीचं नाव सांगून ते आपलं अज्ञान झाकून मोकळे होतात, 'लर्न दीज एक्स्प्रेशन्स बाय हार्ट्!' असं म्हणून ते मोकळे होतात. (शब्द पाठ करायला विरोध करणारे अशा चुकीच्या ठिकाणी मात्र मठ्ठपणानं पाठांतर करण्याचा बदसल्ला देतात.) वास्तविक व्याकरण हा पाठ करण्याचा भाग नाही तर शिक्षकांनी समजून सांगण्याचा आणि विद्यार्थ्यांनी समजून घेण्याचा भाग आहे. शिक्षक पद्धतशीरपणे हा भाग टाळतात, पण विद्यार्थ्यांनी तो आग्रहानं जाणून घेतला पाहिजे. आपल्या शाळेतले, महाविद्यालयातले किंवा खाजगी क्लासमधले शिक्षक व्याकरण समजावून देत नसतील तर जिज्ञासूंनी शक्य असेल तिथे जाऊन, जाणत्यांना शरण जाऊन त्यांच्याकडून व्याकरण समजून घ्यावं! एखाद्या भाषेत स्वयंपूर्ण होण्याचा तो एकमेव, खात्रीशीर उपाय आहे. 'सांगितलेली अक्कल नि बांधलेली शिदोरी उपयोगाची नाही' हे आपण पक्कं लक्षात ठेवलं पाहिजे. शिक्षकांकडून पाच-पन्नास भाकरी घेण्यापेक्षा ती बनवण्याची रीत शिकून घेणं उपयोगाचं असतं; म्हणून व्याकरण शिकायच असतं.

भाषा शिकायला सुरुवात करण्यापूर्वी जर आपल्याला ठरवता आलं की आपण कशासाठी भाषा शिकणार आहोत, आपल्याला नक्की कोणकोणती कौशल्यं मिळवायची आहेत, तरआपल्याला सुरवातीपासूनच योग्य त्या मार्गाचा अवलंब करता येईल. भाषेतली किमान चार कौशल्यं मिळवणं उत्तमच ; पण आपल्याला नक्की काय पाहिजे हे प्रथम निश्चित करावं, कारण ही चारही कौशल्यं मिळवण्याचे प्रयत्न वेगवेगळे असतात'रोज टाईम्सचा अग्रलेख वाचत जा म्हणजे उत्तम इंग्लिश बोलता येईल!'असं छातीठोकपणानं सांगणारी (नव्हे, 'मार्गदर्शन' करणारी) माणसं आपल्याला आजही दिसतात आणि अशा प्रकारे नित्यनेमानं अग्रलेख वाचणारी पण इंग्लिश बोलता न येणारी माणसंही आपल्याला शेकड्यानं भेटतात! ह्याचं कारण म्हणजे भाषेतली चार कौशल्यं एका दगडानं साध्य होत नसतात. ह्यातल्या प्रत्येक कौशल्यासाठी वेगळे प्रयत्न लागतात. ज्याप्रमाणे तुम्ही धावायचा उत्तम सराव केलात तर तुम्हाला चांगलं धावता येईल पण उत्तम धावता येतं म्हणून तुम्हाला उत्तम पोहोता येईल असं नाही! उत्तम पोहोता येण्यासाठी तुम्हाल स्वतंत्रपणे पोहायला शिकावं लागतं, नंतर सराव करावा लागतो, भाषेचंही असंच आहे.

एक शिक्षक एक विद्यार्थी ही पद्धत सामान्यात: उत्तम असली तरी भाषा शिकण्यासाठी मात्र योग्य नाही कारण भाषा ही समूहाची असते, त्यामुळे एखादी खाजगी शिकवणी ठेवून भाषा शिकू नये. जिथे चार विद्यार्थी आहेत, आपल्याला अनेकांच्या मुखातून भाषा ऐकण्याची सोय आहे, आपल्यालाही बोलायची संधी मिळणार असते, जिथे शिक्षक आपल्याला प्रश्न विचारतात (केवळ व्याख्यान देत नाहीत) अशा ठिकाणी भाषा शिकावी.

आपण आपल्या गरजा, आपली कुवत, आपल्याकडे असलेला वेळ, आणि उपलब्ध साधनं ह्यांचा सुवर्णमध्य काढला तर एखादी नवीन भाषा शिकणं अवघड नाही.

अनुक्रमणिका

३७
डूडन् प्रामाण्य

मराठी शुध्दलेखन म्हणजे नुसता सावळा गोंधळ आहे असं सर्वसाधारण मराठी माणसाचं (ऐकीव माहितीवर आधारित) ठाम मत असतं; पण जर्मनसारख्या आजच्या एका अत्यंत पुढारलेल्या देशाच्या समृद्ध राष्ट्रभाषेची शुध्दलेखनाची स्थिती जेमतेम शंभर वर्षांपूर्वी काय होती हे आपण बघितलं तर आपल्याला नक्की वाटेल की आपल्या मराठीची स्थिती तितकी वाईट कधीच नव्हती आणि आजही ती तितकी वाईट नाही!

जर्मन ही भाषा तशी खूप जुनी असली (म्हणजे मराठीएवढीच) तरी जर्मनी हा देश मात्र तसा नवा आहे! नवा म्हणजे किती? जेमतेम सव्वाशे वर्षाचा! मध्य युरोपात जर्मन भाषिकांची संख्या बऱ्यापैकी आहे, (जर्मन भाषिकांची आजची लोकसंख्या सुमारे दहा कोटी आहे) तरी आपलं स्वतंत्र राष्ट्र नाही ह्याचं दु:ख जर्मनांना फार काळ सहन करावं लागलं. तसं ऑस्ट्रियाचं (पवित्र रोमन) साम्राज्य होतं पण त्यात जर्मनांची संख्या कमीच होती.

स्वतंत्र जर्मनीचं स्वप्न तिथल्या जनतेनं प्रदीर्घ काळ उराशी बाळगलं होतं. मध्य युरोपात अनेक छोटी-छोटी जर्मन भाषिक राज्यं होती. अशा सर्वांना एकत्र आणण्याचं महान कार्य प्रॉइसन संस्थानाच्या प्रधानमंत्र्यानं म्हणजे बिस्मार्कनं १८७१ मध्ये पूर्ण केलं. फ्रान्सच्या नाकावर टिचून जर्मनीच्या निर्मितीचा हा कार्यक्रम पॅरिसजवळच्या व्हेर्सायमध्ये १८ जानेवारी, १८७१ ला साजरा करण्यात आला!

लष्करी बळाच्या नि मुत्सद्देगिरीच्या सहाय्यानं देश बनवणं तुलनेनं सोपं असतं, पण एकदा देश बनल्यावर त्यातल्या सर्व घटकांना एकत्र ठेवणं तितकं सोपं नसतं. वर्षानुवर्ष ज्यांनी अस्मितेच्या नावाखाली आपलं वेगळेपण जपण्यातच धन्यता मानलेली असते अशांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणणं म्हणजे तारेवरची कसरत असते. ह्या कसरतीतला पहिला भाग होता भाषेचा.

भाषा थोड्याथोड्या अंतरावर बदलते हे खरं असलं तरी त्या बदलांना आपण बोली म्हणून स्थान देतो पण प्रत्यक्षात मात्र महत्त्वाच्या, व्यापक भाषिक देवाणघेवाणीसाठी आपण प्रमाण भाषेचा उपयोग करत असतो, पण जर्मन भाषिक राज्यांमध्ये प्रत्येकानं आपलं वेगळेपणच कुरवाळलं होतं, प्रमाण मानलं होतं; त्यामुळे १८७१ मध्ये जर्मनी हा देश अस्तित्वात आला तेव्हा जर्मनीत जर्मन(शुध्द) लेखनाच्या अनेक तऱ्हा अस्तित्वात होत्या! (त्या तऱ्हांना 'शुध्लेखनाच्या पद्धती' म्हणणं योग्य ठरणार नाही)

जर्मन भाषेतलं लेखन म्हणजे विलक्षण गोंधळ असंच समीकरण त्या काळी तयार झालं होतं! जर्मन लेखनातली ही अराजकता शेवटी इतकी विकोपास गेली की विल्हेल्म (दुसरा) ह्या राजानं १८९० मध्ये बेर्लीनहून शेवटी एक आदेश काढला की 'किमान एकाच शाळेतल्या विद्यार्थ्यांनी तरी एकाच प्रकारे लेखन करावं! एकाच शाळेत अनेक प्रकारचं लेखन होऊ नये!' आज अत्यंत हास्यास्पद वाटणारा हा आदेश तिथल्या शुध्दलेखनाची तत्कालीन स्थिती किती भयंकर होती हे कळायला पुरेसा आहे.

परिस्थिती अशी होती की शाळेतला प्रत्येक विद्यार्थी आपल्या 'पद्धतीनं' (?) लिहीत होता, आता त्या सर्वांनी एकाच प्रकारे लेखन करायचं म्हणजे नक्की कसं करायचं?सर्वांनी सारखं लिहायचं तर ते सारखं रूप कसं असावं, कोणतं असावं हे सांगणारं एखादं तरी साधन उपलब्ध हवं ना?

राजाच्या लेखानाबद्दलच्या आदेशानं एका मुख्याध्यापकांच्या परिश्रमाचं चीज झालं. प्रमाणीकरणाबाबत त्यांना एक कल्पना अगोदरच सुचली होती. त्यांनी नेहमीच्या वापरातले शब्द गोळा करून ते योग्य प्रकारे लिहून काढले, थोडक्यात म्हणजे एक यादी तयार केली. जर्मन शब्दांचं लेखन कसं असावं हे सांगणारी, दाखवणारी —(रेश्ट्श्राइबुङ् डेऽर् डॉइचन् श्प्राखऽ - Rechtschreibung der deutschen Sprache) जर्मन भाषेच्या शुद्धलेखनाची-प्रमाणीकरणाची ती पहिली यादी, शुध्दलेखनाचा हा पहिला कोष होता आणि ते काम अत्यंत आस्थेनं आणि चिकाटीनं करणाऱ्या कल्पक मुख्याध्यापकांचं नाव होतं कोन्राट डूडन् (१८२९-१९११) . कोन्राट डूडनचा हा पहिला कोष १८७२ मध्ये प्रकाशित झालेला होता, त्याला आता राजमान्यता मिळाली होती. (इथे लक्षात घेण्यासारखा महत्त्वाचा एक मुद्दा असा आहे की राजानं विद्वानांच्या कामाला मान्यता दिली, सरकारनंच आपले विद्वान नेमून करून घेतलं नाही.)

कोन्राट् डूडन् स्वतः एवढ्यावरच थांबला नाही. डूडन् ही आता एक प्रकाशन संस्था झाली होती. त्यानं आपलं काम अधिक गतीनं अधिक पद्धतशीरपणे चालूच ठेवलं, अधिक व्यापक केलं आणि त्यानं चिकाटीनं केलेल्या कामांमधून निर्मिती झाली ती अनेकविध कोषांची. शब्द कसा लिहावा हे सांगणारा ‘प्रमाण’ लेखनाचा-शुद्धलेखनाचा कोष करून डूडन्नं पुढे अर्थाचा विचार करणारा कोष बनवला. शब्दार्थानंतर व्याकरणकोष, शैलीकोष, व्युत्पत्तिकोष, समानार्थी-विरूध्दार्थी शब्दकोष-असे एक ना अनेक प्रकारचे कोष जर्नम भाषेत संशोधित आणि संपादित झाले. जर्मन भाषा नित्यनेमानं अधिकाधिक समृद्ध होत होती. चित्रकोष (बिल्ट्-व्यॉर्टर्-बूख् Bildworterbuch) हा एक नवा कोषप्रकार डूडन्नं विकसित करून जागतिक कोषसाहित्याला एक नवी दिशाच दिली.

डूडनचं कार्य जर्मन भाषेच्या दृष्टीनं इतकं महत्त्वाचं आहे की आज लेखन, व्याकरण, शैली वगैरेबाबत कोणालाही कोणतीही कसलीही शंका आली तर खात्री करून घेण्यासाठी डूडन् बघितला जातो आणि डूडन् काय म्हणतो ते प्रमाण मानलं जातं !

डूडन् म्हणजे कोष/ शब्दकोष असंच एक समीकरण झालेलं आहे कारण युरोपात अनेकांना डूडन् ह्या जर्मन शब्दाचा अर्थ डिक्शनरी आहे असंच वाटतं!

कोन्राट डूडन्नंसारखी प्रतिभावान, कर्तबगार माणसं आपल्याकडेही झाली. अशी वेगळी, आभाळाएवढी माणसं जन्माला घालताना निसर्ग एखाद्या प्रदेशावर अन्याय करत असेल असं आजपर्यंत इतिहासावरून तरी वाटत नाही! (अन्याय होतो तो त्या त्या समाजाकडून!) पण कोन्राट डूडन् भाग्यवान कारण त्याचं कार्य त्याच्या लोकांनी पुढे नेलं त्याच्या कार्याचं सातत्य टिकवलं. आज शंभर वर्षानंतरही डूडन् ही कोषवाङ्मयातली जागतिक कीर्तीची महत्त्वाची प्रकाशन संस्था आहे.

कोनात डूडन्प्रमाणेच ब्रोक्हाउस्, लाङेन्शाइट् हेही नशीबवान. शब्दकोष, ज्ञानकोष आणि मुख्यत: द्वैभाषिक कोषांच्या क्षेत्रात त्यांनी केलेलं कार्य महत्त्वाचं तर आहेच पण आकाराच्या दृष्टीनंही अफाट आहे नि मुख्य म्हणजे त्यांनाही अत्यंत लायक वारसदार लाभले. त्यांचं कार्य त्यांच्या वंशजांनी सातत्यानं पुढे नेलं. हे त्यांचं आणि त्यांच्या जर्मन भाषेचं भाग्य! (लाडेन्शाइट ह्यांची पणती आता त्यांच्या प्रकाशन संस्थेची प्रमुख आहे.)

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातही डूडन्, ब्रोक्हाउस्, लाडेन्शाइट ह्यांच्यासारखी माणसं झाली, आजही आहेत, त्यांच्या कार्याला डोळस लोकाश्रय लाभून ती सगळी माणसं भाग्यवान व्हावीत आणि आपलं मराठी कोषवाङ्मय सर्वार्थानं विशाल, समृद्ध करण्याचं कार्य सातत्यानं होत राहावं हीच इच्छा !

अनुक्रमणिका

३८
ज़ीप्स्-प्रामाण्य

उच्चारण कोष म्हटलं की आपल्याकडच्या इंग्लिशच्या (काही) अध्यापक-प्राध्यापकांना डॅनियल जउन्जची ‘इङ् लिश् प्रनाउन्सीङ् डिक्शनरि’ माहीत असते. सुदैवानं आपल्याकडे ‘सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश ॲड फॉरिन लॅंग्वेजिस’ सारख्या संस्थांमधून सुरुवातीची बरीच वर्षं ह्या उच्चारकोषाचा पाठपुरावा केला जात असे. त्यामुळे इंग्लिशच्या प्रमाण (RP) उच्चारांबाबत निदान तिथे जाऊन आलेल्यांना तरी बऱ्यापैकी जाणीव झालेली आहे.

डॅनियल जउन्ज्च्या ‘एव्हरीमॅन्स इङ्लिश् प्रनाउन्सिङ् डिक्शनरि’च्या कितीतरी अगोदर जर्मन भाषेसाठी उच्चारण कोष निर्माण झाले. उच्चारण कोष निर्माण झाले. त्यांच्या निर्मितीची कारणं काय होती, त्यांची पार्श्वभूमी काय होती काय होती वगैरे गोष्टी जाणून घेणं निश्चितच उद्बोधक ठरेल.

कोन्राट डूडन् ह्यानं जर्मन भाषेच्या शुद्धलेखनाचा शास्त्रशुद्ध पाया घालण्याचं महान कार्य केलं आणि त्याच सुमारास शुद्धालेखनाप्रमाणेच शुद्धउच्चारणासाठीही त्याच तोलामोलाचं काम होत होतं. त्या कामाची सुरुवात तशी अगोदरच झालेली होती पण त्यावर कळस चढवला तो टेओडर् ज़ीप्स् (Theoder Siebs) ह्यानं. जर्मन भाषेच्या उच्चारणाचं महा-कठीण काम त्यानं मोठया चिकाटीनं केलं होतं.

जर्मनी नावाचा देश १८७१ मध्ये अस्तित्त्वात आला तरी जर्मन भाषिक छोटी-मोठी राज्यं मात्र संपूर्ण मध्य युरोपात पसरलेली होती. आजचा जर्मनी, ऑस्ट्रिया, स्विटझरलंड, झेकिया, स्कोवाकिया, आजच्या पोलंडचा काही भाग, रूमेनियाचा काही भाग इत्यादी सारा प्रदेश जर्मन भाषिकच होता. ह्या अस्ताव्यस्त पसरलेल्या भागांमध्ये अनेक बोली असणं स्वाभाविकच होतं. जर्मन भाषेच्या बोलींमध्ये तर इतके प्रकार नि भेद होते की आल्पस् पर्वतातल्या खूपशा भागांतल्या लोकांची तथाकथित जर्मन बोली मातृभाषा म्हणून बोलणाऱ्यांना शाळेत जायला लागल्यावर एखादी परदेशी भाषा शिकावी त्याप्रमाणे शिकल्या-सावरलेल्या लोकांची भाषा शिकायला लागायची (अजूनही लागते!)

बोलींमध्ये सामान्य माणसाचं कुठेही, काहीही अडत नसतं कारण सर्वसामान्य माणूस आपल्या पंचक्रोशीबाहेर फारसा कुठे जातच नसतो. पण ह्या सर्व जर्मन भाषिक प्रदेशांना जोडणारे, त्यांच्या सतत संपर्कात असणारे असे काही सेतू त्या काळातही मध्य युरोपात होते. त्यातला एक म्हणजे शिकल्या-सावरलेल्या, विद्वान लोकांचा एक वर्ग आणि दुसरा, अधिक महत्त्वाचा, सामान्य जनतेशी अतिशय जवळचं नातं असणारा वर्ग - तो म्हणजे नाटकवाल्यांचा.

एखाद्या देशात किंवा प्रदेशात अनेक बोली असल्यामुळे सामान्य माणसाचं काही अडत नसलं तरी ह्या नाटकमंडळींची मात्र फारच पंचाईत होत असे. आता ही मंडळी आपल्या वेगवेगळ्या नाटकांचे खेळ करत-करत आपल्या भल्या मोठ्या कुटुंबासह गावोगावी भटकणार; मग प्रत्येक गावात गेल्यावर त्या गावच्या भाषेत-बोलीत नाटक करायचं म्हणजे आली की नाही पंचाईत! ह्या नाटक मंडळींनी किती भाषा/बोली येणारी माणसं आपल्या पदरी बाळगायची? कोणत्याही नाटक कंपनीला ही गोष्ट परवडणारी नव्हती आणि असा खेळ कोणत्याही समाजाला परवडणारा नसतो!

अनुक्रमणिका

समाजाची ही व्यावहारिक अडचण ओळखून समाजाच्या हिताची(च) पर्वा असणाऱ्यांनी म्हणजे विद्वानांनी त्यावर एक तोडगा पूर्वीच काढलेला होता. (असा तोडगा प्रत्येक जाणत्या समाजात काढला जात असतो.) तो तोडगा म्हणजे प्रमाण भाषेचा. जर्मन भाषेच्या अनेक बोली अस्तित्त्वात होत्या, वापरात होत्या तरी प्रमाण भाषा म्हणून विद्वानांनी एक शैली विकसित केली होती, ती शैली होख़्डॉइच् (Hochdeutsch) ह्या नावानं ओळखली जाते.

सर्वांना कळेल आणि मान्य होईल अशी शैली विकसित झाल्यामुळे नाटकवाल्यांची फार मोठी सोय झाली. (आणि परिणामत: 'प्रमाण' जर्मन भाषेचा प्रसार झाला.)

आपल्याला आढावा घेताना सहज, सरळ वाटणारी ही प्रमाणीकरणाची प्रक्रिया प्रत्यक्षात मात्र अतिशय अवघड होती!

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला जर्मन भाषेचा महाकवी आणि नाटककार योहान् वॉल्फगाङ् फोन् ग्यॉटऽ (Johann Wolfgang von Goethe) ह्यानं मोठ्या हिरिरीनं एक मुद्दा मांडला की जर्मन भाषेच्या उच्चारांचं प्रमाणीकरण होणं आवश्यक आहे की ज्याचा उपयोग नाटक मंडळींना होऊ शकेल. नटांचे उच्चार प्रमाणित झाले की नाटकाच्या प्रयोगांच्या दृष्टीनं फार मोठी सोय होईल आणि प्रेक्षकांचीही सोय होईल. ग्यॉटऽसारख्यांचा पुढाकार असल्यामुळे त्या काळच्या म्हणजे अभिजात काळच्या जर्मन भाषेच्या प्रमाणित उच्चारांचा एक कोष विल्हेल्म् फ़िएटोर् (Wilhelm Vietor) ह्यानं बनवला. जर्मन भाषेतला हा पहिला उच्चारणकोष म्हणता येईल. Die Aussprache der Schriftdeutschen हा उच्चारणकोष इ. स. १८८५ मध्ये प्रथम प्रकाशित झाला.

फिएटोरचा उच्चारणकोष प्रकाशित झाला पण त्याचं स्वरूप पाहिजे तितकं सर्वसंग्राहक नव्हतं. त्याचप्रमाणे जर्मन भाषेच्या संदर्भातला आणखी एक गमतीचा (म्हणजे आपल्या दृष्टीनं, पण त्यांच्या दृष्टीनं अत्यंत गंभीर) भाग म्हणजे प्रमाण भाषा कोणती ह्या मुद्दयावर उत्तर जर्मन आणि दक्षिण जर्मनी ह्यांच्यात नेहमीच भांडणं हित असत/होतात. दोघांच्या दृष्टीनं तो अस्मितेचा प्रश्न असतो!

ह्या पार्श्वभूमीवर प्रमाणित उच्चारांसाठी मध्य जर्मनीत एक समिती स्थापन झाली, प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ टेओडर् ज़ीप्स (Theoder Siebs) हे त्या समितीचे अध्यक्ष होते. केवळ नाटकवाल्यांसाठी बनवलेल्या उच्चारणकोषाचं स्वरूप त्यांनी खूपच व्यापक केलं आणि त्यांचा सुधारित उच्चारणकोष डॉइच ऽब्यूनन्ऽप्राखऽ (Deutsche Buhnenaussprache) इ. स. १८९५ मध्ये प्रकाशित झाला. ज़ीप्स्चा हा उच्चारणकोष इतका व्यापक, सर्वसंग्राहक होता की मध्य युरोपातल्या सर्व जर्मन भाषिकांनी /राष्ट्रप्रमुखांनी (थोडक्यात म्हणजे जर्मनी, ऑस्ट्रिया, स्विटझरलंड ह्या देशांनी) तो प्रमाण मानायला सुरुवात केली. अल्प काळातच ज़ीप्स्चा चं नाव झालं नि उच्चारणाच्या क्षेत्रात 'ज़ीप्स् -प्रामाण्य' सुरु झालं.

आपल्या भाषांचा विचार केला तर असं दिसतं की संस्कृत भाषेसाठी उच्चारणकोषाची गरज मुळीच नाही कारण उच्चार आणि लेखन ह्यांचं नातं शंभर टक्के आहे पण इतर भाषांची परिस्थिती तशी नाही. (विश्वनाथ नरवण्यांच्या भारतीय व्यवहार कोशावर नजर टाकली तरी ही गोष्ट ध्यानात येईल) . सर्व आधुनिक भारतीय भाषांसाठी उच्चारणकोषांची आवश्यकता आहे, तरीही त्याची कल्पना आपल्याकडे

अजूनही नाही. खुद्द मराठीचा विचार केला तर त्याची गरज आहे, पण त्याबाबत कसलाच विचार झालेला दिसत नाही.

मराठीच्या संदर्भात च, छ, ज, झ, ह्या अक्षरांबाबत खुद्द मराठी भाषिक ही खूप गोंधळ करतात. ह्या अक्षरांच्या लेखनात सुधारणा करणं आवश्यक आहे. श आणि ष चे उच्चार भिन्न आहेत. संस्कृतातल्या ह्या दोन अक्षरांचे वेगळे उच्चार मराठीत आज प्रत्यक्षातही टिकून आहेत पण बहुसंख्य लोक ह्या दोनही अक्षरांचा उच्चार सारखाच करतात. त्यांच्या वेगळेपणाची जाणीव मुलांना लहानपणापासूनच करून दिली तर ‘ष’चा वैशिष्ट्यपूर्ण उच्चार आपण अजूनही वाचवू शकू! तेव्हा एखादा चांगला उच्चारणकोष बनवणं ही आपल्या मराठीची एक महत्त्वाची गरज आहे ह्याची आपण प्रथम जाणीव करून घेऊया!

अनुक्रमणिका

३९

द्वैभाषिक शब्दकोष

भाषेच्या शिक्षणात शब्दकोषाचं महत्त्व काय आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही असं म्हणून पुढे बोलायला हरकत नसावी पण वस्तुस्थिती तशी नाही. त्यांचं महत्त्व आहे वगैरे गोष्टींबाबत सर्वांचं एकमत दिसून आलं तरी प्रत्यक्षात आपण म्हणजे मराठी भाषिकांनी त्याबाबत काही भरीव कार्य केलेलं नाही ही वस्तुस्थिती आहे.

भारतातल्या इतर भाषांमध्ये ह्या संदर्भात परिस्थिती वाईटच आहे. इतर भाषांची दयनीय स्थिती पाहून आपली छाती अभिमानानं फुगते नि असं वाटतं की अरे वा, मराठीत बरंच काही झालेलं दिसतंय! पण हा अभिमान क्षणभर टिकू शकतो कारण तो तितकासा खरा नाही म्हणजे खोटाच आहे.

द्वैभाषिक कोषांची गरज भासणं हाच खरं तर एखाद्या समाजाच्या विकासातला एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. दुसरी भाषा शिकावी, ती आपल्याला चांगली यावी म्हणून प्रयत्न करताना शब्द्कोषांसारखा उत्तम साथी नाही. त्याची उपयुक्तता पटवून देण्याची वेळ येत असेल तर त्यावरून समाज गाढ झोपलेला आहे, त्याला उठायची इच्छा झालेली नाही एवढंच सिद्ध होतं. द्वैभाषिक कोषांबाबतची समाजाची गरज दुहेरी असते, उदाहरणार्थ: इंग्लिश शिकणाऱ्याला इंग्लिशमध्ये काय आहे हे समजून घेण्यासाठी इंग्लिश-मराठी शब्दकोषाची गरज आहे हा एक भाग, ही त्या समाजाची पॅसिव्ह गरज आहे; पण आपल्याला काय म्हणायचं आहे हे इंग्लिश माणसाला चांगल्या प्रकारे किंवा वेळप्रसंगी ठणकावून सांगता यावं हीसुध्दा त्याची गरज असते आणि त्यासाठी हवा असतो एखादा चांगला मराठी-इंग्लिश शब्दकोष. हा मुद्दा लक्षात घेऊन विचार केला तर काय दिसतं?

इंग्लिश-मराठी असे शब्दकोष महाराष्ट्रात आज संख्येनं बरेच आहेत. कोषसाहित्यात अग्रेसर असलेल्या ऑक्सफर्डसारख्या नावाजलेल्या संस्थेनं सुध्दा आपलं जाडजूड प्रकाशन मध्यंतरी बाजारात आणलं (त्याची उणीदुणी काढण्याचं संशोधनही महाराष्ट्रात तातडीनं झालं, त्यामुळे आता त्याची उजळणी नको!) पण मराठी-इंग्लिश शब्दकोषांची स्थिती काय आहे? कँरे, मोल्सवर्थ वगैरे मंडळींनी संपादित केलेले मराठी-इंग्लिश शब्दकोष हे इंग्लिश माणसाला उपयोगी पडावेत म्हणून बनवलेले आहेत ही गोष्ट आपल्याकडची मंडळी लक्षातच घेत नाहीत नि मग होतो तो केवळ धंदा. कारण कोणाला रॉयल्टी देण्याचा प्रश्न नसतो. त्यांची पुनर्मुद्रणं होतात. पण असं कारणं म्हणजे आपल्याकडे मुळातच कमी असलेल्या साधन-संपत्तीचा अक्षम्य अपव्यय कारणं आहे.

मराठी भाषिकांना उपयोगी पडावेत म्हणून बनवलेले आजपर्यंतचे द्वैभाषिक कोष म्हणजे केवळ याद्या आहेत असंच म्हणावं लागेल, इतके ते सुमार आहेत. सुमारे सात कोटी मराठी भाषिकांचा इंग्लिशशी संबंध येतो, इतक्या लोकांचा संबंध असलेल्या नि समाजात जिला(अवास्तव का असेना पण) मोठ्ठं स्थान दिलेलं आहे अशा भाषेच्या कोषांची ही स्थिती तर मग इतर भाषांच्या कोषांची परिस्थिती काय असणार?!

हिन्दी-मराठी, कन्नड-मराठी, तमिळ-मराठी, गुजराती-मराठी असे काही कोष महाराष्ट्रात झालेले आहेत, प्रकाशित झालेले आहेत. हे कोष मोठ्या संस्थांनी प्रकाशित केलेले असले तरी ते यादी स्वरूपाचेच आहेत, पण मराठीतून इतर भाषेत असलेले कोष ह्याहूनही कमी आहेत म्हणजे मराठी-हिन्दी,

मराठी-कन्नड, मराठी-गुजराती, मराठी-सिन्धी. हे कोष बघितल्यावर लक्षात येतं की द्वैभाषिक शब्दकोष म्हणजे काय, त्याची गरज काय, ते कोणासाठी नि कशासाठी बनवायचे. . . ह्या नि अशा अत्यंत महत्त्वाच्या मूलभूत गोष्टीच संपादकांनी लक्षात घेतलेल्या दिसत नाहीत!

द्वैभाषिक कोष हा मूलतः प्रतिशब्दकोष, प्रतिशब्द देणारा कोष असतो(असावा) . अशा कोषात अपेक्षित असलेला प्रतिशब्द न देता एकभाषिक कोषांत देतात त्या प्रमाणे व्याख्या दिल्यामुळे द्वैभाषिक कोषाची उपयुक्तताच संपते! विनाकारण व्याख्या देऊन(त्याही चुकीच्या) किंवा कसलाही आगापीछा नसलेले संदर्भहीन शब्द एकापुढे एक ठेऊन कोष 'सुसंपन्न' केलेले असतात!

महाराष्ट्रात गेली सुमारे १५० वर्ष फ्रेंच भाषा शिकवली जाते, जर्मन भाषेचं अध्यापन पुण्यात नि हळू हळू इतर भारतात सुरू होऊन आता ८०/८५ वर्षं उलटून गेली, पण ह्या दोन भाषांबाबत मराठीत आजपर्यंत काय काय झालं हा प्रश्न आपल्याला कधीच पडत नाही! समाजानं ह्या भाषांसाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जो खर्च केला त्याचं काय झालं? त्यातून काय निष्पन्न झालं?

भारतात फ्रेंच भाषेचं अध्यापन सुरू होऊन दीडशे वर्षं उलटून गेली नि गंमत म्हणजे फ्रेंच भाषेच्या अध्ययन-अध्यापनाचं मुख्य केंद्र महाराष्ट्र, पण एवढ्या प्रदीर्घ काळात आमच्या अध्यापक-प्राध्यापाकांनी कोणती साधनं निर्माण केली? काय केलं दीडशे वर्षात? (एवढ्या काळात वेगवेगळ्या कारणांसाठी परदेशी/फ्रेंचभाषिक देशांत जाऊन, राहून आलेल्यांची संख्या हजारोंनी भरेल. ह्या लोकांनी साधी प्रवासवर्णनंही लिहिलेली नाहीत!) विद्यापीठ अनुदान मंडळही अनेक नावांनी(?) दर वर्षी लाखो रुपये खर्च करतं, त्यातून नक्की काय होतं/आजपर्यंत काय काय झालं? ह्या सगळ्याचा हिशेब आपणा करदात्याला कधी मिळतच नाही! आपण करदातेही इतके भोळे/भोंगळ/ बेपर्वा आहोत की आपल्याला ह्याची कधी गरज वाटत नाही. आंधळं दळतंय, कुत्रं पीठ खातंय. . .

आता मराठी समाजालाच जेव्हा (केव्हा) विकासाची खरी-खुरी स्वप्नं पडू लागतील तेव्हा अशी काही साधनं निर्माण होतील! जगभरातल्या चैनीच्या वस्तू हावरेपणानं आपल्या घरात आणून निर्बुद्धपणानं त्यांचा उपभोग घेणं म्हणजे जागतिकीकरण नव्हे तर आपण आपल्या स्वतःच्या मर्दुमकीवर जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचणं, पराक्रम गाजवणं, आपला आणि आपल्या राष्ट्राचा भविष्यकाळच नव्हे तर वर्तमानकाळही उज्ज्वल करणं म्हणजे जागतिकीकरण होय हे जेव्हा मराठी समाजाला वाटेल, कळेल, पटेल तेव्हाच तो कोषांसारख्या ज्ञानसाधनांचा शोध घेऊ लागेल.

जगातल्या आजच्या प्रगत राष्ट्रांमध्ये ज्ञानसाधनांचा विकास आणि तिथल्या तरूणांची विजिगीषू वृत्ती ह्यांचा विकास बरोबरीनंच झालेला दिसतो, आणि त्याचे फायदे त्या व्यक्तींना आणि त्यांच्या राष्ट्रांना लगेचच मिळाले! ती सुचिन्हं आपल्याकडे दुर्दैवानं अजून तरी दिसत नाहीत. अशा परिस्थितीत एवढीच इच्छा आपण करू शकतो की देवा रे, आमच्या मराठी माणसाला आपला स्वतःचा सक्रीय सहभाग असलेल्या जागतिकीकरणाची भव्य-दिव्य स्वप्नं (तरी) पडोत! त्यासाठी तो अस्वस्थ होऊन तो तनमनधन अर्पून धडपडो! असं काही घडलं तरच मराठीच्या ह्या अंगांचा विकास होऊ शकेल. आमच्या मराठी बांधवांना आपल्या भाषेच्या, संस्कृतीच्या सुखसमृद्धीची स्वप्नं पडोत हीच इच्छा !

अनुक्रमणिका

४०
भाषेची ओढ

लहान गावातून असतं त्याप्रमाणे आमच्या घराचं दार सताड उघडं होतं, तरीपण बेल वाजली म्हणून मी कोण आलयं हे बघण्यासाठी बाहेर आलो.

'मे आय खमिन् सऽ ?' दारात अत्यंत अदबीनं जेनेट उभी होती, मला पाहताच तिनं कमरेत किंचित वाकून अत्यंत विनम्रतेनं विचारलं होतं.

'अग ये न! बेल वाजवायला नि येऊ का म्हणून विचारायला तू कोणी नवखी का आहेस?' मी अघळपघळपणानं तिला आता येऊन बसायला सांगितलं.

'आय हउप्, आय् हॅवन्ट् डिस्टऽ ब्ड् यू, सऽ!' अत्यंत दिलगिरी दाखवत जेनेट हळूवारपणे बोलत होती.

'त्रास कसला आलाय !बोल!. . . रॉबी कधी येणार आहे ?'

'नेक्स्ट् मन्थ्, सऽ-. . .'

जर्मन भाषेतल्या अडचनी विचारण्यासाठी जेनेट अलीकडे खूपदा आमच्याकडे यायची आणि ती आली की सुरुवातीला आमचा हा असा द्वैभाषिक संवाद चालत असे. जन्मापासून कोल्हापुरातल्या खास देशी वातावरणात राहूनही ती ब्रिटीश इंग्लिश आणि ब्रिटीश मॅनर्स कटाक्षानं पाळत असे.

जेनेट आमच्या कोपऱ्यावर राहणारी हुषार. चुणचुणीत मुलगी. आम्ही एकामेकांना चेहऱ्यानं ओळखत होतो पण परिचय असा नव्हता. जेनेट विलक्षण जिज्ञासू नि खूप धडपडी. ह्या जिज्ञासेतूनच तिची आणि रॉबीची म्हणजे रॉबर्ट् फ्लाईस्गार्टन् ह्या जर्मन तरुणाची ओळख झाली. पुढे त्यांची मैत्री जुळली आणि दोन वर्षांच्या मैत्रीनंतर त्यांनी आता विवाहबद्ध व्हायचं ठरवलं होतं. रॉबी वर्षातून दोनदातरी भारतात येत होता. रॉबीची आई म्हणजे उर्सुलाबाई मला एकदा (जर्मनीत असताना) सांगत होत्या की रॉबीला अगदी लहानपणापासूनच भारताचं वेड होतं. भारतातल्या माणसांशी ओळख करून घेऊन त्यांच्याशी गप्पा मारायला त्याला आवडायचं. आमच्याकडे आल्यावर पाटावर मांडी घालून बसण्याची आणि पदार्थांचा आस्वाद घ्यायची रॉबीला चांगलीच सवय झाली होती. लौकरच लग्न होऊन जेनेट रॉबीबरोबर जर्मनीला गेली, अनेक वर्षं उराशी बाळगलेलं युरोपात राहायला जायचं जेनेटचं स्वप्न प्रत्यक्षात आलं होतं! आम्ही सर्वांनी तिला प्रेमानं निरोप दिला.

जेनेटच्या लग्नानंतर तब्बल चार वर्षांनी मला पुनः एकदा जर्मनीला जायचा योग आला. मी जर्मनीत पोहोचल्याच्या दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी जेनेटचा फोन आला नि तिनं पुन: पुन: मला घरी यायला सांगितलं, मी अर्थात जाणार होतोच. तिचा संसार बघण्याचं विलक्षण औत्सुक्य होतं. . . पहिला शनिवार आला त्या दिवशी मी रॉबीला फोन करून कळवलं, आम्ही क्रेफिल्ट्च्या स्टेशनावर ठीक पाच वाजता भेटायचं ठरवलं. उगाच चुकामूक व्हायला नको अशा हिशेबानं दोनशे किलोमीटरचा प्रवास करून

मी साडेचारवाजताच क्रेफिल्ट्ला पोहोचलो. ठरलेल्या वेळी रॉबीला पाहून मला अतिशय आनंद झाला. जेनेटाचं घर फेनेकोटन् नावाच्या छोट्याशा गावात होतं. 'फेनेकोटन्' हे ठिकाण वायव्य जर्मनीत, जर्मनी-नेदर्लंडच्या अक्षरशः सीमेवर आहे.

आउटोबाऽनवरून तुफान वेगानं रॉबी चालला होता, (१२०-१३० किलोमीटरच्या गतीमुळे) आसपासची झाडंझुडपं फरफटत होती बिचारी. सुमारे अर्ध्या तासातच आम्ही जेनेटच्या फेनेकोटन् गावातल्या घरी पोहोचलो.

'सर, तुम्हाला पाहून इतका आनंद झालाय मला!' दार उघडताच जेनेटनं अक्षरशः मिठी मारून माझं स्वागत करत म्हटलं, माहेरचा होतो न मी! जेनेटचे दोन गोंडस मुलगे जरासे दूर राहूनच मला न्याहाळत होते. आमच्या गप्पा स्वाभाविकपणे जर्मनमध्येच चालू होत्या, तेवढ्याच जेनेट चहा घेऊन आली नि 'सर, आता तुम्ही दर शनिवारी इथे यायचं नि आलात की फक्त मराठीत बोलायचं हं, म्हणजे माझ्या मुलांच्या कानांवर मराठी पडेल!' जेनेटच्या ह्या बोलण्याचं मला आश्चर्य वाटलं नि माझ्या लक्षात आलं की आज आल्याआल्या तिनं माझं स्वागत चक्क मराठीत केलं होतं.

त्या दिवशी रात्री तर जेनेटचं वागणं पाहून मी चक्रावूनच गेलो. जेवाणानंतर मी नि रॉबी गप्पा मारत बसलो होतो तेव्हा जेनेटनं एका कुठल्याशा जुन्या हिन्दी चित्रपटाची कॅसेट लावली नि मग ती आमच्या गप्पात सामील झाली, तेव्हा रॉबी म्हणाला की गेल्या दीड-दोन वर्षांपासून ती रोज रात्री निदान काही वेळ तरी हिन्दी चित्रपट बघतेच नि झोपतानाही तिला हिन्दी गाणी ऐकायची असतात! कुठे कोणी मराठी बोलणारी व्यक्ती आली आहे असं कळलं की जेनेट तिला आवर्जून फोन करते. भारत सोडल्यापासून तिचं भारतप्रेम भलतंच वाढलं आहे. रॉबीचा अर्थात ह्यातल्या कशालाच विरोध नव्हता, त्यालाही ह्या सर्व भारतीय गोष्टींबद्दल विलक्षण प्रेम होतं.

माझ्या पुढच्या वास्तव्याच्या काळातही दर शनिवारी मी नित्यनेमानं क्रेफिल्टला जात असे, ठरलेल्या वेळी, ठरलेल्या ठिकाणी रॉबी मला न्यायला येत असे नि मग आम्ही घरी जायचो. सोमवारच्या पहाटेपर्यन्त आमच्या गप्पा संपत नसत. सगळं कळत नसलं तरी रॉबी आमच्या मराठी गप्पांचा सहृदयी श्रोता असायचा आणि साथीला लता मंगेशकर, आशा भोसले, महंमद रफी, किशोरकुमार वगैरे थोर कलावंतही जातीनं उपस्थित असायचे!

भारतात असताना जेनेटला युरोपचा, जर्मनीचा ध्यास लागला होता. कोल्हापुरात राहत असताना आपल्याला केव्हा एकदा जर्मन बोलता येईल असं तिला झालं होतं, जर्मन बोलता यायला लागल्यावर आपण केव्हा एकदा जर्मनीला जातो असं तिला झालं होतं; पण प्रत्यक्षात तिथे पोहोचल्यावर, दिवसभर फक्त जर्मन भाषेतच बोलायला लागल्यावर तिच्या लक्षात आलं होतं की जर्मनीत असलो, जर्मन बोलतो, आपल्याला चांगलं जर्मन येत असलं तरी आपण जर्मन नाही तर भारतीयच आहोत. आपल्या रोमारोमात भिनलेल्या भाषेपासून, आपल्या संगीतापासून, आपल्या कलांपासून आपण वेगळे होऊ शकत नाही. भाषेची, संगीताची, संस्कृतीची खरी ओढ तिला जर्मनीत आल्यावरच कळायला लागली होती.

अनुक्रमणिका

४१
अर्ध त्यजति पण्डितः

माझे एक ज्ञानवृद्ध, (वयोवृद्ध म्हणत नाही पण) प्रौढ स्नेही, संस्कृतचे विद्वान पंडित, त्यांचं नावही तसंच भारदस्त—विद्यासागर सच्चिदानंद सहस्त्रबुद्धे. विद्यापीठातून मिळणाऱ्या बी. ए. एम. ए. पासून ते पीएच. डी. आणि त्याही पलीकडच्या डी. लिट्. पर्यंतच्या विद्यापीठांमधून मिळू शकणाऱ्या सगळ्या पदव्या त्यांनी कधीच ग्रहण केलेल्या होत्या. एकदा आमच्या अशाच गप्पा(?) चालू होत्या.

'माझं एक काम आहे तुमच्याकडे'- अचानकपणे ते मला म्हणाले.

'सांगा!' मी त्यांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहत म्हटलं.

'त्याचं काय आहे-' त्यांच्या ह्या सुरुवातीवरून मी ओळखलं की आता डॉ. सहस्त्रबुद्ध्यांचं एकसुरी भाषण सुरु होणार आहे, आपण आता फक्त हं हं करत श्रवणभक्ती करायची आहे हे मला सरावानं कळलं. 'संस्कृतच्या संदर्भात जर्मन विद्वानांनी काय म्हटलं आहे ते मुळातूनच बघावं असा विचार आहे-'त्यांचं हे वाक्य ऐकून मी अधिक सावध होऊन ऐकू लागलो कारण दर चार-दोन दिवसांनी कुठलसं जर्मन पुस्तक घेऊन ते माझ्याकडून त्यातले काही उतारे समजावून घेत असत, काही उताऱ्यांचं भाषांतर करून घेत असत; म्हणजे ह्यांच्या नव्या कल्पनेनुसार हे भाषांतराच्या कामासाठी रोजच मला वेठीस धरणार अशी मला साधार भीती वाटली. 'काय आहे, सगळंच मुळातून बघायचं म्हणजे आपल्यालाच भाषा आलेली बरी, नाही का?'

'काही प्रश्नच नाही!' डॉ. सहस्त्रबुद्धे पुढे काही म्हणायच्या आतच मी त्यांच्या कल्पनेचं कौतुक केलं! त्यांच्या मोनोलॉगमध्ये अन्यथा एवढं म्हणायला इतरांना संधीच मिळत नाही.

'तर तुमच्याकडे काम असं की-' त्यांच्या कामाचा पक्का अंदाज मला एव्हाना आला होताच. डॉ. सहस्त्रबुद्धे किंचित थांबून, जरासं अवघडून पुढे म्हणाले, 'मला जर्मन शिकायचं आहे आणि मला शिकवायचं काम तुम्ही करायचं!'

'जरूर जरूर! आनंदानं!' मी म्हटलं. हे एकदा जर्मन शिकले तर माझ्या दृष्टीनं फारच सुखाचं होणार होतं, त्यामुळे मी त्यांना प्रोत्साहन देत म्हटलं, 'तुम्ही मुळीच चिंता करू नका! मी तुम्हाला रोज शिकवीन. आपल्याला दोघांना दुपारी दोन तास ऑफ असतातच'-

'तसं खरं सांगू का-' मघाच्या किंचित अवघलेपणातून डॉ. सहस्त्रबुद्धे एव्हाना चांगलेच सावरले होते. 'मला बरं का, तसं अर्ध जर्मन येतचं!'

'मग तर काही प्रश्नच नाही!' मीही त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी म्हटलं,'कुठे शिकला होतात?' बाळबोध कुतूहलानं मी विचारलं.

अनुक्रमणिका

'शिकायला कशाला पाहिजे हो?! अहो जर्मन आणि संस्कृत ह्या दोन्ही भाषा एकाच कुटुंबातल्या, म्हणजे इन्डो –जर्मन फॅमिलीतल्या-होय की नाही ? (माझ्या डोळ्यासमोर एकदम कुठल्याशा हॉटेलातल्या फॅमिलि –रूममध्ये दाटीवाटीनं बसलेल्या वेगवेगळ्या वयाच्या नि रंगारूपाच्या दहा-बारा बाया उभ्या राहिल्या!)

'अं, हो! बरोबर!' उगाच वाद घालायला नको म्हणून मी घाईघाईनं कबुली देऊन टाकली.

'अहो, तुम्हाला माहीत नसेल कदाचित-आमच्या संस्कृतात बरं का, काय गंमत आहे-' (संस्कृतबद्दल नि संस्कृत वाङ्मयाबद्दल बोलताना डॉ. सहस्त्रबुद्धे न चुकता आमचं संस्कृत, आमच्या संस्कृतात, आमचा कालिदास असं म्हणतात.)

'काय आहे?' मीही आपल्या चेहऱ्यावरचा भाबडेपणा किंचितही कमी होऊ न देता विचारलं.

'आमच्या संस्कृतात बरं का, क्रियापदं चालतात! आणि बरं का संस्कृतात चालतात ना अगदी तशीच ती जर्मन भाषेतही चालतात. क्रियापदं चालतात, नामं चालतात एवढंच काय पण विशेषणंसुध्दा चालतात!' कोचावर पाठीमागे रेलूनं दोन्ही हातांचे पंजे सताड उघडून तळवे समोरच्या माणसाला दाखवून त्याला आश्वस्त करत बोलायची त्यांची ही नेहमीची पद्धत होती. 'अहो, आमच्या संस्कृतात आहेत अगदी तस्सेच जर्मन भाषेतही दहा गण आहेत. क्रियापदांचे आत्मनेपदी, परस्मैपदी, उभयपदी असे प्रकारही आहेत. आमच्या संस्कृतातल्या प्रमाणेच समासांचे सुध्दा सगळे प्रकार आहेत, अगदी जसेच्या तसे!'फार काय, संस्कृतातल्या सारखं द्विवचनसुध्दा आहे, काय?!'

'हं!' मी आश्चर्यानं हं म्हटलं खरं पण डॉ. सहस्त्रबुद्ध्यांना तशी समोरच्या माणसाकडून प्रतिसादाची अपेक्षा कधीक नसते! सहस्त्रबुद्धे सांगत असलेली माहिती मला कधीच कुठे भेटलेली नव्हती, म्हणजे अगदी नवीन होती! मला येत असलेल्या जर्मन भाषेतल्या क्रियापदांना गण नव्हते. आत्मनेपद, परस्मैपद, उभयपद वगैरे प्रकार नव्हते आणि द्विवचन तर नव्हतंच नव्हतं! आणि इकडे क्रियापदं आहेत तिकडे क्रियापदं आहेत, इकडे नामं चालतात तिकडे नामं चालतात, इकडे गण आहेत तिकडे गण आहेत. . . ह्याला काय साम्य म्हणायचं का? आणि दोन भाषात जरी अशी (?) साम्य 'स्थळं' असली तरी त्यांच्या आधारानं काय भाषा शिकता येते का? मी विचारात पडलो होतो, नव्हे गटांगळया खात होतो पण माझ्या शंका डॉक्टरांना सांगण्यात काही अर्थ नव्हता. मी माझ्या साऱ्या शंका मनातल्या चोरकप्प्यात दडवून ठेवल्या.

'जर्मन आणि संस्कृत अगदी एकसारख्या आहेत, म्हणून तर अहो जर्मनांनी संस्कृतवरती एवढं प्रचंड काम केलं.'

'बरोबर आहे!'

'तर मला संस्कृत येतं म्हणजे अर्धं जर्मन येतंच!' डॉक्टरसाहेब मोठया आत्मविश्वासानं बोलत होते, 'तेव्हा उरलेलं तुम्ही शिकवा, म्हणजे दोन चार महिन्यांनी माझा मीच जर्मन ग्रंथ वाचू शकेन, नाही का?'

'हो, निश्चितच!' मी कसलाही विचार न करता त्यांचं म्हणणं तत्क्षणी मान्य करून टाकलं.

मी डॉ. सहस्रबुध्दयांचा निरोप घेऊन परतलो खरा पण जर्मन नि संस्कृत भाषांमधल्या साम्यस्थळांच्या यादीनं मला पुरतं चक्रावून टाकलं होतं. दुसऱ्या दिवशी ग्रंथालयात जाऊन आम्ही एक चांगलं पुस्तक आणलं आणि मी डॉ. सहस्रबुध्दयांच्या जर्मन भाषेचा पहिला धडा शिकवला.

पहिल्याच धड्यात क्रियापदं वर्तमान काळात कशी चालवायची हा भाग आलेला होता, त्यात द्विवचन नाही हे बघताच डॉ. सहस्रबुद्धे खरं तर अक्षरशः खवळलेच! आम्ही ग्रंथालयातून आणलेलं पुस्तक पूर्णपणे जर्मन भाषेत होतं, ते बऱ्याचदा उलटं-पालटं करून (पण सुदैवानं भिरकावून न देता) ते म्हणाले, 'हे पुस्तक काही ठीक दिसत नाही बुवा! आपण असं करूया-'

'कसं?'

'औरंगाबादला मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयात गोरे म्हणून ग्रंथपाल आहेत, विद्वान माणूस आहे-'

'हो, मी ओळखतो त्यांना. जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलर आहेत ते-' मी नकळतपणे आगांऊपणा करत म्हटलं.

'मग प्रश्नच नाही. तुम्हीच त्यांना एक पत्र पाठवून जर्मन शिकायला कोणतं पुस्तक चांगलं आहे हे विचारा! त्यांचा मुलगा जर्मनीत असतो. त्यामुळे त्यांना एखादं चांगलं पुस्तक माहीत असेल-'

'डॉ. सहस्राबुध्दयांनी माझ्यामागे आणखी एक काम लावलं होतं!

दुसऱ्या दिवशी सुरुवातीलाच डॉक्टरांनी मला सांगितलं की काल घरी पाहुणे आल्यामुळे मला अभ्यास करायला वेळ मिळाला नाही त्यामुळे आज मला मागचं काही विचारू नका. पण आज पुढचा धडा करायला काही हरकत नाही. तिसऱ्या दिवशी ठरल्या वेळेच्या थोडा वेळ अगोदर येऊन त्यांनी मला सांगितलं की विद्यापीठात काहीतरी महत्त्वाचं काम आहे त्यामुळे आज तास नको! चौथ्या दिवशी डॉक्टरांनी आदल्या दिवशी झालेल्या दगदगीची सबब सांगितली. त्यानंतर रविवार आला. सोमवारी म्हणजे पाचव्या दिवशी त्यांनी आल्याआल्याच मला सांगितलं की एक नवं प्रोजेक्ट मी घ्यायचं ठरवलं आहे तेव्हा सध्या आपण आपला जर्मनचा कार्यक्रम स्थगित ठेवू यां!

'पण डॉक्टर, तुम्हाला अर्ध जर्मन येताच आहे. उरलेलं अर्ध शिकायला असा किती वेळ लागणार आहे? महिन्यादोन महिन्यात शिकून होईल! आपण सुरुवात तर केलेलीच आहे, तेव्हा ते पूर्ण करून टाकू या!' मी आग्रह धरत म्हटलं.

'ते खरं आहे, पण यूजीसीचं प्रॉजेक्ट अधिक महत्त्वाचं आहे!' डॉ. सहस्राबुध्दयांनी थोडक्यात आटोपतं घेत म्हटलं.

भाषेतल्या खऱ्या-खोट्या, ऐकीव-पुस्तकी साम्य-स्थळांनी सहस्रबुद्ध्यांना चांगलंच चकवलं होतं.

[अनुक्रमणिका](#)

४२
भाषिक साम्यं

भाषांचा अभ्यास करताना विद्वानांनी भाषांची तुलना करण्याचंही एक शास्त्र बनवलं आहे- तौलनिक भाषाशास्त्र, पण असं शास्त्रबिस्त्र असलं तरी सामान्य माणूस मात्र कोणाची पर्वा न करता आपल्या पद्धतीनं जशी कोणत्याही दोन माणसांची, दोन वस्तूंची तुलना करत असतो तशीच तो दोन भाषांची पण तुलना करत असतो आणि अशा तुलनेनं तो स्वतःचे असे काही 'निष्कर्ष' काढत असतो. भाषांची तुलना करण्याचे हे सारे प्रकार मोठे गंमतशीर असतात, पण बहुतेकजण अशी तुलना मोठ्या गांभिर्यानं करत असतात.

परवा आमच्या शेजारचा अमेय, एक शाळकरी विद्यार्थी, आमच्या मुलीला सांगत होता की इंग्लिश आणि गुजराती ह्या भाषांमध्ये विलक्षण साम्य आहे. 'बघ, तुला इंग्लिशमधली एबीसीडी अक्षरं येत असतील तर मी तुला एका मिनिटात गुजराती शिकवीन!' हिमानीनं एबीसीडी अक्षरं येतात असं म्हणताच अमेयनं हातातल्या वहीवर लिहायला सुरुवात केली आणि हिमानीला वाचायला सांगितलं. तो लिहित होता, ती वाचत होती- BD PY K?(बीडी पीवाय के?-बिडी ओढतोस का?) PY, PY! (पीवाय!पीवाय!-ओढतो!) BD M PY ? (बीडी एम पीवाय?-बिडी अशी ओढतात का?) M, BDCY GY K ? (एम, बीडी सीवाय जीवाय के?-हं, बिडीशिवाय जगता येईल का?) . 'बघ, आलं की नाही एका मिनिटात गुजराती !'

अमेयच्या ह्या भाषिक तुलनेनं आमची सर्वांचीच काही वेळ छान करमणूक झाली आणि विशेष म्हणजे ही तुलना अमेयनंही (शाळकरी मुलगा असल्यामुळे) फार ताणली नाही पण अनेकदा मोठी माणसं मात्र अशाच प्रकारची तुलना करतात आणि त्याला फार महत्त्व आहे असं सांगून त्याला संशोधन वगैरे म्हणत राहतात!

अ भाषेत क्रियापदं चालतात, ब भाषेत क्रियापद चालतात. अ भाषेत नामं चालतात, ब भाषेत नामं चालतात. अ भाषेत इतके काळ आहेत, ब भाषेत तितकेच काळ आहेत-अशा तऱ्हेची तुलना करून अनेक लोक, अगदी शिकालीसवरलेली माणसंसुध्दा चमत्कारिक निष्कर्ष काढत असतात. दोन भाषांमध्ये साम्यं आहेत असं (आपलं आपण) ठरवून अमकी तमकी भाषा शिकायला सोपी आहे वगैरे निष्कर्ष काढून अनेकांची, बऱ्याचदा विद्यार्थ्यांची दिशाभूल करतात. असल्या तुलनेनं मराठी आणि चिनी किंवा संस्कृत नि स्वाहेलीच काय पण जगातल्या कोणत्याही दोन भाषांमध्ये विलक्षण साम्य आहे, नव्हे त्या एकच आहेत असं दाखवणं शक्य आहे!

संस्कृत आणि जर्मन भाषांमध्ये विलक्षण साम्य आहे असं (संस्कृत आणि जर्मन ह्या दोन्ही भाषा न येणाऱ्यांकडून) इतक्यांदा सांगितलं जातं की ते खरं नाही असं कोणी सांगायचा प्रयत्न केला तर लोक त्यालाच वेड्यात काढतात! खरं तर मूलभूत प्रश्न असा आहे की भाषिक साम्य नक्की कशाला म्हणायचं ? त्याचा आधार काय? दोन भाषांची सर्वसाधारण (?) तुलना करायची की त्यातल्या एक-एक भागाची म्हणजे नामं, विभक्ती, काळ अशी वेगवेगळी अंग घेऊन त्यांची तुलना करायची? असो.

मी तुम्हाला एक कोडं घालतो हं! 'मी चाइ पिलि.' हे वाक्य कोणत्या भाषेतलं आहे ते ओळखा पाहू! अगदी सोपं आहे. कोणती भाषा असेल ही ? सागां बर !

अनुक्रमणिका

‘हिन्दी?’

‘नाही!’

‘हं, हे वाक्य आर्थात हिन्दी –पंजाबी वळणाचं वाटत नाही !’

‘अगदी बरोबर आहे !’

‘पण ही पूर्वेकडची बंगाली –आसामी वळणाची गोलमोल भाषाही वाटत नाही कारण ‘मी चाइ पिलि ‘हे वाक्य उच्चारताना तोंडाचा चंबू कुठेच करावा लागत नाही!’

‘अगदी बरोबर आहे तुमचा अंदाज. ही भाषा पूर्वेकडची नाही!’

‘दक्षिणेतल्या कन्नड, तेलगु, तमिळ, मलयाळम् वगैरे भाषांपैकी तर नसणारच कारण ह्या तुमच्या कोड्याताला वाक्यात टठडढणच किंवा ळचा खणखणाट नाही!’

‘अगदी बरोबर!’

‘मग ही उडिया आहे का?’

‘नाऽही!’

‘मग कोंकणी?’

‘नाही!’

‘ह्या वाक्याचा अर्थ तसा कळतोय! मग आपली मालवणी आहे का?’

‘मुळीच नाही!’

‘मग कारवार, मंगलोरकडची हांगा पळैवाली मराठी, आय मीन कोंकणी असेल!’

‘नाही, मुळीच नाही!’

‘छे, उगाचच भारतभर फेरफटका मारला! ही तर आपली मराठीच असणार हो !नक्कीच! कुठेतर विदर्भात किंवा मराठवाड्यात बोलली जाणारी मराठी असणार ही. कदाचित आदिवासींची वगैरे बोली असेल. किंवा अहिराणी वगैरे, होय ना?’

‘नाऽही!’

अनुक्रमणिका

‘आता हरलो बुवा!’

‘खरंच हरलात?’

‘हो! मला माहीत असलेल्या सगळ्या भाषांची नावं घेऊन झाली. आता तुम्हीच सांगा बुवा ह्या कोड्याचं खरं उत्तर!’

‘ऐका, ‘मी चाइ पिलि’ हे शुद्ध रशियन वाक्य आहे. ह्या भूतकाळातल्या कर्तरी वाक्याचा शब्दशः अर्थ आहे ‘आम्ही चहा प्यायलो’ म्हणजे प्रमाण मराठीत ‘आम्ही चहा प्यायला.’

‘काहीतरीच काय राव? आम्हाला तुमच्याइतक्या भाषा येत नाहीत म्हणून बनवता काय आम्हाला?’

‘खरं नाही ना वाटत? पण खरं आहे! अगदी शंभर टक्के सत्य! मराठी भाषेत भूतकाळात ला ली ले, ले ल्या ली अशा प्रकारचे प्रत्यय लागतात तर रशियन भाषेत भूतकाळ करताना धातूला ल ला ली असे प्रत्यय लागतात. ‘पित्’ (पिणे) धातूला बहुवचनाचा ‘लि’ प्रत्यय लागून ‘पिलि’ असं रूप झालं. ‘मी’ म्हणजे आम्ही, ‘चाइ’ म्हणजे चहा आणि ‘पिलि’ म्हणजे प्यायलो/ प्यायला.’

म्हणजे मराठी आणि रशियन ह्या भाषांमध्ये भूतकाळ करण्याच्या पद्धतीत खूपच साम्यं आहेत असं म्हणता येईल; म्हणजे प्रत्यक्षात आहेतच. ह्या मुद्द्याबाबत काही संशय नाही. (‘अरेच्चा मराठी रशियन इतक्या जवळच्या भाषा आहेत?! मला मराठी येतंच म्हणजे अर्ध रशियन आल्यासारखंच आहे, तेव्हा मी उरलेलं रशियन सहज शिकू शकेन’ असं म्हणून मला टाळीबिळी देऊ नका हं!)

दोन भाषांमध्ये अशा तऱ्हेची साम्यं अभ्यासानं शोधून काढता येतील, जिज्ञासूंनीहे काम चिकाटीनं केलं पाहिजे; पण अशा अभ्यासाचा, निरिक्षणांचा उपयोग इतरांना झटकन उपटता येईल असं मात्र नाही कारण अशा साम्यस्थळांमुळे भाषा शिकणं एकदम सोप्पं वगैरे होत नसतं. भाषा शिकण्यासाठी जे कठोर परिश्रम करावे लागतात त्यांना पर्याय नसतो हे आपण विसरता कामा नये.

मराठी, हिन्दी ह्या तशा खूप जवळच्या भाषा आहेत. त्यांची लिपीसुद्धा एकच आहे, शब्दभांडार खूपसं सारखं आहे, दोन्ही भाषा बोलणाऱ्यांची संस्कृती फार भिन्न नाही. एवढी महत्त्वाची साम्यं असली तरीही किती मराठी भाषिक चांगलं हिन्दी बोलू शकतात? अशा काही समान मुद्द्यांची यादी करता आली तरी त्यामुळे भाषा येत नाही. अशा साम्यांचा भाषा शिकण्यासाठी ही काही उपयोग होत नसते.

दोन भाषांमधली साम्यं शोधण्याचा उद्योग त्या-त्या भाषांचा अभ्यास फार चांगल्या प्रकारे केल्यानंतरच करायचा असतो. त्याचा फायदा किंवा आनंद त्या दोन्ही भाषा चांगल्या येत असतील तरच होतो. नवशिक्यांना किंवा भाषा शिकण्याची (केवळ) हौस असणाऱ्यांना भाषिक साम्यवैषम्यांचा उपयोग नसतो, त्यांनी आपलं लक्ष अभ्यासावर केंद्रित करून प्रथम भाषा आत्मसात करून घ्यावी हेच लाभदायक.

अनुक्रमणिका

४३
अनेकभाषाकोविद

'अविमामा, तुला किती भाषा येतात रे?' घरात माझं पाऊल पडल्या-पडल्याच माझी भाची मला मोठया उत्सुकतेनं विचारत होती.

'अडीच!' मी चपला काढता –काढता उत्तर दिलं.

'एऽ, असं घाईघाईनं काही तरी उत्तर देऊ नकोस! खर्र सांग ना! मी तुला सिरीयसली विचारत्याय!' रूपानं आग्रह धरला.

'अगं मी तत्काळ उत्तर दिलं याचा अर्थ ते घाईघाईनं, विचार न करता दिलं असं नाही काही! मी ते अगदी विचारपूर्वक दिलं आहे. ह्या प्रश्नाचा मी पूर्वीच विचार केलेला आहे त्यामुळे माझं उत्तर तयार होतं.'

'हा अडीच भाषांचा अडणिडा हिशेब काय आहे?' रूपानं (बी. कॉम असल्यामुळे) माझ्याकडे हिशेब मागत विचारलं.'

'अडीचचा हिशेब सोपा आहे. मराठी ही माझी मातृभाषा नि हिन्दी मातृभाषेसारखीच म्हणजे झाल्या दोन आणि अर्धी जर्मन. ती माझी मातृभाषा नाही किंवा त्या भाषेच्या देशात वर्षानुवर्ष राहायची संधी मला मिळाली नाही म्हणून ती अर्धी. झाला ना हिशेब पूर्ण?'

फारसं काही नं बोलता रूपानं नुसतं हं म्हटलं.

'आज तू अशी भाषांची मोजदाद कशासाठी चालवली आहेस?'

'तसं नाही रे! आज ना दूरदर्शनवर एक मुलाखत लागली होती, मुंबईच्याच एका माणासाची. त्याला चाळीस भाषा येतात, चाळीस!'

'वा, छान आहे!' मी कौतुकानं म्हटलं.

'चाळीस भाषा येणं म्हणजे खरच आश्चर्य आहे, नाही का?' क्षणभर थांबून रूपानं पुढे विचारलं, 'कसा काय शिकला असेल रे तो एवढ्या भाषा?'

'त्या माणसाची मुलाखत तू बघितलीस. त्यांनी काही सांगितलं नाही?'

'हो! त्यांनी तशी काही उदाहरणं दिली. म्हणजे कुठल्याही भाषेचं पुस्तक हातात घेतलं की तो माणूस काही वेळात ते वाचून पूर्ण करतो आणि त्या तेवढ्या वेळात त्याचा त्या भाषेचा अभ्यास झालेला असतो-'

अनुक्रमणिका

‘वाह! फारच छान! विलक्षण बुध्दिमान नि प्रतिभावान माणूस असला पाहिजे तो! कुठे असतात हे गृहस्थ?’ मलाही आता त्या मला माहीत नसलेल्या बहुभाषाकोविद पंडिताबद्दल विलक्षण कुतूहल वाटू लागलं होतं.

‘अविमामा, तू त्यांना एकदा भेटच! मुंबईत त्यांचा ट्रान्सलेशन ब्यूरो आहे कुठेतरी, ते तसे खूप वेळा परदेशी जात असतात. पण-’ रूपा अत्यंत भारावलेल्या सुरात सांगत होती. ‘त्यांनी किनई अनेक भाषा केवळ प्रवास करता-करता आत्मसात केल्या आहेत. गाडीत बसताना पुस्तक घेऊन सुरुवात केली की काही तासांनी पुढच्या गावात पोहोचण्यापूर्वीच त्यांची तिथली नवी भाषा शिकून तयार असते!’

त्या महाशयांच्या भाषा आत्मसात करण्याच्या गतिमान कौशल्यानं भारावून जाण्याची आता माझी पाळी होती. मी विचारात पडलो होतो की काय बरं तंत्र वापरत असतील? भाषा येणं म्हणजे ‘नमस्कार! काय कसं काय? तुम्ही कोठून आलात? प्रवास कसा झाला? काय पिणार, चहा की कॉफी? पुढच्या वेळेला सावकाशीनं या हं! अच्छा!’ अशा तऱ्हेची काही जुजबी, प्राथमिक चौकशी करण्यापुरती एखाद्या भाषेतली काही वाक्यं आणि त्यांची औपचारिक उत्तरं अशी पाच-पंचवीस वाक्य एखाद्यानं चांगली घटवली, त्यांचे उच्चार, आघात, सूरयोजना (इन्टोनेशन) वगैरे गोष्टीचाही भरपूर सराव केला नि सफाईनं ती वापरली म्हणजे त्या माणसाला ती भाषा आली असं समजायचं का?

भाषा येणं म्हणजे नक्की काय? आपण तर मानतो की भाषा येणं म्हणजे त्या भाषेत किमान चार महत्त्वाची कौशल्यं त्यानं प्राप्त केली पाहिजेत. वाचलेलं नि ऐकलेलं कळलं पाहिजे, ही दोन पॅसिव्ह स्किल्स झाली आणि आपल्या मनातला आशय लिहून आणि बोलून व्यक्त करता आला पाहिजे ही दोन ॲक्टीव्ह स्किल्स. (ह्या चार कौशल्यांच्या पलीकडेही काही खरोखर अवघड कौशल्यं असतात, त्यातलं पहिलं कठीण कौशल्य म्हणजे भाषान्तर आणि दुसरं म्हणजे धावतं भाषांतर, इन्टरप्रिटेशन.) रूपानं ज्या पंडितांच्या मुलाखतीचा उल्लेख केला त्यांना एखाद्या भाषेतली ही चारही कौशल्य काही वेळात म्हणजे केवळ काही तासात साध्य करून घेता येत असतील का? आणि असं विलक्षण कौशल्य त्यांनी सातत्यानं चाळीस-एक दोन नव्हे चाळीस भाषांमध्ये मिळवलं म्हणजे त्यांचं कौतुक करायला कौतुक हा शब्द फारच अपुरा आहे! त्यांना येत असलेल्या चाळीस भाषांमधल्या चाळीस कौतुकवाचक शब्दांची माळ करूनच एखाद वेळेस त्यांचं थोडंफार कौतुक करता येणं करता शक्य होईल! बापरे! खरंच विलक्षण आहे हे! ह्यापूर्वीही मी अशा काही महान व्यक्तींबद्दल ऐकलेलं होतं पण अशा कोणाला प्रत्यक्ष बघण्याचंच काय पण त्यांची मुलाखत बघण्याचं किंवा ऐकण्याचं भाग्यही मला अद्यापि लाभलेलं नव्हतं! ही माहिती ऐकूनही मी अवाक झालो होतो.

‘काय रे, केव्हा आलास?’ आतून येत बहिणीनं विचारलं, ‘आणि असा बाहेरच का बसलायस ?’

‘रूपा एका गृहस्थांबद्दल माहिती सांगत होती, ती ऐकत होतो-’

‘कुठली माहिती?’

‘ती गऽ, आज ती मुलाखत नव्हती का, चाळीस भाषा येणाऱ्या त्या-’

अनुक्रमणिका

'छट्! सगळं बंडल होतं रे ते!' बहीण ठसक्यात म्हणाली.

'आईचं आपलं काहीतरीच असतं रे! हिला प्रत्येकातले दोष काढायची वाईट्ट सवय आहे! कोणाला चांगलं म्हणून म्हणायची नाही-'रूपा सात्विक संतापानं म्हणाली.

'असं नाही हं रूपा! त्यांनी प्रयत्न केले असतील, त्यांना काही भाषांचं जुजबी ज्ञान असेल इथपर्यंत ठीक आहे, पण चाळीस भाषा येतात म्हणणं म्हणजे काहीतरीच!'

'तुला येत नाहीत म्हणून काय इतरांना येणार नाहीत असं का वाटतं तुला?'

रुपानं व्यावहारिक प्रश्न टाकला होता.

'मला कशाला यायला पाहिजेत चाळीस भाषा? पण शितावरून भाताची परीक्षा असते अग! हे बघ त्या माणसाचा इंटरव्ह्यू चालला होता हिन्दीत, पण तो माणूस किती वाईट हिन्दी बोलता होता-' बहिणीनं आता आपली बाजू मांडायला सुरुवात केली होती.

'आई, तु जुन्या रामाच्या काळात हिन्दी घेऊन बी. ए. झालीस म्हणजे काही स्वत:ला फार कोणी समजू नकोस हं! आणि त्याचं हिन्दी वाईट म्हणजे काय, बम्बईया हिन्दी होतं. मुंबईत सगळेच तसं बोलतात! त्याच्या वाईट हिन्दीचा इथे काय संबंध?'

'काय संबंध? तेच तर महत्त्वाचं! अगं, आपल्याकडे हिन्दी भाषेचं इतकं वातावरण आहे, तेरीदेखील तो माणूस अगदी वाईट्ट हिन्दी बोलत होता. ज्याचं हिन्दीसुद्धा इतकं वाईट तो इतर भाषा काय स्टॅन्डर्डच्या बोलत असणार? हा मुद्दा लक्षात घे ना! त्याच्या इतर भाषांचं स्टॅन्डर्ड हिन्दीपेक्षाही वाईट असण्याची शक्यताच जास्त! मला चाळीस भाषा येत नसल्या तरी एवढं नक्कीच कळतं, होय की नाही?

आता रूपा अवाक झाली होती.

अनुक्रमणिका

४४
स्त्रीचं भाषिक स्थान

मैत्रेयी, गार्गी वगैरे विदुषीचा विषय निघाला की त्याकडे दुर्लक्ष करून भारतात फार पूर्वीपासूनच स्त्रियांवर अत्याचार होत आलेले आहेत अशा तऱ्हेची आक्रमक भूमिका घेणारी मंडळी आपल्याला प्रत्यही भेटत असतात. पूर्वी काय होतं ह्याबद्दल अनेक ग्रंथांमधून अंतर्गत पुरावे वगैरे गोळा करून चर्चा, वाद रंगवले जातात; पण पुरावे म्हणून सादर केलेल्या ग्रंथांच्या भाषेच्या विचार फारसा कोणी केल्याचं दिसत नाही.

वैदिक आणि संस्कृत भाषांचा विचार केला तर असं अगदी स्पष्ट दिसतं की ह्या भाषांमधल्या क्रियापदांमध्ये प्रथमपुरुषी आणि द्वितीयपुरुषी रूपांमध्ये लिंगभेद नाही, ह्याचा सरळ स्पष्ट अर्थ असा की स्त्री-पुरुष जेव्हा एकमेकांशी बोलत असत तेव्हा ते अगदी समान पातळीवरून बोलत असत, त्यांच्यात उच्च-नीच असा कोणताही भेदभाव नव्हता की स्त्री-पुरुष असा लिंगभेद नव्हता, ह्याचाच हा ढळढळीत पुरावा आहे. संस्कृत भाषेत क्रियापदांची रूपं आणि एवढंच नव्हे तर अस्मद् आणि युष्मद् ही सर्वनामं ह्यांच्याबाबतीत कसलाही लिंगभेद नाही, मुळीच नाही. आगच्छति, करोति, पिबति, पृच्छामी. लिखसि, माया त्वया, तुभ्यम्, कोणतंही रूप घ्या, ह्यांत कुठे पुसटसाही लिंगभेद आढळणार नाही!

स्त्रियांच्या कौटुंबिक, सामाजिक स्थानाबद्दल वाद घालून तिचं स्थान काय आहे अशा प्रकारचे प्रश्न स्त्रियांचे कैवारी-स्त्रीवादी नेते नेहमीच चर्चेला घेत असतात आणि अशा वादांमध्ये स्त्रियांचं स्थान फार प्राचीन काळापासूनच दुय्यम आहे वगैरे गोष्टी उगाळून बोलल्या जातात; पण भाषेच्या ह्या अंतर्गत पुराव्यांवरून असं स्पष्ट दिसतं की अभिजात संस्कृतच्या काळात तसं काहीही नव्हतं.

अभिजात संस्कृतनंतरचा काळ म्हणजे प्राकृत, अर्धमागधी, शौरसेनी, पैशाची वगैरे अपभ्रंश भाषांचा काळ. हा काळ भारतीय भाषांच्या दृष्टीनं पुन: एकदा नवं वळण घेणारा काळ. ह्या काळात कृषीचं चांगलं बस्तान बसलं होतं. सुबत्ता आली होती. एकाच कुटुंबातही आता अधिकाराची उतरंड सुरू झाली होती. सर्वजण समान असण्याचा काळ संपून आता काही जण अधिक समान व्हायला लागले होते!

जुन्या काळात भटक्या वृत्तीत स्त्री-पुरुष दिवसभर एकाच प्रकारचं जीवन अक्षरश: एकत्रपणे व्यतीत करत होते; पण आता शेतीवाडीच्या विकासाबरोबर घरदारही आकार घेऊ लागलं होतं आणि त्यातून कामाची विभागणी सुरू झाली होती. पुरूषांनी बाहेरची शेतीभातीची कामं सांभाळायची नि स्त्रियांनी घरात चूलमूल बघायचं अशी पद्धत सुरू झाली आणि अधिकाराच्या कल्पनेतून स्त्रीला दुय्यम स्थान मिळालं असावं कारण ह्याच काळात म्हणजे अपभ्रंश भाषांच्या काळात स्त्रियांची भाषा वेगळी होऊ लागलेली दिसते. बायकांची भाषा हळूहळू बदलून क्रियापदांची स्त्रीलिंगी रूपं वेगळी होऊ लागली, सर्वनामांमध्येही स्त्रीलिंगी रूपं वेगळी झाली.

आदरार्थी रूपांचा विकासही ह्याच काळात सुरू झाला, आदर दाखवण्यासाठी बहुवचन वापरण्याची पद्धत ह्याच काळात सुरू झाली. संस्कृत भाषेत गुरूलाही 'त्वम्' म्हणण्याची पद्धत होती आणि आदर दाखवण्यासाठी भवान्, अत्रभवान् असे शब्द असले तरी बहुवचन वापरण्याची पद्धत मुळीच नव्हती.

अनुक्रमणिका

आदरार्थी म्हणून बहुवचनी रूपं वापरण्याच्या पद्धतीतही आजचे काही प्रकार पाहता त्या-त्या समाजाची एकूण विचारसारणी काय आहे हे लक्षात येतं. उदाहरणार्थ पंजाबी भाषेत आदरार्थी रूपं नेहमी बहुवचनी आणि पुल्लिंगीच असावी लागतात हे ऐकून तुम्हाला धक्का बसला का? किती विलक्षण प्रकार आहे हा! अगदी आपल्या जन्मदात्या मातामाऊलीबद्दल आदर व्यक्त करायचा झाल्यास आपल्याकडे प्रमाण मराठीत कोणताही वेगळा प्रकार अस्तित्त्वात नाही. कोल्हापूर वगैरे भागातल्या ब्राह्मणेतर समाजात स्वतःच्या आईला 'आमच्या आई' असं आदरार्थी, बहुवचनी म्हणायची पद्धत आहे. (पुण्या-मुंबईकडे सासूबाईंचा उल्लेख अशा प्रकारे होतो!) म्हणजे आदरार्थी, बहुवचनी, स्त्रीलिंगी रूप वापरलं जातं. पण पंजाबी भाषेत मात्र 'मेरी माँ' असं मान्यच होणार नाही!सर्वप्रथम म्हणजे आदरार्थी 'जी' हवाच म्हणजे झालं माताजी. आणि माताजी म्हटल्यावर एकवचन कसं वापरणार? बहुवचनच हवं, पण 'मेरिआं माताजीआं' किंवा असं काही चमत्कारिक रूप होत नाही कारण पंजाबी कल्पनेनुसार आदरास पात्र होऊन बहुवचनासाठी पात्र ठरणारी व्यक्ती स्त्री कशी असेल? म्हणजे (पुरुषी व्याकरणानुसार) रूप पुल्लिंगीच हवं! आणि असं करता-करता ते योग्य, प्रतिष्ठीत रूप होतं 'मेरे माताजी'! 'मेरे माताजी इस वक़्त घर पर हन' म्हणजे माझी आई आत्ता घरी आहे. आपल्या एखाद्या मोठया बहिणीबद्दल आदर दाखवायचा झाला तर रूप होतं 'मेरे भैण जी'.

दक्षिण भारतात कृषी आणि घर ह्यांचा विकास खूप पूर्वीच झालेला होता म्हणूनच द्रविडी भाषांमध्ये म्हणजे तमिळ, तेलगु, कन्नड, मलयाळम् ह्या भाषांमध्ये अगदी सुरुवातीपासूनच क्रियापदांमध्येच नव्हे तर सर्वनामांमध्येही स्त्रीलिंगी रूपं वेगळी होती/आहेत. आधुनिक भारतीय भाषांमध्ये उत्तरेकडच्या आणि पश्चिमेकडच्या सर्व भाषांमध्ये हा लिंगभेद आढळतो; पण पूर्व भारतातल्या बंगालीत मात्र लिंगभेद नाही. तिथे स्त्रीपुरुषांची भाषा एकच आहे!

युरोपातल्या भाषांचा विचार केला तर तिथेही असं दिसतं की मध्य युरोपात म्हणजे आजच्या राजकीय नाकाशातले युक्रेन, झेकिया वगैरे देशांचा प्रदेश म्हणजे सुपीक जमिनीमुळे गव्हाचं कोठार मानला गेलेला (आणि अजूनही असलेला) प्रदेश. ह्या भागात शेतीचा विकास झाला, त्याच्या जोडीनं कुटुंब-कल्पनेचा विकास झाला आणि स्वाभाविकपणेच तदानुषंगिक कामाची वाटणी, अधिकारांची उतरंड वगैरे गोष्टी पूर्व युरोपात विकसित झाल्या. परिणामतः तिथल्या भाषांमध्ये लिंगभेद स्पष्टपणे दर्शवणारी क्रियापदांची रूपं आणि सर्वनामं विकसित झाली. रूसी, पोलिश, झेक वगैरे सर्व 'स्लाव' भाषांमध्ये हा भाषिक विकास स्पष्टपणे दिसून येतो.

पूर्व युरोपच्या तुलनेनं भिन्न परिस्थिती पश्चिम युरोपात होती. तिथली शेती तितकीशी चांगली नसल्यामुळे स्त्री-पुरुष सारखेच कष्ट करत होते. पुरुषाच्या बरोबरीनं स्त्री बाहेरची, कष्टाची कामं करत होती नि त्यामुळे तिकडच्या भाषांमध्ये क्रियापदांची वेगळी स्त्रीलिंगी रूपं विकसित झालेली दिसत नाहीत.

ज्या भाषांमध्ये स्त्रीलिंगी रूपं वेगळी असतात त्या भाषिकांच्या कानांना ती वेगळी-स्त्रीलिंगी रूपं ऐकायची सवय झालेली असते/ हैद्राबादला सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश अँड फॉरिन लँग्वेजेसच्या होस्टेलवर असताना घडलेला एक प्रसंग आठवतो.

एक बंगाली विद्यार्थी होता अगदी दारासिंग शोभावा असा धिप्पाड. एकदा जेवणाच्या वेळी तो आपल्या मित्राला मेसच्या दारात उभा राहून 'आलोच' म्हणून बंगालीत सांगत होता 'आस्चीऽ, आमि

अनुक्रमणिका

आस्चीऽ!' पण त्याचं ते (छान बंगालीतलं) बोलणं मराठी भाषिक विद्यार्थ्यांना इतकं विचित्र वाटत होतं की त्या दारासिंगसारख्या धिप्पाड माणसाच्या तोंडी ते मुळीच शोभत नव्हतं, म्हणजे मराठी(कानांच्या) 'दृष्टी'नं कारण मराठी कानांना ते 'आलीऽ - मी आलीऽ!' असं नागपुरी मराठीसारखं वाटत होतं नि त्याचं ते वाक्य ऐकून आमच्या मराठी घोळक्यातला भोपालच्या दोन मराठी मुली म्हणाल्याही की 'हा एवढा आडदांड मुलगा पण पण अगदी मुलीसारखा आली, गेली, बोलली करत बोलतोय! नाही का?'

४५
मराठीचं भवितव्य

आपल्या मराठी भाषेचं आता काय होणार हो? जगणार की नाही? आणखी किती काळ जगू शकेल? फक्त बोली भाषा म्हणून तरी उरेल की नाही? अशा तऱ्हेचे एक ना अनेक प्रश्न अलीकडे अनेकांच्या मनात डोकावतात, काहींच्या डोक्यात प्रामाणिकपणानं डोकावतात. काहींना असे प्रश्न भेडसवतात, काहींना ते बोलून दाखवण्याचीही आवश्यकता भासते, म्हणजे त्यांना हे प्रश्न अतिशय गंभीर वाटत असतात/ असावेत. इन्टरनेटच्या महा(कि माया) जालातली अनेक 'जाळी' मारू घातलेल्या भाषा| बोली इत्यादींबद्दल भयंकर माहिती देण्याचे रतीब घालतच असतात. आपण (स्वखर्चानं) अशा जाळ्यात (तासान् तास) गटांगळ्या खात अडकलो की आपली चिंता उगाचच चिघळते, वाढत जाते (आणि फोनचं बी लही) .

मराठीची परिस्थिती खरोखरच इतकी वाईट, इतकी गंभीर आहे हा? असा विचार केला तर एक सुखद गोष्ट सर्वप्रथम जाणवते ती ही की मराठी ही सुदैवानं फक्त मुंबई-पुण्यात राहण्याऱ्या उच्चभ्रू किंवा उच्च मध्यमवर्गीयांची भाषा नाही (खरं तर मुंबईत राहणाऱ्यांची ती आता राहिलेलीच नाही! मुंबईतल्या मराठी माणसांची उचलबांगडी होऊन काळ लोटला-) मराठी ही महाराष्ट्रात राहणाऱ्यांची भाषा आहे. मुंबई महाराष्ट्रात असली तरी सुदैवानं मुंबई म्हणजे महाराष्ट्र नव्हे! आपला देश खेड्यातून राहतो, आणि त्या ठिकाणी लोक अजूनही मराठीच बोलतात, ऐकतात, (काही काही साक्षर) लोक (केव्हा केव्हा) वाचतात सुद्धा आणि (काही लोक तर चक्क) लिहितातही! म्हणजे सामान्य माणसांची दैनंदिनी व्यवहाराची भाषा अजूनही मराठीच आहे.

लहान गावातल्या आई-बापांनाही आता आपल्या पोराला विंग्लिश साळत घालावं असं वाटतं पण ते जमत नाही म्हणजे आर्थिकदृष्ट्या त्यांना ते परवडत नाही, आणि पोटाला चिमटा घेऊन जे कोणी बिच्चारे आई-बाप आपल्या मुलांना इंग्लिश शाळेत घालतात, त्यांनाही (मराठीच्या सुदैवानंच म्हणायला पाहिजे!) इंग्लिश येत नाही कारण अशी मुलं कोणत्यातरी खाजगी शाळेत जात असतात, जिथे कसल्याच नियमांचं पालन होत नसतं. अनुदान असलेल्या शाळेतले शिक्षक निदान कागदोपत्री तरी शिक्षित असतात, प्रशिक्षितही असतात, पण विनाअनुदान वगैरे खाजगी शाळेत (अनुदान नसल्यामुळे त्यांना कुठलेच नियम लागू नसतात त्यामुळे) कशाचा काही पत्ता नसतो! परिणामतः मुलांना इंग्लिश येत नाही, अर्थात मराठीही चांगलं येत नाही, पण त्याला आपली मातृभाषा मराठी कामापुरती येत असते कारण तो मराठी वातावरणात राहत असतो.

ही परिस्थिती लहान गावातल्या किंवा खेड्यापाड्यातल्या शाळांचीच आहे असं मात्र नाही. अगदी खुद्द मुंबईतल्या इंग्लिश माध्यमाच्या अनेक शाळांमधून ह्याहून काही फारशी वेगळी परिस्थिती नाही! आपली मुलं असल्या शाळांत जाऊन धड इंग्लिशमन होत नाहीत नि धड मराठीही राहात नाहीत. अशा परिस्थितीत शेवटी ती अनिच्छेनं/ नाईलाजानं (कच्ची पण) मराठीच होतात/ उतरतात!

मागे आपले एक भाषासंचालक कोल्हापूरला आमच्या राजाराम महाविद्यालयात आले होते तेव्हा चहापानाच्या वेळी ते विनोदानं म्हणाले होते महाराष्ट्राला इंग्लिश न येणारा मुख्यमंत्री लाभला तरच मराठीचा उपयोग खऱ्या अर्थानं राज्यकारभारात मोठया प्रमाणात होऊ शकेल नि काय गंमत, पुढे फार

अनुक्रमणिका

थोड्या दिवसातच आपले सांगलीचे वसंतदादा पाटील मुख्यमंत्री झाले. दादा म्हणजे एकदम हुषार माणूस, अत्यंत कर्तबगार. प्रत्येक विषयात त्यांना रस होता, जाण असायची त्यामुळे प्रत्येक फाइल त्यांना बघायची असायची. ह्या सगळ्याचा चांगला परिणाम असा झाला की इंग्लिश मजकुरासोबत केवळ शासकीय ठराव म्हणून कसलंतरी मराठी भाषांतर नव्हे तर खरंखुरं मराठी टिपण त्या फायलींवर येऊ लागलं हे तर आपल्या महाराष्ट्राचं नि मराठीचं दुर्दैवच म्हणावं लागेल की कै. वसंतदादांसारखा एकभाषी, चाणाक्ष, कामसू मुख्यमंत्री आपल्याला फार काळ लाभला नाही! ते पूर्णकाळ / प्रदीर्घ काळ आपले मुख्यमंत्री राहिले असते तर आज मराठीचा वापर करावा की नाही असले वाद घालत बसण्याची वेळच आली नसती, सर्वदूर मराठी प्रत्यक्षात वापरात आलं असतं! पण आत्याबाईंना मिशा असत्या तर. . . वगैरे म्हणून हात-पाय गाळण्याची गरज नाही. वेळ अजूनही गेलेली नाही. आपण अजूनही निश्चय करू शकतो.

भाषा जिवंत राहणं म्हणजे तरी काय असतं? भाषेचं जिवंत राहणं दोन स्तरांवरचं असतं. पहिला महत्त्वाचा स्तर म्हणजे ती भाषा प्रत्यक्ष उपयोगात असणं, प्रयोगात असणं, प्रचारात असणं, कोटी-कोटी लोकांच्या मुखी असणं. हा पहिला उपयोगाचा स्तर बळकट असेल तरच अर्थात दुसरा स्तर शक्य असतो. मराठीच्या बाबतीत हा पहिला भाग सुदैवानं चांगला आहे पण अधिक चांगला होण्याची आवश्यकता आहे की ज्यामुळे दुसऱ्या स्तरावर तिची प्रतिष्ठापना अधिक उत्तम प्रकारे होऊ शकेल. दुसरा स्तर म्हणजे ज्ञान भाषा म्हणून प्रचारात असणं. आपल्या भाषेला सर्व स्तरांवर ज्ञानभाषा करण्यासाठी त्या भाषेच्या सुपुत्रांनी चिकाटीनं प्रदीर्घ प्रयत्न करण्याची आवश्यकता असते. असे प्रयत्न नेटानं केल्यास यश निश्चित येतं हे इतिहासांत आपल्याला ठायीठायी दिसून येतं.

मराठीचं भवितव्य काय असा प्रश्न खऱ्याखुऱ्या गांभीर्यानं विचारणाऱ्यांना ज्ञानभाषा म्हणून मराठीचं भवितव्य काय असंच म्हणायचं असतं. ह्या दृष्टीनं विचार करायचा झालं तर बऱ्याच मुद्द्यांचा विचार करायला पाहिजे; पण त्या तपशिलात आत्ताच न जाता असं म्हणता येईल की ज्ञानभाषा म्हणूनही मराठीचं भवितव्य सर्वसामान्यांना वाटतं तितकं वाईट नाही, निश्चितच नाही, पण म्हणून कोणी सर्व ठीकठाक आहे असं समजून गाफील राहू नये. मराठीचं भवितव्य शेवटी आपल्याच हातात आहे. जगाच्या आजपर्यंतच्या सांस्कृतिक इतिहासावर ओझरती नजर टाकली तरी हेच दिसतं की भाषेचे किंवा संस्कृतीचे मारेकरी परकीय नसतात, ते नेहमी स्वकीयच असतात!

त्या दृष्टीनं आपण सर्वांनी आणि आपण निवडून दिलेल्या सरकारनं पाळले तर मराठीच्याच नव्हे तर मराठी माणसाला उन्नतीसाठी उचललेलं ते एक महत्त्वाचं पाउलं ठरेल.

प्रत्येकानं आग्रहपूर्वक मराठी बोलावं, केवळ घरातच नव्हे तर सार्वजनिक ठिकाणीही. आपल्या मुलांना मराठी माध्यमातूनच शिकवावं. महाराष्ट्र शासनाच्या कार्यालयांतून महाराष्ट्रातल्या कोणत्याही संस्थेला किंवा व्यक्तीला दिलं जाणारं उत्तर हे मराठीतच असेल, (पत्र भले कोणत्याही भाषेतून आलेलं असो) चतुर्थ, तृतीय आणि द्वितीय श्रेणीतील नियुक्तीसाठी मराठी माध्यमाच्या शाळेतून शिकलेल्या उमेदवारांचाच विचार होईल, इतरांचा होणार नाही असे काही चार-दोन नियम करून ते अतिशय प्रामाणीकपणानं पाळले तर मराठी राहील की नाही, इतर लोक मराठी स्वीकारतील की विरोध करतील असले दुर्बळ प्रश्न पडणार नाहीत.

अनुक्रमणिका

४६
कानडीने केला मराठी भ्रतार

दोन भिन्न भाषा बोलणाऱ्या समाजांमध्ये कितपत सामंजस्य असतं/ असावं? जगात सामान्यात: असं दिसतं की भिन्न भाषिकांमध्ये सामंजस्य वगैरे काहीही नसतं. संधी मिळताच ते दोन्ही गट एकमेकांच्या उरावर बसायला सदा-सर्वदा तयार असतात; युरोपच्या इतिहासावर ओझरती नजर टाकली तरी हेच दिसतं. भाषिक असमंजपणातून (त्यालाच बऱ्याचदा गौरवानं 'भाषिक अस्मिता' वगैरे म्हणून गोंजारलं जातं!) तिकडे फुटाफूट होऊन वेगळी राष्ट्रं निर्माण झाली. त्यांच्या राष्ट्रवादाच्या उदयात बहुतेक ठिकाणी भाषिक अस्मिता हाच कळीचा मुद्दा होता. जर्मनी आणि ऑस्ट्रीयासारख्या देशांच्या बाबतीत तर असं दिसतं की एकच भाषा बोलणारे असूनही ह्या देशांचं एकमेकांशी कधीच जमलं नाही (ह्याला अपवाद म्हणजे हिटलरच्या काळात त्यानं ऑस्ट्रीयालाच जर्मनीत विलीन करून टाकलं होतं तो) .

भारतीय उपखंडात मात्र अशी भाषिक-तेढ, भाषिक-वैर असे प्रकार कधीही नव्हते आणि सुदैवानं आजही नाहीत असं म्हणायला हरकत नाही. भाषेच्या प्रश्नावरून वैर तर नाहीच नाही (अनेक राजकीय पक्षांनी आणि नेत्यांनी आपल्या स्वार्थासाठी भाषिक प्रश्नांना अधून-मधून खूप खतपाणी घालण्याचा प्रयत्न करूनही,) उलट विलक्षण भाषिक सामंजस्य असल्याची अजब उदाहरणंच भारतात आहेत, जगातल्या इतर समाजांनी कौतुकानं बघावीत, वर्णन करावीत अशी! असं एक उदाहरण खुद्द आपल्याकडेच आहे, ते म्हणजे मराठी-कन्नडचं.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेल्या भाषावार प्रांतरचनेमुळे राजकीय स्तरावर अल्प प्रमाणात महाराष्ट्र-कर्नाटक राज्यांमध्ये काही वाद, झगडे निर्माण झालेले असले (आणि सरकारांच्या धरसोड वृत्तीमुळे ते अजूनही सुटलेले नसले) तरी मराठी-कन्नड भाषिकांमध्ये कसलेही गैरसमज नाहीत कारण ह्या दोघांमध्ये गेल्या अनेक शतकांपासून चालत आलेली सामंजस्याची परंपरा.

केवळ भाषिक दृष्ट्या बघायचं झालं तर मराठी-गुजराती किंवा मराठी हिन्दी ह्या भाषा तशा भाषा म्हणून खूप जवळच्या आहेत, हे भाषाशास्त्रीय सत्य आहे पण ह्या दोन भाषिकांमध्ये, त्यांच्या संस्कृतीत खूपच फरक आहे. नर्मदेच्या दक्षिणेला आर्य कुटुंबातली मराठी भाषा बोलली जात असली तरी ती भाषा बोलणाऱ्यांची संस्कृती मात्र नर्मदेच्या उत्तरेकडच्या लोकांहून खूप वेगळी आहे नि त्यामुळेच मराठी-गुजराती किंवा मराठी-हिन्दी भाषिकांमध्ये परंपरेनं बेटी-व्यवहार होत नाहीत हे सत्य आहे. त्याउलट मराठी नि कन्नड ह्या भाषा तितक्या म्हणजे मुळीच जवळच्या नसल्या तरीही ह्या दोन भाषकांमध्ये बेटी-व्यवहार सरसकट होतात हेही ऐतिहासिक सत्य आहे 'मराठीनें केला कानडी भ्रतार'हा फार प्राचीन आहे.

काही शतकांपूर्वी कोकणपट्टीतून मराठी भाषिक मंडळी घाटावर येऊन स्थिरावू लागली त्यात मुख्यतः कोल्हापूर, बेळगाव, धारवाड, हुब्बळ्ळी हा घाटावरचा भाग होता कारण अनेक नैसर्गिक कारणांमुळे हा भाग राहायला सोयीचा होता, समृद्ध होता / आहे. ह्या भागात मराठी भाषिकांची वस्ती वाढली. खूप वाढली. कालांतरानं ती ग्रामीण भागातही हळूहळू झिरपली, पण फार थोड्या प्रमाणात. मध्ययुगातही महाराष्ट्राच्या उत्तरेकडून, विशेषत: शिवाजीच्या नि पेशव्यांच्या काळात मराठी माणसं मोठया प्रमाणात दक्षिणेत आली. त्यांची अनेक संस्थानं कन्नड भाषिक प्रदेशात स्थापली गेली, स्थिरावली आणि १९४७ पर्यंत सुखानं नांदली. त्यांच्या प्रभावामुळे त्या भागांतून मराठी शाळा निघाल्या, सरकारी कागदपत्रं

मराठीत(च) ठेवली जाऊ लागली. . . पण ह्यात कुठेही कधीही असमंजसपणा नव्हता, त्यातून कधी कुठे आंदोलनं झाली नाहीत की भिन्न भाषिकांमध्ये वैरभाव निर्माण झाला नाही.

नवीन भागात आलेली माणसं नेहमीच खूप कष्ट करतात, अतिशय समंजसपणानं नि सचोटीनं वागतात (सुरुवातीला तरी) . ह्या नि अशा सद्गुणांमुळे त्यांना बरंच काही साध्य करून घेता येतं, मराठी भाषिकांनीही तेच केलं. त्याचबरोबर त्यांनी स्थानिक भाषेशीच नव्हे तर स्थानिक माणसांशीही प्रेमानं जुळवून घेतलं, नव्हे प्रेमाचे संबंध निर्माण केले, मराठी-कन्नड भाषिकांच्यात सरसकट लग्नं होऊ लागली. ह्या लग्नांमधली गंमत म्हणजे लग्नाच्या वेळीं वधुवरांना एकमेकांची भाषा यायला(च) पाहिजे असं कधीही कोणालाही वाटलं नाही! 'कानडीने केला मराठी भ्रतार, एकाचे उत्तर एका न ये' अशी त्याची मराठी वाङ्मयात ऐतिहासिक नोंदही झालेली आहे.

कन्नड भाषिक प्रदेशात राहणाऱ्या मराठी कुटुंबामध्ये असलेल्या भाषिक सामंजस्याचं खरं तर जागतिक पातळीवर कौतुक करावं इतकं ते महान आहे! अशा घरातून मुलीला मराठी माध्यमाच्या शाळेत घालायची पद्धत होती कारण मराठी ही कुटुंबाची भाषा; तेव्हा मराठीचा वारसा आपल्या मुलांना मातृभाषेच्या रूपानं देण्याची जवाबदारी तिची; त्यामुळे तिला मराठी चांगलं यायलाच पाहिजे म्हणून तिचं शिक्षण मराठी माध्यमातून होत असे. मुलगा कन्नड भागात राहणार असल्यामुळे त्याला स्थानिक भाषा उत्तम प्रकारे येणं आवश्यक होतं; त्यामुळे मुलांचं शिक्षण कन्नड माध्यमातून होत असे. घरात कटाक्षानं मराठीचाच वापर होत असे/होतो.

कन्नड भाषिक कुटुंबांमधल्या एका मुलाचं शिक्षण मराठी माध्यमातून होत असे कारण घरचं कुलकर्णी, पाटील वगैरे वतन चालवायचं तर ती कागदपत्रं मराठीत ठेवायला लागायची त्यामुळे एक मुलगा तरी मराठीत शिकलेला असायचा. खरं तर मराठी आणि कन्नड असा भेद नव्हताच, ते सारे द्वैभाषिक होते! अनेक शतकं चाललेली ही परंपरा देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर मात्र क्षीण होत चालली आहे; पण अजून मेलेली नाही.

मराठी-कन्नडच्या ह्या सामंजस्याच्या पार्श्वभूमीवर भारतातल्या इतर भाषांची तुलना केली तर काय दिसतं? सहिष्णुता सर्वत्र आढळते ह्यात काहीच संशय नाही. भारतीय संस्कृतीचा तो अंगभूत गुण सर्वत्रच ठासून भरलेला आहे; पण मराठी-कन्नड भाषिकांसारखी जवळीक, घरोबा इतर कुठेही नाही.

आपल्याला नेहमीच आकर्षक वाटणाऱ्या, भुलवणाऱ्या युरोप-अमेरिकेतल्या लोकांच्या भाषिक सबंधाबाबत काय दिसतं? तीतर सगळी असहिष्णुतेचीच ज्वलंत उदाहरणं आहेत! नाक मुरडण्यापासून ते थेट कत्तली करण्यापर्यंतची असहिष्णुता.

इबेरियन प्रदेशात विशेषत: स्पेनमध्ये काय दिसतं? अरबांचा जोर असेल तेव्हा त्यांनी स्पॅनिश भाषिक ख्रिश्चनांच्या कत्तली करायच्या नि स्पॅनिशांची चांगली जमवाजमव झाली की त्यांनी जोर धरून अरबांच्या कत्तली करायच्या. 'तू किंवा मी' हाच तिथला न्याय होता. 'आपण दोघेही सुखानं राहूया!' हा सुसंस्कृत विचार त्यांना कधी कळलाच नाही.

अनुक्रमणिका

आधुनिकीकरणाच्या / पाश्चात्त्यीकरणाच्या नावाखाली / रेट्याखाली आपणही आपली सहिष्णुता गमावणार की काय अशी शंका येण्यासारखी परिस्थिती बऱ्याचदा दिसते; पण आपण तसं होऊ देता कामा नये. 'कानडीनें केला मराठी भ्रतार-' ह्या आपल्या परंपरागत सामंजस्याचं विस्मरण आपण कधीही होऊ देता कामा नये.

अनुक्रमणिका

४७
चांगली भाषा

चांगली भाषा म्हणजे काय हा प्रश्न सर्वांनाच पडत असतो नि त्यामुळेच प्रत्येक जण त्याबाबत विचार करून चांगल्या भाषेची स्वत:ची व्याख्या बनवत असतो. आपल्या प्राचीन परपरेतही चांगल्या बोलण्याबाबत 'सत्यं वद!' आणि 'प्रियं वद!' असे दोन मानदंड अत्यंत आग्रहानं सांगितलेले आहेत.

बोलण्याचा प्रश्न हा नेहमीच व्यक्तीशी संबंधीत असतो, तो संवाद असतो, समाजाशी किंवा समूहाशी त्याचा संबंध नसतो हेही लक्षात घेण्याजोगं आहे. (समूहाकडून किंवा समाजाकडून अपेक्षा असते ती जाणीवेची, सामंजस्याची, न्यायाची वगैरे.)

प्राचीन काळातली 'सत्यं वद' ही कल्पना (उघड-उघड नाही तरी प्रत्यक्षात) मागे पडलेली असली तरी 'प्रियं वद' ची कास मात्र व्यवहारचतुर लोकांनी सोडलेली नाही. 'सत्यं वद, धर्मं चर, स्वाध्यायात्. . .' वगैरे उपदेशाच्या काळापासून आजपर्यंत चांगल्या भाषेच्या कल्पनेतही अनेक स्थित्यंतरं घडलेली दिसतात. भाषेच्या विद्यार्थ्यांनी बदललेल्या पद्धतींचं भान ठेवणं अतिशय महत्त्वाचं असतं कारण ते भान सुटल्यास त्याला आपल्या भाषेतून अभिप्रेत असं काहीच मिळत नाही; म्हणजे भाषेतून, भाषेच्या माध्यमातून जे काय साधायचं असतं तेच हाती लागत नाही.

काही दशकांपूर्वी बोलताना किंवा लिहिताना भारदस्तपणा दाखवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात असे. (सर्वसामान्यांना कळणार नाही अशा) एखाद्या ग्रीक, लॅटिन, संस्कृत वगैरे उद्धरणानंच सुरुवात करायची असा अलिखित नियमच होता. बोलण्याच्या/लिहिण्याच्या ओघात अनेक गोष्टी गृहीत धरून आपलं अगडबंब वाचन/ विद्वत्ता दिसेल असे उल्लेख वरचेवर करत राहायचं! अनेक श्लोक, सुभाषितं (अनेकदा ओढून-ताणूनच) वापरायची. मोठमोठी पल्लेदार वाक्यरचना करायची (की वाचकाला दम लागला पाहिजे!) समोरच्याला आपलं बोलणं/ लिहिणं कळत आहे असं गृहीत धरून हे सगळं चालत असे! (आणि प्रत्यक्षात ते सर्वांना कळत नसे म्हणूनच 'मला त्यांतले फार काय कळलें नाहीं हो! पण लेखन/ भाषण विद्वत्तापूर्ण झालें!' असं अनेक जण त्या काळी म्हणत असत.) पण पुढे असा काळ आला की बहुसंख्य श्रोत्यांना/वाचकांना अन्य भाषेतली उदाहरणं मुळीच कळेनाशी झाली, तेव्हा विद्वानांनी त्यावर एक नामी उपाय शोधून काढला. संस्कृत उद्धरण समोरच्या माणसाच्या डोक्यावर/कानांवर हाणायचं नि मग 'ह्याचा अर्थ असा की. . .' म्हणून त्याला त्याचं मराठी भाषांतरही ऐकवायचं! अशा प्रकारची 'शैली' एके काळी अनेक लेखकांना प्रिय होती, जगातल्या इतर भाषांमध्येही ती प्रचलित होती. श्रोत्यांना हैराण करणारी ही 'डायना-असुरी' शैली पुढे सुदैवानं मागे पडली.

आज मराठीतच नव्हे तर इंग्लिश, जर्मन वगैरे बहुतेक सर्वच भाषांमध्ये साधी, सोपी, सरळ, सुटसुटीत भाषा वापरण्याची शैली वापरात आहे. आपल्याला काय म्हणायचं आहे ते जास्तीत जास्त सोपं करून समोरच्याला सांगणं/ सांगता येणं हाच खरं तर चांगल्या भाषेचा पहिला निकष आहे, सर्वोत्तम वापर आहे, तो जर साधता आला तर त्याला प्रासादिक शैली म्हणतात.

ही प्रासादिक शैली हस्तगत (खरं तर मुखोद्गत) करण्यासाठी मात्र सामान्यात: प्रयत्न करावे लागतात. मुळात म्हणजे आपल्या मनात मानवजातीबद्दल नव्हे तर एकूण सृष्टीबद्दलच अपार प्रेम असायला

पाहिजे. 'मी बुवा असंच लिहिणार/वागणार! पाहिजे तर समजून घ्या नाहीतर गेलात उडत!' अशी बेपर्वा वृत्ती असल्यास प्रासादिकता मिळवणं अवघडच. तेव्हा मुळात अपार प्रेम हवं, आपण काय सांगणार आहोत त्याबद्दल पूर्ण निष्ठा हवी, आपलं म्हणणं समोरच्याला कळलंच पाहिजे असा प्रेमळ आग्रह असेल तरच प्रासादिकता येऊ शकते. मराठीतल्या ज्ञानेश्वर-तुकाराम-रामादासांपासून म्हणजे अगदी कोणत्याही काळापासून कोणत्याही काळापर्यंतच्या मराठी संतांचीच नव्हे तर जगातल्या इतर कोणत्याही भाषेतल्या संतांची भाषा पहा (अगदी वाल्मीकि किंवा व्यास ह्यांचीही) , ती नेहमीच अतिशय सोपी, सहजपणे मनाला भिडणारी, हृदयाचा ठाव घेणारी असते. त्यात कुठेही गूढ, तांत्रिक वगैरे भाग नसतो. भाषेत रस असणाऱ्यांनी बायबल हा ग्रंथ अवश्य पहावा/ वाचावा. धर्मग्रंथ मानल्या गेलेल्या पुस्तकांमध्ये मला वाटतं भाषिकदृष्ट्या इतका प्रासादिक असलेला ग्रंथ दुसरा नसावा! तो इतका प्रासादिक होण्याचं कारण एकच, ते म्हणजे सांगणाऱ्यांच्या मनात भक्ताबद्दल असलेलं प्रेम, कळकळ आणि आपल्या विचारांवरची अपार निष्ठा.

सांगणाऱ्याच्याच मनात किन्तु असेल, लबाडी असेल, इतरांपासून काही लपवून ठेवण्याची वृत्ती असेल, अनास्था असेल तर प्रासादिकता कुठून येणार?! आपल्या दैनंदिन जीवनातही आपल्या अवती-भोवतीची शेकडो उदाहरणं तपासता येतील. उदाहरणार्थ राजकीय नेते (खोटं-खोटं असलं तरी) बऱ्यापैकी प्रासादिक बोलतात कारण त्यांचं बोलणं समोरच्यांना कळणं आवश्यक असतं. त्यांच्या खऱ्या-खोट्या आश्वासनांची भुरळ पडण्यासाठी तरी मतदार श्रोत्यांना त्यांचं बोलणं समजायलाच पाहिजे! त्यामुळे नेतेमंडळी प्रासादिक बोलतात. पण अधिकारी मंडळी ठोकळेबाज, नियमांवर बोट ठेवणारी उत्तरं देतात कारण आपण जनतेसाठी आहोत ह्याचं भानच त्यांना राहिलेलं नसतं, किंबहुना तमाम जनता आपल्या(च) सेवेसाठी आहे असा दृढ विश्वास असतो (नि वर्तनही) , त्यामुळे संवादाच संपतो नि प्रासादिकतेचा प्रश्नच उरत नाही! पण उत्तम कारभार करणारे, लोकहितवादी अधिकारी स्वाभाविकपणे प्रासादिकच बोलतात ह्याचा सुखद अनुभव आपण सहजतेनं (कधी कधी) घेऊ शकतो/घेत असतो! आई प्रासादिक बोलते, वडील (बऱ्याचदा) नियमबद्ध बोलतात! चांगले शिक्षक आणि वाईट ह्यांच्यात नेमका हाच फरक असतो!

चांगल्या भाषेचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मोजकेपणा, कुठे थांबायचं हे कळणं!

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेची भाषाविषयक प्रकाशने

१) **मराठी लेखन मार्गदर्शिका – यास्मिन शेख**
आवृत्ती दुसरी, पृष्ठे : १८२, मूल्य : ८० रुपये
सर्वसामान्य नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, मराठी भाषा शिकणाऱ्या अन्य भाषक व्यक्ती, दूरचित्रवाणीपटावर लेखन करणारे कलावंत, पाट्या रंगविणारे रंगारी, टंकलेखन, संगणकावर अक्षरजुळणी करणारे जुळारी अशा सर्वांना बिनचूक मराठी लेखन करण्यासाठी उपयुक्त पुस्तक. 'शुभदा सारस्वत'च्या सहकार्याने.

२) **प्रशासनिक मराठी भाषेचा विकास – गीता भागवत**
पृष्ठे : ४२२, मूल्य : १५० रुपये
प्रशासनिक मराठीचा वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेला अभ्यास. प्रशासनिक लेखन करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचनांसह.

- वा. वा. मिराशी स्मृती वैचारिक लेखन पुरस्कार (विदर्भ साहित्य संघ, नागपूर १९९७)

३) **शालेय मराठी शब्दकोश – वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके**
सुधारून वाढवलेली दुसरी आवृत्ती, पृष्ठे :३६०, डेमी चतुष्पत्री,
मूल्य : १०० रुपये.
इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विषयांच्या मराठी पाठ्यपुस्तकांशी संबंधित शब्द, संज्ञा, वाक्प्रचार आदींची सचित्र सोदाहरण ओळख. शुभदा सारस्वतच्या सहकार्याने.
मराठी भाषाविषयक लेखन पारितोषिक १९९९ (महाबँक, मराठी अभ्यास परिषद पुणे.)

४) **आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन – मिलिंद मालशे**
दुसरी आवृत्ती, पृष्ठे : २५६, मूल्य :१५० रुपये.
भाषाविषयाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासासाठी बी. ए. , एम. ए. मराठीचे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच भाषाविषयक जिज्ञासा असणाऱ्या वाचकांना उपयुक्त ग्रंथ. लोकवाङ्मयगृहाच्या सहकार्याने.

- महाराष्ट्र शासन पुरस्कार

५) **दखनी भाषा – मऱ्हाटी संस्कृतीचा एक अविष्कार – श्री. रं. कुलकर्णी**
पृष्ठे :२२६, मूल्य : ४५ रुपये
दखनी या आज बोलीरुपात अस्तित्वात असलेल्या भाषेचा मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीशी असलेल्या संबंधाचा वेध.

- महाराष्ट्र फाऊंडेशनचा समीक्षा पुरस्कार १९९९

६) **शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम – वासुदेव बळवंत पटवर्धन**
पृष्ठे :१८६, मूल्य :१६० रुपये
जन्मभाषेचा पाश तोडून आम्ही काम करणार? ना देश, ना गोत, ना राष्ट्र असे आम्हांस व्हावयाचे आहे काय? या प्रश्नाला भिडणारे मराठीच्या शिक्षणाशी संबंधित असलेले पुस्तक.

अनुक्रमणिका

७) **मराठी भाषा : वाढ आणि बिघाड – श्री. के. क्षीरसागर**
पृष्ठे : १९६, मूल्य : १६० रुपये
आपल्या भाषेच्या संदर्भात सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे प्रश्न घुटमळत आहेत त्याचा मुक्त मनाने घेतलेला परामर्श.

८) **"वृद्धिः" भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन – दिनेश द. माहुलकर**
पृष्ठे : १४०, मूल्य :१६० रुपये
भारतीय भाषाभ्यासात जिवंतपणा आणायचा असला तर भारतीय परंपरेचा वैज्ञानिक अभ्यास करायला हवा हे सांगणारा मौलिक ग्रंथ.

९) **बेलभाषा – सुमन बेलवलकर**
पृष्ठे : ११०, मूल्य :१०० रुपये
प्रत्येकाच्या मुक्त आविष्कारातून प्रकटणारी भाषा जी अंतर्गत सुसंबंद्ध व्यवस्था निर्माण करते तिचा खेळकरपणाने प्रत्यय देणारे पुस्तक.

१०) **भाषा आपली सर्वांचीच – अविनाश बिनीवाले**
पृष्ठे : १५०, मुल्य :१५० रुपये.
अनेक भाषासमुदायांना आता आपले काय होणार अशी भीती वाटते आहे. या प्रश्नाचे माहितीपूर्ण विवेचन.

पुस्तके मिळण्याचे ठिकाण

राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय ३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१ दूरध्वनी : २६५ ३९६६ / २६३ १३२५
आणि **महाराष्ट्रातील प्रमुख विक्रेते**

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेची नवीन प्रकाशने

१) शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम – वासुदेव बळवंत पटवर्धन

२) मराठी भाषा : वाढ आणि बिघाड – श्री. के. क्षीरसागर

३) 'वृद्धि :' भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन – दिनेश द. माहुलकर

४) बेलभाषा – सुमन बेलवलकर

५) भाषा – आपली सर्वांचीच – अविनाश बिनीवाले

अनुक्रमणिका